करवीर रियासतीची कागदपत्रे

संपादक : स. मा. गर्गे

तिसरा खंड

सं. मा. गर्गे यांचे साहित्य

प्रकाशित

सुलभ राज्यशास्त्र
राज्यशास्त्राचा विकास
राज्यशासन
समाजवादी समाजरचना
जिल्हा परिषद आणि पंचायत समिती
शांतिपर्वातील कथा
स्वप्न आणि सत्य
करवीर रियासत
करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड १, २ व ३
अर्थशास्त्र प्रवेश (सहकार्याने)
भारतीय राज्यघटनेचा इतिहास (सहकार्याने)
भारताचे लोकमत (संपादन)

आगामी

थोरले बाजीराव

87

महामहोपाध्याय द. वा. पोतदार
यांसी आदरपूर्वक भेट

स. मा. गर्गे
ता. २ जून १९६३

करवीर रियासतीची कागदपत्रे

तिसरा खंड



संपादक
सदाशिव मार्तंड गर्गे
'करवीर रियासत' ग्रंथाचे लेखक


करवीर रियासतीची कागदपत्रे खंड २ व ३
या दोन्ही इतिहास–साधन–ग्रंथांना
शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर
या संस्थेने संपूर्ण प्रकाशन–अनुदान दिले आहे

मूल्य दहा रुपये

प्रकाशक
सदाशिव मार्तंड गर्गे
'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर
पुणे ४


प्रकाशन काल
पहिली आवृत्ती
२८ मार्च १९७३

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
४६१/४ सदाशिव
पुणे ३०.



करवीर रियासतीची कागदपत्रे : तिसरा खंड
हा ग्रंथ
क्षत्रिय कुलावतंस मेजर जनरल हिजहायनेस सर
श्री. शहाजी छत्रपती महाराज, कोल्हापूर
यांस त्यांच्या ६३ व्या वाढदिवसाच्या शुभदिनी
स्नेहपूर्वक सादर

२८ मार्च १९७३ लेखक



ऋणनिर्देश

'करवीर रियासतीची कागदपत्रे' या साधन-ग्रंथमालेतील तिसरा खंड वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. या खंडात कागल (ज्युनियर) आणि प्रतिनीधी (विशाळगडकर) या दोन दप्तरातील कागदपत्रे प्रसिद्ध करण्यात आली आहेत. इतिहासाचे वाचक आणि अभ्यासक यांना या दोन प्रसिद्ध घराण्यांच्या संग्रही असलेली प्रस्तुत कागदपत्रे उपयुक्त वाटतील अशी अपेक्षा आहे.

कागदपत्रांचा हा संग्रह प्रसिद्ध करण्यासाठी **छत्रपती शहाजी महाराज** यांनी अगोदरच्या दोन खंडांप्रमाणे याही खंडाला साहाय्य केले. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच ही कागदपत्रे प्रकाशात येऊ शकली हे सर्व विदित आहे. महाराजांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

प्रस्तुत संग्रह आज फाल्गुन वद्य ९ (२८ मार्च) रोजी प्रसिद्ध होत आहे. आज छत्रपती शहाजी महाराजांचा ६३ वा वाढदिवस असल्यामुळे हा खंड प्रसिद्ध होण्यात फार मोठे औचित्य साधले जात आहे असे मला वाटते. या शुभप्रसंगी मी हा ग्रंथ त्यांना स्नेहपूर्वक अर्पण करतो व त्यांना दीर्घायुरारोग्य प्राप्त होवो अशी सदिच्छा व्यक्त करतो.

या खंडासाठी मला अनेकांचे सहकार्य लाभले आहे. त्या सर्वांचे ऋण मान्य करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. सर्वात प्रथम ज्यांनी मला ही कागदपत्रे उपलब्ध करून दिली त्यांचे आभार मानले पाहिजेत. कागलचे घाटगे आणि विशाळगडचे प्रतिनिधी ही दोन्ही घराणी कोल्हापूरच्या इतिहासाशी निगडीत आहेत. त्या घराण्यांचा फार मोठा इतिहास आहे. अशा थोर आणि प्रतिष्ठित घराण्यांच्या

दप्तरातील ही कागदपत्रे असल्यामुळे त्यांचे महत्त्व सहजच लक्षात येऊ शकेल. कागल (ज्युनियर) घराण्याचे विद्यमान वंशज श्रीमंत अजितसिंह यशवंतराव घाटगे सर्जेराव यांनी आणि प्रतिनिधी घराण्याचे श्रीमंत त्रिंबकराव ऊर्फ आप्पासाहेब भवानराव पंत प्रतिनिधी यांनी आपल्या दप्तरातून मला ही कागदपत्रे दिली. त्या दोघांचाही मी अत्यंत आभारी आहे.

कागदपत्रे मिळाली तरी त्यांची निवड करणे, त्यांचे बालबोधीकरण करवून घेणे, ती पुन्हा मूळ कागदपत्रांशी ताडून पाहाणे, तारखा काढणे, त्यांची दुरुस्ती करणे, मुद्रणप्रत बनविणे, इत्यादी कितीतरी किचकट आणि जिकिरीची कामे कराययाची असतात. या सर्व कामांत माझे मित्र रावसाहेब शं. ह. वर्टीकर, श्री. खंडेराव आनंदराव ऊर्फ नानासाहेब गायकवाड आणि श्री. रत्नाकरपंत ऊर्फ आप्पासाहेब राजाज्ञा या सर्वांचे सहकार्य अतिशय उपयोगी पडले. त्यांचा या कामी वेळोवेळी मला सल्ला मिळाला. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

प्रसिद्ध इतिहास संशोधक श्री. यशवंत नरसिंह केळकर यांनी मोडी वाचनाचे व मुद्रणाचे दोष मुद्दाम तपासून दिले. त्यांनी घेतलेल्या परिश्रमाबद्दल मी त्यांचा आभारी आहे. त्यांनी तयार केलेले शुद्धिपत्र या खंडाच्या शेवटी जोडले आहे.

छत्रपती शहाजी महाराजांचे चिटणीस श्री. यशवंतराव तस्ते यांचे सहकार्य नेहमीप्रमाणे याही वेळी उपयोगी पडले. त्यांचे मी आभार मानतो.

कल्पना मुद्रणालयाचे संचालक श्री. चिं. स. लाटकर यांनी उत्कृष्ट छपाई करून दिल्याबद्दल त्यांचा व प्रेसच्या कामगार बंधूंचा मी आभारी आहे.

२८ मार्च १९७३
‘ ज्ञानेश ’ १२०५/४ शिवाजीनगर — स. मा. गर्गे
पुणे ४

सांगता

करवीर रियासतीशी संबंधित कागदपत्रांचे संपादन व प्रकाशन करण्याचे मनात योजिले होते, तेव्हा सामान्यतः दोन खंडात काम पूर्ण होईल अशी कल्पना होती. पण कागदपत्रांचे वाचन करीत असता आणखी बरीच कागदपत्रे प्रकाशित होणे आवश्यक आहे असे वाटले, आणि मग त्यातूनच प्रस्तुत तिसरा खंड तयार झाला.

हे तिन्ही खंड प्रसिद्ध झाल्याने जणू योजिलेल्या कार्याची तूर्त तरी सांगता झाली आहे. वास्तविक पाहाता कागदपत्रांच्या संशोधनाला काळाची किंवा कागदपत्रांची मर्यादा घालणे अशक्यच असते. मराठ्यांच्या इतिहासाचा सुमारे दोनशे वर्षांचा काळ धरला तरी, केवळ या काळातील लक्षावधी कागद अद्यापही जागजागी जुन्या घराण्यांकडे, देवस्थानांत आणि ऐतिहासिक ठिकाणी तसेच पडून आहेत. म्हणूनच संशोधन कितीही काळ चालले व कितीही व्यक्तींनी वा संस्थांनी केले तरी ते अपुरेच पडेल. मी माझ्या पुरती तीन खण्डांची मर्यादा गृहीत धरलेली होती ती या खण्डाने पूर्ण झाली आहे एवढेच.

या कागदपत्रांचे संपादन करीत असता आणखी एक गोष्ट अशी लक्षात आली की शेकडो जुनी दप्तरे जीर्ण-शीर्ण झाली आहेत. त्यातील कागदपत्रांचा भुगा होत आहे. मोडी वाचणारांची संख्या कमी होत चालली आहे. किंबहुना पुढच्या दहा पंधरा वर्षानंतर मोडी कागदपत्रांचे वांचन करू शकतील अशी मंडळी सापडणे जवळजवळ अशक्य होईल. म्हणून मोडी वाचू शकणारांची उरलीसुरली पिढी अंतर्धान पावण्यापूर्वीच जेवढे अधिक काम होईल तेवढे अगत्याचे आहे. मरा-

ह्यांच्या इतिहासातील कितीतरी महत्त्वाचे दुवे अद्याप जोडले जावयाचे आहेत. अस्सल पुराव्याच्या अभावी अनेक प्रसंग अनिर्णित आहेत. तर अनेक व्यक्तींच्या गुणावगुणांचे योग्य मूल्यमापन निःसंदिग्धपणे करण्यासाठी अजूनही महत्त्वाची कागदपत्रे हाती लागणे आवश्यक आहे.

साधनसामग्रीची अशी अवस्था आणि ती प्रकाशित होण्यातील प्रतिकूलता यांच्या पार्श्वभूमीवर **छत्रपती शहाजी महाराज** यांचे कार्य किती मोलाचे आहे हे निराळे सांगण्याची गरज नाही. त्यांनी गेली पंचवीस तीस वर्षे अज्ञात इतिहासाला प्रकाशात आणण्याचे महत्‌कार्य हाती घेतले आणि ते आजच्या काहीशा प्रतिकूल परिस्थितीतही आर्थिक झीज सोसून नेटाने चालू ठेवले आहे. जणू हे कार्य त्यांच्या निदिध्यासाचा विषय बनले आहे. कोल्हापूरच्या इतिहासापुरतेच सांगावयाचे म्हटले तरी, श्री. मा. वि. गुजर यांनी महाराजांच्या प्रोत्साहनाने 'कोल्हापूर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने,' आठ खण्डात प्रसिद्ध करून या कार्याचा पूर्वार्ध संपविला.

त्यानंतर इ. स. १९६६ पासून या इतिहासकार्याचा उत्तरार्ध सुरू झाला. आणि गेल्या सहा सात वर्षांत सातत्याने इतिहास लेखन, संशोधन, संपादन प्रकाशन होत राहिले. या अल्पशा काळात एकूण नऊ ऐतिहासिक ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. त्यातील पाच साधन-ग्रंथ आहेत. या साधनग्रंथातील माहितीची विविधता आणि उपयुक्तता लक्षात येण्यासाठी पुढील एकत्र दिलेला तपशील वाचकांना उद्‌बोधक वाटेल.

ग्रंथाचे नाव		पत्रसंख्या	पृष्ठसंख्या	प्रकाशन काळ
१ करवीर रियासतीची कागदपत्रे खंड १ :		**२४१**	**३३६**	**३१ मार्च १९७०**
निवडी दप्तर	१५९			
तोरगल दप्तर	३६			
हुजूर खाजगी दप्तर	२७			
राव विश्वासराव गायकवाड	१९			
२ करवीर रियासतीची कागदपत्रे खंड २ :		**२४४**	**२६८**	**९ मार्च १९७२**
चिटणीसी	१५१			
पारसनीसी	३१			
सरलष्कर निंबाळकर दप्तर	२२			

चावरेकर शिंदे दप्तर १९			
निपाणकर दप्तर २१			
३ करवीर रियासतीची कागदपत्रे खंड ३ :	**२२१**	**३००**	**२८ मार्च १९७३**
कागल (ज्युनियर) दप्तर १०९			
पंत प्रतिनिधी दप्तर १११			
४ करवीर सरदारांच्या कैफियती*	**५९**	**३०४**	**जानेवारी १९७१**
कैफियती ४३			
वंशावळी १६			
५ कापशीकर सेनापती घोरपडे घराण्याची कागदपत्रे**	**३९४**	**४३३**	**मे १९७१**

वरील सर्व साधन ग्रंथांची पृष्ठ संख्या १६४१ असून त्यांत ११५९ ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध झाली आहेत.

या सर्व कागदपत्रांची वैशिष्टये, त्यातील उपयुक्त माहिती आणि त्यांचे ऐतिहासिक संदर्भातील महत्त्व त्या त्या ग्रंथांच्या प्रस्तावनांतून विशद केलेच आहे. येथे त्यांची पुनरावृत्ती करण्याची गरज नाही. या कागदपत्रांबरोबर वानगी दाखल काही मूळ मोडी कागदपत्रांचे ठसे आणि करवीरच्या राजघराण्यातील प्रमुख व्यक्तींच्या राजमुद्राही छापल्या आहेत.

सुदैवाने महाराष्ट्रात इतिहास संशोधनाची परंपरा फार मोठी आहे. अनेक थोर पुरुषांनी हे क्षेत्र परिश्रमपूर्वक समृद्ध करून ठेवलेले आहे. त्यात अल्पांशाने का होईना भर घालण्याची संधी मला मिळाली याचा मला अभिमान वाटतो. इतिहासाच्या अभ्यासकांना या ऐतिहासिक साधनसामुग्रीचा उपयोग होईल अशी मी आशा करतो.

स. मा. गर्गे

---

* संपादक : श्री. खं. आ. गायकवाड. ** संपादक : श्री. शं. ह. वर्टीकर.

अनुक्रमणिका

कागदपत्रासंबंधी स्पष्टीकरण

या खंडात निरनिराळ्या दोन दप्तरातील एकूण २२१ कागदपत्रे समाविष्ट केली आहेत. त्यासंबंधीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

(१) कागल ज्युनियर दप्तर : १०९

श्रीमंत अजितसिंह यशवंतराव घाटगे माजी जागीरदार कागल (ज्युनिअर) यांचे खाजगी दप्तर

(२) प्रतिनिधी दप्तर : ११२

श्रीमंत त्र्यंबकराव उर्फ आप्पासाहेब भवानराव पंत प्रतिनिधी (विशाळगड) यांचे दप्तर

एकूण कागदपत्रे : २२१

प्रास्ताविक

'करवीर रिसायतीची कागदपत्रे : खंड तिसरा' या साधन-ग्रंथात, कागल ज्युनियर आणि प्रतिनिधी विशाळगडकर या दोन घराण्यांतील कागदपत्रांचा समावेश केलेला आहे. ही दोन्ही घराणी मराठ्यांच्या इतिहासात आपल्या कर्तृत्वाने नावाजलेली होती. कागलचे घाटगे सर्जेराव यांचे घराणे विजापूरच्या बादशाहीपासून लौकिकाला पोहचले होते. आदिलशाहीने या घराण्याला जहागीर आणि मानमरातब बहाल केले होते. नंतर त्या घराण्याचा मराठेशाहीशी संबंध आला. शककर्ते शिवाजीमहाराजांपासून अगदी अलीकडच्या काळापर्यंत घाटगे घराण्याचा छत्रपतींच्या घराण्याशी निकटचा संबंध दिसून येतो. राजकीय संबंधाप्रमाणे नात्यागोत्याचाही संबंध अनेकदा आलेला आहे. प्रतिनिधींचे पद राजाराम महाराजांच्या काळात निर्माण झाले व या घराण्याची एक शाखा नंतर करवीरकडे आली.

कागल ज्युनिअर दप्तर

शककर्ते शिवाजी महाराजांनी विठोजी घाटगे यांस लिहिलेले पत्र (लेखांक १) आणि त्यालाच पूरक असे लेखांक २, ३, ४ वाचले म्हणजे त्यावेळच्या विशिष्ट राजकीय घटना आणि हालचाली यांच्यावर एक नवा प्रकाश पडतो. या चारही लेखांचा एकत्र विचार करून त्यांची सर्व अंगोपांगांनी चिकित्सा करणारा एक स्वतंत्र लेख 'छत्रपतींची दोन अस्सल पत्रे' या मथळ्याखाली याच संग्रहात इतरत्र प्रसिद्ध केला आहे. हा लेख प्रथम 'महाराष्ट्र टाइम्स' या मुंबईच्या मराठी दैनिकात ता. २७ ऑगस्ट १९७२ रोजी प्रसिद्ध झाला होता. त्याचे ऐतिहासिक महत्त्व लक्षात घेऊन पुन्हा या संग्रहात तो उद्धृत करण्यात आला आहे.

संभाजी महाराज करवीर यांनी विठोजी बिन पिराजी यांस इ. स. १७१८ साली दिलेले वतनपत्र (लेखांक ५) आणि विठोजीचाच भाऊ राणोजी घाटगे यांस शाहू महाराजांनी इ. स. १७२५ साली गांव इनाम दिल्याची सनद (लेखांक ६) या दोन्हींचा एकत्र विचार केला म्हणजे त्यावेळी कोल्हापूर आणि सातारा या दोन राज्यांत चाललेल्या राजकीय संघर्षाची कल्पना येते. दोन्ही छत्रपती कागल घराण्यातील दोन भावांना आपापल्या पक्षात सामील करण्यास कसे उद्युक्त करीत होते हेही त्यावरून लक्षात येते.

संभाजी महाराज करवीर यांनी भगवंतराव अमात्य यांना नार सावंत कुडाळकर याला 'मारून काढण्यास' जाण्याचा हुकूम (लेखांक ७) दिला होता. आणि हे काम 'बहुत नाजूक' असल्यामुळे अतिशय काळजीपूर्वक करण्याचे

कळविले होते. लेखांक ८ आणि २६ यामध्ये कागलकरांना दिलेले नाडगौडकी आणि देसकतीचे वतन तपशीलवार सांगितले आहे. त्यात वतनादाखल मिळणाऱ्या हक्कांचा तपशीलही दिला आहे तो वाचण्यासारखा आहे. रयतेकडून कोणत्या वस्तू किती आणि कोणत्या स्वरूपात मिळाव्यात याची त्यात यादी दिली आहे. त्यावरून तत्कालीन उद्योगधंदे आणि त्यातून वतनदाराला द्यावे लागणारे हक्क यांची माहिती मिळते. घाण्याचे तेल, साळी, कोष्टी आणि धनगर यांच्याकडून मिळणाऱ्या वस्तू विड्याची पाने, फसकी, चांभाराकडून जोडा इत्यादींचा उल्लेख तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात समजून घेण्यासारखा आहे.

कागलकरांचा करीना (लेखांक १०) म्हणजे त्या घराण्याच्या इतिहासाचे एक माहितीपूर्ण टिपणच आहे. त्यात या घराण्याला सर्जेराव हे नांव कसे मिळाले, शहाजी महाराजांकडे घाटगे बंधू कोणत्या प्रसंगी नोकर होते, त्यातील एक बंधू रामचंद्रपंत अमात्याजवळ राहून चाकरी करीत होता, अशी किती तरी माहिती यात समाविष्ट आहे. घाटग्यांच्या एका भांडणाचा इन्साफ ताराबाईंनी केला आणि त्यावेळी रामचंद्रपंत, हिंदुराव, चंद्रसेन जाधव, गिरजोजी यादव इत्यादी प्रमुख मंडळी उपस्थित होती हा त्यातील उल्लेखही महत्त्वाचा वाटतो.

इंचलकरंजीकर घोरपडे आणि कागलकर घाटगे यांचे संबंधही निकटचे होते असे लेखांक ११, १२ यावरून स्पष्ट दिसते.

संभाजी महाराज करवीर, निधन पावल्यानंतर नानासाहेब पेशवे यांनी कोल्हापुरावर फौज पाठविली आणि या फौजेला मदत करण्यासाठी यशवंतराव घाटगे यांना कळविले (लेखांक १३) याच संदर्भात लेखांक १४ ही वाचण्यासारखा आहे.

पेशव्यांचा विरोध न जुमानता जिजाबाईंनी शहाजी भोसले खानवटकर याला दत्तक घेतले. त्याबद्दल रघुनाथराव पेशवे आणि माधवराव पेशवे यांनी (लेखांक १७, १८) जिजाबाईंना पत्रे पाठविली.

बाबाजी अनंत महाशब्दे यांना कागलकरांनी वतनाची मुतालकी दिली त्याचा तपशील लेखांक १९, २० मध्ये दिला आहे.

जिजाबाई नंतर छत्रपतीच्या घराण्यातील दुर्गाबाईंनी दिलेले एक आज्ञापत्र (लेखांक २१) येथे उपलब्ध आहे.

पेशवे, पटवर्धन आणि कागलकर घाटगे यांचे परस्परसंबंध लेखांक २२ आणि २४ यावरून दिसून येतात.

इ. स. १८०० मध्ये रामचंद्र परशुराम पटवर्धन यांनी पेशवे आणि दौलतराव शिंदे यांच्या मदतीने कोल्हापूरवर स्वारी केली. त्यावेळी शिवाजी

महाराज करवीर यांनी दौलतराव शिंद्यांचे कारभारी व सासरे सखाराम घाटगे यांच्याकडे संधान जोडले. घाटगे यांनी शिंद्यांच्या मार्फत पटवर्धनांना स्वारी मागे घेण्यास भाग पाडले. त्यामुळे त्यावेळी कोल्हापूरवरचे एक मोठे संकट टळले. छत्रपतींनी या कामगिरी बद्दल सखाराम घाटगे यांस यशवंतराव घाटगे यांची काही ठाणी दिली. पण तेव्हापासून कागलच्या दोन घराण्यात वडिल-धाकटेपणाचा व वतनाचा वाद उत्पन्न झाला. हे प्रकरण पुढे अनेक वर्षे तसेच चालू होते. त्याची तपशीलवार माहिती लेखांक ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३७, ४२ इत्यादी मध्ये आलेली आहे.

'कागलची जहागीर छत्रपतींच्या अखत्यारीतील आहे', असा एलफिन्स्टन याने इ. स. १८१३ मध्ये निर्णय जाहीर केला (लेखांक ४०). पण त्याचबरोबर कागलकराशी कसे वागावे याविषयी छत्रपतींना आवश्यक तो सल्लाही दिला.

छत्रपती आबासाहेब यांचा खून अंबाबाईच्या चौकात सयाजी बाजी मोहिते याने केला. त्या खुनाची कारणे आणि इतर घटनांचा तपशील लेखांक ४१ मध्ये दिलेला आहे. त्यामुळे या घटनेवर अधिक स्पष्ट प्रकाश पडतो.

आबासाहेब महाराजानंतर छत्रपतिपद बुवासाहेबांकडे आले. बुवासाहेब आणि कागलकर घाटगे यांचे वितुष्ट अनेक वर्षे चालू होते. बुवासाहेबांनी कागलवर स्वाऱ्या केल्या, तेथील वाडे लुटले आणि घाटगे घराण्याला अनेक प्रकारांनी उपद्रव दिला. त्याविरुद्ध घाटग्यांनी इंग्रजांकडे तक्रारी केल्या. तसेच बायजाबाई शिंदे यांच्याकडेही विनंती पत्रे पाठविली. (लेखांक ४४, ४५, ४६, ४७, ४८, ४९, ५१, ५३, ५४, १०५, १०७, १०८) हे प्रकरण शेवटी इतके विकोपाला गेले की त्याबद्दल इंग्रजांनी बुवासाहेबांना खडसावून ताकीद दिली की त्यांनी कागलविरुद्ध कोणत्याही प्रकारे कारवाई करू नये आणि कागलची जहागीर ताबडतोब हिंदुराव घाटगे यांच्या स्वाधीन करावी. इंग्रजांना कोल्हापूर छत्रपतींचे अधिकार काढून घेण्यासाठी कागलकरांचे निमित्त सापडले आणि त्यातूनच छत्रपतींच्या अधिकारावर, हालचालीवर मर्यादा पडल्या.

कागलच्या घाटगे घराण्यासंबंधी ऐतिहासिक माहिती मिळण्यासाठी पुढील लेखांक अतिशय महत्त्वाचे आहेत. लेखांक ६४, ७३, ८०, ८१, ८८, ९२, ९५, ९७, ९८ या लेखांकांत कागलकरांची जुनी परंपरा, घराण्यातील कर्तबगार पुरुष, त्यांनी केलेली महत्त्वाची कामे, इत्यादि संबंधी महत्त्वाचे संदर्भ सापडतात. किंबहुना हे सर्व लेखांक म्हणजे घाटगे घराण्याचा इतिहास सांगणारे महत्त्वाचे दुवेच आहेत. मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीने त्यांचे वैशिष्ट्य समजून घेण्यासारखे आहे.

घाटगे घराण्याकडे इंग्रजांच्या काळात फौजदारीचे हक्क मिळाले होते. ही

कामे कशी पार पाडावीत या संबंधीचे एक तपशीलवार टिपण लेखांक ७१ मध्ये दिलेले आहे. नंतर हे हक्क काढून घेतले, (लेखांक ८६).

कागलकरांच्या दप्तरातील आणखी काही महत्वाची माहिती अशी : सामानगडचे बंड– (ले. ६७), जैन, लिंगायत आणि ब्राह्मण यांच्या परस्पर संबंधाविषयी एक महत्वाचा निर्णय (ले. ६६), १८५७ च्या बंडात भाग न घेण्याची ताकीद (ले. ८४), दत्ताजीराव (शाहू महाराजांचे वडील) यांना दत्तक घेण्याची परवानगी (ले. ९०).

या दप्तरातील लेखांक ९१ अतिशय महत्त्वाचा आणि तत्कालीन काही महत्त्वाच्या घटनांवर प्रकाश टाकणारा आहे. ही एक उद्‌बोधक याद आहे. तत्कालीन घटना, विशेषतः शिवाजी महाराज (चौथे) यांच्या संदर्भात कशा घडल्या, महाराजांचा कोण आणि कसा छळ करीत होते, याविषयी या लेखांकांत, घाटगे यांनी आपले कारभारी पांडोबा रेंदाळकर यांच्यासाठी सूचनात्मक माहिती नमूद करून ठेवली आहे. शिवाजी महाराजांविरुद्ध कारभारी बर्वे, रामभाऊ ऐनापूरकर, जामदार इत्यादींनी जणू कारस्थानच केले होते. त्याचा परिणाम शिवाजी महाराजांच्या प्रकृतीवर आणि बुद्धीवरही झाल्याचे दिसते; नंतर त्यांना इंग्रजांनी अहमदनगरच्या किल्ल्यात नेऊन ठेवले. नाना भिडे सारख्या काही लोकांना छत्रपतींच्या छळाला वाचा फोडली आणि नंतर हे प्रकरण लोकमान्य टिळकांनी ‘ केसरी ’त प्रसिद्ध केले. या साऱ्या इतिहासाची पार्श्वभूमी लक्षात येण्यासाठी लेखांक ९१ मधील माहिती अतिशय उपयुक्त वाटते.

या संग्रहातील विशाळगडकर प्रतिनिधींच्या दप्तरातील कागदपत्रेही इतिहासाच्या अभ्यासकांना महत्त्वाची वाटतील.

राजाराम महाराजांनी जिंजीस असताना दिलेली वतनपत्रे (लेखांक ११०, १११, ११२) म्हणजे त्यावेळच्या सेनाधिकाऱ्यांना किंवा गडकऱ्यांना दिलेली प्रोत्साहन-पत्रेच आहेत. पावनगड आणि पन्हाळा या किल्ल्यावरील कामगिरीबद्दल विठोजी केसरकर आणि काशी रंगनाथ ओरपे यांना दिलेली वतनपत्रे विशेष महत्त्वाची आहेत. रामचंद्रपंत अमात्यांचा त्यातील उल्लेख त्यांचे त्यावेळचे राजकीय स्थान दर्शविणारा आहे. अशाच प्रकारची वतनपत्रे शिवाजी महाराज (राजारामाचे पुत्र) यांनीही नंतर दिलेली आहेत. (लेखांक ११५, ११६).

राजकीय घडामोडींच्या संदर्भात लेखांक १४०, १४१, १४२, १४३, १४४, १४५, १५०, १५१ इत्यादी महत्त्वाचे आहेत. त्यात महादजी शिंदे यांनी कोल्हापूरला वेढा दिला त्यावेळी कोणत्या घटना घडल्या, त्यानंतर कोल्हापूर आणि पेशवे यांचा तह कसा झाला, त्यातील महत्वाच्या अटी कोणत्या इत्यादी

प्रतिनिधी दप्तर

संबंधी महत्वाची माहिती मिळते. तसेच सवाई माधवरावांनी सदाशिवराव भाऊंच्या तोतयाला पकडून ठार मारण्याचा केलेला हुकूम (लेखांक १३८) आणि परशुरामभाऊ पटवर्धन यांना दिलेली ताकीद (लेखांक १४५) ही दोन पत्रेही उल्लेखनीय आहेत.

दौलतराव शिंदे यांचेकडे नारायणराव घोरपडे यांनी लावलेले संधान (लेखांक १५९) आणि दुसऱ्या बाजीरावाने बावडेकरांविरुद्ध केलेली तक्रार (लेखांक १६०) यासंबंधीची माहितीही तत्कालिक ऐतिहासिक घटनाच्या संदर्भात महत्वाची वाटते.

प्रतिनिधींच्या दप्तरातील कागदपत्रे राजकीय घटनांपेक्षा सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या अधिक अभ्यसनीय आहेत. विशेषतः, तत्कालीन शेतीची सुधारणा न्यायानिवाडे आणि धार्मिक विधी व प्रथा यांचा अभ्यास करण्यासाठी तर ही कागदपत्रे खरोखर अद्वितीय मानावी लागतील.

त्याकाळी देवीचा उत्सव (लेखांक २२१), अन्नछत्रे (ले. १९९), देवालयाला दिवाबत्ती (ले. १२७) नंदादीप (ले. १७९), चंद्रग्रहण (ले. १२९), भूमिदान (ले. १८१), नवरात्र महोत्सव (ले. १९५) या हिंदूंच्या सण समारंभांबरोबरच पीर आणि मशीद यांनाही देणग्या देण्यात येत होत्या (लेखांक १६८ व २११).

छत्रपतींनी प्रतिनिधींकडे निरनिराळ्या गमतीदार वस्तूंची मागणी केल्याचे उल्लेख काही पत्रात सापडतात. वर्षश्राद्धाबद्दल रक्कम (ले. १५४), हुजूर लग्नाबद्दल रक्कम (ले. १६५), मध, तूप, सागवानी लाकूड, फळफळावळ, पूजेसाठी गाय इत्यादी वस्तूंची मागणी (ले. १८४, १८९, २०४, २१०, २१२, २१३)

रयतेस उपद्रव देऊ नये, इनामगावचा वसूल घेऊ नये, वसूलासाठी रयतेवर जुलूमजबरदस्ती होऊ नये, मुजावरला त्रास देऊ नये यासारखे प्रतिनिधींचे काही हुकूमही लक्षात घेण्यासारखे आहेत. (ले. १५५, १५६, १८०, २१९). त्याबरोबरच गाव ओस पडले तेथे पुन्हा वसती करावी अशी आज्ञापत्रेही दिलेली आहेत (ले. १६९, १७०, १७३). बाजारात जकातीचा उपद्रव देण्यात येऊ नये (ले. २०२) आणि गावाला बाजार भरविण्याची आज्ञा (ले. २१८) हेही वरील संदर्भात लक्षात घेण्यासारखे लेखांक आहेत.

याच सर्व लेखांकाची दुसरी बाजू म्हणून लेखांक १७२ वाचण्यासारखा आहे. लोकांकडून किती प्रकारच्या पट्ट्या घेतल्या जात असत, किती प्रकारचे

वसूल करीत असत, यांची जणू एक यादीच या लेखांकात दिलेली आहे.

अठराव्या शतकातील आर्थिक स्थिती आणि न्यायदानाच्या पद्धती यांचा अभ्यास करण्याचा दृष्टीने तर प्रतिनिधी दप्तरातील काही कागदपत्रे अत्यंत उपयुक्त आणि उद्‌बोधक आहेत. त्या सर्वांचा तपशील येथे देता येणार नाही. तो सारा मूळातूनच वाचण्यासारखा आहे. पण त्यातील काही महत्वाचे उल्लेख असे :

विशाळगडकरांची काही गावे समुद्राच्या खाड्यांनी वेढलेली होती. तेथील खाजण जमिनी लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न खर्चाचे असत, तसेच परिश्रमाचे असत. अशा शेताना बांध बंदिस्ती करणे आणि तेथे लागवड करून जमिनीत पीक काढणे अतिशय कष्टाचे असे. अर्थात एवढे सर्व केल्यानंतर जमीनमालकांना वसुलात सूट मिळणे आवश्यक असे. काही जमीनमालकांनी खाडीत भर घालून शेताभोवती चिरेबंदी बांध घातले आणि अशा प्रकारे पिकाऊ जमीन वाढविली. या खटाटोपासंबंधीचा तपशील १३१, १६३, १७६, १९२, १९७ इत्यादी लेखांकात दिलेला आहे.

याच संदर्भात जमाबंदी, कारसाई, सारामाफी, जमिनीची बंदिस्ती, त्यासाठी लागणारा खर्च, गाव ओस पडणे, ते पुन्हा वसविणे, त्यासाठी भरपाई आणि सूट देणे, जमिनीच्या स्वामित्वाची रक्कम, मक्ता, निरनिराळ्या पट्टया (पोशाखपट्टी, लग्नपट्टी, फाळापट्टी, आंबेपट्टी, स्वारीपट्टी इ). वेठबिगार, जकात इत्यादी किती तरी शब्द, त्यांचे योग्य संदर्भातील अर्थ, त्यामागील आर्थिक स्वरूपाचे आशय, हे सर्व जाणून घेतले तरच १८ व्या शतकातील शेतीच्या संदर्भातील अर्थस्थिती लक्षात घेण्यासारखी आहे. हे सारे शब्द म्हणजे जणू त्या काळातील अर्थ-व्यवहारातील परिभाषाच होय.

प्रतिनिधींच्या दप्तरातील काही न्याय-निवाडे अप्रतिमच म्हणावे लागतील. ते वाचीत असताना त्यावेळची न्याय करण्याची पद्धती, साक्षी आणि जबान्या नोंदवून घेण्याची रीत, फिर्यादी व आरोपी यांना विचारले जाणारे प्रश्न, आरोप सिद्ध झाल्यावर दिल्या जाणाऱ्या निरनिराळ्या शिक्षा हे सर्व अभ्यास करण्या-सारखे आहे. न्यायपंचायतीत समाजातील सर्व जाती धर्मांचे लोक सामील असत हेही लक्षात येते.

एका न्याय निवाड्याच्या बाबतीत (ले. ११४) रामचंद्रपंत अमात्य यानी निर्णय दिला आहे. तर, दुसऱ्या एका वादाचा निर्णय (ले. ११८) परशुराम पंत प्रतिनिधी यांनी केलेला आहे. पहिला निकाल देताना म्हटले आहे, 'मौजे मजकुराचे वतनी कुलकर्णपण फाटकांचे असे. कागदोपत्री व साक्षीतील अन्वय पहाता फाटकाचे कुलकर्णी असे खरे केले.' कागदपत्रांचा पुरावा व साक्षी यांचे येथे महत्त्व मानलेले आहे.

एका निवाड्याच्या बाबतीत, पेशव्यांचे त्याकाळचे प्रसिद्ध न्यायाधीश रामशास्त्री प्रभूणे यांच्याकडे प्रकरण सोपविण्यात आले (ले. १४९) आणि मग त्यांनी त्यासंबंधी साधक-बाधक पुरावा समजून घेऊन आपला निर्णय दिला. या प्रकरणी अगोदर एका पक्षाकडून ' अंतस्त दोनशे रुपये घेऊन निकाल दिला होता,' असेही रामशास्त्रींना दिसून आले, म्हणून त्यांनी तो निकाल फिरविला आणि मग दोनशे रुपये ज्याचे त्यास परत करण्याची आज्ञा दिली.

बहुतेक वादांची प्रकरणे वतनदारी आणि भाऊबंदकी यांच्याविषयीची आहेत पाटीलकी, कुलकर्णीपण आणि तत्सम इतर वतनामुळे बरेच खटले होत असत (ले. ११४, ११८, १२२, १२३, १४६, १५२, १५७, १७५, १८७).

त्याकाळी धार्मिक नीतीनियमांची व देवाची भीती आणि आदरभाव मनात जागा असल्यामुळे लोक सत्यकथन करीत असत असे काही वादातील साक्षी-पुराव्यावरून दिसते. एका खटल्यात (लेखांक १४७) विशिष्ट जागा कोणाची आहे असा वादाचा मुद्दा होता. तेव्हा एका पक्षाने मंदीरात देवापुढे उभे राहून आपले म्हणणे खरे असल्याचे निवेदन करण्याची तयारी दर्शविली आणि त्याप्रमाणे त्याने करूनही दाखविले. त्यामुळे अधिक पुरावा घेण्याची गरज पडली नाही. प्रतिपक्षानेही ते मान्य केले आणि मग त्याला अनुसरून निर्णय देण्यात आला.

'दिव्य' करण्याची पद्धत काही प्रकरणी अनुसरण्यात येत असे. एक पक्ष दिव्य करण्यास सिद्ध झाला व दुसऱ्याने त्याबाबतीत माघार घेतली. म्हणून, ' उभयता वाद्यांमध्ये एक अमान्य झाला म्हणजे सहजच अप्रमाण ऐसी पत्रे आली, आणि मग ती पत्रे पंचयातीपुढे ठेवून दिव्य करण्यास तयार असणाऱ्याच्या बाजूने निकाला दिला गेला.' या खटल्यातील दिव्याचा उल्लेख ' दशरात्र दिव्य ' असा करण्यात आला आहे.

सामान्यतः दिव्य यशस्वी झाल्याची उदाहरणे सापडत नाहीत. कारण खऱ्या अर्थाने ते भयंकर दिव्य असे. तापलेला लोखंडाचा गोळा हातात धरावयाचा आणि तरीही तो हात भाजता कामा नये, अशा काही अघटित प्रयोगांनी दिव्य यशस्वी करावयाचे, म्हणजे ते दिव्य यशस्वी होणे जवळ जवळ अशक्यच. पण एका खटल्यात असे दिव्य यशस्वी झाल्याचाही उल्लेख आहे. (लेखांक २१५)

पाटीलकीच्या वतनासंबंधीचा हा खटला आहे आणि त्यात एका पक्षाने दिव्य केले आहे. त्याचा तपशील देताना म्हटले आहे, " तर्फ मजकूरचे देसाई व देशपांडे, गावगन्नाचे पाटील व कुलकर्णी व दोन्ही गावचे महार व गुरव वगैरे वतनदार व सरकार संबंधी लोक व सर्व ब्राह्मण बोलावून आणून श्री विज्ञानेश्वर

वाक्य अन्वये गोळा वजन तोळा २०० चा त्रिवार तप्त करून व तो शास्त्रान्वये हातावर घेऊन सप्तमंडळ चालावयाचा नियम केला." त्याप्रमाणे वादी तापलेला लोह गोळा हातावर घेऊन सहा मंडले चालून दिव्यातून पार पडला. आणि अशा प्रकारे त्यांने आपले म्हणणे खरे असल्याचे सिद्ध केले. (ले. २१५).

काही खटले गमतीदार वादातून उत्पन्न झाले आहेत. उदाहरणार्थ एका मुसलमानाला न्हावी म्हटल्याबद्दल त्याने फिर्याद केली आहे (लेखांक १२१). तर दुसऱ्या एका वादात दहनभूमी कोठे असावी यावर रण माजले आहे. (ले. १३३) एका खटल्यात दोन गावांची सरहद्द ठरविण्याबाबत भांडण लागले आहे आणि मग ते मिटविण्यासाठी दोन्ही गावच्या लोकांनी पंचापुढे आपले म्हणणे मांडून सरहद्द ठरवून घेतली आहे. (ले. १६२)

या संग्रहातील कागदप्रत्रात आलेल्या प्रमुख विषयांची, त्याच्या महत्त्वाची आणि त्यासंबंधीच्या कार्यपद्धतीची माहिती वर दिली आहे, ती वाचकांना उपयुक्त वाटेल. त्या माहितीतील राजकीय संदर्भ, सामाजिक संबंध आणि आर्थिक परिस्थिती यांच्या माहितीवर प्रकाश पडेल आणि इतिहासाच्या अभ्यासकाला ही सर्व कागदपत्रे उद्‌बोधक वाटतील अशी आशा आहे.

अशी उपयुक्त ऐतिहासिक कागदपत्रे प्रसिद्ध करण्यासाठी, '**शहाजी छत्रपति म्युझियम ट्रस्टने**' प्रकाशन अनुदान दिले, त्या बद्दल मी सर्व ट्रस्टींचा अत्यंत आभारी आहे.

'ज्ञानेश' १२०५/४ शिवाजीनगर, पुणे ४

स. मा. गर्गे

छत्रपतींची दोन अस्सल पत्रे

शिवाजी महाराजांची केवळ दीडदोनशे पत्रे आजवर उपलब्ध झालेली आहेत. त्यातही अस्सल पत्रे फारच थोडी. बहुतेक पत्रांच्या नकला सापडल्या आहेत. ज्या पत्रांवर छत्रपतींचे शिक्कामोर्तब असेल ते त्यांचे अस्सल पत्र होय. अशा पत्रांच्या नकला नंतरच्या काळात भाऊबंदकीचे वाद किंवा तत्सम खटले पडल्यास पुराव्या दाखल सादर करण्यात येत असत. म्हणून त्यांनाही ऐतिहासिक संदर्भात, आशयाच्या दृष्टीने विशिष्ट मर्यादेपर्यंत महत्त्वाचे स्थान दिले जाते. पण नकलां-मध्ये अनेकदा नक्कल करणारांचे हस्तदोष किंवा इतर उणिवा निर्माण होतात, त्यामुळे अर्थविपर्यास होण्याची शक्यता असते. म्हणून ऐतिहासिक पुराव्यासाठी अस्सल पत्रच शंभर नंबरी मानले जाते. या संदर्भात प्रस्तुत दोन पत्रांची ऐति-हासिक महती सहज लक्षात येऊ शकेल. (लेखांक १ व ४)

आतापर्यंत उपलब्ध झालेल्या महाराजांच्या दीड-दोनशे पत्रांतील पहिले पत्र दि. १८ मार्च १६४५ तारखेचे असून ते दादजी नरसप्रभू यांस लिहिलेले आहे. हे ऐतिहासिक पत्र अनेक ठिकाणी प्रसिद्ध झाले आहे. ते शिवाजी महाराजांच्या स्वराज्यस्थापनेच्या संकल्पाची नांदी मानली जाते. याच पत्रात 'हिंदवी स्वराज्य' हा शब्द महाराजांनी प्रथम उपयोगात आणला असून तो त्यांच्या भावी ध्येय-धोरणासंबंधीची दिशा दर्शविणारा आहे. या इतिहासप्रसिद्ध पत्रानंतर इ. स. १६४५ ते १६८० या ३५ वर्षांच्या कालखंडात महाराजांनी विविध कारणांसाठी अक्षरशः हजारो पत्रे लिहिली असावीत. कालप्रवाहाने त्या पत्रसंभारातील जेम-तेम दीडदोनशे पत्रे मागे ठेवली आहेत. निदान, इतिहास संशोधकांच्या हाती तरी तेवढीच पडली आहेत. त्यांची अनेक पत्रे काळाने नष्ट केली. अनेक थोरा-मोठ्यांच्या जुन्या दप्तरात अद्याप कुजत पडली असावीत. जुन्या घराण्यांच्या विद्यमान वंशजांना सुबुद्धी सुचेल तेव्हाच त्या ऐतिहासिक पत्रांचे अमोल भांडार प्रकाशात येऊ शकेल.

शिवाजी महाराजांचे पत्र

मला उपलब्ध झालेले शिवाजी महाराजांचे पत्र त्यांनी कागलचे विठोजी घाटगे सर्जेराव यांना लिहिलेले आहे. या पत्राच्या पाठीवर शिवाजी महाराजांची 'प्रतिपत्‌चंद्र' ही अष्टकोनी राजमुद्रा असून पत्राच्या शेवटी 'मर्यादेयं विराजते' अशी समाप्ती-मुद्रा (मोर्तब) आहे. पत्राचे अस्सल स्वरूप, त्यातील महत्त्वाचा विषय आणि स्वराज्याच्या साधनेतील त्याचे विशिष्ट स्थान अशा सर्वच दृष्टींनी हे पत्र आगळे वाटावे असे आहे.

या पत्राचे आणखी एक वैशिष्ट्य लक्षात येते. पत्र वैयक्तिक स्वरूपाचे आहे. वैयक्तिक याचा अर्थ महाराजांनी एखाद्या व्यक्तीशी मनातील विशेष हेतू व्यक्त

करण्यासाठी जिव्हाळ्याने आणि आत्मीयतेने लिहिलेले पत्र. प्रस्तूतचे पत्र त्याच स्वरूपाचे आहे. त्यात शिवाजी महाराजांनी विठोजी घाटगे यास आपल्या स्वराज्याच्या प्रयत्नात सामील होण्याचे आवाहन केले आहे. विजापूरच्या अदिलशहाची ताबेदारी सोडून आपल्या पक्षाला येऊन मिळण्याचा आग्रह केला आहे.

अशा स्वरूपाची वैयुक्तिक पत्रे आतापर्यंत केवळ सात-आठच उपलब्ध झालेली आहेत. त्यातही दोन नकला असून दोन पत्रांतील मजकूर ऐतिहासिक दृष्ट्या प्रस्तूत पत्राइतका महत्त्वाचा वाटावा असा नाही.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत पत्रातील मजकूर समजून घेणे उद्बोधक ठरेल.

पत्रातील मजकूर पुढीलप्रमाणे आहे.

" राजश्री विठोजी घाटगे गोसावी यांसी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री शिवाजीराजे उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले. अभिप्राये कळो आला. सरंजामीच्या कामाच्या गोस्टी कितेक लिहिल्या. तरी जैसे काम कराल तैसे आम्हीही बरे करून प्रस्तुत जरी आमचे सेवेस अंगीकार असाल तरी जे जमेती तुम्हापासी असेल ते घेऊन येणे भेटी घेणे भेटीनंतर तुमचा बरल्याख[1] सरंजाम करू जे येवीसी पहिलेच अभयपत्र पाठविले असे. आताही हे पत्र अभयपत्रच जाणून सीघ्र येणे. जमेत बरी आणणे. बरे घोडे, बरे माणूस पाहोन जे होईल ते ठेवून फटकाल[2] ठेवणार नाही. कळले असावे. मर्यादेयं विराजते, "

या पत्राचे आणखी एक वैशिष्ट्य. पत्राच्या माथ्यावर राजमुद्रा उठवलेली नसून ती पत्राच्या पाठीवर आहे. यासंबंधीचा तत्कालिन विशिष्ट संकेत लक्षात घेतला तरच पाठीवरील राजमुद्रेचे निराळेपण समजू शकेल. जी पत्रे राजाच्या कचेरीतून सरकारी कामकाजाच्या निमित्ताने पाठविली जातात, त्यांच्या माथ्यावर राजमुद्रा दिलेली असते. पण जी पत्रे स्नेही, आप्त, बरोबरीचे प्रतिष्ठित, साधुसंत, इत्यादीना लिहिलेली असत, त्या पत्रांच्या पाठीवर राजमुद्रा देण्याची प्रथा असे. पाठीवर मुद्रा असलेले पत्र सन्मानदर्शक आणि आपुलकीचे निदर्शक मानले जाई. ' थोरले महाराज पाठीवर शिक्का मारून आम्हाला पत्रे पाठवीत असत. ' असे अभिमानपूर्वक उल्लेख पुढच्या काळातील काही पत्रांत केलेले आढळतात. शिवाजी महाराजांना आपल्याविषयी किती आत्मीयता होती, त्यांचा व आपला केवढा घरोबा होतो, हे दाखविण्याचाही अशा उल्लेखामागे एक हेतू असे. प्रस्तुत पत्राच्या पाठीवर शिक्का दिलेला आहे. त्यावर प्रधान वगैरे कोणाचीही दुसरी मुद्रा नाही.

कागलकर घाटग्यांचे घराणे शिवाजी महाराजांच्या उदयापूर्वीपासून वजनदार मानले जात होते. त्या काळातील अगदी निवडक अशा प्रतिष्ठित मराठा घरा-

१. (बरल्याख = लायकीप्रमाणे. २. फटकाल = कुचकामी)

ण्यांत त्याची गणना होत असे. विजापूरच्या आदिलशाही बादशहांच्या हाताखाली कागलकरांनी मोठी कामगिरी बजावली होती. त्या बादशाहीतून घाटग्यांना जहागीर आणि सरंजाम मिळाला होता. अशा मातब्बर सरदाराला आपल्याकडे वळविण्याचा शिवाजी महाराजांचा प्रयत्न एका दृष्टीने धाडसाचाच म्हटला पाहिजे. कारण, त्या काळातील प्रतिष्ठित समजली जाणारी प्रमुख मराठा वतनदार घराणी महाराजांच्या स्वराज्य संपादनाच्या प्रयत्नाकडे उदासीनतेने, उपेक्षेने आणि तुच्छतेनेही पाहात होती. त्यांचा ओढा आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यासारख्या तत्कालीन बादशहांकडे असे. त्यांच्याकडून मानमरातब मिळविणे, जहागिरी व वतनदारी वाढविणे आणि मग संबंधित बादशाही सत्ता बळकट करण्यासाठी जीव तोडून लढाया करणे, हीच त्यावेळच्या अनेक मराठा घराण्यांची निष्ठा व परंपरा होती. त्याच मानमरातबात ते मशगुल होते. जहागिरी वाढविण्यात इतिकर्तव्यता समजत होते. अशा प्रतिकूल परिस्थितीमुळेच शिवाजी महाराजांना जावळीचे मोरे, सुप्याचे मोहिते, चांबळीचे नाईक, हिरडसचा देशमुख, सावंतवाडीचे भोसले, मुधोळचे घोरपडे इत्यादी बड्या असामींशी दोन हात करावे लागले. त्यांना पराक्रमाने बाजूला सारावे लागले. प्रसंगी त्यांना मारावे लागले.

विठोजी घाटगे सर्जेराव हाही त्यावेळचा मातबर सरदार होता. त्याच्या घराण्याच्या अनेक पिढ्या आदिलशाहीशी एकनिष्ठ राहिल्या होत्या. सर्जेराव हे नाव देखील विजापूरच्या संरक्षणासाठी घाटग्यांच्या कोणा पूर्वजाने केलेल्या पराक्रमाच्या संदर्भात या घराण्याला लाभले होते. विठोजीचे पूर्वज आणि भाऊबंद विजापूरच्या लष्करी छावणीतील तोलदार सेनाधिकारी मानले जात. बादशाहीच्या हुकुमावरून त्यांनी अनेक मोहिमा पार पाडल्या होत्या. त्यासाठी बादशहाकडून या घराण्याला मिळालेल्या जहागिरीच्या सनदा आजही उपलब्ध आहेत.

इतक्या विविध सूत्रांनी विठोजी घाटगे विजापूरच्या सलतनतीशी निगडीत होता. अशा फौजबंद सरदाराला आपल्या कार्यात सहभागी करून घेण्याचा महाराजांचा प्रयत्न प्रस्तूतच्या पत्रातील मजकुरावरून लक्षात येतो. वस्तुतः हे पत्र म्हणजे विठोजीच्या पत्राला पाठविलेले उत्तर आहे. त्यांचा अगोदर पत्रव्यवहार झालेला आहे. शिवाजी महाराजांनी विठोजीला आपल्याकडे बोलाविले, त्यावर विठोजीने सरंजामाबद्दलच्या काही अटी सुचविल्या, नंतर महाराजांनी एका अभयपत्राच्या द्वारे त्या मान्य केल्या आणि त्या अभयपत्राचा संदर्भ देऊन प्रस्तुत पत्रात महाराजांनी विठोजीला पुन्हा आश्वासन दिले. असा या पत्रव्यवहारातील घटनांचा क्रम असावा.

प्रस्तुत पत्रातील मजकुराची भाषाही महाराजांच्या रोखठोक आणि निश्चयी स्वभावाची निदर्शक आहे. 'तुम्ही जेवढे परिश्रम कराल, स्वराज्याच्या प्रयत्नात

जेवढ्या निष्ठेने आणि पराक्रमाने काम करून दाखवाल, तेवढ्या प्रमाणात तुम्हाला सरंजाम मिळेल. जसे काम तसा मोबदला. विजापुरचा आश्रय सोडून आमच्या पक्षाचा स्वीकार करा. जे सैन्यबळ तुमच्यापाशी असेल ते घेऊन या. त्वरेने भेटा. भेटीनंतर तुमच्या सरंजामाबद्दल सर्व प्रकारे बरे करू. येताना चांगले घोडे आणि लढाऊ माणसे आणा. योग्यतेप्रमाणे आणि कर्तबगारी पाहून सर्व काही केले जाईल. ' पत्रातील हा आशय स्वच्छ, स्पष्ट आहे. त्यात विठोजीने व्यक्त केलेल्या शंकांचे निरसन आहे. त्याने उपस्थित केलेल्या मुद्यांचे स्पष्टीकरणही आहे.

कदाचित विठोजीला आपल्या सरंजामाचा खर्च, आपली कामगिरी, बढती इत्यादी संबंधी अधिक आश्वासन हवे असावे. महाराजांनी प्रस्तुत पत्रात त्याच्या मागण्यांना निःसंदिग्ध उत्तर दिले आहे. ' प्रस्तुत जरी आमचे सेवेस अंगीकारीत असाल तरी तुमच्या सरंजामाची सर्व व्यवस्था होईल. ' यात अभयदान आले आणि कामगिरीसंबंधीच्या अपेक्षाही व्यक्त झाल्या. ' केवळ बादशाही सोडून आमच्याकडे याल म्हणून सरंजाम मिळेल, असे नव्हे, तर आपल्या कर्तबगारीची आणि पात्रतेची साक्षही पटवावी लागेल. ' हे सर्व स्पष्टपणे या पत्रात महाराजांनी बजावले आहे.

' जसे काम तसा सरंजाम ' या धोरणात, आधी सरंजामाचे आमिष दाखवून अपात्र मंडळी भोवती जमविण्याचे कामचलाऊ राजकारण महाराजांना मान्य नव्हते, हेही ओघानेच लक्षात येते. पण या स्पष्टोक्तीबरोबरच विठोजीच्या कर्तृत्वाचा उपयोग स्वराज्याच्या कामी चांगला होऊ शकेल हेही त्यांनी जमेत (फौज-फाटा) घेऊन शिघ्र भेटण्याची सूचनाही आवर्जून केली आहे. पत्रातील मोजकी पण अचूक शब्दयोजना लक्षात घेतली म्हणजे त्याचा हा सर्व अन्वयार्थ सहज पटावा.

काळासंबंधी अनुमान

प्रस्तुत पत्रावर काळाचा निर्देश नाही. हे त्याचे एक वैगुण्य आहे. पण कागलकरांच्या दप्तरात अलीकडेच उपलब्ध झालेल्या इतर कागदपत्रांवरून प्रस्तुत कागदपत्राचा काळ ठरविण्यास मदत होते. या कागदपत्रात आदिलशाहीच्या सनदा, फर्मान, घाटगे घराण्याचा करीना, खुद्द शिवाजी महाराजांच्या आणखी काही पत्रांच्या नकला इत्यादींचा समावेश आहे.

प्रस्तुत पत्राचा काळ ठरविण्यासाठी बहिलोलखानाचा रांगण्यावर हल्ला (एप्रिल–मे १६६७) आणि विजापूरच्या कागलकारांना मिळालेले फर्मान (जून १६६७) या दोन घटनांची पार्श्वभूमी लक्षात घेतली पाहिजे.

विजापूरच्या बहिलोलखानाने रांगण्यावर एप्रिल १६६७ मध्ये हल्ला केला— आणि तो मोडून काढण्यासाठी स्वतः शिवाजी महाराजांनी मोहीम हाती घेतली.

त्यांनी 'विजापूरचे सैन्य मारून काढले' बहिलोलखानाचा पराभव झाला. खानाबरोबर महाराजांचा सावत्र भाऊ व्यंकोजीही होता. पराभवानंतर विजापूरकरांनी महाराजांना दरसाल तीन लाख होन खंडणी देण्याचे कबूल करून सलूख केला. (ऑगस्ट–सप्टेंबर १६६७).

वरील सर्व घटनांच्या तारखा लक्षात घेतल्या म्हणजे, एप्रिल–मे १६६७ ते ऑगस्ट–सप्टेंबर १६६७ च्या दरम्यान विठोजी घाटगे आणि शिवाजी महाराज यांचा पत्रव्यवहार झाला असावा असे म्हणता येते.

विजापूरकरांचे फर्मानही त्याच सुमाराचे (२५ जून १६६७) आहे. या फर्मानात विजापूरच्या बादशहाने विठोजीला लिहिले त्याचा आशय असा—

'तुम्हाकडील वकील देवजी खंडेराव यांनी सांगितलेला मजकूर जाहीर झाला. किल्ला हाती आल्यावर तुम्हास किताब देऊन मोबदला त्या परगण्यात जहागीर करून देऊ. एक हजार होन बक्षीस व आबाजी घाटगेपेक्षा एक हत्ती व दोन घोडे... देऊ. किल्ला काबीज करण्यास एक हजार स्वार पाठवून देऊ. तुम्ही या दौलतीचे पुरातन सरदार सबब हा सर्व मजकूर समजोन कृपेस पात्र व्हावे' इत्यादि. (लेखांक २)

या फर्मानात किल्ला काबीज करण्याचा स्पष्ट उल्लेख आहे. आणि त्याबरोबरच किल्ला काबीज केल्यास मान मरातब व जहागीर देण्याचे प्रलोभनही आहे. फर्मानावरील २५ जून १६६७ ही तारीख लक्षात घेतली म्हणजे त्यातील उल्लेख रांगणा किल्ल्याचा असावा हे सहज लक्षात येण्यासारखे आहे.

रांगणा किल्ला कोकणात कुडाळच्या सरहद्दीवर आहे. विजापूर व रांगणा यांच्या संदर्भात कागलचे भौगोलिक स्थानही लक्षात घ्यावे. अशा स्थितीत बादशहाच्या फर्मानाला प्रतिशह देण्यासाठी महाराजांनी विठोजीला आपल्याकडे आकर्षित करण्याचे राजकारण केले नसते तरच आश्चर्य. म्हणूनच प्रस्तुत पत्राच्या तारखेसंबंधी असा निष्कर्ष काढावा लागतो की हे पत्र, जून–जुलै १६६७ च्या सुमाराचे असावे.

राजाराम महाराजांचे पत्र

दुसरे पत्र छत्रपती राजाराम महाराजांचे आहे. आणि त्यावरही तारीख नाही. पण पत्रातील प्रसंगाचा उल्लेख स्पष्ट आहे. पत्र पुढीलप्रमाणे आहे:–(लेखांक ४)

"अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री पिराजी घाटगे यासी प्रति- राजश्री राजाराम छत्रपति उपरी तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले. स्वामी कर्नाटक प्रांताहून या प्रांतास आले हे वर्तमान आईकोन बहोत समाधान वाटले, म्हणून हे वर्तमान तपसिले लिहिले ते विदीत जाहले. ऐशास स्वामीच्या आगमने तुम्हास संतोष वाटावा हे उचितच आहे व या प्रांते स्वामींच्या लष्करच्या लोकी

बहोतच उपसर्ग दिला. काही बल राहिला नाही, पुढेही उपसर्ग होतच आहेत, म्हणून हे वर्तमान तपसिले लिहीले ते विदीतच जाहले. ऐशास लष्करच्या लोकास ताकीद पत्र पाठविली आहेत ते या उपरी उपसर्ग देणार नाहीत. तुम्ही आपले समाधान असो देणे बहोत लिहीणे तरी तुम्ही सूज्ञ असा. मर्यादेयं विराजते."

हे पत्र राजाराम महाराजांनी जिंजीहून परत आल्यावर पिराजी घाटगे यास लिहिले आहे. पिराजी हा विठोजीचा मुलगा. राजाराम महाराज जिंजीहून फेब्रुवारी १६९८ साली महाराष्ट्रात परत आले. पत्रातील तक्रारीवरून राजाराम महाराजांच्या सैन्याने कागलकरांच्या जहागिरीला उपसर्ग पोचविला असावा. तो नाहीसा करावा म्हणून पिराजीने छत्रपतींकडे मागणी केली. या पुढे उपसर्ग पोचणार नाही, असे छत्रपतींनी आश्वासनही दिले. त्यांनी आपल्या लष्करच्य लोकांना ताकीदपत्रे पाठविली, आणि 'या उपरी उपसर्ग देणार नाही, तुम्ही आपले समाधान असो देणे,' असा दिलासा दिला आहे. राजाराम महाराजांच्या स्वभावावर या पत्राने चांगलाच प्रकाश पडतो.

अशाच स्वरूपाचे शिवाजी महाराचांचे एक पत्र (शिवचरित्र साहित्य ५ ले. ७९५) प्रसिद्ध झालेले आहे. त्या पत्रात आंबेजोगाईच्या कवी दासोपंताना शिवाजी महाराजांनी कळविले आहे की, 'आमचे सैनिक प्रस्तुत तिकडे येणार नाहीत. पण ज्यावेळी येतील त्यावेळी त्यांनी कोणत्याही गावास किंवा मठास उपद्रव देऊ नये, अशी त्यांना ताकीद केली जाईल.' महाराजांच्या याच धोरणाची परंपरा राजाराम महाराजांनी कायम राखली होती हे त्यांच्या पत्रांवरून सहज दिसून येते.

स. मा. गर्गे

'महाराष्ट्र टाइम्स' ता. २७ ऑगस्ट १९७२

कागलचे घाटगे सर्जेराव (ज्यू.)
यांच्या दप्तरात
मिळालेल्या अस्सल पत्रांचे
व त्यावरील राजमुद्रांचे ठसे.

शककर्ते शिवाजीमहाराज यांची राजमुद्रा



प्रतिपच्चंद्र लेखेव वर्धिष्णुर्विश्व वंदिता ।
शाह सूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

थोरले राजाराममहाराज यांची राजमुद्रा



श्री धर्मप्रद्योतिताशेषवर्णा दाशरथेरिव ।
राजारामस्य मुद्रेयं विश्ववंद्या विराजते ॥

शककर्ते शिवाजीमहाराजांनी विठोजी घाटगे यास लिहिलेले पत्र

(लेखांक : १ पाहा)

श्री



थोरले राजाराममहाराज यांनी पिराजी घाटगे यास लिहिलेले पत्र

(लेखांक : ४ पाहा)

लेखांक : १

कागल ज्युनिअर : इ. स. १६६७ (?)

राजेश्री विठोजी घाटगे गोसावी यांसी—

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रती राजश्री शिवाजी राजे उपरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले आभीप्राये कलो आला सरंजामीच्या व कामाच्या गोस्टी कितेक लिहिल्या तरी जैसे काम कराल तैसे आम्हीहीं बरे करून प्रस्तुत जरी आमचे सेवेस अंगीकार असाल तरी जे जमेती तुम्हापासी असेल ते घेऊन येणे भेटी घेणे भेटीनंतर तुमचा बरल्याख सरंजाम करून येविसी पहिलेच अभयपत्र पाठविले असे आताही हे अभयपत्रच जाणून सीघ्र येणे जमेत बरी आणणे बरे घोडे बरे माणूस पाहून जे होईल ते ठेवून फटकाल ठेवणार नाही. कलले असावे. मर्यादेयं विराजते.

लेखांक : २

कागल ज्युनिअर : ता. २५ जून १६६७

फर्मान बादशाई आमीरूलउमराव विठोजी घाटगे यासी—तुम्हांस कळावे की—तुम्हा कडील वकील देवजी खंडेराव यांनी सांगितलेला मजकूर जाहीर झाला. दिगर किला हाती आल्यावर तुम्हांस किताब देवून मुबदला त्या परगणेत जाहागीर करून देऊ. एक हजार व्होन बक्षीस व आबाजी घाटगे या पेक्षा एक हत्ती व दोन घोडे सर्ज्यासहीत देऊ. तुरा व फिरंग देऊ कागल परगणे व देसकत पूर्वी प्रमाणे कायम ठेवून कुटुंब राहाण्यास महंमदपुर परगणेत एक गाव पाचशेहे व्होनाचा देऊ. किला काबीज करण्यास एक हजार स्वार पाठवून देवू. तुम्हीही या दौलतीतील पुरातन सरदार सबब हा सर्व मजकूर समजोन कृपेस पात्र व्हावे. याशिवाय तुमच्या वकिलास सरकारात ठेवून एकशेहे

अैशी व्होन नेमणुक करून देऊन एक गाव देवून पिढी दर पिढी चालवू या हुकुमाप्रमाणे करावे. तारीख १२ मोहरम सन १०७७ फसली

लेखांक : ३

कागल ज्युनिअर : ता. २८ जानेवारी १६६९

स्वती श्री मन्माहाराज राजश्री शिवछत्रपती यानी राजश्री पीराजीराव राजे घाटगे सर्ज्याराव वजीर देशमुख जाहागीरदार व फौजदार पो कागल यासी ईलाखा प्रकरणीस्तव राजपत्र सादर जाहाले वरून सर्जेराव यानी शके १५९० माघ शु॥ ७ सप्तमीस मुक्काम पुरंदरास भेट जाहली ते समई सर्जेराव याज नी॥ वकील राजश्री मल्हार नागनाथ नाडगौंडा माणगावकर यानी हुजूर सर्जेराव याचे वतनदारीचा मजकुर झाडेनिशी कागद पत्री समजुत करून दिल्हे ते वेळेस मा॥र समजोन घेऊन तुम्ही वतनदारी वजीर मोर्चेल चवघडा तेव्हा स्वामी प्रसन्न होऊन तुमची वतनदारी तुम्हास चालवणे जाणोन हे राजपत्र करून दिल्हे बीतपशील—

का॥ कागल	का॥ वालवबु॥	का॥ चिरवली
१ का॥ मा॥र	१ का॥ मा॥र	१ का॥ मा॥र
१ का॥ करनुर	१ वालवे खुर्द	१ का॥ बालिंग
१ वंतुर	१ बेलवले बु॥	१ (फाटलेले)
१ पिंपळगाव	१ बेलवले खुर्द	१ कवलगे
१ सिध नरली	१ कबंली	१ यमग्रर्णी
१	१ साळा बु॥	१ नागनुर
१ येकाडी	१ बिद्री	१ भिवसी
१ बामणी	१ बोरवड	१ कनवाड
१ (फाटले आहे)	१ उंदीरवाडी	१ म्हाकव
१ बाचणी	१ निगडी	१
१ शेंडूर	१ चंद्र	१ सानग
१ साळा खु॥	१ सोनाली	१ बस्तवाड
१ शंकरवाडी	१२	१२
१३		

का॥ मुरगोड	का॥ मांजरी	का॥ डिगरज
१ का॥ मा॥र	१ का॥ मा॥र	१ का॥ मा॥र
१ यमगे	१ रुवी	१ डिग्रज खुर्द
१ चिमगाव	१ साजणी	१ मळशीगाव
१ पिंपळगांव बु॥	१ सिर्दवाड	१ आलसंद
१ सावर्डा खुर्द	१ आंकली	१ डोंगरसानी
१ सावर्डा बु॥	१ माणगाव	१ तुंग
१ मलग बु॥	१ चोकाक	१ बुरली
१ मलग खुर्द	१ नीमसिरगांव	१ गोरगांव
१ चवडाळ	७॥	१ बोरगांव
१ पीढारी		९
१ कुरणी		
१ कुरुकली		
१ भडगांव		
१ सुरुपली		
१४		

येकूण का॥ साहा गांव सुमार साडे सदसष्ट पाद्याई ईनाम तालुका व देशमुखी व वतन वेगेरे झाडानिसी पुरवीपासुन चालत आले आहे त्याप्रमाणे तुमचे तुम्ही पुत्रपौत्रादी व वंशपरंपरा आनभवुन सुखरूप राहणे. तुम्हांस माहाराज सरकारातुन तुमचे वतनदारीस वेगैरे ईलाखास्तव विचारणेस कारण नाही. जाणीजे छ १५ माहे जिल्हेज मोर्तब असे दस्तुर-गणेश खंडो फडणीस

लेखांक : ४

कागल ज्युनिअर : इ. स. १६९७-९८

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री पिराजी घाटगे यासी प्रती राजश्री राजाराम छत्रपती उपरी तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. स्वामी कर्नाटक प्रांताहुन या प्रांतास आले हे वर्तमान आईकोन बहुत समाधान वाटले

म्हणुन हे वर्तमान तपसीले लिहिले ते विदीत जाहाले. येशास स्वामीच्या आगमने तुम्हांस संतोष वाटावा हे उचीतच आहे व या प्रांते स्वामींच्या लष्करच्या लोकी बहुतच उपसर्ग दिला, काही बल राहिला नाही. पुढे ही उपसर्ग होतच आहेत, म्हणूत हे वर्तमान तपसीले लिहिले तेही विदीत जाहालें. ऐशास लष्करच्या लोकांस ताकीद पत्र पाठविली आहेत. ते या उपरी उपसर्ग देणार नाहीत तुम्ही आपले समाधान असो देणें बहुत लिहिणें तरी तुम्ही सुज्ञ असा मर्यादेयं विराजते.

लेखांक : ५

कागल ज्युनिअर : ता. २१ जून १७१७

स्वास्ति श्री राज्याभिषेक शके ४४ हेमलंबी नाम संवत्सरे जेष्ट बहूल आष्टमी भृगु वासर क्षत्रीय कुलावंतस श्री राजाशंभु छत्रपती स्वामी यानी राजे श्री देशाधिकारी व कारकुन वर्तमान व भावी सुभा प्रा। कोल्हापुर यासी आज्ञा केली असीजे – राजश्री विठोजी बीन पिराजी सरजाराव घाटगे देशमुख पा। कागल हे प्रामाणिक वतनदार याचे बाप पीराजी सरजाराव स्वामीच्या पायासी निष्टा धरून वतनाची सेवा करीत होते हल्ली हेही स्वामीच्या पायाशी येकेरूप निष्ठेने वर्तत आहेत याचे चालवणे स्वामीस परम आवश्यक यानी स्वामी संनीध विनंती केली की, स्वामीनी बहुता वतनदारास ईनाम गांव देऊन स्थापना केली आहेत. आपणासही कृपाळू होवून मौजे सावर्डे बु।। हा गावई नाम करून दिला पाहिजे म्हणून विदीत केले. त्यावरून मनास आणिता विठोजी घाटगे सरजाराव हे प्रामाणीक वतनदार स्वामीच्या पायाशी निष्ठा धरून वतनाची सेवा करीत आहेत, यास्तव स्वामी याजवरी कृपालु होवून यास नुतन ईनाम कुलबाब कुल कानु खेरीज हक बार ईनाम बार करून मौजे सावर्डे बु।। पा।। कागल प्रां म।। र हा गाव देहबार अकरास ईनाम अजरामऱ्हामत करून दिला असे तरी तुम्ही मौजे मजकूर पुर्वमर्यादे प्रमाणे यांचे स्वाधीन करणे आणि ईनाम यासी व यांचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे प्रतीवर्षी नुतन पत्राचा आक्षेप न करणे या सनदेची तालीक लिहोन घेऊन अस्सल पत्र भोगवटीयांस परतोन देणे.

जाणीजे याचे माथा शेरणी रुपये १००० येक हजार करार केले असेत सदरहुचा वसुल हुजूर होईल जाणीजे. लेखनालंकार.

लेखांक : ६

कागल ज्युनिअर : ता. ६ एप्रिल १७२५

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके ५१ विश्वावसु नाम संवत्सरे वैशाख शु॥ पंचमी भोमवासेर क्षत्रीय कुलावतंस श्री राजाशाहू छत्रपती स्वामी यानी मोकदमानी निगवे त॥ कागल यास आज्ञा केली असीजे-मौजे मजकूर राणोजी घाटगे बीन पीराजी घाटगे सर्जाराव यास ईनाम दिला आहे. ती मौजे मजकूरचा वसुल मा॥र ईलेकडे देणे जाणीजे सनद आलाहिदा सुभेदाराचे नावे सादर आहे त्यांप्रमाणे करार असे. जाणीजे लेखनालंकार.

लेखांक : ७

कागल ज्युनिअर : ता. ३१ मार्च १७२८

राजेश्री विठोजीराव घाटगे गोसावी यांस

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री राजा शंभु छत्रपती उपरी तुम्ही पत्र राजश्री गोपाळ गोविंद या बराबरी पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ व मा॥र नीलेनी निवेदिला अर्थ अवगत जाहाला अैशास तुम्ही निष्ठावंत वतनदार कार्यकर्ते नामोशाचे आहा तुमचे सर्व प्रकारे उर्जीत करून चालवणे हे स्वांमीस अवश्यक या करिता मौजे सावडे बु॥ परगणे कागल हा गांव स्वामीनी हल्ली तुम्हास ईनाम देवून सनदा सादर आहेत. त्या प्रमाणे गांव अनभवणे व नार सावंत कुडाळकर याने स्वामीनी कुडाळचा कोट हस्तगत केला त्यास वेढा घातला आहे त्यास मारून काढणे हे स्वामीस परम आवश्यक यास्तव राजेश्री भगवंतराव आमात्य यास अगोदर रवाना केले आहेत व हाल्ली राजेश्री तिमाजी पंडित प्रधान रवाना केले आहेत....पोख्ता हशम स्वारांचा जमाव असावा लागतो त्यास आपण स्वामी कार्य करून दाखवू म्हणून तुम्ही

आपला....भावार्थ निवेदिला आहे तरी तुम्ही पुरातन वंशज आपल्या कर्तव्यास चुकता यैसे नाही यास्तव तुम्हास हे पत्र सादर केले असे तरी तुम्ही आपणांला हशम व स्वामीचा पोख्ता....दोन मर्दान मनुष्यासमागमे देऊन उभयता मा।।र नीलेकडे पाठवून देणे म्हणजे स्वामी तुम्हावरी विशेषात्कोर संतोषी होतील हे. काम बहुत नाजुक यास्तव स्वामीनी तुम्हांस लिहिले आहे तरी लिहिल्याप्रमाणे मसलतीस पोख्ता पाटवून देणे. स्वामी तुमचे चालवायास...करणार नाहीत सविस्तर गोपाळ गोविंद सांगतील त्यावरून कळेल बहुत काय लिहिणे.

पौ. ३० शाबान सु।। समान अशरीन मया आलफ

लेखांक : ८

कागल ज्युनिअर : ता. १० डिसेंबर १७२८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५५ कीलक नाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी यांनी समरत सेना धुरंधर विश्वास निधि राजमान्य राजश्री राणोजी घोरपडे सेनापती यासी आज्ञा केली. ऐसीजे राजश्री विठोजी बीन पिराजी घाटगे देसाई परगणा कागल यांनी स्वामी सन्नीध विनंती केली की, महाराजांनी बहुतांस वतने मऱ्हामत केली आहेत. आपणावर मेहेरबान होऊन परगणे मजकुरचे नाडगौडकीचे वतन अजरामऱ्हामत करून ध्यावयासी आज्ञा केली पाहिजे विदीत केले. त्यावरून मनास आणिता हे वतनदार प्रामाणिक स्वामीच्या पायासी निष्ठेने वर्तितात याचे सर्वप्रकारे चालवणें हे स्वामीस परम आवश्यक यास्तव स्वामी याजवरी कृपाळू होऊन यासी परगणे कागलेचे नाडगौडकीचे वतन अजरामऱ्हामत करून दिल्हे असे. या वतनास माजे वंदुर परगणे मजकुर बा।। व इनाम १ येक व हक रयत नीसबत दिवाण दस्ताचे दर संदे सेत दोन व तेल्याचे घाणी यास सालीना तेल बाराशेर पानाचे निम्यास पाने एकशे. भुसास दोन रूके तीन रुके कापड सहा रुके एकूण अकरा रुके व साली कोष्टी धनगर याचे मागास सालीना चार सणगा व दर दुकानास सालीना चार सणगा येणेप्रमाणे मोईन करून देऊन सनद आलाहीदा सादर केली असे तरी तुम्ही हे नाडगौडीचे वतन वंशपरंपरने

चालवणे या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल परतोन देणे. बहुत लिहीणे तरी सूज्ञ असो. शिक्का.

लेखांक : ९

कागल ज्युनिअर : ता. २३ डिसेंबर १७४१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ६८ दुर्मती नाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल द्वादशी सौम्य वासरे क्षत्रीय कुलावतंस श्री शंभु छत्रपती स्वामी यानी विठोजी बीन पीराजी घाटगे यासी—दिल्हे ईनाम पत्र ऐसाजे तुम्ही वतनदार तुम्हा विषयी दरानी चौथावाडा व चिरंजीव राजेश्री अजाजी यादव यानी विनंती केली त्यावरून मनास आणिता तुमचे चालवणे हे स्वामीस आवश्यक यास्तव स्वामी कृपाळू होऊन नुतन ईनाम कुलबाब व कुल कानुखेरीज हक्कदार व ईनामदार करून मौजे बालिंगे प्र॥ कागल हा देह १ येक रास ईनाम दिल्हा असे तर तुम्ही सदर मौजे मजकूर पूर्व मर्यादे प्रमाणे चतु:सीमा आपले स्वाधीन करून घेणे आणि ईनाम गाव तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने अनभवून स्वामीची सेवा करून आपले उर्जीत करून घेणे जाणीजे नीदेश समक्ष.

लेखांक : १०

कागल ज्युनिअर : ता. १७ जून १७४२

मौजे वाघेरी प्रांत कऱ्हाड यांचे सेवेसी—

करीना बेशमी भानजी बीन संभाजी देशमुख प्रांत कागल सु॥ सलास अर्बैन मया व आलफ कारणे लिहून दिला करीना ऐसीजे—त्रिंबकजी बीन मलजी घाटगे व आपणास वतनासंबंधे कज्जा लागला. त्यामुळे हुजुरून निवाडीयास तुमचे उभयतास पाठविले. राजीनामे व जामीन घेऊन करिना लिहून घ्यावयाची आज्ञा केली. त्यावरून करीना असलबर तुमचे सेवेसी लिहून दिला आहे.

आपले पणजे भानजी घाटगे ह्याचे बाप पदाजी घाटगे व त्याचे भाऊ आबाजी घाटगे या उभयतांचे पोटी पुत्राचे संतान नाही. पदाजी घाटगे यासी तिघी बायका असोन, पुत्र नाही. तसेच आबाजी घाटगे यासीही पुत्र नाही.

त्याची बहीण गुणाबाई तानाजी काटकर यासी दिली होती. ती पोटोसी होती, म्हणून कोनी निघावयासी भावानी माहेरास आणिली. घरी बहीण व भाऊ एक ठायी जेवताना बोलीली जे तुझ्या पोटी (फाटून गेले आहे) देणे म्हणून वर-हात ठेवणे. यासी तिने उत्तर दिलेजे तुम्हाखेरीज मज दुसरी जोडी नाही, परंतु आपण वडील असत त्यापासी मागे॰न घेणे म्हणजे आपण मान्य असो, असे उत्तर दिल्हे. त्यावर प्रसूत झाली, पुत्र जाहला........रोज जाहलेवर पालखीमध्ये गुणाबाईस घाल्हन व पदाजी घाटगे यांनी बरोबर घेऊन विजापुरास गेले. गुणाबाईचे दादलेस सांगून पाठविले जे आम्ही आलो आहो. त्यास ते काही सामोरे आले नाहीत....करून दुसरे जागा राहिले, तेव्हा त्याची बायको त्याज-कडे पाठवून दिलीं. त्यावर दुसरे रोजी पादशहाचा मुजरा झाला. मेहेरबानीचा वक्त समजोन पदाजी घाटगे यांनी अर्ज केला जे आपले पोटी संतान नाही. साहेबी दौलतही बहुत दिल्ही, आणि कागलचे देशमुखीचे वतन आहे. परंतु पोटी पुत्र नाही. तानाजी काटकर यासी आपली बहिण दिल्हीं (फाटले आहे.) पुत्र आहे तो घ्यावयाचा हुकूम काय म्हणोन अर्ज केला. त्याउपर पादशाही हुकूम जाहलाजे आवलाद की आफलाद या दोहीतील घ्यावा, असे उत्तर जाहले-वर मागते पदाजी घाटगे यांनी अर्ज केला की, तानाजी काटकर यासी आणवुन हुकूम करावा. त्यावरून काटकर यासी आणोन, तुझा लेक आपणास देणे म्हणोन त्यास वचनास गोविले. मग पदाजी घाटगे याचे वोट्यात घातला. ते समई भानजी घाटगे असे नाव ठेविले, आणि उभयतांची समजावीस जाहाली. साखरा वाटण्यासी नौबतीस हुकूम जाहला. त्यावर पदाजी घाटगे याची वडील बायको रानीबाई वांज होती, तिने या मुलाची निगा करून आपले थानास लावितांना पान्हां फुटला. तिने मूल थोर केला. दहा-बारा वर्षाचा होताच दुसरी बायकोस तिघे पुत्र जाहले. वडील नरसोजी दुसरा कृष्णाजी तिसरा अन्नसोजी. ऐसे तिघे व चौथी लेक जाहली.

धाकटा भाऊ आबाजी घाटगे यासी दोघे पुत्र जाहाले. त्याउपरी उभयता भाऊ वेगळे निघोन, वतन दोन भाग करून, सिके दोनी केले. त्याउपरी पदाजी घाटगे यांचे म्हातारपण जाहले. ते समई चौघा पुत्रास आणोन विचारले जे आपला जीव आहे तो विल्हे लावून देतो म्हणोन बोलले. मग घरची ब्रीसात चौघा वाटून दिल्ही. त्या पैकी जेष्ठ भानजी घाटगे आपले वडील यासी दिल्हा

त्याचा तपशील—छत्री व घोडा व देव्हारा व वडील कुणबीन भागाई येसे चार दागिने वडिलांकडे दिल्हे. बाकी बीसात चौघा वाटणी केली व घरवाडा कागलातील—दोन भाग केला. आपले वडील भानजी घाटगे यासी निम्मे व त्याचे भाऊ तिघे यासी निम्मे याप्रमाणे जागा वाटून दिल्या. त्यावर इनाम कसबा कागलचे ठाणेपैकी निम्मेचे भाऊ आबाजी घाटगे यांचे वंशाकडे निम्मे देहे उरले, त्यापैकी आपले वडिलांस निम्मे बाग दिली. तिचे नाव भानबाग ऐसे ठेविले. निम्मे उरले ते या तिघा भावास दिले. त्याचे नाव खासबाग ठेविले. यैसे वडिलांनी विल्हे लाविली. पुढे देहे आवसानीचे समई भानजी घाटगे यांनी मान दिली होती. हे तिघे भाऊ जवळ होते. ते वेळेस पदाजी घाटगे यांनी भानजी घाटगे वडील पुत्र यांचे गळा सीका घातला. त्याउपरी पदाजी घाटगे मृत्यू पावले. त्यावरी दौलत बहाल करावयाबद्दल चौघे भाऊ मिळोन विजापूरास गेले.

पादशहा मुजरा देऊन भानजी घाटगे याचे नावे दौलत बहाल जाहली त्याउपरी गावास येऊन दोघे मुतालिक—वतनावर करार करून ठेविले. आपण चाकरीवर विजापूरास मागती गेले, त्यावर कित्येक दिवशी हिंदुस्थानाहून विजापुरावर उम्धा सर्जेराव रजपुत आला होता, तेव्हा राजश्री शिवाजीराजे भोसले इत्यादिक उमराव पादशहांनी त्यावर........केले. तेथे झुंजामध्ये सर्जेराव यासी भानजी घाटगे यानी एकाकी त्यास मारुन त्याचा घोडा सर्जा समवेत पाडाव करून आणिला. ही खबर आपले घरी कागलास पावती केली. त्यावरून नरसोजी घाटगे विजापुरास भेटीस गेले. तेव्हा सर्ज्या भावाजवळ बाजीद होऊन मागितला. त्यास भानजी घाटगे बोलिले जे, पादशहापासोन सर्ज्या देऊ. ऐसे बोलून मुजरेस गेले. तेव्हा सर्ज्या भानजी घाटगे यासी दिला त्यास भानजी घाटगे यांनी अर्ज केलाजे, आपला भाऊ नरसोजी घाटगे यासी द्यावा. तेव्हा पादशाई हुकूम जाहलाजे ज्यानी पाडाव केला त्यास दिला. तुम्ही आपले घरी ठेवणे अगर भावास देणे. आपले डेऱ्यास येऊन सर्ज्या समवेत घोडा भावास दिल्हा. भाऊ भाऊ एका विचारे पुढे चालत होते. वतनाचा कारभार मुतालिक करीत होते. त्यावर किती येका दिवशी भानजी घाटगे मृत्यू पावले.

मग त्याची दौलत दूर करून शहाजी राजे यास ज्याजती दिल्ही त्यावर भानजी घाटगे यांचे पुत्र पाचजणे राजेश्री शहाजीराजे याजकडे चाकरीस राहिले.

त्याचे चाकरीवर मसलतीवर पदाजी घाटगे पडले. संताजी घाटगे व तानाजी घाटगे व त्रिंबकजी व विठोजी घाटगे हे चौघे भाऊ महाराजाजवळ होते. तेथे नरसोजी घाटगे यांनी महाराजांस अर्ज केलाजे बाप भाऊ जोरावर होऊन आपल्यास रेटतात, याकरिता साहेबी त्यांस रजा दिल्ही या वतनावर घेऊन जातो असा अर्ज केला. त्यावरून निरोप दिला. मग चौघास घेऊन येत होतो. वाटेस आबाजी भोसले याची गाठ पडली. त्यानी माहादाजी नाईक निंबाळकर यांचे आपले झुंज आहे म्हणोन बाजीद होऊन घेऊन गेले जरदौडीवर झुंज जाहाले तेथे नरसोजी घाटगे व आपले वडील संताजी घाटगे, तानाजी घाटगे ऐसे तिघेजण पडले. त्रिंबकजी घाटगे व विठोजी घाटगे यासी जखमा लागल्या. वरी मलेवाडकर साबाजी घाटगे यांनी बरे करून गावास लावून दिल्हे. तेथे आपले वडील व पदाजी घाटगे व आबाजी घाटगे ऐसे एकरूप वतन आनूभवुन होते. त्या उपरी बंद भावकीच्या पेचामुळें नरसोजी ठाणेदार रायबागास सामील करून घेऊन पीराजी घाटगे यासी बागेमध्ये मारीले मग त्रिंबकजी घाटगे यात व त्यात झुंज जाहाले. तेव्हा आबाजी यासी त्रिंबकजी घाटगे यानी सीकेची जमदाड देऊन पुळविले. त्यावर त्रिंबकजी घाटगे त्या झुंजात पडले. उपरी आमचे आजा विठोजी घाटगे व त्याचा धाकटा भाऊ आबाजी घाटगे येऊन कसबे डिगुरजेस राहिले. त्याचेमध्ये कांगल.... (फाटले आहे.).

ह्या उपरी कागलात अवघ्यानी जाऊन वस्ती केली. मग निम्मेचे भाग पिराजी घाटगे औरंगशहाजवळ जाऊन कागद जहागिर करून आले. आमचे वडील त्रिंबकजी घाटगे यांचे वडील कोकणात सावताचे आश्रेने जाऊन राहिले. तेथे आमच्या वडिलांस कोकण सोसेना. चुलते मलजी घाटगे त्यांस खबर कळलियावर ते येऊन आमच्या वडिलांस घेऊन आले. मग राजश्री राजे चंदीस गेले. मग राजश्री रामचंद्रपंताजवळ चाकरी राहून स्वराज्यातील कागल मोबदला करून घेतला. मग कागलात जाऊन राहिले. वतन आनभवीत होते. त्यावर विषाची बाधा होऊन मलजी घाटगे मृत्यू पावले. संबाजी घाटगे आपले राजश्री हिंदुराव घोरपडे याजकडे चाकरीस राहिले. संताजी घाटगे कोकणात होते. यमगेकर पाटील याचा भाऊ पिराजी घाटगे यानी मारिला. म्हणोन यमगेकरांनी संताजी घाटगे यासी आणोन शेंडुरात जागा करून दिला. आमचे बापास खबर

पाठविली. त्यानी चिकोडीकर बस........देसाई यासी भेटून संताजी घाटगे याचे साहित्य करविले. मग मुरगुडचा हुडा घेऊन तेथे राहिले. त्यावर दोन वर्षात कागलावर राजश्री हिंदुराव व चंद्रसेन जाधवराव यानी वेढा घातला. तेसमई आमचें बाप राजश्री हिंदुराव घोरपडे याकडे होते, तेव्हा रदबदल करावयासी कागलास गेले, परंतु बनाव जाला नाही. आपण वतनदार भावावर विरोध आला त्यांस अंतर करू नये यास्तव लस्करात घोडी-बीसात डेरा दांड्याची सोडी करून भावाचे कुमकेस कागलात राहिले. हे वर्तमान हिंदुराव यासी कळल्यावर त्यानी यांची घोडी-बीसात लुटून नेहली. दुसरे रोजी गावावर हाला जाहला. गावात तुकोजी घाटगे आमचा चुलता पडला. त्यास माती द्यावयास बाहेर आणिले. ते समई आबाजी घाटगे व मलजी व संताजी घाटगे यासी बोलाविले. त्यांनी सांगोन पाठविले जे आपले बागेत माती द्याल तर आपण येत नाही. तेव्हा संबाजी घाटगे यानी आपले बागेमध्ये नेऊन माती दिली. त्यापासोन आपले बापात व त्यात कलह लागला. तेव्हा आमचे बापास काटकर असे म्हणो लागले. या बाबे पनालेवर राजश्री तारा आईसाहेब याजवळ ईन्साफ जाहला. ते समई राजश्री रामचंद्रपंत व हिंदुराव व चंद्रसेन जाधवराव व कुसो मल्हार व शाबाजी नाईक निंबाळकर व गिरजोजी यादव व येसाजी मोहिते तलवडीकर इत्यादिक मराठे होते.

त्याचे विद्यामाने आपले वडील घाटगे असे करार जाहले. त्याची पत्रे हुजुरची होती. ती राजश्री बाळाजी विश्वनाथ यानी आष्टेचे ठाणे घेतले ते समयी गमावली. निवडीप्रमाणे डिगरजेत आपले बाप राहून वतन आनुभवीत होते व त्रिंबकजीचें वडील मुरगुडी राहून वतन खात होते. काही याची त्याची वतनाची कज्या थकला नव्हता. डिगरजेवरी मिरजकरांची स्वारी आली तेव्हा झुंज जाहले. तेथे आपले बाप संबाजी घाटगे पडिले. या उपरी आपले मातोश्रीने वीस बावीस वर्ष वतन केले. तेव्हा त्रिंबकजीच्या वडिलानी कज्या केला नाही. त्यावर आपणही चा-पाच वर्ष करीत आलो. ऐलीकडे त्रिंबकजी घाटगे यांनी कज्या करून महाराज राजश्री स्वामीजवळ उभा राहून तुमचे थलास आणिले, त्यावरून आवघा करीना लिहून दिला असे. तुम्ही गोतगंगा धर्म निवाडा करणार असा हा करीना लिहून दिला. सही छ. २४ माहे रबिलाखर.

लेखांक : ११

कागल ज्युनिअर : १७५७-५८

श्रीयासह चिरंजीव विजई भव राजेश्री नाना यासी—प्रती आनुबाई अनेक आशीर्वाद विंनती येथील कुशलता मार्गशिर्ष शु॥ प्रतीपदा भृगुवार मु॥ ईचलकरंजी सुखरूप जाणुन स्वकीय कुशल लिहिता असिले पाहिजे. विशेष राजेश्री तुळजोजी घाटगे सर्ज्याराव व राणोजी घाटगे सर्ज्याराव हे उभयंता आपल्या घर कलहामुळे आपणापासी आजी एक वर्ष बैसले होते याचा सर्व वृत्तांत आपणास श्रृतच आहे. तूळजोजी बावास आरोग्य नव्हते या करिता त्यास घरी जावयास आपण निरोप दिला. मार्गीं भुईंज प्रांत वाई येथे मृत्यू पावले ईश्वरे आंघात केला त्यांस आजी अकरा दिवस जाहाले त्या सुतकातच चिकोडीकरानी हजार दीड हजार जमा होऊन त्यासी कजीया लावून गुरे वळवुन नेली तेव्हा कागलकर शे दोनशे हे याचे त्याचे युद्ध जाहाले. आपले आशिर्वाद करून कागलकरास येशच आले. पुढे आणकी चिकोडीकर कजीया करणार ईतकीयांत याचे वर्तमान ही आले त्यास चिकोडीकरांस यीके ताकीदपत्र देऊन कागलकराचे वाटेस न जाता ते केले पाहिजे. बाकी राहता राजेश्री यशवंतराव धाकटा बंधु राहिला आहे आपली आज्ञा ज्या प्रमाणे होईल त्याप्रमाणे वर्ततील. कागलकर घरणदाज आपल्या पदरीचे आहेत. येविषी आम्ही लिहावे ऐसे काय आहे. बहुत काय लिहिणे लोभ असो दिल्हा पाहिजे. हे आशिर्वाद.

लेखांक : १२

कागल ज्युनिअर : इ. स. १७६०-६१

राजेश्री यशवंतराव सर्ज्याराव घाटगे गोसावी यासी अखडींत लक्ष्मी आलंकृत राजमान्य नारायणराव व्यंकटेश आशिर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत जाणे विशेष राजश्री राणोजी घाटगे याचा व तुमचा कज्या निमित्त तुम्ही श्रीमंतापावेतो गेला. त्यांचा फडशा न होता निघोन माघारा आलेत याकरिता विषाद जाऊन विलयास जावयाचा प्रकार दिसून आला. तुमच्या आमचा स्नेह या करिता नाना प्रकारे सांगोन यांचे

मनोदयानुरूप आपले आज्ञेप्रमाणे करून देतो म्हणोन श्रीमंतापासी करार करून....समागमे घेऊन आलो ये विषयीच विचार बोलावा लागतो तर तुम्हा-कडील कारकून शाहाणा मनुष्य पाठवून देणे-रवाना छ. ५ माहे सवाल मु॥ ईचलकरंजी बहुत काय लिहिणे.

लेखांक : १३

कागल ज्युनिअर : २९ जानेवारी १७६१

राजेश्री यशवंतराव सर्जेराव घाटगे गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकीत बालाजी बाजीराव प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे. विशेष करवीरच्या बंदोबस्तास राजेश्री हरीराम व विसाजी नारायण यांस पाठविले आहेत. त्यांस तुम्ही याजवळ आपले जमावसुद्धा सामील होऊन हे सांगतील त्याप्रमाणे करणे. उभयता म॥र निल्हे तुम्हास लिहितील ते समयी येऊन सामील होणे जाणीजे. द. २० जमादिला-वल बहुत काय लिहिणे.

लेखांक : १४

कागल ज्युनिअर : ता. २३ फेब्रुवारी १७६१

राजेश्री यशवंतराव सर्ज्याराव गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ बाळाजी बाजीराव प्रधान आशीर्वाद उप्रीयेथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत जाणे. विशेष राजेश्री अहीलोजी यादव यानी करवीराकडून स्वारी घेऊन येऊन वारणे ऐली-कडील रयेतास उपद्रव आरंभीला आहे याकरिता त्यांचे बंदोबस्तास सरकारची पथके, स्वार, गाडदी व हशमी लोक रवाना केले आहेत. त्यास वारणे पलीकडे अथवा अैलीकडे दुसरा (फाटले आहे) यैसे नाही सर्व येकच आहे. उगाच कलह त्यानी निर्माण करून रयतीस पीडा मांडिली आहे. तरी येकरूपताच होईल तर या प्रसंगी तुम्हांकडील स्वार प्यादे तिकुडील मदतीस आली याने ठीक नाही सरकारचा पेच तुम्हां वर येईल याजकरीता लिहिले असे तर स्वार

प्यादे तिकडे कुमकेस येकदम पाठविणे जाणीजे छ. ५ रजेब सु।। सीतेन मया व अलफ बहुत काय लिहिणे

लेखांक : १५

कागल ज्युनिअर : २७ मे १७६२

ता।। मोकदमानी मौजे सावर्डे बु।। पा।। कागल सु।। सलास सीतेन मया आलफ मौजे मजकुरावरी श्रीमंत पेशव्येची पटी करार रुपये ५०० पांचशेहे केले असेत. सदरहु वरातदार येतील याचे पदरी घालणे जाणीजे. छ २ माहे जीलकाद

लेखांक : १६

कागल ज्युनिअर : ता. ६ जून १७६२

ता।। मोकादमानी मौजे बाचणी पा।। कागल सु।। सलास सीतेन मया आलफ दर्शवीला श्रीमंत पेशव्येची पटी करार रुपये ४०० चारशे केले आहेत ती सदरहु वरातदार येतील याचे पदरी घालणे. जाणीजे छ १२ जीलकाद

लेखांक : १७

कागल ज्युनिअर : २४ ऑक्टोबर १७६२

राजेश्री राणोजी घाटगे सर्ज्याराव गोसावी यास

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत रघुनाथ बाजीराव आशिर्वाद उपरी ईकडील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत जाणे. विशेष श्री मन्महाराज मातुश्री बाईसाहेब यानी सर्वांचे समते कैलासवासी माहाराज याचे राज्यासनी शाहाजी भोसले खानवटकर याचा पुत्र दत्त विधी युक्त घेवून विजया दशमीचे सुमुहुत सिंहासनारूढ केले हे गोष्ट उत्तम केली. आम्हांसही मान्य आहे तरी त्यांचे ठायी येक निष्ठेने वर्तणूक करीत जावी जाणीजे छ ६ रबिलाखर बहुत काय लिहिणे

लेखांक : १८

कागल ज्युनिअर : ता. १७ नोव्हेंबर १७६२

राजमान्य राजेश्री राणोजी घाटगे यासी श्री मन्माहाराज मातुश्री जिजाबाईसाहेब यानीं आज्ञा केली औसीजे सु॥सलास सीतेन मया व आलफ-चिरंजीव राजश्री शिवाजीराजे याज कारणे राजश्री रघुनाथ पंडीत यानी बाबुराव बावाजी याज समागमे पत्रे, जवाहीर रत्नखचीत पाठवीली आहेत. राजेश्री माधव-राव पंडित प्रधान याजकडून ही पत्रे आली. राजेश्री रघुनाथ पंडीत यानी तुम्हास पत्र पो आहे. त्यावरून कळेल तुमचे जाहागीरीवर नवीन भवानजी जाधव पो आहे. यासी खर्चास रुपये ५ देवीले असे. देणे जाणीजे छ. ३० रबिलाकर बहुत काय लिहिणे

लेखांक : १९

कागल ज्युनिअर : ता. १७ डिसेंबर १७६९

राजश्री बाबाजी अनंत व राजश्री जनार्दन अनंत उपनाम म्हाशब्दे गोसावी यासी—

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकीत राणोजी बीन आबाजी सर्ज्याराव घाटगे देशमुख व नाडगौड प्रांत कागल दंडवत सु॥ सबैन मयाआलफ लेहून दिल्हे वतनपत्र औसाजे प्रांत मजकूरची देशमुखी व नाडगौडकी व गाव गन्ना पाटीलकी याचे आपल्या वंशपरंपरा वतन व प्रांत मा॥र कुली सानक या-प्रमाणे पिढी दर पिढी चालत असतां दरम्यान श्रीमंत राजश्री माधवराव पंडीत प्रधान याचे कारकीर्दीस विक्षेप होऊन जाहागिरीस खलेली जाहली. कागलच आमचे ठाणे ही गेले दिवाणच........ठाणेदार येऊन यानी ठाणे आम्हा पासोन आपले हस्तगत केले. तेथ आमच्या वतनी उत्पनासही खलेल बहुता पडोन जाहालीं व श्रीमंत महाराज मातुश्री आई सो। करवीरवासी याजकडूनही वतनी आंमलास खलेल जाहाली वतनी व उत्पन्न कुली चालेना याचे प्रयत्नास पुणेस आलो पांच सांत वर्षे प्रयत्नही केला परंतु या गोष्टीचा प्रयत्न कोणाचे हाते जाहाला नाही दिवस गत गुदरू लागली तेव्हा भोगवटयास ही उजुर

पडो लागला येणे करून कुलवृत्तीस आपाय जाणून तुम्हासी आम्ही संदर्भ केला जे आमचे वतनाचा विचार असा होऊन वृत्ती चालेनासी जाहाली. तुम्ही आंगेजनी करून या गोष्टीचा श्रमसायास करून वतनाचा बंदोबस्त केलीया होईल त्यावरून तुम्ही ही गोष्टी मान्य करून आम्हांसी बोलिला कीं, आपण या वृत्तीसाठी जिवदारभ्य व द्रव्यद्वारा आंत करीत नाही. येणे प्रमाणे आम्हांसी बोलून सर्व प्रकारे अंगिजनी करून आमची वृत्तीबद्दल दरबारी श्रम सायास करून दरबारचे कागदपत्र व इत्यादीक साहित्य व करवीरवासी पत्रे घेऊन कुल बंदोबस्त केला. पुढे दरबारी खर्च वेंच पडला व आमचा मुक्काम पुणेत जाहला या गोष्टीविषयी खर्च वेंच पडला अवघा मजकूर ध्यानास आणिता पैकेची बेरीज भारी जाहाली याचे निर्गतीस आम्हास अनुकुलता नाही. तेव्हा तुम्हां पासी काही पतपतेरा करून विचार केला की, तुम्ही हल्ली श्रम करून कार्यें केले आणि पुढेही घरंदाज आणि ईतबारी कार्यकर्तें ममतेचे पदरी तुम्ही पदरी असली यापुढे ही वतनाची उपयोगी असे चित्तांत आणून आमचे वतन देशमुखी व नाडगौडकी व पाटीलक्या यांची कुलवतनी सर मुतालिकीस वेतन नक्त रुपये ३०० तीनशे व जमीन २ चावर गावगन्ना सिस्त आलाहिदा करून दिली आहे. त्याप्रमाणे वेतन आनभवुन वृत्तीसंमंधे सेवा तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरा आनुभवुन सुखरूप राहाणे. या वतनी तुमचे धंदीयास तुम्हांपासून नजर रुपये घेऊन दरबारचे व आमचे........खर्च वेचाची देणें कराची निगति केली असे सदरहु तुमच्या वतनी धंदीयांस वेतनास आमचे वंसी कोणी खलेल न करावी सबब की तुम्ही सर्व प्रकारे वतन राखिले यास्तव जो कोणी खलेल करील त्यास श्री कुलस्वामीची व पुर्वजाची शफथ असे बहुत काय लिहिणे छ ११ माहे साबान शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे मार्गेश्वर वद्य पंचमी भानुवासरे

लेखांक : २०

कागल ज्युनिअर : ता. १७ डिसेंबर १७६९

राजश्री रागोजी राजे घाटगे सर्ज्याराव देशमुख प्रां॥ कागल गोसावी यासी अखडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ बाबाजी अनंत आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणुन स्वकीय कुशल लि॥ गेले पो. विषेष प्रां

कागल....आपली....पिढी दर पिढी चालत आली आलीकडे श्रीमंत प्रधान यांस श्रीमंत माहाराज मातुश्री जिजाबाईसाहेब यानी श्रीमंतास सांगुन ठाणे बसवून हस्तगत केली यांस पांच सांत वर्षे जाहली दरबारी सुद्धा श्रमसायास केले कोठे उपाय न चाले यास्तव ये गोष्टीचा तुम्ही आंगीकार करून हे कार्य करावे त्यास........जाहालीयावरी या सरंजामाची दिवाणगिरी व फडणीसी वतनी तुम्हास देऊन तुम्हास वेतन दिवाणगिरीस पालखीस रुपये १००० व जाती संवसारास रू॥ २०००-दोन हजार व फडणीस वेतन रुपये पाचशेहे येकूण तैनात दिवाणगीरीस व फडणीसीस साडेतीन हजार याचे आपले वतनी गाव ईनाम राजपत्री आहेत ते लावून देवू व सोडावयास सरकारांत वगैरे जो खर्च पडेल तो तुमचे साधनसुधा ऐवजी फेडून घेणे तुमचे साधनसुधा फिटल्यावरी मग आम्ही अंतर करणार नाही या प्रो केली. यावरून आम्ही तुमचे पदरी पडोन ही गोष्ट कबुल केली की, आमचा जितका प्रयत्न चालेल तितका करून साधनकेचे काम करून देऊ कामकाज जाहालीयावरी जो तुम्ही करार करून लिहून दिल्हे आहे त्या प्रो आमचे वंशपरंपरा चालवावे आम्ही तुमचे सेवा वंशपरंपरा करावी तुम्ही आम्हासी कार्य जाहल्यावरी अंतर करू नये. आम्हीही करणार नाही यास आनर्थ जो करील त्यांस कुलस्वामीची शेफथ आहे. श्रम करून साधनक न चालु ये तरी आमचा उपाय नाही प्रयत्न आमचा प्राक्तन तुमचे आम्ही येत्नास अंतर करणार नाही हा कागद लिहून दिल्हा सही शके १६९१ विरोधी नाम संवत्सरे मार्गशीर्ष वद्य पंचमी बहुत काय लिहिणेहे विनंती.

लेखांक : २१

कागल ज्युनिअर : ता. ८ डिसेंबर १७७४

श्रीमन्माहाराज मातुश्री दुर्गाआईसाहेब यानी राजमान्य राजश्रो राणोजी घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली येसीजे-तुमचे भाऊबंद याच्या वाटण्या जाहाल्या ते समई यशवंतराव घाटगे याजकडे पिंपळगाव व बाचणी चौघांचे मते रास्ती विभाग करून दिला असता बाचणी प्रस्तुत तुम्हाकडे आहे म्हणून विदीत जाहाले तरी हे विहीत नव्हे. यशवंतराव याची मुले नेणती. त्यांचे तुम्ही संगोपन करावे. ते न होता रास्ती त्याचे वाटणीस बाचणी आली असता, अनुंभवावी हे उत्तम नव्हे. त्याची बाचणी हा गांव हाल्ली यशवंतराव याचे मुलाकडे

देणे तुम्ही न दिल्हया पक्षीं सरकारातुन तो गाव देवीला जाईल. जाणीजे सु।। खमस सबेन मया व आलफ छ ४ माहे शावाल बहुत काय लिहिणे–

लेखांक : २२

कागल ज्युनिअर : ता. २० मे १७७८

राणोजी सर्ज्याराव घाटगे गोसावी यासी

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने।। माधवराव नारायण प्रधान आशिर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहिणे विशेष तुम्ही पुरातन सरदार दरोबस्त कागल प्रांत तुमचे वडील (वाळवीने खाल्ले आहे) पेशजी भगवंत अप्पाजी व शेष नारायण यांनी सरकारात गैरवाका समजावुन कागल वगैरे गाव घेवून राजमंडळ करवीराकडे दिले त्याजवरून तुम्ही देशांतरास गेला उपरांतीक रामचंद्र गणेश यांनी कागल वगैरे गाव घेऊन तुमचे स्वाधीन केले त्यापासुन स्वतः मेहनत करून सिबंदीचे पेचात येऊन सरकारचा (फाटले आहे) राखीला हे जाणोन कैलासवासी मातोश्री आई साहेब याच्या कारकीर्द पासून कागल वगैरे गाव सरंजाम चालत होते त्या शिवाय ईनाम पत्री ईनाम गाव व देशमुखी व नाडगौडी वगैरे वतन बाब चालवावे येणे प्रमाणे राजमंडळ कडून तह करून देविला असे त्या प्रमाणे तुम्ही आनुभवुन सुखरूप राहाणे हर येक विषी उपद्रव होणार नाही २२ रबिलाखर (फाटले आहे) समान सबेन मया व आलफ बहुत काय लिहिणे.

लेखांक : २३

कागल ज्युनिअर : ता. ४ मार्च १७७९

राणोजी सर्ज्याराव गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत परशराम रामचंद्र आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणे विशेष तुम्ही पत्र पाो ते पावेल लिहिला मजकूर व राजेश्री बाबुराव यानी विदीत केल्यावरून सविस्तर कळले. तुम्हाविषयी चिरंजीव राजेश्री बळवंतराव यांस पत्र लि।। आहेत. निरोप देतील वरकड मा।र नीलेच्या पत्रा-

वरून कळेल. छ. ११ सफर बहुत काय लिहिणे हे विनंती छ. १५ माहे सफर सु॥ तीसा सबेन मय्या व अलफ

लेखांक : २४

कागल ज्यूनिअर : ता. १७ जून १७८१

राजेश्री या विराजीत राजमान्य राजेश्री—

परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यासी पो माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जाणे विशेष राणोजी घाटगे सर्ज्याराव कागलकर यानी हुजूर विदीत केले की कर्यात डिग्रज प्रांत कागल तालुके मिरज येथील देशमुखी व कसबा डिगरजेची पाटीलकी पूर्वीपासून आमची आम्हाकडे चालत आली असता हल्ली तिघस्ता पासून आमची भावजयी सगुणाबाई घाटगी याजकडे परशराम रामचंद्र वतन चालवितात त्यास राजेश्री महादजी शिंदे व बाजी गोविंद यानी सगुणाबाईच्या खर्चास सालीना तीनसेह रुपये आम्हाकडून देण्याचा ठराव करून दिला आहे. त्याप्रमाणे देत जाऊ वतनास आडथळा न होता आम्हाकडे सुरळीत चालत केलें पाहिजे. म्हणोन त्याजवरून हे पत्र तुम्हांस लिहिले असे. तरी पूर्वीपासून राणुजी सर्ज्याराव घाटगे याजकडे कर्यात डिगर ज येथील देशमुखी व कसबा म॥रची पाटीलकी चालत आल्याप्रमाणे चालवणेस सगुणाबाई घाटगे यांची भावजयी तीजबद्दल राजश्री माहादजी शिंदे व बाजी गोविंद यानी ठराव करून दिला आहे. त्याप्रमाणे हे देत जातील तुम्ही याचे वतनदारी सगुणाबाईचा पक्ष धरून दिकत न करणे चालत आल्याप्रमाणे चालवणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणीजे छ. २४ जमादिलाखर सु॥ ईसने समानीन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक : २५

कागल ज्युनिअर : ता. ३० नोव्हेंबर १७९१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११८ वि रो धी कृत नाम संवत्सरे मार्गशिर्ष शु॥ पंचमी सौम्यवासरे क्षत्रीय कुळावतंस श्री राजा शिवछत्रपती स्वामी यानी

चिरंजीव सौ. संपन्न वज्रचुडेमंडीत जिजाबाई घाटगे सर्ज्याराव देसाई का।। कागल यासी दिल्हे ईनाम पत्र असाजे–तुमचे विषयी राजश्री सुबराव पंडीत आमात्य यानी विनंती केली की आपण सौभाग्यादी संपन्न जिजाबाई घाटगे सर्ज्याराव देसाई का।। कागल यासी चोळी कांकणा बद्दल सेवकाचे सरंजामा पो ईनाम मौजे परीते ता।। तारळ हा गांव करार करून दिल्हा आहे माहाराज कृपाळू होऊन भीगवटेस सनदा सादर व्हाव्या म्हणून विदीत केले त्याजवरून स्वामी कृपाळु होऊन पंडीत मा।रे नीले यांनी ईनाम दिले हुजुरून मौजे परीते ता।। तारळ हा गाव देह एक रास १ एक आजरामरामत चोळी काकंणाबद्दल ईनाम करार करून दिल्हा असे तरी तुम्ही सदरहु मौजे म।। पूर्व मर्यादे प्रा चतुःसीमा पुर्वक आपले स्वाधीन करून घेणे आणि ईनाम तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने आनभऊन सुखरूप राहाणे सदरहु ईनामास कोणी ईस्कील करील त्यास त्याचे स्वधर्माची शफत आसे जाणीजे नीदेश समक्ष मोर्तबा आहे. सदरी शिक्का तीन आहे. रुजु. तारीख ४ रबिलाखर सु।। ईसने तिसेन मया व आलफ



लेखांक : २६

कागल ज्युनिअर : ता. १४ जानेवारी १७९२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११८ विरोधी कृत नामसंवत्सरे पौष बहुल पंचमी मंदवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी याणी राजश्री देशमुख व देशपांडे.

ता।। कागल यासी आज्ञा केली ऐसीजे राजेश्री यशवंतराव बीन राणोजी घाटगे सर्ज्यांराव देसाई ता।। मजकुर यांनी करवीराचे मुक्कामी स्वामी संनीध विनंती केली की, आपले पुरातन ता।। मजकुरचे देसकतीचे वतन चालत आहे. माहाराज कृपाळु होऊन हक ईनाम कानूकायदे गाव गन्ना करार करून देवून भोगवटीयांस सनदा सादर व्हाव्या म्हणुन विदीत केले त्यावरून स्वामी याज वरी कृपाळु होवून ता।। मजकुरच्या देसकतीच्या वतनास हक ईनाम कानु कायदे करार करून दिल्हे असेत. गावगन्ना देहाय बी तपशील—

किता गाव

१ कसबा कागल
१ मौजे बाचणी
१ मौजे वाळवे बु॥
१ मौजे सावर्डे बु॥
१ मौजे सेंडुर
१ मौजे बस्तवडे
१ मौजे कुरूकली
१ मौजे डिगरजखुर्द
१ मौजे रूबी
१ मौजे मलगे बु॥
१ मौजे पींपळगाव
१ मौजे केंब्रळी
१ मौजे वाळवेखुर्द
१ मौजे सावर्डे खुर्द
१ मौजे करनुर
१ मौजे म्हाकवे
१ मौजे मुरगुड
१ मौजे मांजरी
१ मौजे चोकाक
१ मौजे भडगाव
१ मौजे बेलवले बु॥
१ मौजे तुंग
१ मौजे बोरगाव
१ मौजे मळणगाव
१ मौजे बेलवले खुर्द
१ मौजे चंद्रे
१ मौजे बोरीवडे
१ मौंजे सोनाली

किता गाव

१ मौजे वंदूर
१ मौजे सकरवाडी
१ मौजे सिदनरली
१ मौजे होनुर
१ मौजे पिंपळगाव खुर्द
१ मौजे येकोंडी
१ मौजे बामणी
१ मौजे खेबवडे
१ मौजे होनाळी
१ मौजे चिखली
१ मौजे मीवसी
१ मौजे यमगरणी
१ मौजे नांगनुर
१ मौजे कोलगे
१ मौजे बालिंगे
१ मौजे सोनगे
१ मौजे आनुर
१ मौजे केनवडे
१ मौजे गेरंबे
१ कसबा डिगरज
१ मौजे....
१ मौजे आलसंद
१ मौजे डोंगरसोनी
१ मौजे निगवे
१ मौजे बिदरी
१ मौजे उंदरवाडी
१ मौजे साके
१ मौजे चिमगाव

१ मौजे मलगे खुर्द	१ मौजे यमगे
१ मौजे सुरुपली	१ मौजे कुर्णी
१ मौजे निढोरी	१ मौजे माणगाव
१ मौजे चवंदाल	१ मौजे आकली
१ मौजे सिरदवाड	१ मौजे गोरगाव
०॥० मौजे नीमसिरगाव	१ मौजे साजणी
३३॥	३४

येकूण देह सुमार साडेसदुसष्ठ येथील देसकतीचे वतनास हक्क ईनाम कानु काईदे यार्चा मोईन करार करून दिले असे कलमे बी त॥

किता	कलमे	किता	कलमे
	इक दरसदे नकद १० रुपये		घुंगरी पेंडी कलम १
	ईनाम दर चावरी जमीन		जकायत दर वेली रुका
	बिघे ८६।- कलम १		८३ गोणीस रुके
	मळा जमीन कलम १		८१ भुसगोणीस रुका
	वतनी रयताव कलम १		८४ कलम १
	भेट बकेर कलम १		साळी कोष्टी घनगर
	लग्ना मुहुर्तास नारळ		सणगर मागास साळीना
	खांडवा कलम १		हक्क रुपये ८२ कलम १
			तेलीयाचे घाणेस दररोज
	मेटकुडा कलम १		तेल पा— कलम १
	आडतईरल कलम १		पानारी याचे नगास पाने
	सण बेंदुर कलम १		सुमारे १०० कलम
	पक्षाचे तुप शाकभाजी		पानारी यांचे दुकानात
	फाटी भारे कलम १		दररोज पाने १२
	गुगलाचा हक कलम १		कलम
	गुराळाचे घाणेस दररोज		फरकी उकाळा कलम १
	ऊस व रस व सेरणी		राबता महार कलम १

कलम १	चांभाराकडील सालीना
परस कडील पडद कलम १	जोडा कलम १
ठाणेचे गावास	बायजमा कलम १
आसामी येक कलम १	दिवाणातुन तश्रीप
	कलम १
	लक्ष्मीचे जत्रेस हक कलम
	वेगैरे वेट कलम १

येकूण कलमे सुमार अठ्ठावीस येणेप्रमाणे तर्फ मजकूरचे देसकतीचे वतन व हक्क ईनाम कानु कायदे करार करून दिल्हे असेत तरी यासी व याचे पुत्र-पौत्राही वंशपरंपरेने चालवीत जाणे या सनदेची तालीक लिहून घेवून अस्सल पत्र देसाई मशारनील्हे याजकडे भोगवटीयासी देणे जाणीजे नीदेश समक्ष मोर्तब आहे रुजु समंत मंत्री

लेखांक : २७

कागल ज्युनिअर : इ. स. १७९४

यादी-समज पत्र तीर्थस्वरूप राजेश्री विश्वासराव बापु यास यशवंतराव घाटगे सर्ज्याराव सु।। अर्बा तीसेन मया व आलफ तुम्ही व आम्ही तीर्थस्वरूप राजश्री यशवंतराव त्रीवर्गानी करार नामा लिहुन दिला बी त।।

१ ठाणे कागलचा अैवज जो आहे तो श्रीपीर साहेब याजकडे खर्चास द्यावा स्वासगत खर्चास घेऊ नये. अैवजाशिवाय खंडचेवरास्त अैवज होईल तो....द्यावा कलम

१ ठाणे मा।।र मळे व शेते पेशजी वहिवाटी प्रो जिकडील तिकडे चालावी

१....कलमे मामलेदारास सांगून चालवावे. कलम

१ वतनीगाव व ईनामगाव करार करून दिले आहे त्याप्रमाणे अनभऊन राहाणे

१ का॥ चिकली
१ का॥ वाळवे
१ मलगे बु॥
१ मलगे खुर्द
१ भडगाव
१ मौजे कुरणी

येकूण साहागावे व वतन बाब हाकदारी सु॥ तुम्ही अनभऊन राहावे—कलम

१ सरकारांत स्वारी खर्च पडल तो आम्ही करावा— कलम

येकूण कलमे पांच सदरहु लिहून दिले प्रमाणे करार असे—

साक्ष.

१ नारायणराव पाटणकर सरलष्कर
१ गोपाळराव शिंदे

लेखांक : २८

कागल ज्युनिअर : ता. ९ सप्टेंबर १७९५

राजमान्य राजश्री राणोजी नाईक निंबाळकर नामजाद व केसो महादेव कारकून किल्ले प्रसिद्ध गड यासी आज्ञा केली ऐसीजे—मौजे बेलवले बु॥ प्रांं कागल येथील पयोद किल्ले मा॥री चाकरी करीत आहेत त्यास हाल्ली सदरहु गाव चिरंजीव राजेश्री यशवंत घाटगे सर्ज्याराव याजकडे दिल्हा याज करिता येथील पयादेची किल्ले मजकूरी चाकरी मना केली आहे तरी पयाद्यास निरोप देऊन मौजे मजकुरास पाठवून देणे जाणीजे. सु॥ सीत तीसेन मया व आलफ छ. २४ माहे सफर निशान मोर्तबां

लेखांक : २९

कागल ज्यूनिअर : ता. १२ डिसेंबर १७९६

चिरंजीव राजमान्य राजश्री यशवंतराव घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे राजेश्री सिदरामराव घाटगे सर्ज्याराव व राजेश्री यशवंतराव घाटगे सर्ज्याराव या उभयतापर्यंत तुम्ही जाऊन उभयतास घेऊन हुजूर करवीरचे

मुक्कामी येणे विषयी आज्ञा करणे ते राजेश्री जोत्याजी यादव यासी करून पाठवीले आहेत. सांगतील त्यावरून कळो येईल. जाणे विषयी अनुमान न करिता जाऊन घेऊन यावे. जाणीजे. सु॥ सीत तीसेन मया व आलफ छ. २९, माहे जमादिलावल बहुत काय लिहिणे,

लेखांक : ३०

कागल ज्युनिअर : ता. ३ मे १८००

राजमान्य राजेश्री तुळजोजी घाटगे सर्ज्याराव यास आज्ञा केली ऐसीजे हुजुरान आज्ञा करून चिरंजीव राजेश्री विश्वासराव घाटगे सर्ज्याराव व वेदशास्त्र संपन्न राजेश्री रामचंद्र जोशीराव व राजेश्री आकाराम यादव हवालदार व राजेश्री बच्याजी बलाळ यासी पाठवीले ते येवून पोहचले असतील. आपणास हुजूरच लक्ष सर्वापरी त्यांत सर्व तेथील बाजी आपले हाती आली आहे या प्रसंगी जितकी सेवा करून दाखवाल तितकी स्वाधीन आहे ये विषयी आपणास आज्ञा पत्री आज्ञा करवून कळवावेसे नाही. सर्व कारभाराची बाजी आपले स्वाधीन यात जो कारभार करणे तो बहुत धरून करीत जावा. मोठेपणा आपलेकडे आले आहे. तेव्हा नेणतपणा सोडून सावधपणा करणे ते करीत आसा व आपण सुज्ञे आहात विस्तारे आज्ञा करणे न लगे. करवीरावरील फौज उठून गेली याच-मुळे ताकीदी ठेवून घेतल्या त्याजकडे पाठवीली नाहीत. कळावे वरकड आज्ञे-प्रमाणे व राजेश्री लिंबाजी यादव हवालदार यानी लिहिले आहे त्याजवरुन कळल. जाणीजे सु॥ सन मयातेन व आलफ रवाना छ. ८ माहे जिल्हेज बहुत काय लिहिणे

लेखांक : ३१

कागल ज्युनिअर : इ. स. १८०१

यादी नी॥ सखाराम घाटगे सर्जेराव याजकडून यैवज मुबादल्यास व जव्हायर व कापड मा॥र नीलेकडे व गाव सीलेदार पथक व दागीने सोन्या-रुपयाच व पागची घोडी व हाती व ऊंट वगैरे खरेदी सुद्धा दरोबस्त फडशा

बदल ई।। सन सबा तीसेन (इ. स. १७९७) आवल साल ता।। सन ईहिदे मया तेन (इ. १८०१) माहे सफर आषाढ मास पर्यंत येकंदर देण्याचा मोघम ठराव १४०००००रुपये येकूण चौदा लक्ष रुपये येकंदर द्यावयाचे ठरले त्याची हप्ते बंदी साल दरसाल द्यावयाची याद आलाहिदा ठराऊत यैवज नेमुन देवीला जाईल येणे प्रमाणे करार

१२१० फसलीत कोल्हापुरास भाऊसाहेबाचे लेक रामचंद्रपंत अपा याने सिंदेकडील कंपु व श्रीमंताची फौज २५ हाजार आणुन वेढा घातल्या वेळी शिंदेस व श्रीमंतास चौदा लक्ष रुपये........कितेक नग....कितेक हवाला देवून वेढा उठविला त्या वेळी महाराजानी लिहून दिले याद्या प्रमाणे यैवज यावा.

लेखांक : ३२

कागल ज्युनिअर ता. २३ मार्च १८०१

राजमान्य राजेश्री तुलजाजी घाटगे सर्जेराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही स्वामीचे संरक्षणाविषयी जीवादारभ्या श्रमसहाय्य केलेवरून स्वामी तुम्हा-वर कृपाळू होऊन चिरंजीव राजेश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव याजकडील ठाणे कागल व गाव घेवून खालसा असलेले गावंसुद्धा तुम्हास देणेचे ठरलेवरून मशार निल्हे याचे समजुतीबद्दल जेसमई आज्ञा होईल ते समई ठाणे हुजूरस्वाधीन करून देवू म्हणोन वगैरे मजकुराचे विनंतीपत्र तुमचे स्वदस्तुरचे घेवून मा।र निल्हेस भरंवसा येणेविषयी तुर्त त्याजपासी देवून तुम्हास अलाहिदा सनद देवून ठाणे व गाव द्यावयाचे ठरले आहे. तरी तुम्हास सदरी लिहिले विनंतीपत्र घेवून दिलेबद्दल कोणतेहि गोष्टीची आंदेशा न धरणे थोडे दिवसातच तुमचे विनंतीपत्र मा।र निल्हेकडून घेवून देवीले जाईल. सु।। ईहिदे मया तेन व आलफ ७ माहे जिलकाद. बहुत काम लिहिणे मोर्तबा सुद

लेखांक : ३३

कागल ज्युनिअर : ता. ४ एप्रिल १८०१

चिरंजीव राजमान्य राजेश्री सखाराम घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही करवीरचे मुक्कामी स्वामी सनीध विनंती केली की, प्रांत कागल

देहाये सुद्धा आम्हाकडे पुरातन पासून ईनाम चालत असता हल्ली दंगेमुळे काही देहाये चालत नाही याजकरिता नुतन सनदा भोगोटी यास देवून चालविले पाहिजे म्हणोन विदीत केले त्याजवरून मनास आणिता तुम्ही स्वामीचे राज्याचे उपयोगी राजेश्री रामचंद्र परशराम यांनी राजेश्री पंत प्रधान व सिंदे याजकडून व आपली फौज आणुन राज्य आपतरीस आणिले. करविरास शाहा देवून राज्याचा उछेद करावा हे लक्ष धरून राज्याचा नाश केला. ते समई तुम्ही राज्य उपयोगी स्वामी सेवा खातर जमा युक्त करून दाखविली त्याजवरून स्वामी तुम्हावर कृपाळु होवुन पुरातन तुमच्या वडिलार्जींत पादशाई सनदा आहेत त्यावर हुकूम साडे येकोण सत्तर देहाय सुद्धा दरोबस्त ईनामकुल बाब कुल कानु हाली पटी व पेस्तर पटी जल तरु पाषाण निधी निक्षेप सहीत खेरीज हाक्कदार व ईनामदार करून दिले असे.

येकूण देहाये साडेयेकूणहात्तर ईनाम करार करून दिल्हे असे तर तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चीरकाल पुरातन भोगवटे आनभवुन राज्यास येकनिष्टपणे असून सुखरूप राहाणे जाणीजे छ सु॥ सन ईहिदे मयातेन व आलफ छ १९ माहे दिलकाद बहुत काय लिहिणे मोर्तबा

लेखांक : ३४

कागल ज्युनिअर : ता. १ आक्टोबर १८०२

राजमान्य राजश्री तुळजोजीराव घाटगे सर्जेराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हा स्वामीचे राज्योपयोगी पडला यास्तव तुम्हास कागल तालुका देणेची आज्ञा जाहली. परंतु कसबा कागल व काही गाव चिरंजीव राजश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव याजकडे असलेले घेवुन द्यावयाचे याजकरिता मशार निल्हे यांचे व चिरंजीव सकल सौभाग्यदि संपन्न सौभाग्यवती आऊबाई घाटगे यांचे समजुतीबद्दल तुम्हाकडून विंनतीपत्र आज्ञा होईल तेव्हेळी तालुका परत देऊ म्हणोन घेऊन त्याजकडे दिल्हे आहे. ते पुढे त्याची समजूत काढून ते पत्र तुमचे तुम्हांस परत देण्याविषयी आज्ञा होईल. नढून राहिले असता रद्द असे जाणिजे. सु॥ सलास मया तेन व आलफ छ १६ माहे जमादिलाखर. बहुत काय लिहिणे

लेखांक : ३५

कागल ज्युनिअर : ता. १० जानेवारी १८०५

चिरंजीव राजमान्य राजश्री यशवंतराव घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे—तुम्हाकडील सरंजामी गावगन्ना पैकी येक साली बद्दल रुपये १५००० पंधर हजार आणवीले असेत तरी आज्ञेप्रमाणे हुजूरूर आज्ञा करून आलोजी कणसे हुजरे पाठवीले याज समगमे पाठऊन देणे जाणीजे सु॥ खमस मयातेन व आलफ रवाना छ ८ माहे शोवाल बहुत काय लिहिणे

लेखांक : ३६

कागल ज्युनिअर : ता. १ फेब्रुवारी १८०५

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके १३१ रक्ताक्षीनाम संवत्सरे माघ शु॥ द्वितीया भृगुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यानी राजमान्य राजेश्री घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली ऐसाजे चिरंजीव विजयीभव राजेश्री आबासाहेब छत्रपती यांचे वृत्तबंध फाल्गुन शु॥ द्वितीयेस व विवाह शुद्ध त्रयोदशीस योजून वधु राजेश्री नारायणराव खानवेलकर यांची कन्या नेमस्त करुन तुम्हास आज्ञा पत्र सादर जाहले असे तरी सहपरिवारे समारंभास येणे जाणीजे.

लेखांक : ३७

कागल ज्युनिअर : ता ७ डिसेंबर १८०५

राजमांन्य राजेश्री तुळजोजी घाटगे सर्जेराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हांत व चिरंजीव राजेश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव यात वडील धाकटेपणाचा विवाद असून, तुम्ही स्वामीसेवा जीवादारम्य केली यास्तव कागल तालुका तुम्हाकडे देण्याचे ठरून तुमचे स्वदस्तुरचे विंनतीपत्र आज्ञा होईल तेवेळेस ठाणे स्वाधीन करू म्हणोन घेवून त्याजकडे देऊन त्याजकडील कागल वगैरे गाव घेवून व खालसा गाव असलेले सुद्धा तुम्हाकडे दिले. परंतु पंचमते ठराव करून घेणेचा करार असून घेतला नाही. सबब गाव गन्नाकडून वसूल हुजूर आणविल्या-

वर तुम्हाकडून विनंतीपत्र आल्यावरून चिरंजीवाकडील कागदपत्र पाहून ठराव केलाजे म॥र निल्हे वडील सबब त्याजकडे देशमुखी वगैरे वतन बाब व त्याजकडून मोबदला देवून घेतलेले गावापर्यंत कागल समाईक राहून वरकड गाव त्याजकडे असावे. मोबदला दिल्हेले गाव त्याजकडे चालुन येते आणि खालसा असलेले गाव तुम्हाकडे दिल्हे ते तुम्हाकडे चालावे याप्रमाणे ठराव होऊन आज्ञापत्र सादर जाहले असे तरी ठरावाअन्वये चालून सदरहु हुजूरने गाव दिल्हे ते तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने अनभवून सेवा करून सुखरूप राहाणे. म॥र निल्हेसही अलाहिदा आज्ञापत्र सादर असे. जाणीजे सु॥ सीत मया तेन व आलफ छ. १५ रमजान बहुत काय लिहिणे.

लेखांक : ३८

कागल ज्युनिअर : ता. १८ मे १८०९

अभय पत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ता॥ मोकदमानी मौजे सावर्डे खुर्द सु॥ आशर मयातेन व आलफ तुम्ही व समस्त लष्करचे दंगेमुळे परागंदा होऊन हुजूर राजश्री...............विदीत केले त्याजवरून हे अभय पत्र सादर जाहाले असे तरी तुम्ही व समस्त....मौजे मजकुरी येवून वतनाची लावणी करून सुखरूप राहाणे. मौजे मजकुराची वहिवाट म॥र निलेस सांगीतली आहे. ते वचने देऊन लावणी करताना त्या अभये चालवीले जाईल. ये विषयी अभय असे जाणीजे छ ३ माहे रबीलाकर मोर्तबा.

लेखांक : ३९

कागल ज्युनिअर : ता. १० नोव्हेंबर १८१३

पेशजी कैलासवासी श्री शंभू छत्रपती यांचे कारकीर्दीत शके १६५४ पर्यंत (इ. स. १७३२) कागल तालुका खालसात असोन, दरम्यान पीराजी घाटगे सर्ज्याराव देसाई मृत्यू पावले कारणाने अमानत असलेले त्यांचे पुत्र राणोजी घाटगे सर्ज्याराव देसाई हुजूर येवून रुजु जाहालेवरुन शके १६६४ साली वतन खुले करून दिलेचा दाखला आहे. पुढे कोणते साली काही गावे राणोजी घाटगे याजकडे दिली ती किती याचा दाखला नाही. नंतर घाटगे याजकडे

दिली ती किती याचा दाखला नाही. नंतर घाटगे हे हुकुमाविरुद्ध वागु लागले सबब शके १६८६ चे अजमासे दिलेले गाव ठाणेसहित परत घेतले. नंतर बारा तेरा साले खालसा असोन शके १६९९ चे आदमासे पुन्हा घाटगे याजकडे दिल्हे ते त्याजकडे व त्यांचे चिरंजीव यशवंतराव घाटगे याजकडे असोन सन मयातेन व आलफ साली (इ. स. १८००) रामचंद्र परशराम पटवर्धन यांनी शिंदेकडील पलटण आणोन करवीरास शह दिल्हा त्यावेळी तुलजाजी उर्फ सखाराम घाटगे सर्ज्याराव यांनी जीवादारभ्य सेवा करुन कागल तालुका द्यावा म्हणोन विनंतीं केले वरून देणे अवश्य आणि कागल तर यशवंतराव याजकडे असलेले घेणे. सबब उभयतामध्ये वडील-धाकटेपणाचा विवाद होता त्या कारणाने सरकारात असल दाखल–त्यांस मोबदला गावे देवून घेतले, आणि ज्यावेळी हुकूम होईल त्यावेळी परत देऊ अशा कराराचे विनंतीपत्र सखाराम घाटगे याजकडून घेऊन,ते व तुमचे आज्ञापत्र यशवंतराव यांचे नावे असे दोन्ही कागद त्याजपासी भरंवसा वाटणेकरिता देऊन तालुका शके १७२२ साली (इ. स. १८००) त्याजकडून मसुदेदाखल यादी आलेप्रमाणे सनद ठेवुन दिल्हा त्यापासून त्याजकडे आहे. यापूर्वी त्याजकडे काही गाव यशवंतराव याजकडून भाऊहिस्सेने होते. परंतु विनंतीपत्र तालुका जेवेळी आज्ञा होईल ते समई स्वाधीन करू अशा कराराचे देऊन सनद घेतली व त्याच सनदेत कागल तालुका त्याजकडे नसोन असलेचे लिहून घेतात, या दोहींवरून त्या सनदेची मातबरी वारसा करणेसारखी राहिल्याचे दिसत नाही फक्त त्याचे मर्जीबद्दल दिली असेल असे वाटते. सदरहू विंनंतीपत्र याजकडे असलेले कैलासवासी बाबासाहेब छत्रपती याचे वेळे काही कारणाने परत घेतले ते आहेच अलीकडे घाटगे यांनी या ईलाखेतील नव्हे म्हणोन गैरसमजुतीने तक्रार चालविली होती त्याचा ठराव या ईलाखेतील म्हणोन जाहला आहे. पूर्वी दत्तकाविषयी काम चालले नाही. हल्ली हिंदुराव घाटगे तारीख ५ सप्टेंबर सन १८५५ ईसवी रोजी वाटले असोन, त्याचे स्त्रीस दत्तक देण्याचे काम परभारे चालल्याचे समजते. त्यास ते या ईलाखेतील, सबब ईकडील शिरस्तेप्रमाणे पूर्वी विनंतीपत्र घेतलेबद्दल विचार होणे असेल तर होऊन हुकमाने व्हावे अथवा ते तक्रारीकरिता अलफिस्टन साहेब बहादुर यांची थैली तारीख १० नवंबर सन १८१३ साली आली प्रमाणे त्याजकडे ठेवणेस अजून सरकार मुखत्यार आहे.

लेखांक : ४०

कागल ज्युनिअर : ता. १९ नोव्हेंबर १८१३

श्रीमन्महाराज छत्रपती साहेब दाम अलताफहु–

अर्जी सबब हनराबल मोंट ईष्ट वरीट इल्फीन्स्टन साहेब बहादुर बाद सलाम खैरीयत अजयाम मशहुद बाद आंके येथील खैरीयत जाणुन हमेशा तलतूफ नामा पाठवून शादमानी फर्मावीत असले पाहिजे. दिगर आ माहाराजा कडील मकतुबा छ २१ शवालचा वसुल होऊन कैफीयत दर्याफ्त जाहाली आमहाराजांनी फर्माविले की, हिंदुराव घाटगे सर्ज्याराव हे पीराचे उरुसास कागलास येणार ये विषयीचा बयान लिहिला तो मालुम जाहाला व श्री भाऊमाहाराज व दिनकरराव गायकवाड व सरूपजी क्षीरसागर हुजुरे वकील यानी कागल प्रांत आमाहाराज हिंदुराव घाटगे सर्ज्यांराव याजकडून जप्त करणार म्हणोन जाहीर केले त्यास कागल प्रांत आमाहाराजांचा आहे. त्याजवर दावा दुसरे यांचा नाही यांस शक कांही नाही श्रीमंत राव पंडीत प्रधान पेशवे बहादुर यांचे सरकारांत ईज्यानींबांचे बोलणे कागल प्रांताविषयी जाहाले त्याजवरून श्रीमंतांचे सरकारांतुन साफ जाब सांगितला की, कागल आमाहाराजांचे आहे येसी यासी आमाहाराजांचे मर्जीस येईल तरी हिंदुराव घाटगे याजकडे ठेवावे नाहीतर ठेवू नये याची मुखत्यारी आमाहाराजांची आहे. आमाहाराजांचे घरचे गोष्टीत ईज्यानीब बोलू शकत नाही.

लेकीन ईज्यानीबाचीं सल्लाह म्हणाल तर आ माहाराजांचा मुलुक बहुत खराब जाहाला आहे. याजकरिता पुढे दंगाबखेडा मुलुकात होऊन मुलुक खराब होऊ नये. हिंदुराव यांसी आमाहाराजानी बोलावुन न्यावे आणि आ माहाराजांचे मर्जीनुरुप त्यानी चालावे. आमाहाराज त्यांजकडून जप्त करतील आणि मुलुकात दंगाहंगामा होईल. आणि आमाहाराजाचा मुलुक खराब होईल. याजकरिता येसे न व्हावे ही ईज्यानीबाची सल्लाह आहे. याजवर आमाहाराज मुखत्यार आहेत.

सही इंग्रजी

छ २५ जिलकाद सु॥ आर्बा आशर मयातेन व आलफ

लेखांक : ४१

कागल ज्युनिअर : ता. १७ जुलै १८२१

चिरंजीव राजेश्री चिमणाजी सखदेव यासी आशीर्वाद उपरी ईकडील वर्तमान आषाढ प्रतीपदा सोमवारी तिसरा प्रहरी थोरले मांहाराज आबासाहेब श्री आंबाबाईचे चौकातील आपले खोलीतून बाहेर येत होते. जवळ भुजंगराव भोसले व आबा भोसले व एक दोन हुजरे असामी होते इतकीयात सयाजी बाजी मोहिते तळबीडकर हे हुजूर शिलेदारच नोकरीस होते ते पाच साहा असामी घर मंडळी जमोन आमचा काही अर्जा आहे म्हणोन दारात येवुन आडवे जाहाले, आणि माहाराजास वेढून चिटणीस लिहावयास बसतात तेथे गर्दी केली सबब भुजंगराव भोसले व आबा भोसले हे पुढे धरावयासी जाहाले तो त्या उभयेतास जंबीयाचे व कराचलीचे वार मारुन ठार केले व आणखी हुजरे व पयादे मिळून पाच च्यार आंगावर केले व पाच च्यार आसामी जखमी जाहाले. मोहिते याजकडील कोणी पडले नाही नंतर माहाराजास धरुन एक जंबीयाचा वार मारिला व पिस्तुलाची गोळी डावे कुशीत मारिली ती उजवीकडे पार जाहाली तसेच माहाराजास मोहिते यानी धरुन बसविले होते सरकारचे लोकांनी गडबड करावी तर माहाराजाच त्या (फाटले आहे) पडले त्यापेक्षा उपायच खुंटला श्री यासह चिरंजीव विजईभव राजेश्री बावासाहेब छत्रपती हेही आपल्या खोली जवळ त्याच चौसोपीत होते त्यानी गडबड पाहिली तेव्हा ते आपले खोलीत जाऊन दार लावुन मागील खिडकी होती ती (फाटले आहे) मोडुन तेथून निघोन आमचे वाड्यात धांवत आले. नंतर आम्ही तेथे जावुन दरवाज्या जवळ उभे राहून आंत चिरंजीव राजेश्री सदाशीव अनंत यांस पाठविले तो बहुतच गर्दी आंत होती मा।। निल्हे त्या गर्दीतच माहाराजा जवळ सरकारचे लोक चौकांतील दरोबस्त बाहेर काढून कसा काय मजकूर जाहाला म्हणोन मोहिते यासी विच्यारीले तेव्हा त्याचे बोलणे पडले जे आमचे येकूण तीस हजार रुपये सरकारात तैनातीचे जाहाले आहेत ते द्यावे आणि आमचे जीव जाला यास जामीन द्यावा म्हणजे आम्ही माहाराजास सोडु असे उत्तर केले नंतर राजश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव हे ऐवजास धनी होवून चिट्टी लिहून दिली व नारायणराव पाटणकर व सरलष्कर व हिंदुराव गायकवाड व आपाजीराव जाधव सरनोबत हे व आम्ही जीव जाला यास धनी होवून त्याचे बोलीस

आम्ही माहाराजांस सोडवून त्याचे मोहिते (फाटले आहे) आमच्या वाड्यात सायंकाळी दिवस मावळताना आलो मागे आम्ही आपल्या वाड्यात आल्यावर माहाराजास त्या जाग्यावरून उचलोन बांगच्या खोलीत नेऊन जखमेची वगैरे उस्तवारी करावयासी लागले तो जखमा भारी होत्या त्याने होवुन तीन चार घटका रात्रीस देव आज्ञा जाहाली. ईश्वरे मोठाच आनर्थ केला. श्रीयासह चिरंजीव वहिनी यासी बहुतच दुःख प्राप्त जाहाले ते पत्री किती लिहावे मोठीच आनुचीत गोष्ट जाहाली आम्ही त्याचे वोलीस होतो ते त्यानी सोडले नाही. आम्हास पार करून देणे म्हणोन ते समई निकड केली त्याजवरुन दरवाज्याची कुलुपे काढून लोक सुद्धा पदमाळे दरवाज्याने जयंती गोमतीपर्यंत गेलो तेथे यशवंतराव घाटगे सर्जेराव कागलकर याजकडील आरब होते त्यास दरम्यान होऊन सदाशीव अनंतही त्याचेबराबर श्री कृष्णेपर्यंत दिल्हे आहेत त्यांस श्री कृष्णापार करून देवू याप्रमाणे करार आम्ही व पाटणकर व सर्जेराव वगैरे सर्व त्रानी करून देऊत माघारे आलो ते सरकार वाड्यांत वहिंनी याजकडे गेलो तो तेथील विस्तार पत्री काय लिहावा. मोठाच घात जाहाला. मोहिते यानी मोठाच आन्याय करून अनर्थ केला हा मजकूर बहादर याचे कानावर घाळून मोहिते कुंपणी तालुक्यात गेले आहेत त्यास बाहादर हुजुरचे दोस्त आहेत त्यापक्षी आपराधी यासी कैद करून हूजूर यावेत. सर्वेपरी राज्याची शरम बहादरास आहे. त्यापेक्षा विशेष काय लिहावे. हा मा॥र तेच क्षणी मुंबईस तुम्ही लिहून व हे पत्र देवून चिरंजीव राजेश्री विसाजी नारायण याजकडे पाठवुन आमारत पनाह अजम गव्हरनर बहादर व च्यापलीन वहादर तेथे गेले आहेत त्यांचे कानावर घालावा. छ. १६ माहे शवाल सु॥ ईसने आशरीन मया तेन व आलफ बहूत काय लिहिणे रोज भौमवार प्रातःकालचा च्यार गटिका दिवस बहूत काय लिहिणे हा आशिर्वाद

लेखाक : ४२

कागल ज्युनिअर : इ. स. १८२२

यादी – यशवंतराव घाटगे सर्जेराव यांचे जाबसाल बोलावयाचे त्यासंबंध माहितगारीबद्दल वहिवाट सन १२३२ फसली.

कलम १ सन मया तेन व आलफ साली शिंदे आलिज्या बहादुर याजकडील कंपु व फौजा येवून करवीरास वेढा घाळून जेरीस आणल तेव्हा पुण्यात श्रीमंतापासी व शिंदे पासी ती॥ सखाराम घाटगे सर्जेराव मुखत्यार कारभारास होते त्याजकडे छत्रपती महाराज याजकडून बोलला गेले की तुम्ही यासमई जे मागाल ते तुमच आहे, परंतु शह बसला आहे हा उठवावा म्हणून वकील बोलिल्यावरून मशार नील्हे सर्जेराव यांनी बोलण्यात आणुन शह उठविला ते समईचा

१ भूदरगड तालुका १ कागल तालुका

१ शिवाय दरबार खर्च १ शिंद्याची खंडणीचा

१ खुद्द आपणास बक्षीस मागील बाकी पैकी ऐवज

पाच कलमे द्यावयाचे बोलण्यात आली. त्यास दुसरे साली सखाराम घाटगे सर्जेराव फौज सु॥ आले. त्यावेळी पांच कलमाचा उलगड करुन द्यावा म्हणोन नेट बसविला. तेव्हा छत्रपती यानी आम्हाकडील कागल तालुका वडीलपणास होता तो आम्हाकडून मागोन घेऊन सर्जेराव यास दिल्हा.

कलम २ सन ईसने मया तेन व आसफ साली छत्रपती यांची स्वारी इचलकरंजीवर होती तेव्हा आज्ञा केली की, तुम्हाकडून कागल तालुका घेऊन सर्जेराव यास दिला आहे. त्या सबब तूर्त तुम्हासी गाव देतो म्हणून ते देह तपशील

१ लाट	१ टाकली	१ कमतनुर
१ रांगोळी	१ येळगुड	१ वाडी टाकळीची
१ रामपुर	१ माणकापूर	१ जलालपूर
३	३	३

येकूण नऊ गाव चिठ्या दिल्या आम्हीं विनंती केली की परकी दुमाली गाव आहेत आम्हास नको म्हणोन चिठ्या परत दिल्या.

कलम ३ सन ईसने मयातेन व अलफ साली ईचलकरंजीचे मुक्कामी स्वारी होती त्या समई भुदरगड तालुका आम्हास द्यावा कुटुंब ठेवावयास जागा चांगली आहे, म्हणोन सनदा दिल्यानंतर आम्ही विनंती केली की, सरकारचा किल्ला आम्हास कशास पाहिजे. दुसरा द्यावा म्हणून विनंती केली त्यानंतर



छत्रपती यांनी जागा चांगली कोल्लिची दरेखलीची आहे ध्यावी म्हणोन आम्हासी आज्ञा होवून किल्याची सनद दिली त्या सनदा घेवून लोक कारकून पाठविले. दोन तीन महिने किल्लेस होते. त्यानंतर सखाराम घाटगे सर्जेराव यास किल्ला दिला नाही. याजकडे द्यावा तर तुर्तच मागु लागतील हा विचार छत्रपती यानी मनात आणुन आमचे लोक कारकून माघार आणवणेस आज्ञा जाहली.

कलम ४ सखाराम घाटगे सर्जेराव यांनी शिंदे याचे लष्करास हिंदुस्थान प्रांती होते त्यावेळी महाराज यांनी सर्जेराव दूर गेले असे समजून जमेत सुद्धा स्वारी कागलावर येवून ठाणा घेतलीनंतर आम्हास कागल तुमचे तुम्ही स्वाधीन करून घ्यावे ऐशी आज्ञा जाहली आम्ही विंनती केली की, आम्हाकडून तालुका मागून घेऊन सर्जेराव यासी दिल्हा त्याजप्रमाणे त्याजकडून सरळपणा देवून ठाणी आमचे स्वाधीन कराव म्हणजे आम्ही घेऊ याप्रमाणे विनंती केली.

तसच करितो म्हणोन आज्ञा होऊन येक साल आनभव मामलेदार महाराजांनी येवून केला. कलम

५. दुसरे साली सर्जेराव यांनी हिंदुस्थानाहून करवीरास येवुन मागती महाराजाकडून तालुका घेवुन मामलेदार करवीरास अटकेत होते त्यासी मोकळीक करवुन घेऊन सरलष्कर याजकडे कागल तालुका ठाण्यासुद्धा रखवालीची वहिवाट सांगोन हिंदुस्थानास गेले. आमचा तालुका आम्हास द्यावा समई महाराजास अवघड सबब तुर्त येमकन मुर्डी तालुका दिला तो सन ईसने मया तेन पासून सन तीसा मयातेन पावेतो आम्हाकडे चालिला.

६. पुढे सरलष्कर यांनी फौजसुद्धा येवून दरोबस्त महाराजाचा तालुका लुटून ठाणी घेतली. त्यात आमची खराबी होवून त्याबरोबरी येमकनमुर्डी तालुका घेतला. आम्ही करवीरास होतो. तेथे महाराजांनी बहुत प्रकारे खातरदारी केली. मलाच ठिकाण नाही अशी वेळ आली आहे, पुढे तुमचा बंदोबस्त आधी करू मग संस्थानचा बंदोबस्त होईल म्हणोन खातरदारी करून जागासुद्धा आम्हास खर्चास महाराजांनी हुजुरून दिल्हा. कलम

७. सरलष्कर यांनी संस्थानची खराबी करून ठाणी बसवीत चालले तेव्हा आम्हासी बोलणे लाविले होते की, महाराजांस सोडून आम्हाकडे यावे. तुमची देशमुखी, नाडगौडिकी वतन खेडी दुरोबस्त चालवितो. आमचे होऊन राहाव.



हे बोलणे सरलष्करचे पडले तेव्हा आम्ही यांस सांगितले की महाराज छत्रपती याचे चरण सोडुन यावयाचे नाही. आमचे पूर्वी चालत होते ते चालवून विशेष कृपा तेच करतील. महाराजांस व महाराजाचे संस्थानास अशुभ व्हाव अशी बदचाल आम्ही चालिलो नाही. येविषयी सर्वांस माहित आहे.

८. सन आरबा आशर साली इंग्रज बहादुर यांचे विद्यमाने एकशेदीड गाव महाराजाचे सुटले तेव्हा त्यापैकी महाराज छत्रपती आबासाहेब यांनी आम्हास गाव दिले देह ९.

१ ठाण हुपरी १ मौजे कडोली १ मौजे सडोली.

१ मौजे पटणकडोली १ मौजे हातकणंगले १ मौजे होबाळ.

१ मौजे तलदगे १ मौजे टाकवडे १ हसुर

सन १२३० फसली (इ. स. १८२०) आवल सालपर्यंत चालिले नंतर आबासाहेब माहाराजावरी त्याजपैकी येक गाव मागितले तेव्हा आम्ही बोलिलो जे आपण दिले ते परत घ्यावयास दिल्ले नाही. सनदा पत्र करून दिले असे असून त्यापैकी येकच गाव कशास घेता सारच घ्यावे म्हणून रागाने चिठी दिली. त्या तागायत आम्ही गाव न घेता तसेच हुजूर आहेत. आमचे आम्हास चालावयाजोगे जहाले पाहिजे. कलम

९. भादाले गाव चिरंजीव बाबाजी घाटगे सर्जेराव यास दुधाबद्दल महाराजांनी तो गाव दिला तागायत सन १२३० फसलीपर्यंत आम्हाकडे चालले. आमचे आम्हाकडे चालले पाहिजे. कलम

१० कागल तालुक्यापर्यंत मातोश्री बाईसाहेब याजकडील खेडी ६ व देशमुखी सरलष्कर यानी जबरदस्तीने महाराजांचा तालुका घेतला त्यावेळी आमचे साहा गाव घेतले.

तपशील :—

१ सेंडुर	१ मौजे महाकवे	१ मौजे सावडें
१ बाचणी	१ मौजे बालिंगे	१ मौजे.......

येणेप्रमाणे सहागाव निपाणीकर सरलष्कर याजकडून सन १२२७ फसलीत इंग्रज बहादुर यांनी ठाणी घेऊन महाराजाकडे दिल्हे. तेव्हा आमचे गाव आमचे हवाली व्हावे ते अद्यापी जाहाले नाहीत. कलम

११ आम्हाकडून ठाणी घेतल्यावर हुपरी व कोडोलीतला गला हत्यार सामान वगैरे तेथे राहिले आहेत.

लेखांक : ४३

कागल ज्युनिअर : इ. स. १८२२-२३ (?)

करवीरचे माहाराज यानी एलफीस्टन साहेब यासी थैली मुंबईस पा।। त्यातील मजकूर.

विश्वासराव घाटगे याचा काल होताच कागलकर यानी दोन तीन गावे ठाणी बसवून जमाव घातला आणि पीराची वाडी आम्हास लिहून दिली नंतर आम्ही आज्ञापत्र पाठवीलेने वालवे नि।। खेडी तुम्ही घेवू नये वालवेत बाई आहे त्याजकडे द्यावी आणि पीराची वाडी हुजूर दिली आहे त्याप्रमाणे ठाणे खाली करून द्यावे ऐसी तीन वेळा आज्ञापत्रे पाठविली असता कागलकरानी मानली नाही. त्याजवरून हुजूर सरंजाम पाठवून बंदोबस्त केला त्याजवर पुणेहुंन चापलीन साहेब यानी खलिता पाठविला. त्यात मजकूर जो तालुका परत हवाली करावा असे लिहिणे .... त्याजवर धारवाडाहुन बीबन साहेब याज कडून येलट साहेब करवीरास आले त्यांनी तालुका सोडून देणे विषयी आग्रह केला. त्यात कागलकर हुकमात वागत नाहीत आणि ठेऊन गेले या अर्थी तालुका देऊ नये, ऐसे हुजुरचा मानस आहे. परंतु आग्रह यासी उपाय नाही आपले दोस्ती तोडीत नाही. हिंदुराव घाटगे येथे आले असता तालुका त्याजकडे वहिवाटे होती त्याचप्रमाणे देतो. आपले शिवाय कोठे नाही.

येणे प्रमाणे मजकूर लिहून खलिता आला होता. त्यातील बारीक सोध घेवून समजणे करिता लि।। आसे.

लेखांक : ४४

कागल ज्युनिअर : इ. स. १८२४

यादी—जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव वजारतमाब याजकडील कामकाज घेऊन यावयाची सू।। अर्बा आशरीन मयातेन व आलफ

१ करवीरकर माहाराज छत्रपती याजकडुन जाब होऊन यावयाचे ते निर्वेध करून द्यावे.

१ माहाराज यानी ती॥ विस्वासराव बापु याजला परशराम भाऊ यासी लढाईत पाडाव करण्याबद्दल, मारण्याबद्दल भुदरगडचा किल्ला बक्षीसी द्यावें याचे कबुल केले. माहाराजांचे पूर्ण प्रतापे करून परशराम भाऊ व विश्वासराव बापु यांचे हातून पाडाव होऊन मारिले गेले. ते वेळेस किले भुदरगड येथील हात चिठ्ठी करून दिली नंतर माहाराजांचे म्हणणे पडले की किल्ला प्राचीन बहुता दिवशीचा तो किल्ला हुजूर ठेऊन दुसरा मोबदलास नरसिंग गड देतो. हे ठरून नरसिंगगडची सनद करून दिली- किल्ला पदरी पडला नाही. त्यास किल्ला पदरी पडावा किंवा त्याचे मोबदला दुसरी जागा द्यावी. कलम

१ रामचंद्र परशराम पटवर्धन यानी सिंदे आलिज्या बहाद्दर यांची फौज फलटण नेऊन माहाराजावर प्रसंग गुदरला. करवीरसह राज्य जाण्यात तथा राहिली नाही. ते समई महाराजानी वकील दागिने देवून बोलण्यास पुणे मुक्कामी पाठविले. ते समई आम्ही सरकारात रद्दबदली केली फौज खर्चाबद्दल सात लक्ष रुपये द्यावयाचे ठरले ते आम्ही सावकाराकडून कर्जाऊ मोबदला घेऊन सरकारात देऊन करवीरचा वेढा उठवून राज्यास रक्षण केले. माहाराजाचे दागिने महाराजाकडे द्यावयाबद्दल वकिलाचे जिमेस केले. अैवज नगदी सावकाराबद्दल देणे राहिला, तो द्यावा ऐसे ठरले आहे. तो अैवज हिशेब अन्वये येणे आहे. त्याचा उलगडा व्हावा. कलम

१ निपाणीकर यानी माहाराजासी लढाईचा प्रसंग घातला ते समई आम्ही माहाराजाजवळ पतका सुद्धा होतो पेंढारी यांचे व आमचे पथकाची लढाई होऊन पेंढारी सीरवस्त जाहाले. त्याजवरून मौजे भोज हा गाव सरंजामात लावून दिल्हा नंतर निपाणीकरानी घेतला. हुजूरची स्वारी सावगाववर सीरवस्त जाहाले ते समई समागम राहून जीवदारभ्य सेवा चाकरी करून स्वारी करवीरास पावती केली. चारशेहे सिबंदी सरदारी संबंधे खर्च जाहाला तो पेच सावकाराचा आहे. त्याचा उलघडा हुजुरून होऊन येणे तो यावा. भोजगाव निपाणीकर याजकडुन सुटुन आला आहे तो आमचा आम्हाकडे द्यावा व भोगवट्यास सनदा करून द्याव्या.

१ आपाखान पठाण वस्ती मौजे यमगर्णी यानी सर्जेराव यांचे सरकारात पांच स्वारानिशी चाकरी करावी आणि मौजे मजकूर हा गाव चाकरीत खावा असे चालत असता आलीकडे खान मजकूर हुजूरचे ही मायतीने चाकरी करीत नाही गाव अनभवितो त्यास ताकीद होऊन आमचे सरकारात चाकरी पाच स्वारानिसी करावी आणि मौजे यमगरणी हा गाव चाकरीत अनुभवावा. नाही पेक्षा गाव सोडून द्यावा हुजुरून त्याचा पुस्तद होऊ नये. कलम

१ मौजे चोकाक येथे वाडा बांधु नये म्हणोन आगळीक करून वाडा पाडिला व ठाणे घेतले. गावची व परगण्याची नुकसानी केली त्यासी नुकसान सहा गाव माघारी देवावा.

१ सीवेचे खटले केले आहे.

१ का। कागल व कनेरी

१ मौजे रूवी व मौजे तीलवणी

१ मौजे येकुडी व मौजे वडगांव

सदरहू सिवेचे खटले घातले आहे त्यासी सीवेचा भोगोटा प्राचीन चालत आहे. त्याचा दारवला भोरगाववाले याचे विद्यमान वाजबीचे सईन पाहून सीवेचा भोगवटा सुधामत पासुन चालत आल्या प्रमाणे चालवाव. नवीन उत्पन्न होऊ नये. कलम

१ लक्ष्मीच कुरण कागल तालुक्यातील प्राचीनपासुन आहे ते कुरण कन्हेरीच सिवातील म्हणोन म्हणतात त्यासी ते कुरण कागल ईलाख्यातील कन्हेरीच्या सिवातील नाही हे विषयी भोरगांववाले थलकरी यांचे विद्यमान चौकशी व्हावी आणि सुधामत पासुन वहिवाट चालत आलेप्रमाणे चालावी. कलम

१ मौजे कावणेकर पाटील याचा व मौजे बेलवलेकर पाटील याचा खीस्सा होऊन मारामारी जाहाली. त्यात कावणेकर पाटील मारला गेला. ज्यानी मारला ती असामी हवाला करावी म्हणोन म्हण पडते त्यासी येविषयी धारवाड सुभीयास बोभाट जाऊन सुभीयाच्या सांगण्याअन्वये कावणे पाटील याची समजूत बेलवले येथे जमीन देवून काहडली, त्याची राजीखुषी होऊन जाब तुटला असता हुजूरून म्हणणे पडते ते पडु नये समजूत निघालीच आहे.

१ मौजे निगवे गांव कैलासवासी बापुसाहेब यानी श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब यासी दिल्हा आहे. तो त्याजकडेस चालावा. सोड चिट्ठी द्यावी कारण आमच्या वडलांनी तुम्हास सनदा करून दिल्या त्या आम्हास मंजुर तेंव्हा तुमचे वडिलानी मातुश्री आईसाहेबास सनद करून दिली त्याप्रमाणे तुम्हास मंजूर असावी म्हणुन माहाराजांचे म्हणणे ते आम्हास मान्य. कैलासवासी ती॥ बापु सो यानी निगव हा गाव आईसाहेबास दिल्हा तो त्याचा त्याजकडेच चालावा परंतु आमचे काम माहाराजाकडून भुदगडचा मुबदला नरसिंगगड व सावकाराबद्दल सात लक्ष रुपये कर्जाऊ येणे ते हिसेबाअन्वये वगैरे आबसील कामकाज होवून यावे याची सदरी लिहिली आहेत त्याप्रमाणे उलगडा होऊन यावा नंतर गाव त्याजकडेस चालवावा असे बोलण्यात आहे त्या अन्वये जाबसाल उलगडण्यात यावा तो माहाराजाच्या खटल्यामुळे ज्यास्ती सीबंदी ठेवली ती दुर करावी त्याचा उपसर्ग लागणार नाही नुकसान व चोकाक गांव मागारी येईल म्हणुन बोलण पडल त्याजवरून आम्ही ती॥ मातोश्री नानीबाईसाहेब यासी लिहिल त्यावरून त्यानी सीबंदी दुर केली नंतर गाफीली पाहुन करवीरकरानी दग्यानी निगव्याचे ठाणे घेतले ये विषयी सरकार आलीज्याबाहादर माहाराज व आपल्यात मुनसबा दिलेस त्या अन्वये जाबसाल सांग उगवून देववून बंदोबस्त करून देण्यात यावा करवीर कराचा वगैरे कोणताही उपसर्ग न लागता बंदोबस्त होये ते करून द्यावा.

१ भावबंदासरीसा वडलानी गाव त्याजकडेस चालवून पेसजी तोडलाच आहे याप्रमाणे त्यानी राहाव. त्याजकडील येकादा गैर वाखा कोणी हूजुर येऊन समजाविल्यास मनावर घेऊ नये. यशवंतराव आपा घाटगे सरज्याराव यास कैलासवासी यानी साहा गाव व देशमुखी लावून दिली आहे आलीकडे चालत नाही त्यास चालवावी म्हणोन वेदशास्त्रसंपन्न राजेश्री भाऊमाहाराज यानी धारवाड सुभेच्या विद्यमाने बोलणे घातले. त्याचे उत्तर ईकडील कारकूनाने केले की येजमानास लिहितो उत्तर येईल तैसी विंनती करीन त्याजवर सुभेचे सांगण पडल जे साहा गाव भाऊ माहाराज यांचे स्वाधीन आमलात कराव. उत्तर आल्यानंतर भाऊ माहाराज गाव यशवंतराव आपाकडेस देतील. देशमुखी ही तुम्ही चालवावी त्याजवरून त्यांचे सांगणे प्रमाणे भाऊ माहाराजानाच स्वाधीन केले आहेत ते मा॥र निल्हे स्वाधीन देऊन पावती यावी. सारांष हुजूरुन

वगैरे भावबंदास .... होऊन व कोणाचा गैर वाका समजाविल्याचे मनावर धरून बखेडा होऊ नये ये विषयी निक्षुन सांगण्यात येऊन बंदोवस्त व्हावा. भावबंदाचे समजी कैलासवासी वडिलानी पाडून चालवलि आहे त्याप्रमाणे चालावे.

१ किरकोळ कामकाज प्रकर्णी लागतील त्याजविषयी ईकडील कारकून विनंती करीत जातील त्या अन्यये त्यांचे उत्तर येऊन बंदोबस्त करून देत असावे.

येकूण अकरा कलमे आहेत त्याचे निरवेध बंदोबस्त होऊन यावा.

१ पंतप्रधान यांचे व सरकारात कागल तालुके पौ फूटगाव मौजे आपसींग व मौजे सुरूपली येकूण दोन गावे आहेत त्यास दरोबस्त कागल तालुका देहाये सुद्धा सुधामत पासून पातषाहीपणे ईनाम आम्हाकडे चालत आला अलीकडे हे गाव याजकडेस आहेत ते आमचे आम्हाकडे चालवावा.

१ मिरजकर याजकडे डिगरज कर्यात प्रांत कागल कसबा सुद्धा गाव सात व मांजरी कर्यात प्रांत कागल पो मौजे अंकली गाव येक येकूण देहाय आठ आहेत त्यास कागल तालुका दरोबस्त देह सुद्धा पादशाई पण ईनाम आम्हाकडे चालत आला आहे. अलीकडे सदरहुगाव दाबात गेले आहेत ते सोडुन देवावे.

१ सितोळे यानी मांजरी कर्यात कसबा कागल पो कसबा मजकूर देहे येक दाबला आहे. त्यास कागल तालुका दरोबस्त देहे सुद्धा पादशाई पण इनाम आम्हाकडे चालत आला आहे. दरम्यान सदरहु गाव दाबला तो सोडून आमचा आम्हाकडे द्यावा.

१ ईचलकरंजीकर याजकडून जाबहोवून येणे १ मौजे सिरदवाड का। मांजरी प्रांत कागल हा गाव दाबुन बसले आहेत, आमच्या वडलाच्या सनदा आहेत यैसे म्हणतात परंतु दाखवीत नाहीत त्यास आमच्या वडलाच्या सनदा दाखवाव्या आथवा गाव सोडून द्यावा.

१ मौजे रूवी माणगाव व मौजे साजणी व चोकाक व सीर्दवाड येथील देशमुखीचा नवीन सनदा करवीरकर माहाराजापासून करून घेतल्या आणि

जबरीने देशमुखीची जप्ती करीविली तेव्हा त्याजकडील बोलणार येऊन भुलथाप देऊन सरदेशमुखी कमावीसदारास चिठी न्हेली येविशयी करून सरदेशमुखीचा हक्क देतात त्यासी आमच वडलाच सनदा पत्र दस्ताऐवजी असल्यास दाखवाव्यात आणि हक्क द्यावा नाही पेक्षा बोलू नये देशमुखीचा वारसा करू नये ऐवज त्याजकडेस पडला असेल तो द्यावा.

सदरहुप्रमाणे दोन्ही जाब उलघडून द्यावे.

लेखांक : ४५

कागल ज्युनिअर : इ. स. १८२४-२५

तीर्थरूप मातुश्री नानीसाहेब वडिलांचे सेवेशी.

बालके जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव वजारत माब मु।। लस्कर. नजीक ग्वालर दोन्ही कर जोडून चरणावर मस्तक ठेवून शिरसाष्टांग दंडवत विनंती विज्ञापना: ता।। छ २५ माहे शाबान पावेतो इकडील वर्तमान सर्व यथास्थीत असे विशेष वडिली दोन थैल्या आल्या की, करवीरकर यानी सर्व तालुकेत ठाणी घालून सरकारी वगैरे गला लुटुन न्हेले आणि ठाणी पाडणेचा हूकूम जाहाला. आहे. तालुक्यातून आपले नीसबत्तीची मनुष्य यासी धरा धरी करून दंड घेत आहेत. खासगत चीज वस्तू व सनदपत्र मात्र निपाणीस घेवून गेलो म्हणोन लिहिलेत श्रुत जाहाले आणि लि।। की, तालुके विषयी ईकडुन यत्न राहिला आता यत्न करणे लष्कर मुक्कामी चिरंजीव राजेश्री आलीजा बाहादुर व चिरंजीव सौ. बाईजाबाई आक्का यासी बोलून लष्कर मुक्कामी वकील राजश्री विष्ठुर साहेब आहेत यासी बोलून तेथील साहेबाच्या चकत्या ममई पुणेकर साहेबासी येऊन लुकसान सुद्धा आपले जिमेस तालुका यावा ऐसा यत्न करावा अगर हे होत नसल्यास चिरंजीव राजश्री आलीजा बाहादुर यासी विनंती करून पांचचार पलटणी आणि एक नामांकीत सरदार पाठवून देऊन तालुका राजेकडुन हस्तगत करावा म्हणजे नक्षा राहातो. ऐसे कित्येक प्रकारे वडिली लिहिले ते सर्व श्रुत जाहाले. वडिलाकडून पत्र आली तीच उभयता वडिलाशी श्रुत केली नंतर छ. १९ माहे शाबान रोज शनिवारी सरकारानी राजेश्री विष्टुर साहेब

बाहादुर यासी बोलावून आणून आपले स्वमुखे आमच्या समक्ष कागल प्रकरणी जाब आग्रह करून किती एक प्रकारे बोलणी कागलसंबंधे जाहली नंतर ईष्टुर साहेब यानी सरकारासी विनंती केली की राजे यांनी दंगा करून तालुका घेतला या विषयीची पत्र तिकडून एक दोन वेळा आली ती सरकारानीं आम्हा पासी दिली त्यातील भाव जो लिहिणे तो आम्ही मुंबईस लिहित गेलो नंतर या विषयीचा मजकूर पुणे मुंबईची लिहिणी आम्हांस आली त्यासी लवकरीच बंदो-बस्त होऊन येईन यैसी उत्तर साहेबानी सरकारासी केली नंतर सरकारानी त्यास उत्तर केले की, आपण आमची खातरी केली परंतु तिकडे मातुश्री नानी साहेबासी आमचे लिहिणेची खातरी वाटत नाही. त्यापेक्षा आपले नावे एक खलिता द्यावा की ग्वालेर मुक्कामी जाब ठरून येईल तोपर्यंत निपाणीत स्वस्थ असाव ऐसा खलीता एक मातुश्रीस द्यावा तसच राजश्री सरलष्कर यासी एक खलीता द्यावा की, तुम्हांपासी मातुश्री नानीसाहेब आले आहेत तरी सुखरूप असो द्यावी ऐसा खलिता मशार निल्हेस देणेचे करणे राजेचा दावादारी सर्ज्या-राव आणि त्यासी सरलष्कर यानी जागा दिली त्यापेक्षा धेनात वागत आहे की राजे यासी पक्ष कंपनी सरकारचा असता नानी साहेबासी ठेवणे मूळ सर लष्कर यासी आपाये आहे ही जनवार्ता आहे याकरिता सर लष्कर यासी यक खलिता द्यावा असे सरकारचे म्हणणे विष्टुर साहेबासी पडले. नंतर ईष्टुर साहेबानी सरकारासी विनंती केली की, लाट गवरनेल बाहादुर यानी आम्हासी व मुंबईकर बडे साहेब गवरनेल यासी लिहिले आहे की सरकार सांगतील त्याज प्रमाणे कागलचा जाब करून द्यावा त्याजवरून लाट साहेबाची चकती व आमचे लिहिणे मुंबईस गेले आणि त्याची उत्तरही आम्हास आली आहेत की मातुश्री नानी साहेबाची खातरी करून नुकसान सुद्धा तालुका मागे द्यावे म्हणोन पुणेकर साहेबासी मुंबईहून लिहिणी पुणेस गेली पुणेहुन खलिता चकत्या राजे कडे करवीरास गेल्या असतील. तसच मातुश्री सही व सरलष्कर यासी ही पुणे कर साहेबाची लिहिणी खातरीची गेली असतील याविषयी आंदेशा तिलशा: घेऊ नये येक दोन दिवसात आमचे लिहिणेही येईल. लिहिण येणेस आवधी पडलेस खलिते उभयतासी देणेस येतील. राजे यानी आगलीक केली त्यास च्यापलीन साहेब यानी रखमाबाईचे गावाविषयी सांगणेत आले त्याजवर ते सोडोन सर्व तालुका लबाडी करून घेतला त्याचे फळ ते पावतील नंतर सरकारानी साहेबानी

उत्तर केले की, रखमाबाई याणी राजेसी दस्ताऐवज लिहून दिले आहेत त्यासी पुन्हा ईकडुन दस्ताअैवज करून घेतील आगर नानीसाहेब लालची मुले यकादा .दस्ताअैवज करून देतील तो मंजूर नसावा. कागल प्रकर्णी जो जाब ठरणे तो लष्कर मुकामी उलघडावा ऐसे सरकारानी साहेबासी उत्तर केलेवर साहेबानी सरकारासी विंनंती केली की, सकवारबाई याजपासी राजे दस्ताअैवज मागत असता बाईने दस्ताऐवज न देता सीर फोडोन मेली परंतु दस्ता ऐवज दिला नाही त्यापेक्षा यानी वर्ग बायाकडून दस्ताऐवज घेतला आगर बायांनी दस्ताऐवज लालचीमुळे दिला तो मंजूर नाही. ऐसे साहेबानी सरकारास दस्त-ऐवजाविषयी बोलणेत आणले. त्यासी आता जाब पका ठरला आहे त्यास पुणेकर राजश्री च्यापलीनसाहेब याजकडून आपला जाब पडला तरी आपले कडून बोलणी त्यासी पडावी की नुकसान सरकारी व तालुके पैकी मौजे चोकाक व मौजे निगवे सुद्धा व कैलासवासी बापुसाहेबाचे आठ गाव सुद्धा सर्व तालुका आपले जिमेस करावा. आणि वाळवेतिल उभयता बाई व करवीर कैदेत मनुष्य असतील ती मागे यावी चिरंजीव सौ. आकुबाई सुद्धा या प्रमाणे उत्तर पुणेकर साहेबाच बोलणे पडल तरी करावे आणि साहेब यानी राजेकडील वकील पाठविल असता त्यासही येसेच उत्तर द्यावे. बोलणेची यादी नऊ कलमाची पाठविली आहे त्याप्रमाणे बोलणे बोलावे. सेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक : ४६

कागल ज्युनिअर : इ. स. १८२४–२५

राजेश्री आणाजीराव वकील नी॥ इंग्रज बहादुर मो॥ करवीर यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रीमती सुंदराबाई घाटगे दंडवत विंनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असले पाहिजे विशेष हुजुरून स्वारी होऊन मौजे माणगाव प्रां। कागल येथील गुरढोर माणसे नागऊन जखमी करून नागावा घेऊन गेले. नंतर स्वारी कर्णेचे कारण कोणते विच्यारा-वयास्तव राजश्री लक्ष्मण अनंत यासी करवीरास पाठवून देऊन हुजूर विनंती करविली. उपरांत सीवचे खटलेचा मजकूर वगैरे चिखलीस जाऊन विचारून येणेस्तव हुजुरून आज्ञा होवून आठ रोजात यावे येसा करार ठरवून निरोप दिल्हे

वरून पंत मा।। र नीले चिखलीस येऊन पोहोचताच. दुसरे रोजी हुजूरची खासी स्वारी तोफा सरंजाम घेऊन येऊन मौजे चोकाक येथील वाडा पाडून स्वारी माघारी निघोन गेली आठ रोजाचा करार येकीकडच राहिला तदनंतर मौजे रूवी व मौजे तीळवणी येथील सीवचे खटले स्तव राजश्री रघूनाथराव मुलीक यानी रुकडीहुन स्वार व लोक आणऊन मौजे रुवी येथील हादी खेरीज मळेतील उसाचे फड लुटून मोटा पाडून ऊस व जोंजळा कापुन नेऊन रानाची खराबी बहुत केली. हे सविस्तर पंत मा।।र नीले यानी आपलेस निवेदन केलेच असल. अशा ईकडुन मेहेरबान ताकरीन साहेब इंग्रज बहादुर यासी धारवाडास पत्र लिहून वकील रवाना केल होत तिकडुन उत्तर साहेबानी सांगितल जे ईत:पर कागल तालुकेस उपद्रव व्हावयाचा नाही येविषी खुद करवीरास रवाना जाहाल आहेत याप्रमाणे उत्तर होवून वकिलास निरोप देवून पत्राच उत्तर देवून पाठवील त्याजवरून खाली आपणास लिहिले आहे तरी खटलेचा विचार वाजवी गैरवाजवी हे सर्व आपले लक्षात आलेच असल ईकडुन परत खटला व्हावा तरी साहेबा-कडील शब्द लागल त्याजकरिता गावगना जिकडील तिकड ताकीदी करवुन बंदोबस्त राखिला असो सीवेची खटली असतील ती पंचदेवमत ठरवीतील त्या-प्रमाणे दोन्हीकडील गांवकरानी चालाव असे असता तीळवणीकर मुलीक यानी रुवीचे रानाची दोन हजाराची खराबी केली यांचा जाबसाल होऊन यावा मोटा पडिल्या त्याजमुळे ऊस वाळून गेले. आणि मौजे माणगावच्या जागा व गुर ढोर सुद्धा माघारी यावी तेसीच मौजे चोकाक येथील वाडा पाडुन गावास जप्ती चिठी आली त्याची मोकळीक व्हावी. याजप्रमाणे तुर्त जाबसाल होवून यावेत येतद्विषयी लक्ष्मण पंत आपलेसी बोलतील त्यांजप्रमाणे आपण हूजूर बोलण बोलून जाबसाल उलघडणेत आणावे. ईकडील संस्थानाविषयी मेहेरबान अगत्ये धरून लक्ष वागवितात त्या आर्थी आपलेस ईकडुन अगत्याविषयी लिहून कळवा-वेसे नाही. करवीरी हुजूर ईकडील वकीलास बोलणे........येवून घेऊन तीळ-वणी करास कुमक पाठवून रूवीचे रानातील मोटा पडुन ऊस कापून नेले तेव्हां तेथील बोलणचे विचार कैसा आहे तो ध्यानात आणावा. कळावे बहुत काय लिहिणे

छ १० माहे रबिलाबल हे विनंती

लेखांक : ४७

कागल ज्युनिअर : इ. स. १८२४-२५

साहेब मुषफक मेहेरबान दोस्तां ताकरीन साहेब बहादुर सर कलेक्टर सुभा धारवाड अज तर्फ सकवारबाई घाटगे सलाम बाजद सलाम आंकी येथील खैर खुषी तागायेत द. १२ माहे जिल्हेज पावेतो जाणुन आपले कडील खुशाली नामा हमेशा कलमी करून दील ताजा करीत असले पाहिजे. ईकडील मजकूर तरी खासेचे प्रकृतीस समाधान वाळवे मुक्कामी वाटेनासे जाहाले. तेव्हा आम्ही व चिरंजीव सौ. आकुबाई पाटणकर व चिरंजीव सौ० ताराबाई राणी मिळून वाळवेस येऊन पोहचले उपरांत चिरंजीव राजेश्री राजे बावासाहेब छत्रपती यांची स्वारी जमाव सुद्धा संध्याकाळी भेटीस म्हणुन वाडेत आले ते तसेच लोक ठाणेत घालुन बंदोबस्त केला. दुसरे दिवशी खासेनी छत्रपती यासी साडेतीन वस्त्रे देऊन करवीरास स्वारी जाणेविषी निरोप दिल्हे नंतर ठाणेत जमाव येऊन बंदोबस्त करून स्वारी जाणेविषी निघोन करवीरास गेली. पुढे दोचौ रोजी खासेस अतिसाराचा उपद्रव होऊन काल जाहाला. काल होताच हुजूर नी॥ कारभारी घरातील चीज वस्त जामदारखाना व पागा पीलखाना वगैरे सुद्धा पाहरे बसविले प्रेतास येक रात्र दहन करू दिले नाही करवीरास छत्रपती याकडून हुकूम आणऊन दुसरे रोजी दोन प्रहरी दहन करवीले. उत्तर कार्य दशांत कर्म आम्ही बाप भाऊ यांचा मुल आणुन चालीस लाविले. आकरावे दिवशी पुनरपी छत्रपती यांची स्वारी करवीराहुन आली दुसरे रोजी बारावे दिवशी सपींडी होणे ती चिरंजीव राजश्री हिंदुराव बाबा यांनी करावयाची तेव्हा छत्रपती यांचे म्हणणे पडले जे तुम्हास दत्त पुत्र करून देतो सपिंडी करावी या प्रमाणे म्हणणे पडले वरून आम्ही उत्तर केले जे सपिंडी करणे ती पुत्र हिंदुराव बाबा आहेत ते हिंदुस्थानात करतील पुत्र असता दुसरा पुत्र आणोन घ्यावयाचा नाही याजप्रमाणे सांगितले. तेरावे दिवशी छत्रपती यांचे म्हणणे पडले जे वाडीचे ठाणेची सोडचिठी द्यावी. आम्ही उत्तर सांगितले जे आम्ही काही सोडचिठी द्यावयाची नाही. हिंदुराव बाबा दौलतीचे मालक आहेत त्यासी पुसावे असे उत्तर सांगितले चवदावे रोजी भोजनास सर्वत्रास स्वयंपाक करवीला. स्वयंपाक जाहाले नंतरी छत्रपती यास व मानकरी भले लोक लोकपाळ सुद्धा भोजनास बोलाविले तेव्हा छत्रपती यानी मानकरी व भले लोक लोकपाळ यासी ताकीद

देवून जेवणास कोणी येऊ दिले नाही. दोन तीन हजाराचा स्वयंपाक जाहला तेच दिवशी छत्रपती आपण जातींने येवून बसले आणि वाडीचे ठाणेची सोड-चिठी द्यावी असा आग्रह धरून दोन प्रहर पर्यंत बसले. ते समई आम्ही काही चिठी द्यावयाची नाही आसे निक्षुन म्हटलेवरून आमचा कारकुन राजश्री सिताराम नारायण यासी जबरीने धरून पाहरेत दिल्हे तेव्हा आम्ही आग्रह करून काढून घेतला नंतर स्वारी दाहावे तासी निघोन बाहीर जाऊन आम्हा कडील खेडेस ठाणी झाडेनिसी हुजुरचे आज्ञापत्रे जप्तीची पाठवूत ठाणी घातली वाडे तीन, थटी, कोठी, पागा, पीलखाना व जामदारखाना सुद्धा येकंदर जप्ती करून सडी स्वारी निघोन करवीरास गेली. मुदपाकचे चंदी सुद्धा बंदी करून गेले आमचे शरीर प्रकृतीस समाधान नाही. प्रकृती बहुत बिघडोन हैराण गत होवू लागली याजमुळे करवीरास आम्हास घेऊन जाणे विषी तीर्थस्वरूप मातुश्री आई सो माहाराज छत्रपती यासी विंनती पत्र पाठविले व आपले कडील राजश्री तीर्मलराव वकिलास आम्हास सूचना देवून औषध घेणेस यडुरास वैद्याकडे जाऊ याजप्रमाणे लिहिली. परंतु हुजूरोन जाबसाल होवून आले नाहीत आमचे शरीर प्रकृत दिवसा न दिवसा राहता चाली याजकरिता साहेबास विंनतीपत्र लिहिले आहे कुंपीणी साहेबाचे राज्यात जबरीने संवस्थान कोणी कोणाचे घेतले नाहीत असे होऊ नये ये विषयी साहेबानी दरयाप्ती करून संस्थानची मोक-ळीक व आमची सुटका खलिते करवीरास येऊन संवस्थान स्वाधीन होय तो अर्थ करावा ज्यादा काय लिहिणे प्यार असो दीजे हे किताबत.

लेखांक : ४८

कागल ज्युनिअर : इ. स. १८२४–२५

श्रीयासह चिरंजीव विजयीभव राजमान्य राजेश्री हिंदुराव बाबाजी घाटगे सर्ज्याराव वजारतमाब यासी प्रती रखमाबाई घाटगे उपरी तागायत छः १९ माहे जिल्हेज पावेतो मुक्काम कसबा वाळव येथे आला विशेष इकडील वर्तमान खासे आषाढ व॥ ७ सप्तमीस देव आज्ञा जाहालेवर करवीराहुन छत्रपती माहाराज वाळवेस येवून खटला केलेच सविस्तर वर्तमान येकदोन पत्री पेशजी ती॥ मातुश्री बाईसाहेब घाटगे यानी आपणास लिहिलेच आहे. येलीकडे वर्तमान तर

खाशाचे चवदावे रोजी छत्रपती यांनी जमाव सुद्धा वाड्यात येवून वाडी पीर येथील सोडचीठी द्यावी म्हणोन निकड बसविली व सिताराम नारायण कारकून आपल्या कडील यासी धरून सोडचिठी लिहून द्या म्हणुन बे अब्रु करू लागले तेव्हा बाईसाहेब यांनी छत्रपतीचे बोलणेस त्रासून व कारकुनाची आब्रु घेऊ लागल्यास तापाने आक्रोश करून कपाळ आपटुन घेतले. तेव्हा दोन घटका पर्यंत प्राण व्याकुळ होवून हैराण जाहाले ते समई आम्ही व चिरंजीव नानीबाई घाटगे उभयतानी तोंडात पाणी घातले आणि मस्तकावरीही पाणी घाळून वारा घातला नंतर दोन घटकेने सावध जाहाल्या. त्या दिवसा पासून बिछानावरी निजुनच होत्या. खासे मरताच करवीरचे लोकांनी वाळंवे ठाण्यात सिरोन बंदोबस्त केला परंतु वरकड खेडयास आठ चार दिवस उपद्रव काही नव्हता. फुढे वालवेहुन छत्रपती करविरास जाताना भडगाव व कुरणी व मलग बु॥ व मलग खुर्द व सुरुपली व साजणी व नीम सिरगाव व भरतवड सुद्धा खेडी जातीस लोक पाठवून गाव घेतली. पीराचे वाडीस चिपळीतील नव्या वाडयासही जप्ती चिठ्या घेऊन लोक आले होते. त्यासी चिठी माघारी देवून लोक माघार घालवील. गाव खेडी त्यानी घेऊन जामदारखाना व पागा हत्ती व गुरांच्या व मेंढराच्या थव्या सुद्धा वगैरे झाडेनिसी जप्ती जाहाली आणि बाहेर कोठे जाणे येणेची ही बदी केली याजमुळे लौकीकात नीट जाहाले नाही. म्हणोन रात्रंदिवस काळजीने बाईसाहेब दिवसें दिवस क्षीण होत चालली तेव्हा येडुरास तरी फडके स्वामीकडे जावून औषध उपाय करून येडूरास जाणेची परवानगी पाठवावी म्हणोन करवीरास येक दोन पत्र श्रीमंत मातुश्री आईसाहेब माहाराज यासी लीहून पाठविले. त्यानी परवानगी सांगुन पाठविली नाही करवीरात न्हेऊन आटकेत ठेवाव या बेतान छत्रपती यानी वाळवेत हुजुरच कारभारी आहेत त्यासी सांगुन पाठविलेवरून कारभारी यानी श्रावण व॥२ बुधवारी पाचवे तासी तीन पालक्या वाड्यात घेऊन येऊन म्हणू लागले जे तुम्हास करवीरास न्ह्यावयाचे पालखीत बसवून निघावे म्हणोन निकड करू लागले. तेव्हा बाईसाहेब यानी पस्ट आम्ही काही करवीरास येत नाही असे सांगितले. परंतु न ऐकताच न्यावयाच म्हणोन निकड करू लागले. चिरंजीव सौ. ताराबाई राणी यासी पालखीत बसवून पालखी बाहेर काढली. बाईसाहेब यासी व चिरंजीव सौ. आकुबाई पाटणकर यासी निघणे म्हणोन आग्रह पडला

तेंव्हा करवीरात न्हेवुन आटकेत ठेवितात आता आब्रु राहात नाही ऐसे बाई साहेब घाटगे यांचे पुरत ध्यानात येवून घाबरीया जाहाल्या जीव व्याकुळ होऊन तेच समई साहावे तासी प्राण सोडला. नंतर चिरंजीव सौ. आकुबाई पाटणकर मात्र येथ राहिली राणीची पालखी बाहीर निघाली होती ती तशीच करवीरास गेली. मातुश्री बाईसाहेब यांच दहन दोन घटका रात्रीस जाहल. ईश्वरी इच्छेस उपाय नाही. ईकडील आवस्था तो यैशी जाहाली आम्ही बायकानी काय कराव? आम्हाकड काय आहे? आपण पुत्र व दौलतीच मालक आहा. आपणास कळेल तैसे बंदोबस्त केला पाहिजे. वाळवे वगैरे खेडी करवीरकरानी घेतलीच आहेत. वाडीच ठाण घ्यावया बेतान वाळवेचे मु॥ दोन हाजार जमाव आहे आणि निगवेच मु॥ तोफा च्यार आहेत दग्या फटक्यान आगर कैस साहल तैस वाडीचठाण घ्याव या उमेदीत आहेत. कुंपणी सरकारातुन नेट बसल्या शिवाय करवीरकर उगच राव्हयाच नाहीत. ये विषयी इंग्रज बाहादुर याजकडील वकील तेथ आहेत त्यासी बोलुन त्यांच पत्र पुण्यातील साहेबास पाठवून बंदोबस्त कैसा करणेचा तो करावा. सर्वत्राच संरक्षण करणे आपणाकडे आहे येथील घोडेस चंदी नाही. मजकडे आदा काये आणि खर्च काय हे आपणास पेशजी पासून बिदीत आहे. खर्च चालावयाचा कठीण दिवस तो या प्रकार आल. तेंव्हा सर्वत्र पदरच मनुष्याचं संरक्षण होणे ते आपणाकडे आहे. समजदार आपण आहात बहुत काय लिहिणे हा आशिर्वाद.

लेखांक : ४९

कागल ज्युनिअर : ता २५ एप्रिल १८२५

यादी माहे येप्रील सन १८२५ ईसवी महिन्यात पत्रे लिहिली. सु॥ खमस आशरीन मयातेन व आलफ माहे साबान चैत्रमास

तारीख छ २५ माहे येप्रील सन १८२५ ईसवी

१ श्रीमन्माहाराज छत्रपतीसाहेब दाम आलंताफ हु

नियाजमंद वुलीयम च्यापलीन सो बाहादुर कमीशनर हुजूर पुणे बाद नियाज मारुज हसुल आके नियाजमंदाची खेरयत रोषन होऊन हमेषा तलतुफ

नामा फिरस्ताद करून सरफराज करीत असले पाहिजे. दरीवीला नबाब मुरत-ताब मोला अलकाब गोरनर साहेब बहादुर यांचे हुकमाबमोजीब छ ९ मार्च तारखेचे कागलकर यांचे मोकदमेस खत फिरस्ताद करण्यात आले होते याचा जबाब जरूर कल्मी करण्याचा असता ताहालत आला नाही. बहुत ताजुब जाहले. ऐशास परतुन आ माहाराजास ईतला करावयास मोला अलकाब गौरनर साहेब बहादुर यांचा हुकूम सादर जाहला आहे की साहेब मेहेरबान दौलतराव शिंदे आलीज्या बहादूर यानी आपले मेव्हणे मेहेरबा हिंदुराव घाटगे याचे जाहागिरीत आ माहाराजानी जुलुम जबरदस्ती केली ती खबर अैकोन रंजीदा व खफा जाहले की, अलबता फौज जमा करून पेशजी मरहुम माहादजी शिंदे यानी आ माहाराजांचे तीर्थरूप मरहुम राजेसाहेब यांचे वक्ती फौजेनिशी पाठ-वीली होती त्याप्रमाणे पाठवावी म्हणोनि मगर आ माहाराज व सरकार इंग्रज बहादुर यांचे दरम्याने तहनामा जाहाला आहे. त्याजवर नजर ठेऊन आज-तलग ताहमुल करून हात राखीला. आगरचे आलीज्या बहादर यानी आ माहा-राजावर फौज पाठवावी अैशी सरकार इंग्रज बहादुर याची मर्जी नाही लेकीन त्या दरबारातील जाबसालाचा रंग पाहाता सरकार इंग्रज बहादुर यांस ऐसे जाहीर जाहले की, आ माहाराजानी पराई दौलतीचे ईलाखेचे मोकदमेत पेदरपे इंग्रज बाहादर यांचा सल्हा खातेरस न आणिता बेज्या काम चालवीले ते तह-नाम्यातील मतलबास बीलकुल खिलाप आहे व मेहेरबा हिंदुराव घाटगे यानी आज पावेतो सबुरी केली ती पाहता नम्रतेने सवाल करून आमाहाराजाकडून आपले हक्कास पोहचेल ऐशी सरकार इंग्रज बहादुर यास उमेद आहे. लेकीन आ माहाराजास मालुम असावे की, मेहेरबा घाटगे यानी आपली जाहागीर अैंदा सुपुर्द करून घेणेस कस्त केली या आमाहाराजास सरकार इंग्रज बहादर यांची कुमक हरगीज होणार नाही व आमाहाराजानी येकीन जाणोव की, या मोकदम्याचे दरम्यानेत शिंदे अलीज्या बहादर यास येऊ देणार नाही. लेकीन मेहेरबा हिंदुराव घाटगे खुद्द मातबर याजमुळे भारी फौज जमाऊन आणि-तील. ऐसे जाहाले असता आमहाराजास गैरराजी असणार बीसीयार नमुद होऊन घाटगे यांस कुमक करून आमहाराजास बहुत बखेड्यात आणितील याजकरिता महाराजास जाहीर करण्याविषयी गोरनर साहेब बहादर यानी नीयाजमंदास मरकुम केला आहे की पेशवे यानी आमहाराजांवर हमेशा बहुत हूकुमत करीत

होते. पेशवे याचे जागी हल्ली सरकार इंग्रज बहादर आहेत. आमहाराजाचे दिलात वागत असावे की, काही एक वर्षामागे आमहाराजाची दौलत निपाणीकर यांजकडून बहूत खराबीत आली होती हे तमाम सखुन खातरेस आणून सरकार इंग्रज बहादर........केले ते हरसुरत पना आसरा दिल्हा ते स्मरणात ठेवणेचे मसलत मालूम होत आहे. ऐंदा ऐसे पना होणेस आमहाराज काही उमेद ठेविली था सरकारच्या सल्याप्रमाणे चालावे लागल ऐशास फुरसत ईसी वक्त कागलचे जाहागिर हिंदुराव घाटगे यांचे सुपुर्त करावे म्हणजे बुजरूगीदाईचे सहास आले ते सरकारास येकीन मालूम होईल.

लेखांक : ५०

कागल ज्युनिअर : ता. २७ एप्रिल १८२५

मेहेरबान दोस्तानी निळकंठराव शिंदे

सलाम आंके येथील खैर सला जाणोन आपली षादमानी हमेषा कलमी करीत असावे दरीवीला आपण खत मरकुम केले ते पोहोचले. छत्रपती यांची स्वारी मनोली प्रांती येणार असी दाट आवाई आहे. त्यास हाल्ली स्वारी आली असता आपले गावास हरयेक विषी उपद्रव होऊ नये ऐशी वकिलास ताकीद होऊन राजे साहेबास खत फिरस्ताद व्होव म्हणोन. त्यास आपले कामा-काजाचा बंदोबस्त करून द्यावयाचा राहा कैसी आहे की त्याप्रमाणे करून द्यावी ईकडील सल्याप्रमाणे राजेसाहेब यानी चालत नाही. सबब खत होणार नाही. तारीख २१ माहे येप्रील सन १८२५ ईसवी. ज्यादा काय लिहिणे हे किताबत

लेखांक : ५१

कागल ज्युनिअर : इ. स. १८२६

यादी—राजेश्री यशवंतराव घाटगे.

सर्जेराव यांजकडील बोलणी सु॥ सीत आशरीन मयातेन व आलफ.

१. कागल संस्थान पूर्वापार ईनाम आम्हाकडे चालत आले. श्रीमन्म-

हाराज छत्रपती यानी आम्हास कागलाहून सोईरीक दिली, तेव्हा करवीर मुक्कामी आम्ही राहिलो. कागल संस्थान आम्हाकडेसच होते. दरम्यान रामचंद्रपंत आप्पा पटवर्धन यानी आलीज्या बहाद्दर यांची पलटणे आणून करवीरास वेढा दिला. अगदी जेर जाहले. त्यासमई आमचे बीरादर भाउबंद सखाराम घाटगे हे आलीज्या बहाद्दर यांचे सासरे त्यांचे विद्यमाने बोलणे ठरावून घाटगे यास पाऊण लक्षाचा सरंजाम ईनाम करून द्यावयाचा कबुल केला. तेव्हा घाटगे यांचे म्हणणे पडले की, आम्हाकडे कागल संस्थान आहे ते आपणास द्यावे. कागलचे मोबदला नवीन सरंजाम आम्हास द्यावा. तेव्हा श्री महाराज यांनी आम्हास राज्याचे संरक्षण करणे बहुत प्रकारे सांगून घेऊन पराकष्टा मिनतवारी केली. तुर्त तुम्हास कागल मोबदला भुदरगड व येमकनमुर्डी तालुका देवून कागल आम्हाकडोन घेवून सखाराम घाटगे यास दिल्हे. पुढे निपाणकर यांनी राज्यास आपाय केला तेव्हा येमकनमुर्डी तालुका गेला. नंतर माहाराज यांचा काल जाहला. उपरांत श्रीमन्महाराज आईसाहेब यांनी नउगाव आम्हास दिल्ही त्याची वहिवाट आम्हाकडे सात आठ वर्षे चालली. ते गाव जप्त केले आहेत त्याची मोकळीक करून देविली पाहिजे.

१ मौजे भोदोल हा गाव मुलास दुधाबद्दल इनाम करून दिला होता. त्याची वहिवाट आम्हाकडे दहावर्षेपर्यंत होती. तो गाव जप्त केला त्याची मोकळीक करून देविली पाहिजे.

१ आम्हास आरोप ठेवून कैद केले. त्याची चौकशी जाहली नाही. चौकशी न करिता लोक नेले त्याची चौकशी होऊन आब्रू भरून देवावी कलम १

१ साल गु।। कागलास ठाणे करवीरकर यांनी घातले. पुढे श्रींचे ऊरसास स्वारी करवीराहून कार्तिक मासी आली ते समई कागलचे वाड्यातील जिंदगी फरासखानासुद्धा लुटोन नेली. नंतर स्वारी करवीरास आली तेच दिवशी आरबाचा पहारा आमचे घरी बसविला यांचे कारण काय म्हणोन आम्ही विचारिले असता उत्तर केले की, तो............कागलचे वाड्यात का ठेविले यांचा जाबसाल जाहाला पाहिजे असे सांगून तीनचार दिवस पहारा बसवून निकडच केली, तेव्हा वीस हजार रूपये घेवून चौकी उठविली. त्यांस

येविषयी दर्याप्ती होवून वाड्यातील जिंदगी व वीस हजार रुपये माघार देवीले पाहिजेत.

१ मौजे परीते ता॥. तारळे हा गाव....समई बावडेकर पंत आमात्य यांनी धारादत्त दिला. तो आम्हाकडे हल्ली चालत आहे. त्या गावास करवीरकर यांजकडून हरएकविषयी उपद्रव होतो. त्यास उपसर्ग लागू नये असा बंदोबस्त झाला पाहिजे.

१ मौजे उचगाव व मौजे हलकरणी येथील गावे इनाम व कुरण पाचगाव येथील याप्रमाणे आम्हाकडे चालत आहे.

त्यास करवीरकर यांजकडून जप्ती आली आहे. त्याची मोकळीक करून देवावी.

१ नऊ गाव जप्ती केले तेथे ठाणेत....व तोफ वगैरे होते त्यासुद्धा मोकळीक करून देवावी.

लेखांक : ५२

कागल ज्युनिअर : ता. १६ मे १८२८

सरकार दौलत मदार कंपनी इंग्रज बहादुर आज स्वारी मेस्तर जोसीया निसबट सो बहादुर सर कलेक्टर व पोलिटिकल येजंट सुभा धारवाड यानी दस्तक बा॥ मामलेदारां व जाहागिरदारां व चौकीदारां व गावकरां मोकदमान वगैरे ई॥ सरकार मरकूम दर्शवीला कागलाहुन मेहेरबा यशवंतराव घाटगे सर्ज्याराव यानी श्री केदारलिंगाचे दर्शनास जाणार त्याजबरोबर—

२५ स्वार कारकुन सुद्धा एकंदर मंडळी

१०० पयादे असामी

५० शागिर्द पेशा

३ पालख्या

५ उंट नफर

१ हात्ती नग

येणे प्रमाणे असतील. तरी जाताना व येताना रस्तेत कोणी माने मुजाहीम न होता सोडून देणे. काही घास घेणेला लायकची जिनस असलेस दस्तूर प्रमाणे देणे ही राहदारी आज पासुन ३० रोजा मंजूर आहे.

ता॥ १६ माहे मे १२३८ फसली मो॥ धारवाड

सही इंग्रजी
पोलिटीकल एजंट

लेखांक : ५३

कागल ज्युनिअर : ता. १३ सप्टेंबर १८३०

तीर्थरूप राजेश्री आबासाहेब वडिलांचे शेवेशी

बालके सकल सौभाग्यादी संपन्न वज्रचुडेमंडीत गोजराबाईने चरणावरी मस्तक........साष्टांग दंडवत विंनती विज्ञापना छ. १६ माहे रजेब पो वडिलांचे आशीर्वाद करून येथास्थीत असे विषेश वडिली हुजूर ठराव बाब्त अैवज येणे त्याजविषयी येथे निकड च्यारीकडे लागली ती पत्री लिहिता पुरवत नाही. आम्हाकडे माणुस येणेचे व राजेश्री मीराभाई यास व सेमनभाई व बापु कोठवला व मानापा अैसे चार असामीचे घरी परभारे पाच पाच आसामी प्रत्येक बसून त्याची हाल-आपेष्टा चालली आहे. दरबारात जिकडे तिकडे लौकिक त्यास वडिली आमचे कन्यादान करून लोकांच्या अशा गोष्टी व्हाव्या काही ठीक नाही. त्यास वडिली बाकीच्या तोंडी काढून सत्वर दिल्हेस सर्वत्राचा तगादा उठून सोईवर पडते हे लवकर न जाहालेस सर्वत्राच्या आब्रू जाऊन प्राणावर आलेच आहे व मग आम्ही तर वाचून काय लौकीक मिळवावयाचा आहे. वडीलापुर्ते ध्यानी घेऊन अैवजाची तोड होई ते पाहिजे. सर्वत्राच्या आब्रू गेल्यावर तरी रुपये काही सुटत नाही. परभारे तसती लागून घेतात हे निष्ठूर समजोन आले आहे. आजी तागायत अैवजास ईसका न बसता तरी झाडेनिसी जाबसाल सोयीवर पडत आल होत असो. लिहिलेप्रमाणे अैवज सत्वर पाठवून द्यावा. न दिल्हेस आमची भेट ह्याच कागदी हेही पुढे समजोन येईल शिवाय घोडे व हत्यार व बंदुका यैसे काही देणे तीळवार सोसु नये. यातील काडीमात्र

राहिल्यास वडिलांस जाचनुक होईल येविषयी काही न ठेविता देऊन टाकावे. वडिलाप्रती विषेष काय लिहिणे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.



लेखांक : ५४

कागल ज्युनिअर : ता. १४ नोव्हेंबर १८३३

राजेश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव ता॥ मोकदमानी मौजे म्हाकवे प्र॥ कागल सु॥ आर्बा सलासीन मयातेन व आलफ चिरंजीव राजेश्री आबाजी बीन आंदोजी पाटील भोसले कौलवकर यानी हुजूर येऊन विनंती केली आम्ही कुटुंबवत्सल योगक्षेम चालत नाही यास साहेब कृपाळू होऊन काही नुतन जमीन देवून योगक्षेम चालविला पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता पेशजी पासुन सेवा चाकरी एकनिष्ठ केली हल्लीही सेवाचाकरी करीतच आहेत. जाणोन मौजे मजकुरपैकी जमीन बिघे बी तपशील

८३॥ काळी जमीन
८४ गर जमीन

येकूण जमीन साडेसात बिघे पाटील मजकुर यासी ईनाम दिली असता यासी व त्याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे आणि या पत्राची तालीक घेऊन हे पत्र भोगवटेस परतोन देणे. साल दरसाल नवीन पत्राचा आक्षेप न करणे. जाणीजे रवाना छ १ माहे रजब



लेखांक : ५५

कागल ज्युनिअर : ता. ३ जानेवारी १८३४

ता॥ मोकदमानी मौजे म्हाकवे प्रांत कागल सु॥ अर्बा सलासीन मयातेन व आलफ मौजे मा॥री श्री लक्ष्मीची रेडे जत्रा जाहाली याजबद्दल मानपाने चिखलीकर म्हार याजकडे सालाबाद प्र॥ येत असता हल्ली कागलकर म्हार न्हेत आहे म्हणोन निवेदन जाहाले त्याजवरून ताकीद सादर जाहली असे तरी मान पान काये जे असेल ते मागील दाखले आन्वये सालाबाद प्रमाणे चिखलीकर म्हारास देणे. कागलचे म्हारास देणेचे कारण नाही. ये विषयीचा

फिरोन बोभाट येऊ न देणे पुन्हा बोभाट आलेस मुलाहीजा होणार नाही. जाणीजे छ. २२ साबान

लेखांक : ५६

कागल ज्युनिअर : ता. १८ डिसेंबर १८३४

श्रीमन्महाराज मातुश्री सईबाई साहेब यानी राजमान्य राजेश्री यशवंतराव घाटगे सर्ज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे श्रीयासह चिरंजीव विजईभव राजश्री राजे बावासाहेब छत्रपती यासी कार्तिक बहुल चतुर्दशी भोमवारी अठरा घटका रात्रीस कन्या जाहाली या संतोषाची शर्करा तुम्हाकरिता संक्रु कोडला हुजरे व जोती भोसला व येसु पोवार माहाल करीया समागमे पाठवीली आहे घेवून पावली यांचे विंनतीपत्र पाठवणे जाणीजे. सु।। आर्बा सलासीन मयातेन व आलफ रवाना छ. २९ रजेब बहुत काय लिहिणे.

लेखांक : ५७

कागल ज्युनिअर : ता. १७ एप्रिल १८३५

साहेब मेहेरबां दोस्तां बापु पाटील

भोसले नी।। मेहेरबां हिंदुराव बाबासाहेब घाटगे सर्ज्याराव वजारतमाब सलामत—

अजतर्फ मेस्तर बेबर साहेब बहादुर सर कलेक्टर व पोलिटिक्याल येजंट सुभा धारवाड सलाम आंके येथील खैरयत जाणोन आपले आफीयतेस कलमी करीत असावे. दरीवीला मेहेरबां यशवंतराव घाटगे यानी इनूरास मुलाकत करिता आले होते तेव्हा जाहीर केले की कागल येथे आपले व मेहेरबां हिंदुराव बाबा साहेब वगैरेचे वाडा किल्लेत पूर्वीपासून आहे त्यास अलीकडे मेहेरवां रावजी काकडे तेथील वहिवाटीस आल्यावरून आपले घरास येणार जाणारास दरवाजेत परवानगीचा उजूर घेऊन अडथळा करीत आहेत. याजमुळे आपले आब्रूस कमी आणि येणार जाणारास अडथळा केल्यावरून आपले कामकाजासही हरकत पडते. आणि परवा आपलेकडील वकील इनुराहून कागलास गेले असता गावात

सुद्धा सोडले नाही मळेत राहून वर्तमान सांगोन पाठवीले. असे होत आहे म्हणोन त्याजवरून कलमी केली आहे. मेहेरबा यशवंतराव साहेब व मेहेरबां हिंदुराव बाबा सो दोघे एक घराणेचे. मेहेरबां हिंदुराव बाबासो।। सुद्धा यशवंतराव वयाने वडील आहेत. म्हणोन अलबतां मानमर्यादा चालवीतील. उभयतां मध्ये भेद राहणार नाहीत. असे असता हिंदुराव बाबासोचे कारभारी यानी मेहेरबां आपासाहेबास अमर्यादा व्हावयाजोगे त्यांजकडील लोकांस दरवाजेत परवानगीचे उजर घेऊन हरकत करावे म्हणजे बहुत आश्चर्याची गोष्ट आहे. हल्ली काही धांदलचे वक्तही नव्हे अगर असे वक्त आसलीस येणार जाणारास परवानगीचे हरकत होणेचे सबब तरी सांगावयास जागा होते. परंतु असे वक्त नाही. यास्तव हल्ली यशवंतराव सो याजबरोबर सरकारचे स्वार पाठवीले आहे. राव मोसुफ गावात आपले लोकानीसी जातील त्यास हरकत होती किंवा नाही याची नजर राखुन मजकूर हुजुर ईतील्ला करतील. लेकीन आपण मेहेरबां बाबा साहेबांकडून कागलचे कामकाजास मोरव्तार होवून आला आहा असे तकरार येईनास बंदोबस्त राखणे याजविषयी गदग मुक्कामी रुबरु सुचनाही करणेते आली होती ईतःपर त्याजकडील लोकांस दरवाजेत परवानगी रसवानगीचे हरकत पडेनासे आपण बंदोबस्त राखुन येशवंतराव सो।।चे मर्यादेस अंतर करणार नाही असी इज्या नीबाची उमेद आहे. आपणाकडून यांचे बंदोबस्त न होता परतुन असे तकरार नमुद जाहालेस कागल ई।। महाराजाचे आहे. सबब त्याचे बंदोबस्ती विषयी महाराज छत्रपती साहेबांस ईशारा दिला जाईल. जियादा काय लिो हमेष खत पाठवून दिल आराम करीत असावे. ता. १७ माहे अेप्रील सन १८३५

सही इंग्रजी
पोली. एजंट

लेखांक : ५८

कागल ज्युनिअर : ता. १६ एप्रिल १८३६

राजेश्री या विराजीत राजमान्य राजश्री लिंगोपंत आपा स्वामीचे सेवेशी पो रामचंद्र पंत मामलेदार ता।। चिकोडी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता।। छ १६ येप्रील सन १२४५ फसली पावेतो वर्तमान उत्तम असे. विषेष

आपण पत्र पाठवीले ते पावले लिहिला मजकूर कळला. राजेश्री यशवंतराव घाटगे सर्ज्याराव कागलकर यांचा गल्ला जिन्नस मांजरीहुन कागलास येत आहेत त्यास जकातदारानी हासिलाविषयी उपद्रव न करणे विषयी ताकीद पाठवावी म्हणुन लि॥ जाहाले त्यास तालुका मजकुरचे जकात ईजारा मोकरर जाहाले आहे हीजारदाराचे नाव हुजूराहून पण सादर जाहाला त्यात जाहागीरदार वगैरे हीलाकेचे जिन्नस गेले असता त्यास हुजूराहून दस्तक मिळालेस पाहुन सोडून देत जाणे म्हणुन कलम लिहिले आहे व शिवाय अैलीकडे कायदा वगैरे जाले आहेत याजसबबेने हुजूर हुकमाशिवाय ताकीद देववणेस येत नाही. सरकार काईदेकानु सर्व आपणास माहीतच आहे. येविषयी ईकडून लिहिणे नलगे. हुजूर हुकूम आणवीले म्हणजे त्या अन्वये आमल चालवणेस येईल. आपणास कळावे आणि हुजूराहून आपले नावे याद हुजूराहून आले ते पाठवीले आहे तरी पावले याचे उत्तर पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ करावा येथील ईजारदार सयापा गुले आहे त्यास येविषी आम्ही ताकीद दिल्हे असता हुजुरातच जाऊन (अपूर्ण)

लेखांक : ५९

कागल ज्युनिअर : ता. १३ मे १८३७

राजेश्री रामाजीपंत व नाना मुजुमदार व सुभाना घाटगे गोसावी स्नेहांकित यशवंतराव घाटगे सर्जेराव दंडवत व सु॥ समान सलासीन मयातेन व आलफ कारखानेचा बंदोबस्त वरचेवर पाहात असावे, आणि बहुत सावधगिरीने राहाणे, आणि तेथील लोकांची हजेरीची याद पाठवून देणे. रवाना छ. ७ सफर बहुत काय लिहिणे.

लेखांक : ६०

कागल ज्युनिअर : ता. ११ सप्टेंबर १८३७

श्रीमन्माहाराज मातुश्री सईब ईसाहेब यानी राजमान्य राजश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव यासी आज्ञा केली अैसीजे श्रीयासह चिरंजीव विजयीभव राजेश्री

राजे बाबासाहेब छत्रपती यासी श्रावण शु।। पंचमी गुरुवारी प्रातःकाळी चवथे घटकेस पुत्रोत्साह जाहाला या संतोषाची शर्करा बापु धावर व बरगे व येसु घोत्रे या समागमे देवून पाठविली आहे. घेवून पावली याचे विनंती पत्र साहेबाचे शेवेसी पाठवणे जाणीजे सु।। तीसा सलासीन मयातेन व आलफ रवाना छ १० जमादिलावल बहुत काय लिहिणे

लेखांक : ६१

कागल ज्युनिअर : ता. २२ ऑक्टोंबर १८३९

राजेश्री यशवंतराव साहेब सर्ज्याराव घाटगे आपा सो गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य विनायकपंत असिष्टंट सरवीयेर बहाली काम पाहाणेचे अखबरनवीस मु।। कोल्हापूर कृतानेक रामराम विनंती. येथील कुशल ता।। २२ माहे आक्टोबर सन १८३९ ईसवी पावेतो वर्तमान यथास्थीत असो. विषेष श्रीमंत राजश्री हिंदुराव बाबा सो घाटगे सरज्याराव वजारतमाब याजकडील वकील रंगो मनोहर यानी हुजुरात छ २६ रजब रोजी याद दिली त्यात हासल मा।र की, यशवंतराव आपासाहेब घाटगे सर्ज्याराव यानी हाल्ली नवीन सीबंदी लोक इतलाखी आरब वगैरे लोक वरचेवर ठेवून कागल नजीक बागेत तीस च्याळीस असामी पर्यंत जमावीले आहेत असे नवे लोक जमा करून आणु लागलेस श्रीमंत मातोश्री सुंदराबाई सो याजकडील कारभारी रावजी काकडे दिनकरराव आहेत ते गावात येऊ देणार नाहीत येणे कडुन येकादा खटला होईल करिता यशवंतराव आपासो यानी नवे लोक याचा जमाव करीनासे तजवीज जाहाली पाहिजे म्हणुन तपशीलवार याद दिली त्याजवर चवकशी करून रिपोर्ट करावे म्हणून ता।। १६ माहे मजकुरचा हुकूम सादर जाहल्यावरून हे पत्र आपल्यास लिहिले आहे तरी आपण नवीन लोक किती ठेविले आहेत व नवीन लोक आरब वगैरे ठेविण्याचे कारण काय ते तपशीलवार लौकर लिहून पाठवावे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

लेखांक : ६२

कागल ज्युनिअर : ता. ४ एप्रिल १८४०

राजमान्य राजश्री यशवंतराव घाटगे

सर्ज्याराव यासी – आज्ञा केली ऐसीजे राजश्री श्रीपतराव घाटगे सर्ज्याराव यानी हुजूर विदीत केले जे का। कागल येथे आमचे घर आहे त्याचे दरवाजे पर्यंत यशवंतराव घाटगे सर्ज्याराव यानी खाणीत आणून आमचे हद्दीत खलगा करून रस्ता बंद केला व आमचे जागचे घरे आहेत ती काढणेविषयी निकड लाविली आहे म्हणोन त्याजवरून तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले असे. तरी पेशजीपासुन श्रीपतराव घाडगे याजकडे भोगवटेस जागा आहे त्या जागेत तुम्ही नवीन कारखाना न करिता तुमचे हादरमेचे जागेत करणे आणि त्याचे जागेतील घरे असतील त्यास उपसर्ग न करणे जाणीजे. सु॥ आर्बैन मयातेन व आलफ छ १ माहे मोहरम बहुत काय लिहिणे.

लेखांक : ६३

कागल ज्युनिअर : ता. ५ जानेवारी १८४१

राजमान्य राजेश्री नारायणराव घाटगे सर्ज्याराव

यासी आज्ञा केली अैसीजे निपाणी येथे आरब लोक यांनी तंटा करून बेकैदी वर्तणुक करीत आहेत म्हणोन हुजुर निवेदनात आले त्याजवरून तुम्हास आज्ञा पत्र सादर जाहले असे तरी तुम्हाकडील प्रांत कागल नी॥ गाव गन्नानी कोणीही चाकरीस निपाणीस जाऊ नये जातील त्याचे पारपत्य केले जाईल याप्रमाणे ताकीद गावगन्नास पाठवून बंदोबस्त करवणेची आज्ञा जाहाली असे. आज्ञेप्रमाणे ताकीद गावगन्नास पाठवून बंदोबस्त राखणे जाणीजे. सु॥ ईहिदे आर्बैन मयातेन व आलफ रवाना छ ११ माहे जिलकाद बहुत काय लिहिणे.

लेखांक : ६४

कागल ज्युनिअर : ता. १६ जून १८४३

यादी राजमंडळ हुजूर करवीर सरकारातून आजम ईडवर्ड टौनसेंडसाहेब बहादुर पोलीटिकल येजंट प्रांत कर्नाटक सु॥ आर्बै आर्बैन मयातेन व आलफ.

आ. साहेबकडून आंख २७१ तारीख २२ माहे एप्रील सन १८४३ ईसवीची याद आली त्यात कागलकर हे आपला हक्क आहे म्हणणेस पहिले आलिशाने अेलफींष्टन सो गव्हरनर बहादुर यानी खर्डात लिहिले त्याची नक्कल पाठविली आहे. आणखी काही दाखले पुण्याहुन आणवावे म्हणोन चैत्र ब॥ ३ ची याद आली ते पाहुन कलमी केले जाते जे कागलचे ठाणे व कागल तालुकेतील गाव मुळी घाटगे सर्ज्याराव यास कोणाकडून मिळाले, माहाराजाकडून किंवा दुसरे कडून कोणते कारणास्तव मिळाले याचे दाखले काय असतील ते पाठवीले पाहिजेत म्हणोन कलमी केले त्यास पेशजी मरहुम विठोजी बीन पीराजी घाटगे सर्ज्याराव याजला माहाराज सरकारातून ठाणे कागल ईनाम गाव परगणे मजकुरी ईनामी जमीनी व देशमुखी नाडगौडकीचे हक्क कानु कायदे चालत होते पुढे मरहुम राणोजी बीन आबाजी घाटगे सर्ज्याराव याजला ठाणे कागल व ईनाम गाव सात व सदरहु जमीनी व हक्क कानु कायदे देशमुखी व नाडगौडी महाराज सरकारातून चालत असता घाटगे मशारनीले याजकडून हुजूरचे शेवेसी अंतर पडले मुळे मरहुम माधवराव बलाळ प्रधान यानी विठ्ठलराव सिवदेव यासी कागलास शके १६८८ व्यय नाम संवत्सरे सन सला तीसेन मया व आलफ इ. स. १७६६ साली पाठवुन कागलचे ठाणे घालुन हुजूर खालसा तीत दिल्हेवर इनाम गाव सात व देशमुखी व नाडगौडी त्याजला चालविली होती. बाकीचे गावापो कित्येक गाव सरकार खालसांत व काही गाव घाटगे यांचे भाऊबंदाला चालविले पुढे मरहुम विश्वासराव बीन जयशिंगराव घाटगे सर्ज्याराव हे महाराज सरकारचे आप्त जाहलेवर सरकार शेवेशी ठाणे कागल व आठ गाव दिल्हे. पुढे मरहुम यशवंतराव बीन राणोजीराव घाटगे सर्जेराव हे माहाराज सरकारचे ज्यामात जाहालेवार ठाणे कागल व तेरा गाव त्यास दिल्हे. पुढे मरहूम तुळजोजी उर्फ सखाराम बीन जयसिंगराव घाटगे सर्जेराव यानी माहाराज सरकारची सेवा चाकरी केलेवरून ठाणे कागल तालुकेतील गावे छत्तीस सन इहिंदे मयातेन व आलफ शके १७२२ रौद्रनाम संवत्सरे इ. स. १८०० साली देऊन जे समई महाराज सरकारचा हुकूम होईल ते वेळेस सदर ठाणे सरकारात स्वाधीन करून म्हणोन मशार निल्हे घाटगे यानी विनंती पत्र स्वदस्तुरचे लिहून दिल्हे आहे व कागल तालुका महाराज सरकारचे ईलाखेतील असा ठराव पेशजी व आलीकडे जाहला. पेशजी काही दाखलेचे कागद पत्र दग्ध

जाहले. हल्ली हाजर आहेत ते दाखलेचे कागद पत्र असल राजेश्री यशवंतराव जिवाजी वकील याजकडे रवाना झाले आहेत. ते कागद पत्र मशार नील्हे वकील दाखवितील त्याजवरून कागल तालुका घाटगे सर्ज्याराव माहाराज सरकारचे ईलाखेतील असी आसाहेबाची खातरदास्त होईल आणखी काही सदरहु दाखलेचे कागद पत्राचे तलास होत आहे. त्यास दाखलेचे कागद सापडताच वाना होतील रवाना मिती शके १७६५ शोभन नाम संवत्सरे ज्येष्ठ व।। ७ रवीवार चंद्र

सही—रामचंद्रराव नारायण राजाज्ञा कारभारी

सही—हिंदुराव गायकवाड सरखवास कारभारी
इंग्रजी अक्षराची सही असे.

लेखांक : ६५

कागल ज्युनिअर : ता. १५ ऑगस्ट १८४३

यादी—राजमंडळ हुजुर न्यायाधीश कडून राजेश्री नारायणराव घाटगे सर्जेराव यासी सु।। आर्बा आर्बेन मयातेन व आलफ. तुम्ही छ १९ माहे रजेब सन सलास आर्बेन मयातेन व आलफ तारखेचे पत्र राजश्री दिनकरराव गायकवाड यांचे नावे पाठविले. त्यात मौजे शेंडूर का। कागल येथील हाणबर पाटील याने परागंदा होऊन गावाची बहुत खराबी केली व बाळु पाटील यास जीवे मारला त्यास हाणबर मा।र यांचा शोध लावुन धरून कोडणीकर याचे जीमा केला आहे म्हणोन वगैरे मा।र लिहिला. अैसीयास सदर हाणबर याजला हाल्ली चिकोडीचे मामलेदार यानी करवीरास पाठविला आहे व त्याची बायको जिऊ चिकोडीस ठेविली आहे तिजकडे काही गुन्हा आहे की काय ते लिहून आले पाहिजे, म्हणोन पोलटक्याल येजंट सो। बहादुर याजकडून याद आली. त्याजवरून तूम्हास याद सादर जाहाली आहे. तरी हाणबर याने खुन व खराबी केले प्रकर्णी कागदपत्र व साक्षी पुरावा काय आहे तो व त्याचे बायकोकडे काही गुन्हा आहे किंवा नाही ये विषयीची याद येणे प्र।। दोन दिवसात पाठवून द्यावे त्याविणे चौकशी हरकत आहे व साहेब बहादुर याचे यादीचा जाब देणेचा

खोळंबा आहे शके १७६६ क्रोधी नाम संवत्सरे चैत्र शुद्ध रोज ईंदुवार तारीख ५ माहे रबिलावल माहे

छ ७ माहे रबिलाबल चैत्रमास सदरहु यादीचे उत्तर राजेश्री हिंदुराव गायकमाड सरखवास याचे नावे दिले असे छ ९ रोज.

लेखांक : ६६

कागल ज्युनिअर : ता. २० एप्रिल १८४४

राजमान्य राजेश्री नारायणराव घाटगे सर्जेराव यांसी आज्ञा केली ऐसीजे आजम पोलिटिकल येजंट साहेब बहादुर याजकडून ता। ९ माहे फेब्रुवारी सन १८४४ ईसवीची यादी आली. त्यात जैन, लिंगायत जातीचे लोकांचे घरी लग्न-कार्य जाहाले असता, ब्राह्मणाचे उपाध्ये याचे आपणास कारण नाही म्हणोन फिर्याद केलेवरून आलीशान गव्हर्नर साहेब बहादुर यासी लिहिणे गेले. त्याचे उत्तर आलेवरून जैन लिंगायत जातीचे लोक आपले जात (फाटलेले आहे) प्रमाणे लग्न करतील. त्याचे घरी ब्राह्मण जातीचे उपाध्ये यानी येऊन खटला करू नये असे लिहिलं आहे. त्याजवरून हे आज्ञापत्र सादर जाहाले आसे तरी जैन, लिंगायत यांचे घरची कार्य ते आपले रिवाजाप्रमाणे करतील, तेव्हा ब्राह्मण जातीचे उपाध्ये यांनी जाऊन खटला न करावा अशी ताकीद तुम्हाकडील गाव गन्ना करवून बंदोबस्त ठेवलेचे विनंतीपत्र हुजूर पाठवावे. जाणीजे × × × आर्बा आर्बेन मयातेन व आलफ रवाना ता।। १ माहे रबिलाखर बहुत काय लिहिणे. मोर्तबा आसे.

लेखांक : ६७

कागल ज्युनिअर : ता. १३ आक्टोबर १८४४

साहेब मेहेरबां कर्मफर्माये दोस्ता नारायणराव साहेब घाटगे सलाम अज-ज्यानीब हेनरी विलसन रिवीस साहेब बहादुर पोलिटिकल येजंट प्रांत कर्नाटक सलाम आंके येथील खैरीयेत जाणोन आपले षादमानी हमेशा कलमी करीत

असले पाहिजे. दरिविला कोल्हापूर ईलाखा सामानगडकरी लोकानी बदलून राहिले. त्यांचे पारिपत्त्याबद्दल सरकारचे लष्कर समेत येऊन तोफाचे बार होऊन परवा व काल दोन दिवस गड किल्लाचे दिवाल पाडून आज प्रातःकाली हल्ला चढोन ठाणा घातले आहे. सबब हा संतोषाचे वर्तमान आमेहेरबानास जाहीर होणेबद्दल कलमी केली आहे. ज्यादा लिहिणेचे काय असे. हमेशा खत पाठवून दिल आराम करीत जावे. रवाना तारीख १३ माहे ऑक्टोबर सन १८४४ ईसवी १२५४ फसली शके १७६६ क्रोधीनाम संवत्सरे अश्विन शुद्ध २ भानुवार मुक्काम सामानगड नजीक लष्कर. ताजा कलम—आजचे दिवशी सामानगड किल्ला स्वाधीन जाहलेनंतर सरकारचे लष्करावरी छापा घालोव या बेताने सुभाना निकम व भुदरगडकरी च्यार पाचशेहे लोक जमाव होवून आले त्यांस सरकारचे लष्कर जाऊन त्या लोकांचे पारपत्त्य केले. त्यात बहुतेक लोक मारले गेले व सुभाना निकम वगैरे हस्तगत जाहला आहे. सबब पुढे त्या लोकांचे तसदी आपणास लागणार नाही असे तारीख सदर

सही इंग्रजी
पोलि. येजंट

ताजा कलम—५०० लोक धरले गेले व ४०० | ५०० लोक मारले गेले

सही इंग्रजी
पोली. येजंट

लेखांक : ६८

कागल ज्युनिअर : ता. १६ जानेवारी १८४५

साहेब मेहेरबां कर्मफर्माये दोस्ता नारायणराव सो घाटगे सर्ज्याराव सलाम हुताला—अज तर्फ हेनरी विलसन रिवीस साहेब बहादुर पोलीटिकल येजंट प्रांत कर्नाटक सलाम आंकी येथील खैरीयत जाणोन आपली शादमानी कलमी करीत असले पाहिजे. दरीविला आसाहेबानी तारीख छ. ४ मोहरमचे पत्र व ईज्यानीबा कारणे मकर संक्रमणाचे तीळ शर्करा युक्त थैली पाठवीले आहे म्हणोन कलमी जाहाले. फार संतोषास कारण जाहाले ज्यादा काय लिहिणे हमेशा खत

पाठवून दील ताजा करीत जाणे. रवाना तारीख १६ माहे जानेवारी सन १८४५ ईसवी मुक्काम कोल्हापूर नजीक लष्कर

सही इंग्रजी
पोलि. येजंट

लेखांक : ६९

कागल ज्युनिअर : इ. स. १८४७ (?)

चिरंजीव राजश्री नानासाहेब घाटगे सर्जेराव यासी प्रती बायजाबाई सिंदे आलिजा बाहाद्दर आशीर्वाद उपरी येथील कुशल ता। छ २४ जिल्हेज पौ। मु। जनस्थान यथास्थीत असो विषेश आपले मातोश्री करिता खण पैठणी उदा आंजीरी १ व लुगडे गुलाबी सेलारी येवलेची १ व आपणास मकर संक्रमण प्रयुक्त तिळाची थैली पाठवीली, आहे. पावल्याचे लिहून पाठवावे बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

लेखांक : ७०

कागल ज्युनिअर : ता. २ एप्रिल १८४७

चिरंजीव राजेश्री नारायणराव घाटगे सर्जेराव यासी प्रती—बायजाबाई शिंदे आलिज्या बहादुर आशिर्वाद उपरी येथील कुशल ता। १० माहे रबिलाकर पावेतो मुक्काम....पुणे यथास्थीत असे विषेष तुम्हाकडुन पत्र राजेश्री अमृतराव निंबाळकर याज समागमे आले ते पाहुन लि। अभिप्राय सर्व समजला. ईकडीलही ईच्छा होती की, त्या प्रांती जाऊन सर्वत्राच्या भेटी व्हाव्या ईश्वर सत्येने ईकडेस जाण्याची त्वरा जाणोन येणे न जाहाले ईकडुन तुम्हाकरिता पैठणी हीरवी जरी काठी पाठविण्यात आली आहे पावलीयाचे व कुशल वरचेवर लि। येत जावे. कळावे बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद पा। १५ माहे रबिलाखर शके १७६९

लेखांक : ७१

कागल ज्युनिअर : ता. २२ सप्टेंबर १८४८

साहेब मुषफक मेहेरबा कर्म फर्माय दोस्ता जयसिंगराव बाबासाहेब घाटगे सर्ज्याराव वजारतमाब सलाम हुताला—

अजी ज्यानीब कप्तान ग्रेहेमसाहेब बहादुर पोलीटीकल सुपरिटेंडेंट ईलाखा कोल्हापूर सलाम अंकी येथील खैरीयत जाणोन आपली शादमानी हमेषा कलमी करून दील आराम होत असावा. दरीवीला फौजदारी कामाचे अखत्यारा-विषी सरकारचा हुकूम आल्यावरून कलमी करण्यात येते की, आपले ताब्यातील जे गाव आहेत त्या गावगन्नानी फौजदारी प्रकर्णी तंटा होईल त्याचा ईन्साफ आपणाकडे होवून गुन्ह्याचे स्वरूपानुरूप शिक्षा देण्यात येत असावी त्याचा प्रकार खाली लिहिल्याप्रमाणे—

(१) जबरी मारामारी = दरवडा जमातीचा = खुन, अकल्पीत = खुन बुधीपुर्वक येकूण चार गुन्हे खेरीज करून बाकी गुन्ह्याचा इन्साफ आपलेकडे चालुन त्याजबद्दल शिक्षेचा ठराव पन्नास रुपये दंड व तीन महिने कैद येथ पावेतो होत असावा. यावर जास्ती ठराव आपणाकडे होवू नये व जे सदरी चार गुन्हे लिहिले आहेत त्याचा ईन्साफ मात्र आपलेकडे व्हावयाचा नाही. परंतु गुन्हा जाहाला असता तात्काळ–कैदी पकडण्याची व मुद्दा धरण्याची वगैरे तजवीज आपलेकडुन होत असावी आणि त्याविषयी लागलेच इकडे लिहून येत असावे म्हणजे कलमी होत जाईल.

(२) जे खटले आपलेकडे येतील त्याजबा। येक फैल बुक घालुन त्याजवर सर्व खटले म्हणजे फिर्यादीच्या अर्ज्या माहे तारीख वार दाखल होत असाव्या आणि त्यापैकी फैसल किती जाहाले व शिल्लक किती राहिले त्याज-बद्दल दर महिन्यास नेमुन दोन या समागमे पाठविण्यात आले आहेत याप्रमाणे पत्रक तयार होवून दुसरे महिन्याचे दाहावे तारखेचे आत ईकडे येवून पोचत अशी पाठविण्याची तजवीज होत गेली पाहिजे–

(३) सदरहु फौजदारी अंमल आपलेकडुन चांगले रीतीने चालवुन सरळ वर्तणुक जाहाल्यास असाच चालेल तसे न झाले तर हा अखत्यार काढून घेतला जाईल व आपण फैसल करून त्याजवर अपील ईकडे पाहाणे होईल व

प्रसंगोपात जरूर लागल्यास जे खटले आपल्याकडे फैसल व्हावयाचे त्यातून येकादा अवल खटलाही पाहण्यास मागवीला जाईल.

(४) सदरी तीन महिंने कैद व पन्नास रुपये दंड पावेतो शिक्षेविषयी लिहिले आहे त्यातून येखादा भारी स्वरूपाचा खटला दिसल्यास त्याचा फैसल ईकडे लिहून होत असावा परभारे होत जाऊ नये येकूण सदरीच्या कलमी मजकुरावरून आसाहेबास मालुम होईल कळावे ज्यादा काय लिहिणे हमेषा खत येवून दोस्तीची बढती होत असावी. तारीख २२ माहे सपटंबर सन १८४८ इ. स. मु॥ लष्कर बावडा नजीक कोल्हापूर

सही इंग्रजी
पोली. सुपरिं.

लेखांक : ७२

कागल ज्युनिअर : ता. १७ मार्च १८४९

चिरंजीव राजेश्री नारायणराव घाटगे सर्जेराव यासी–बायजाबाई शिंदे आलीजा बाहाद्दर उपरी येथील कुशल तागायत छ २ माहे सफर पावेतो श्री आवंतीका क्षेत्र यथास्थीत असो विषेष तुम्हाकडोन पत्र येऊन वर्तमान समजत नाही त्यास वरचेवर पत्र पाठवून कुशलवृत्त कळवीत जावे. तुमचे लग्न समारंभ आईसाहेब करणार म्हणोन अैकिले त्याजवरून बहुत संतोष जाहाला ईकडोन आपणाकरिता पोषाख राजेश्री बालाजी राजे भोसले व विनायक रामचंद्र व साळू निंबाळकरीण याज समागमे पाठवीले आहे ते पावतील. आपण आईसाहेब व माहाराज छत्रपती साहेब यांचे खर्चाचे संरक्षण बहुत प्रकारे करीत असावे मर्यादेनुरूप आज्ञेत वर्तणुक करीत जावी यातच कल्याणाची वृद्धी आहे बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद ता. २१ माहे रबिलाखर शके १७७०

लेखांक : ७३

कागल ज्युनिअर : इ. स. १८५१

यादी–श्रीमंत राजमान्य राजेश्री नारायणराव नानासाहेब घाटगे सर्ज्याराव

यांचे वंशावळीचा मजकूर माहितीवरून लिहितो सु॥ ईहिदे खमेसन मयातेन व आलफ

(१) चौथे पुरुषाचे पोटी पुत्र ५ पै॥ मधील व दुसरे वडील जिवंत असताच मयत जाहले. (फाटले आहे) काम करीत होते ते कैलासवासी (फाटून गेले) आबाजीराव वहिवाट करीत होते.

(२) नंबर तीनचे पुत्र राणोजीराव याजकडे आमल होता. तेव्हा बंडावा चालत असता करवीरकर व कागलकर यांचा सिलसिला नेहमी चालत असता कैलासवासी जिजीआई सांहेब याचे कारकीर्दी....

येसाजी सिंदे यानी स्वारी करून कागलास गर्दी केली तेव्हा राणोजीराव याचे हातातील आमल गेला तेव्हा...........जाहाला त्यावेळी राणोजीराव दिगरजेस राहात होते पुढे नंबर च्यारचे नातु, विश्वासराव चिखलीस होते त्यानी सदर राणोजीराव याजकडील कामगार बाबुराव नरसिंह म्हणोन होते त्यास हाताखाली घेऊन तालुकेची वसाहत केली. तेव्हा आमल त्याजकडेच आजमासे वर्षे होता.

(३) हातात वहिवाट असले त्या मागे दुसरेने काम करावयाचे परंतु नंबर ४ चे नातु सखाराम बावा हे सिंद्याचे त्या जोरावर वहिवाटीची घालमील होत गेली.

(४) सखाराम बावाचे पुत्र जयसिंगराव उर्फ हिंदुराव बाबा सा॰ दिल्लीस आहेत; त्याजकडेच तालुकेची वहिवाट आहे ; ती सदर जबरीचे कारणानेच आहे.

(५) पहिले च्यार पुरुषांची साले समजत नाही. यैलीकडील चार पुरुषांची साले पा॰ नारायणराव साहेब यांचे पणजे आबाजीराव यानी वर्षे ६० काम केले व राणोजीराव यानी आजमासे ५० वर्षे काम केले व वडील यशवंत राव उर्फ अ.पा॰साहेब यानी आजमासे १५ वर्षे काम केले.

लेखांक : ७४

कागल ज्युनिअर : इ. स. १८५१-५२

यादी कैलासवासी आऊबाई आक्कासाहेब यांचे देवळातील सामान करवीरकर यानी जप्ती केले ते परत घेतले सु॥ ईसने खमसेन मयातेन व आलफ.

१ नी॥ जिन्नसाचे कलम

१७ भांडी सुमारी

६ तांबेची भांडी

२ तांबे १ केळी

१ तामण १ थाटी गंधाची

१ पळी संधेची

११ पितळेची भांडी

१ तबक १ डबा

१ गिंडी १ घाट

१ धुपार्ती १ तामण

२ थाल्या २ वाटया

१ ताट

५ सणग

१ साडी जरी काठी

१ चोली ताड पदरी

१ पातळ रेसीम काठी

१ सर जुना फाटका

१ पंचे जुने आंग पुसावयाचे

४ किता जिन्नस

१ नेत्र जाड रुपेचा

१ कुलुप लोखंडी नळीचे

१ डोरल सोनेच गुंज सुमार येक अजमासे वजन लाकडी करंडे सुद्धा

१ बुरनीस

१ निकम मयत यांचे जिन्नस

१ बाळी सोनेची साधी	१ कड रुपेचे
१ पागोटे नवे	१———
२ धोत्र जुनी	१ चोळणा जुना
१ ....जुना	१ पंचा नवा
१ झोळणा फाटका	१ घोंगडे फाटके
१ सोटकवीडीचे	

जिन्नस सुमार १२

येणेप्रमाणे नाईकजी काटकर व बाळू करव्या यांचे वि॥ जिंनस घेवून आंबाजी जामदार व सतबा सालोखा व गोंदा गंजेव्या याचे जीमा केले असे तारीख १९ माहे मोहरम उर्फ जेष्ट मास सदरहु प्रमाणे सरकारात पावती दिली आसे.

लेखांक : ७५

कागल ज्युनिअर : ता. ३१ जानेवारी १८५४

यादी मेहेरबान नारायणराव घाटगे सर्जेराव संस्थान कागल याजकडे च्यापलेन साहेब असि. ईनाम कमीशनर ईंच्यार्ज खुषकी जकातीवरील हक्कदार वगैरेचे कमिशनर प्रांत दक्षिण भाग याजकडून लिहून जावयाची ऐसीजे. आपल्यास कसबे मांजरी तालुके चिकोडी जिल्हा बेळगाव येथे राबता व भाजी फसकी व चर्मी जोडा अैनजिनसी बाबी पावत होत्या. त्या सन १८४४ चा अॅक्ट १ वरून जकात माफ जाहल्यामुळे बाबी माफ जाहाल्यामुळे वगैरे नुकसान जाहाले म्हणोन दावा त्याजबद्दल सनदपत्र नसोन सन १२३८।४२।४५ तीन सालच्या टाचणादाखल यादी व सन १२५०।५२ ते५४ येकूण ४ सालची कागल प्रांतची मौजेवार बारखतें व सन १२५५ ते ५९ फसली पर्येत याद येक येणे प्रमाणे सालचे कागद आहेत. त्यापैकी सन १२५५ तागायत ५९ पर्यंत याद एक आहे. ती हिशेब नसोन उतारा आहे सबब सोडून बाकी सात सालावरून जुळणी करिता राबता बाकी बद्दल आकार जमा ४९८१२ रुपये वसुल रुपये ४८८१२ या प्रमाणे दाखला आहे. त्यास भाजी फसकी व चर्मी

जोडा ऐन जिनसी असून ॲक्टा पुर्वी माफींतील आहेत. सबब त्याजबद्दल विच्यार व्हावयाचा नाही बाकी राबता बाबीबद्दल ठराव हावयाचा त्यास सदरहु बाब कोणते वतनाबद्दल चालत होती. त्याजबद्दल दाखला नसून कगद पत्रही वेळेस लिहिलेले नाहीत. व सदरहु बाबद सनद पत्र असावयाचे तेही नसोन सरकार हिशेबी दाखला नाही सबब नुकसानी ऐवजी काही मिळावयाचे नाही. म्हणोन ठराव जाहला असे. कळावे तारीख ३१ माहे जानेवारी सन १८५४ ईसवी मुक्काम धारवाड

सही ईंग्रजी
असिस्टंट ईनाम कमीशनवर

लेखांक : ७६

कागल ज्युनिअर : ता. २४ जानेवारी १९५५

राजश्री नारायणराव घाटगे सर्ज्येराव कागल गोसावी यासी.

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत तुकोजीराव होळकर रामराम विनंती उपरी तुमचे पत्र तारीख २४ जानेवारी सन १८५५ इसवींचे आले ते प्रविष्ट जाहाले रवी संक्रमणाचे तीळ व पोषाख राजश्री सुलाराम भाई व बापु यशवंत पाटील राशीवडेकर व राघु व बाबा लाड हुजऱ्या बराबर पाठवीले ते प्रविष्ट जाहाले मा।र निल्हेनी तुम्हाकडील सर्व मजकूर सांगीतला तो श्रुत जाहाला रवाना छ ६ जमादिलावल. बहुत काय लिहिणे हे विनंती

लेखांक : ७७

कागल ज्युनिअर : ता. १७ जून १८५५

यादी—राजश्री नारायणराव साहेब घाटगे सर्ज्याराव याजकडे—जनार्दन हरी किर्तने ऑक्टिंग मुख्य कारभारी नि।। श्रीमन्महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर याजकडोन पाठविण्याची असीजे—मेहेरबा आक्टिंग पोलीटिक्याल सुपरिंटेंडेंट साहेब बहादुर याजकडोन मु।। नंबर ११६९ चा शेरा आल्यावरून आपल्यास लिहिण्यात येते की, आपण आस्मतपन्हा बायूजाबाई

साहेब सिंदे आलिज्या बाहादर यांचे लष्करातुन करवीर मुक्कामी येऊन साहेब बहादुर यांचे हुजूर बंगल्यास मुलाखतीस गेले वक्ती गोपाळ म्हणणार आपले जवळ जासूद असता त्याजला साहेब बहादुर यांचे हुजूर खुर्चीवर बसविलेचे कळते. त्यास असे जासुद लोक खुर्चीवर बसण्याचा पाठ नसता कसे बसविले व या गोपाळाकडे जासुदाचे काम कधीपासून आहे व यामागे हा गोपाळा कधी खुर्चीवर बसला होता की काय ते सुद्रा लौकर लिहून यावे. तारीख १७ जुन सन १८५५ ईसवी

जनार्दन हरी किर्तने
आ. मुख्य कारभारी

लेखांक : ७८

कागल ज्युनिअर : ता. २२ जून १८५५

राजेश्री जनार्दनपंत आबासाहेव किर्तने आ. मुख्य कारभारी गोसावी यासी अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य नारायणराव घाटगे सर्ज्याराव दंडवत विनंती येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असले पाहिजे. विषेष आपणांकडून ता. १७ जून सन १८५५ इसवीचे गोपाळा म्हणणार आपले जवळ जासुद असता त्याजला साहेव बहादुर यांचे मिलाखती समई खुर्चीवर बसविले या मागे कधी खुर्चीवर बसला होता की, वगैरे मजकूर मेहेरबां साहेब बहादुर याजकडून आपलेकडे लिहून आल्यावरून आपण ईकडे कलमी केले. त्यास सदर ईसमास आमचे पूर्वीचे कामदार सखारामपंत कोडणीकर यानी जासुदाची नोकरी दिली. त्यात बंडाई झाली. साहेब लोकाकडे सामानगडास थैल्या पोचविणे व मजकूर कळविणे वगैरे कामात वर्तणुक बरी दिसल्याने सन १२५४ साली हुजुर्‍यात दाखल केला त्यातही हुषारीने व आमचे मर्जीप्रमाणे वर्तणुक केले कारणाने त्यांचे बडती विषयी मनात वागवून भले लोकात दाखल करून बसविणेस घोडा दिल्हा पुढे त्यातही साहेब लोकाकडे आम्हा तर्फ मा॥र सांगितल्या प्रमाणे कळवून त्यांची नाखुषी झाल्याचे आढळात न आल्याने बडोदेस स्वारी निघते वेळी मानकरी वगैरे लोकांची जमादारी देऊन आणखी हुद्दा वाढवून- खुर्चीवर वगैरे बसण्यास मानकरी लोकाप्रमाणे मान दिल्यामुळे त्याचप्रमाणे

चालल्यात मेहेरबां सो बहादुर यांचे मुलाखती वेळीही तसे जाहाले. जासुदात असुन खुर्चीवर बसला असे जाहाले नाही व पाहिले असता पूर्वीचेच योग्यतेचे असे सर्व असतात असे नाही. चांगले चालीने कोणाचीही योग्यता वाढती असा पुर्व सांप्रदाय आहे. मोठ्या हुद्यात असले शिवाय मनुष्यास आवांतर मोठे किंवा साहेब लोक याचे मुलाखतीस अयोग्य मनुष्यास मानोन बसविणे आम्हास तरी कसे आवडेल. असो. याजवरून विचारणेतील सर्व पर्याय समजोन येईल. आम्हाकडील मानकरी-सिलेदार भले लोक वकील-हे आम्हा बराबर साहेब बहादुर याजकडे वगैरे ठिकाणी गेलेवेळी खुर्चीवर बसणेची वहीवाट आहे कळावे तारीख २२ माहे जून सन १८५५ ईसवी बहुत काय लिहिणे लोभ कीजे.

लेखांक : ७९

कागल ज्युनिअर : ता. ७ जुलै १८५५

यादी–राजेश्री नारायणराव साहेब घाटगे सर्ज्येराव याजकडे जनार्दन हरी किर्तने आ० मुख्य कारभारी नि॥ श्री मनूमहाराज छत्रपती साहेब सरकार करवीर याजकडून पाठविण्याची असीजे––मेहेरबान आ० पोलिटिक्याल सुपरिंटेंडेंट साहेब बहादुर याजकडील यादी तारीख ७ माहे जुन सन १८५५ ईसवीची व नंबर ११६९, १२८३ येकूण दोन शेरे आल्यावरून आपणास लिहिण्यात येते ते––

(१) आपण साहेब बाहादुर यांचे हूजूर मुलाखतीस गेला तेव्हा पायात जोडे असोन बंगल्यात जाणे जाहाले. अशी अमर्यादा होऊ नये म्हणोन कळविणे जाहाले. यापूर्वीही असेच अमर्यादेचे कारण जाहाले होते. त्यास वरकड पदाधिकारी मोठे सरदार लोक देखील साहेब बहादुर यांची मुलाखत घेण्यास जातात तेव्हा पायात जोडा असून बंगल्यात जात नाहीत. असे असता आपले कडून वहिवाटीविरुद्ध जाहाले त्यास असे पुन्हा होवू शकले तर आपली भेट कधीही घेण्यात येणार नाही. हा मार्ग आपल्यास कळवावा म्हणोन लिहून आले त्याजवरून कलमी केले आहे. तरी आता साहेब बहादुर यांचे लिहिल्याप्रमाणे बंगल्यात जाणे होईल तेव्हा पायातील जोडे बाबद वरकड सरदार याज प्रमाणे आदब बाळगली पाहिजे.

(२) आपण बंगल्यास मेहेरबां साहेब मोसुफ यांचे भेटीस गेला तेव्हा आपले जवळचा गोपाळा यादव म्हणणारा पुर्वी खिजमतगार असून जासुद गीरीचे कामावर होता तो साहेब बाहादुर यांचे हुजूर खुरचीवर बसविला त्यांस त्याची योग्यता मेहेरबां साहेब बाहादुर यांचे समक्ष खुर्चीवर बसण्यासारखी नाही असे राजश्री सरलष्कर साहेब यांचे माहितीचे लिहिणेवरून कळत असतां खुर्चीवर बसविणेचे केले ते बरोबर जाहाले नाही. यास्तव पुढे साहेब बाहादुर यांचे मुलाखतीस जाणे होईल तेव्हा या गोपाळास बरोबर नेत जावू नये अशी तजवीज राहावी येविषयी लिहुन आले त्यावरून कळावयास लिहिले आहे.

येकूण दोन कलमी लिहिल्याप्रमाणे व्यवस्था राहून राहिल्याचे लिहून यावे कळावे तारीख ६ माहे जुलई सन १८५५ इसवी.

सही
जनार्दन हरी किर्तने
ता॥ ७ माहे जुलई सन १८५५ आ० मुख्य कारभारी

लेखांक : ८०

कागल ज्युनिअर : ता. ११ नोव्हेंबर १८५५

यादी हकीकत श्रीमंत राजेश्री नारायणराव साहेब घाटगे सर्जेराव संस्थान कागल सन १२६५ फसली—

(१) आमचे पूर्वज मुळ पुरुष दिल्लीस पादशहाचे पदरी मोठे सरदार होते. त्यास पादशहाने दक्षिणेस रवाना केले. नंतर त्यांनी देशाईची स्थिती केली व वसाहत चालविली.

उपरांत पादशहा मेहेरबान होवून दक्षिणेस बहुतेक वतने जहागीर देऊन वजीर म्हणविले. पुढे वंशवृक्ष वाढला. नंतर कोणी बहुदास कोणी कागलास, कोणी चंदावरास वगैरे ठिकाणी जाऊन राहिले. बहुता दिवसाची गोष्ट कागदपत्र दंगेधोपेत अस्ताव्यस्त झालेमुळे संपादकाचे नाव मुकरर लागत नाही. सबब काही आधारावरून लिहिले आहे. कलम

(२) आम्हापासोन पुरुष साहावे म्हणजे विठोजी बीन आबाजी कागलास होते. त्यांचे कालकीर्दीत पुर्वील सनदा अस्ताव्यस्त जाहले वगैरे कारणामुळे विजापूर आदलशाई दौलतीत पुन्हा भोगवटेकरिता सनदा करून घेतल्या आहेत. त्या दस्तावरील सन १०७४[1] देशमुखी बा। पत्र १०७७[2] ईनाम जहागिरीचे एकूण दोन पत्रे मिळाले. तागायत आजपर्यंत वहिवाटे चालत आली ती खाली लिहिलेप्रमाणे—

(३) सदर विठोजी देवाधीन जाहले. नंतर त्याचे पुत्र पिराजी यानी त्या वहिवाट केली. त्याचेपुढे आबाजी सर्जेराव यांनी वहिवाट केली. नंतर त्याचे चिरंजीव रांणोजीराव घाटगे यांनी वहिवाट केली.

त्यांचे चिरंजीव आमचे वडील यशवंतराव आप्पासाहेब यानी सन ईहिदे मयातेन व आलफ[3] पर्यंत वहिवाट केली. दरम्यान छत्रपती यांनी काही कारणाने घालमील केली. परंतु पुन्हा वतन व जहागिर पूर्ववतप्रमाणे मिळाली आहे. कलम

(४) रामचंद्र परशराम पटवर्धन यांनी करवीरास शह दिला त्या कारणात आपणावर वक्त गुदरलेमुळे छत्रपतींनी आमचे वडिलांसी निमे व्यंकनमुरडी तालुका करून कागल मामला आम्हाकडील घेऊन सखाराम घाटगे यासी दिला. त्याजकडून मागू तेव्हा तालुका सोडून द्यावा असे स्वदस्तुरचे पत्र घेवून आज्ञापत्र आमचे वडिलांचे नावे लिहून सदरहु पत्र आमचे वडिलाचे करिता दिली होती. पुढे हर काही दुसरे कारणात आज्ञापत्र व सखाराम घाटगेचे पत्र महाराज सरकारात परत घेतली आहे.

(५) सखाराम घाटगे यासी कागल मामला दिला. परंतु आम्हाकडे गावे सहा ६ व देशमुखी व नायकी व नाडगौडीचे वतन आमचे होते ते राहिले भाईबंदी मनात आणून कागल मामला घेतला त्यावेळी छत्रपतींनी आमचे वडिलांस आज्ञापत्र दिल्यात वडील धाकटेपणीचे विवाद दर्शित केला. निर्वाण होण्याचा राहून सखाराम घाटगे हे निपाणकरास सामील होवून पुन्हा निपाणकरांनी राजमंडळावर गर्दी केली. सावगावकर मोड झाला. निपाणकरांनी

---

[1] इ. स. १६६४–६५, [2] इ. स. १६६७–६८
[3] इ. स. १८०१

व्यंकनमुर्डी तालुका घेतला. त्यावर दुसरे गाव आणखी छत्रपतीकडून आम्हास मिळाले होते.

(६) आम्हाकडे वतन बाब व कागल तालुका चालू जाहल्याबद्दल मुळ पादशाई सनद जहाली. त्यात संपादन करणाराचे आवलाद आफलाद असतील त्यांनी आनुभव करावा म्हणून शर्थ आहे. त्याप्रमाणे वडिलकीचे संबंधाने आमचे वडिलांचे कालकीर्दीपर्यंत वहिवाट चालत आली पुढे राजकारणात छत्रपतीस अडचण पडली ती सखारामबाबा घाटगे यांचे मार्फतीने दूर होण्याचे कारणाने आम्हास दुसरा मुलुक देवून कागल तालुका सखारामबाबा घाटगे याजकडे दिल्हे व ते वेळेसही सदर घाटगे यांचे चिठी सरकार मागतील त्यावेळेस तालुका स्वाधीन करून देऊ, अशी चिठी छत्रपती यांनी लिहून घेतल्याचा वगैरे मजकूर सदर लिहिण्यात आमचे आहे. त्या मानाने व अलिकडे सुपरिटेंडेंट साहेब बहादुर यांचे विद्यमाने वाळवेकर व हिंदुरावबाबासाहेब यांचे भाऊपणाचे तंट्यात ठराव जाहला त्यातील हाशील रमाबाई साहेब घाटगे आहेत त्यांचे हयातपर्यंत त्यानी वाळव संस्थानची वहिवाट करावी, त्याजमागे बाबासाहेब मालक म्हणोन ठराव जाहला. त्याचप्रमाणे बाबासाहेब यासी संतती नाही. तेव्हा वाळवेकराचे व त्यांचे ठरावाप्रमाणे व मुळ सनदेची रीतीवरून कागल संस्थानास मालकी आमची पोचत आहे. कदाचित त्यांची वहिवाट शिंदेचे जोराने काही दिवस जाहली ती दस्त देवून ती वहिवाट मंजूर होण्यास आधार नाही. नीराधारादाखल काम केले असे उघड दिसत आहे. कलम.

(७) सदरहु सर्व प्रकार हिंदुराव बाबासाहेब यांचे लक्षात असलेकारणाने त्यांनी हयातपर्यंत दत्तकाचा उद्योग केला नाही. कारण संस्थानात विभाग होणेची वहिवाट नसून मालकी वडीलपणाची हिशोबाने आमची हे जाणून पुढे कलह नसावा हे मनात बाळगुन, देवाधीन होणेसमई नजीक माधवराव घाटगे वंतूरकर (?) होते. परंतु दत्तकाची बिलकूल तजवीज केली नाही. त्याचे....चे ....संस्थान करावी ऐसे असोन त्याजप्रमाणे दिल्ली मोक्कामी बोललेही होते. याबद्दल दाजीपंत दिवाणजी याचे पत्र आले ते व बाबासाहेब यांचे पत्र येणेप्रमाणे दोन पत्र पाहिल्याने खात्री होईल. कलम

येणेप्रमाणे सात कलमी हकीकत लिहिली आहे. या प्रकरणी पुरवणीचे कागद तुर्त मिळाले ते फेरिस्तनिसी नक्कला यासोबत दिल्या आहेत. सारांश

हासल कागल संस्थानावर कलमी आमचा वारसा दुसरे घराणेचा अगदी नाही. सबब संस्थान आमचे आम्हास मिळाले पाहिजे. तारीख ११ माहे नवंबर सन १८५५ ईसवी.

लेखांक : ८१

कागल ज्युनिअर : इ. स. १८५५–५६

हाकीगत श्रीमंत राजेश्री नारायणराव साहेब घाटगे सर्ज्याराव संस्थान कागल सु॥ सीत खमसेन मयातेन व आलफ सन १२६५ फसली.

(१) आमचे पुर्वज मूळ पुरुष दिल्लीस पादशहाचे पदरी मोठे सरदार होते त्यासी बादशाहानी दक्षिणेत रवाना केले नंतर त्यांनी .... उपरात बादशहा मेहेरबान होवून व बहुत वतन व जाहागीरी देऊन वजीर म्हणवीले पुढे वंश वाढला. नंतर बड्डदास व मलवडीस कोणी कगलात कोणी चंदावरास वगैरे ठिकाणी जाऊन राहिले.

कागद पत्र (फाटले आहे) अस्ताव्यस्त झालेमुळे संपादकाचे नाव मुकरर लागत नाही. सबब काही आधारावरून लिहिले आहे.

(२) आम्हापासुन पुरुष साहावे म्हणजे विठोजी बीन आबाजी कागलास .... यांचे कालकीर्दीत पुर्वीले सनदा .... वगैरे कारणामुळे .... आदलशाई दौलतीत पुन्हा भोगवट्याकरिता सनदा करून घेतल्या आहेत त्या दस्तावरील सन १०७४ देशमुखी बा॥ पत्र १०७७ ईनाम जाहागीरीच फर्मान येकूण दोन पत्रे पारसी त्यांचे तरजुमे नि॥ १।२ चे हजर केले आहेत ही पत्रे पाहिली म्हणजे आमचे पुर्वजास कागल प्रांत ज्याहागीर व देशमुखीचे वतन (फाटलेले) देणे व पुर्वे बहुत दिवस चालत आले आम्ही पादशाहाचे पदरचे मोटे सरदार वतन आवलाद आफलाद चालावे अशी शर्थ लिहिलेली आहे. तेव्हा सर्व खातरी होईल.

(३) (फाटले) विठोजीचा पुत्र पीराजीराव घाटगे सर्ज्याराव यांनी तीर्थरूपाच्या मागे कागल परगणा वगैरेचा आनुभव पुर्वीप्रमाणे केले. या बद्दल आलंगीरबादशाहा गाजी हे दिल्लीचे आधिकारी त्याजकडील कामगाराची पत्रे

फारसी मिळाली त्याचे तरजुमे नि।। ३ । ४ चे व छत्रपतीचे वहिवाटीतील काग_
दाच्या नकला नि ।। ५ । ६ । ७ । ८ च्या. पहिल्यात प्रांत म।।रची वहिवाट पीराजीनी केली असा खुलासा (फाटून गेले) पिराजीस पुत्र पाच जाहले. पहिले राणोजी दुसरे (फाटून गेले) तिसरे आबाजी हे आमचे मुळ पुरुष सदर उभयतांच्या मागे हे वडील सबब मालकीने वहिवाट संस्थानची केली. याबद्दल नि।। ९।१०।११।१२।१३।१४।१५ पर्यंत नक्कला सोबत हजर केल्या आहेत. हे कागद पाहिले म्हणजे छत्रपती सरकार व पेशवे सरकार उभय राजधानीत (फाटले आहे.) वहिवाट मालकीने आबाजीराव यानी केलेचे ध्यानात येईल.

आबाजीचे कनीष्ट बंधु तुळजोजीराव हे हिंदुराव बाबा साहेब याचे मुळ पुरुष. त्याहून कनिष्ट यशवंतराव यांचे वंशास .... कनिष्ट बंधु बाबा संस्थानचा अधिकार त्याजकडे नाही.

(५) सदर आबाजीचे पुत्र राणोजीराव घाटगे सर्ज्याराव हे आमचे आजे. त्यांनी वडिलांचे मागे कागल संस्थानची वहिवाट मालकीने केली. त्या बद्दल दाखलेचे कागद नि।। १६।१७।१८।१९।२०।२१।२२।२३।२४।२५।२६ २७।२८।२९।३० पर्यंत दाखल केले आहेत यावरूनही साफ ध्यानास येईल की आमचे आजे राणोजी हे कागलची मालकी करून वहिवाट करीत होते.

(६) सदर राणोजीचे पुत्र यशवंतराव उर्फ आपासाहेब आमचे तीर्थ-स्वरूप (फाटलेले) वडिलांचे मागे कागल संस्थानची वहिवाट मामुलप्रमाणे करीत आले दरम्यान सन १८०० ईसवी साली रामचंद्रपंत आपा पटवर्धन-यांनी शिंद्याकडील फलटणी फौज आणोन करवीर राजधानीस (फाटलेले) दौलत बुडती असे जाणोन कैलासवासी शिवाजी माहाराज छत्रपती .... निवासी होत. कोणतेही प्रकारे राजधानीचा बचाव व्हावा या हेतुने हिंदुराव बाबा घाटगे (फाटलेले आहे) सखाराम घाटगे उर्फ तुळजोजी हे सिंदाचे सासरें या आप्तपणोच संबंधाने शिंध्याची फौज दूर होवून आमची राजधानी या पेचातुन मोकळी व्हावी या ईराद्याने घाटगे म।। याजला मध्यस्ती सांगीतली. त्यांनी (फाटलेले आहे) सिवाजी माहाराज छत्रपती याजपासी आमचे भाऊबंदकीचे द्वेषामुळे कागल संस्थानाची वहिवाट सांगीतली. तेव्हा शिवाजी माहाराज यानी संकट मागून वडिलासी भीड घालून आम्हाकडील

कागल संस्थानची वहिवाट सखाराम घाटगे यांचे हवाली केली परंतु कागल तालुका (फाटलेले) तुर्त देतो तो लवकरच परत घेऊन देईन म्हणोन वडिलासी छत्रपतीनी शपथा वाहिल्या आणि आम्हाकडील वहिवाट घेतली. पण देशमुखी व साहा गावे मिळोन कागल प्रांतातील उत्पन्न तीस हजाराचे आम्हांकडे राहिले होते. नीपाणीकराचे देशमुखीचे उत्पन्न थोडे हिंदुराव बाबा यानी घेतले. हल्ली देशमुखीची गावे हक कमताची दरोबस्त मिळोन चालत आहेत येकूण उत्पन्न (फाटलेले) आठरा हजाराचे. कलम

(७) कागल संस्थानचे आम्ही बहुता दिवसाचे मालक. आम्हांकडील संस्थान सखाराम घाटगे यांचे हवाली केले. परंतु शिवाजी राजे यासी अन्याय वाटल्यावरून त्यांनी जे दिवशी........संस्थान परत देवू आशा आभिप्रायाची सनद ईहिदे मयातेन व आलफ ए ११ जीलकादची आम्हांस करून दिली. अशा दोन कागदाच्या नक्कला नि॥ ३१।३२ च्या या लगत पाठविल्या आहेत. त्याजवरून ध्यानास येईल की, या संस्थानचे आम्ही मालक आहो. हिंदुराव बाबा यांचा संबंध नाही.

(८) आम्हाकडील संस्थान सखाराम घाटगे याजकडे जबरीमुळे दिलेवर छत्रपतीनी मनात असे आणिले की, (फाटून गेले आहे) आपासाहेब यांचे नुकसान जाहाले प्रसंग पाहुन पुन्हा परत देता येईल. तुर्त तुमचे नुकसानी बद्दल यमकनमुर्डी तालोका घ्यावा म्हणोन ताबेत दिला. त्या (फाटलेले) भीजके कागद (फाटून गेले) आस्सल दाखवुन परत घेतले आहेत.

(९) सिवाजी महाराज यानी कागल संस्थान आम्हाकडील घेतल्याबद्दल सनद करून दिल्यावर येक वर्षाने आदमासे कागल संस्थान सखाराम घाटगेकडील घेऊन परत आम्हाकडे दिले. त्याबद्दल सनद सन ईसने मयातेन व आलफ छ १६ माहे सफरची करून दिली त्यात साफ लिहिले आहे की, सखाराम घाटगे याजला कागलाचा आमल व त्याच्या सनदा करून दिल्या त्या शुद्ध जबरीने दिल्या आहेत. त्या सर्व रद्द आहेत. त्या सन देची नक्कल नि॥ ३३ ची या लगत हजर केली आहे. त्याजवरून ध्यानास येईल (फाटलेले) सखाराम घाटगे यांचा हक्क बीलकूल नाही–

(१०) कागल तालुका आमचे हातात आल्याचे सखाराम घाटगे याना

समजल्यावर पुन्हा खुद्द त्यानी (फाटलेले) फौज आणोन करवीरास येवून (फाटले) तसदी देवून कागल तालुका घेतला त्या समई करवीर सरकारचा नावीलाज जाहला. शिंद्याचे पलटण फौजेपुढे—छत्रपतीचे फौजेचा जोर नाही—सबब छत्रपती उगीच राहिले आणि कागल मुबदला यमकनमुरडी तालुका चालविला.

(११) कागलचे मुबदला यमकनमुर्डी तालुका दिल्हा होता तो छत्रपतीनी आम्हांकडे चालविला असोन दरम्यान निपाणीकर आपासाहेब यानी करवीर राजधानीवर बंड केले. त्यात आमचेकडील यमकन मुर्डी (फाटलेले) सही....कलम

(१२) शिवाजी माहाराज कैलासवासी जाहल्यावर (फाटुन गेले) आधीकार आईसाहेब माहाराज करीत असता कागल मुबदला यमकनमुर्डी तालोका........आमचे पुढे करून द्यावे असा आर्ज केलेवरून आईसाहेब माहा राजांची नजर फार न्याई........ हुपरी, पटणकोडोली – तदलगे–हातकणंगले – टाकवुड–कसबा कोडोली–वाण्याची सडोली–हासूर–हेवाळ–येणेप्रमाणे नऊ गावे मिळून साठ हजाराचे उत्पन्नांची अजमासे दिली ती कागलचे मुबदलेबद्दल चालत असता दरबारचे कारभारी यांचे आदावती (फाटले आहे) सदरहु गावे दिलेबद्दल कागदपत्र सर्व हजर होते. परंतु छत्रपती बावासो॥ माहाराज यानी कागलचा वाडा सन १८२५ ईसवी साली लुटून आणिला. कागदपत्र (फाटले) मुळे उपाय दप्तरी हल्ली तपासात मिळालेस पाहावे नसल्यास आम्ही तलास करितो—आणि मिळतील ते हजर करू. सदरहु बद्दल मेहेरबान गौरनरसाहेब बहादुर याजकडे थैली व सात कलमाची याद वडील (फाटलेले) मार्फत पाठविली होती. याच्या नक्कला नि॥ ३४।३५च्या पा॥ आहेत – हे कागद पाहिल्यास कागल मुबदला दिली होती व आम्हांवर जुलमी वहिवाट जाहल्याचे ध्यानात येईल. कलम

(१३) कागल तालुका पूर्ववतप्रमाणे आम्हाकडे चालावा — नसेल (फाटलेले) मोबदलेची गावे तरी चालावी. या इराद्याने वडिलानी गौरनरसाहेब बहादुर याजकडे थैली रवाना केली. छत्रपती सरकारचे ताबेतील याचे दरम्यान या सरकारातुन दखलगिरी होत नाही म्हणोन ता. १३ माहे मे सन १८२६

ईसवीचे थैली आली. सबब लाचार होऊन रा (फाटलेले) थोडे दिवसात काही काही इन्साफे छत्रपतीचे राज्याचा कंपनी सरकार पाहू लागले. तेव्हा ईनसाफ दिसल्यावरून वडिलांनी धारवाडास वकील रवाना केला त्याबद्दल डडलॉफसो।। बहादुर यांची थैली ता।। ४ नवंबर सन १८३६ ईसवीची आली आहे.

........या पाहिल्यास फिर्याद सुरू असल्याची खातर होईल. त्या (फाटून गेले) काल जाहल्यामुळे तहकुब जाहाले. कलम

(१४) करवीर राजधानीत बखेडे होऊन कंपनी सरकारास या राजधानीचे (....) स्थेकडे लक्ष देऊन कारभारी नेमणे प्राप्त जाहाले. त्या वेळेस वडिलांवर जो छत्रपती सरकारचे कामगाराकडून जुल्म जाहाला. न्याई दरबारापुढे अर्ज करून मा।र समज बाबत आम्ही वयाने लहान आम्ही अज्ञान. जुने पदरचे मंडळीनी उद्योग करावा तर सरकर तर्फेने आमचे संस्थानावर कामगार नेमले याजमुळे जुने (फाटलेले) उद्योग राहिला नाही. हे सरकारचे लक्षात उघड येण्याजोगे आहे. कलम

(१५) आमचे वय प्रौढ होताच सरकारातून मुखत्यारी देऊन कारभारी नेमले नंतर कागल तालुका .... कागदपत्र पाहता मनात हिंदुराव बाबासाहेब यांचे मनोगत कसे आहे हे समजण्याकरिता इकडोन वकील राजेश्री दाजीपंत दिवाणजी रवाना केले ते अद्यापी तिकडेच आहेत त्याजकडून व बाबासाहेबाकडून पत्रे नि।। ३८।३९ ची आल्यात संस्थान आमचे आम्हास मिळावे. (फाटले आहे) असल्याचे खात्री होईल. व कागल तालुका कोणाचा आणि न्याय राजधानीत आपले मागे कसा न्याय ठरवील हे पुर्तेपणे बाबासो यानी लक्षात आणोन बिलकुल दत्तकाची तजवीज नाही. मरण समई भावाबंदापैकी नजीकचे माधवराव घाटगे वंतुस्कर होते परंतु दत्तकाचा प्रश्न अगदी मनात आणिला नाही. वारसपणाने आधीकार (फाटलेले आहे) असी त्यांची इच्छा असल्याचे सदर कागदावरून खुलासा होणेस हरकत नाही. कलम

(१६) विश्वासराव घाटगे हे सखाराम घाटगे यांचे वडील बंधु परंतु विश्वासराव याजला संतती नसलेमुळे हिंदुराव बाबा सो यासीच वारस कंपनी सरकारनी केले. याबद्दल मेहेरबान समशनसाहेब बहादुर प्रांत कर्नाटक यांचे थैलीची तालीक नि।। ४० ची या सोबत हजर केली आहे. शिवाय मेहेरबा ग्राम

साहेब बहादुर ईलाखा कोल्हापुर याजकडे वाळवेकर मातोश्री रमाबाई....यानी दत्तका विषयी–काम चालविले होते पण–हुकुम न होता सदरहूप्रमाणेच बाबासाहेब आपले मागे दौलतीस वारस आहेत म्हणोन हुकूम आला आहे दप्तरी तपास केल्यास दाखला मिळेल. या वरून व मागील वहिवाटीच्या न्यायानी बाबासाहेब यांचे ईष्टेटीस आम्हास ठरविण्यात अगदी नड नाही. कलम

(१७) हल्ली हिंदुराव बाबासाहेब कैलासवासी जाहाले त्यास संतती नाही आम्ही मूळ पुरुषाची (........) पुत्र आबाजी यांचे वंसीक (फाटलेले) बाबासाहेब यांचे मुळ पुरुष पिराजी यांचे कनिष्ठ पुत्र तुळजोजी यांचे वंसीक हिंदुधर्मशास्त्रांत ज्या पुरुषास संतती–नाही–त्याजवर–मुख्यत्व हक वडील वंशाचा पोहोचतो–त्या न्यायानेही आम्ही हिंदुराव बाबांचे उत्पन्नास वारस आहे हे हुजुरनी ध्यानात आणिले पाहिजे याबद्दल पुरवणीस वंशवृक्ष नि।। ४१ चा दिला आहे तो पाहिल्यास आम्ही वडील वंश व संस्थानास अधिकारी असा खुलासा होईल. कलम

एकूण सतरा कलमी हकीगत तुर्त मिळाले कागदावरून लिहिली आहे. यातील तात्पर्य : कागल संस्थान वतनी बादशाही देणे व वहिवाट होत आली. आम्ही वडील सबब आमचाच हक आहे. हिंदुराव बाबासाहेब धाकटे. सखाराम राव यांचा अधिकार नव्हता. छत्रपती महाराजांनी स्वराज्याचे बचावाकरिता आम्हा कडील .... काढून घेतली ती परमसंकट विषयाने. आम्हास मुबदला तालुकाही दिला होता. तेव्हा कागलची वहिवाट आम्हाकडेसच समजणेची व आजपर्यंत फिर्याद सुरू असण्याचे लागु पडते व सखाराम घाटगे यानी जबरीने सनद करून घेतली आहे. त्या बरहुकूम वहिवाटही झाली नाही. काही गावची वहिवाट ती दस्त........तेव्हा मालकीचा प्रकार राहिला नाही. निशेदारादाखल काम केले आहे हे सरकारचे नजरेस येतच आहे. सारांश कागल तालुका वाडवडिलांपासून आमची मालकी पोहोचती दुसरे घराणेचा संबंध अगदी नाही. सबब आमचे जिम्मे कागल परगणा आला पाहिजे तारीख १७ माहे .... सन १८५५ ईसवी. आपाजी सदाशीव मुजूमदार नि।। नारायणराव साहेब घाटगे सर्ज्याराव

लेखांक : ८२

कागल ज्युनिअर : ता. ३० सप्टेंबर १८५४

राजेश्री दाजीपंत दिवाणजी मु॥ दिली गोसावी यासी

नारायणराव घाटगे सर्ज्याराव मु॥ बडोद दंडवत विनंती येथील कुशल जाणुन स्वकीय लि॥ जावे. विषेष तुम्ही छ २४ जिल्हेज सन १८५४ ई॥ चे पत्र पाो ते बडोद मु॥ ता. ३० सप्टेंबर पर्यंत रोजी दाखल जाहाले लि॥ मजकूर समजत आला त्याचे उत्तर खाली लि॥ प्रमाणे—

१ छ जिल्हेजची पत्र पाो त्याचे उत्तर रवाना होत होते ईतकेत सदर ता॥ चे पत्र आले सबब दोन्ही पत्राची उत्तरे येकंदर पाो आहेत.

२ ती॥ राजेश्री बाबासाहेब यांचे नावचे पत्राचे उत्तर पाो ते पावले. पत्रातील भाव ध्यानात आला त्याचे उत्तर आलाहिदा पाो आहे वडलानी खलाणेस येणेचा संकेत लि॥ त्यास असे होईल तर सर्वांचा फार संतोष होईल या विषयी विनंती तुम्ही आमचे तर्फेने करीत असावी.

३ हिंदुराव ँगळ्याचा म॥र लि॥ त्या विषयी तुम्ही लि॥ तजवीज व्हावी व अलाहिदा ईकडोन ती॥ राजश्री बाबासाहेब यासी ही पत्र लि॥ आहे.

४ हुजुरची स्वारी व आम्ही उज्जनीस येणेची आपलेकडे दाट आवाई आहे म्हणून लि॥ ती॥ मातोश्री आक्कासाहेब शिंदे आलिज्या बहादुर यांचा मनोदये भेटीस न्याव असा आहे. परंतू ईंग्रजीतून रजा भेटीस जाणेस मिळणे दिसत नाही. यास्तव हुजूरची स्वारी जाणे होईल असे वाटत नाही आमचा संकेत आहे. परंतु साहेब लोकांकडे प्रयत्न चालला आहे. रहदारीसहीत हुकूम मिळाला तर जाणे होईल. गेल्यास तेथून लि॥ प्राो पाठवीतो : नसलेस खलाणेस गेल्यास कुच जाहालेचे तुम्हास कळवितो तुम्ही आता पत्र पाो असता श्रीमन्महाराज छत्रपती करवीरकर यांचे लस्करात खर्डेकर याजकडेस पावते करावे म्हणजे कागलकर याजकडे पावते होईल असे लखोटेवर पत्ता लि॥ जावा म्हणजे पत्र पावत जाईल.

५ कुरणाविषयी व साडे पंधरा खंडेची देशमुखीचा हक्क व कमता विषयी याद दिल्ही त्याज बद्दल वडलानी कारकुनास गावगन्नाचे आहेत त्यात हाक कमताचा तलास करावयासी ताकीद जाहाली आहे असे लि॥ तर हक्क

खर्ची घालीत नाहीत तेव्हा दाखला कसा मिळेल ? मिळणार नाही. कमताची जमीन खर्ची पडत आहे तेव्हा कमताचा दाखला मिळेल. कागलाहुन हक्क-दारीचा दाखला आणवून रवाना करितो

६ हालकरी यानी पत्र गमावली त्याज पुर्वीचे पत्री लि॥ आहे हालकरी रवाना करणे असल्यास तिसरे कलमी सदरहु लि॥ आहे त्याज प्रमाणे हुकमाची तजवीज होऊन रवाना करावे. येक तुम्हापासी पाहिजे असलेस ठेऊन घेऊन येक रवाना करोन द्यावे.

७ तुम्ही लि॥ प्रे॥ मसुदे ब॥ पत्र पो आहे येकूण सात कलमी मजकूर लि॥ आहे त्या प्रो तजवीज व्हावी तारीख माहे आक्टोबर सन १८५४ ई॥ बहुत काय लिहिंणे. लोभ कीजे हे विनंती

लेखांक : ८३

कागल ज्युनिअर : ता. २४ ऑगस्ट १८५५

श्रीमंत राजमान्य राजेश्री नानासाहेब घाटगे सर्जेराव कागलकर मु॥ करवीर साहेबांचे सेवेशी—

आज्ञाधारक बापु यशवंत पाटील रासीवडेकर ईलाखा कोल्हापूर व मानाजी नाईक थीटे हुजुरे नि॥ होळकर सरकार मु॥ इंदुर दोनी कर जोडुन सिरसाष्टांग दंडवत विज्ञापना ता। श्रावण श्रु॥ ४ पात्रेतो शेवकाचे वर्तमान यथास्थीत असे विषेष आपण गेल्यापासून कागदपत्र येऊन शेवकाचा सांभाळ जाहला नाही. तरी असे न होता येणारा मनुष्य समवेत अगर डाकमार्गे पत्र पाठवण्यास आज्ञा होऊन सांभाळ करण्यांत यावा यानंतरी ईकडील मजकूर श्रीमंत होळकर सा। यांस आपलेविषी अर्ज केला तेव्हां ते बोलले की येथे काय तजवीज करून घेणे असेल तर त्याजकडुन मोहर शिक्याचे पत्र घेऊन यावे म्हणजे आम्ही जसे त्यांचे चित्तात असेल तसे बंदोबस्त करून देवू त्याजवर आम्ही बोलले की, महेश्वर मुक्कामी पान सुपारीस स्वारी डेऱ्यात आली होती ते समई आपणास सांगितले होते की, पाटील आपले कडेस पाठवून देतो ते मुखजबानी सांगता कळो येईल. याप्रमाणे सरजेरावसाहेब यानी मला सांगितले त्याजवरून सरकारास विनंती केली तेव्हा सरकार बोलले की,

जातीनिसी येथे राहातील किंवा कोणी मानकरी खाशा पो राहील म्हणोन बोलले त्याजवर आम्ही बोललो की, जातीनिसी राहिल्यावर महिना किती हजार रुपये द्याल त्याजवर महाराज साहेब बोलले की, राजश्री हिंदुराव बाबा घाटगे सरजेराव यास किती हजार रुपये दरमहा मिळतो त्याजवर आम्ही बोललो की दाहा हजार रुपये दरमाहा मिळतो. त्याच प्रा। येथे मिळावा त्याजवर होळकर सा। बोलले की, पाच हजार रुपये दरमाहा देऊ त्याजवरून आपणाकडेस दोन तीन पत्रे पाठवीली त्यास एकाही पत्राचा जाब आला नाही. त्याजवर सरकारानी दाहा पाच वेळा विचारीले की, पत्र आले किंवा नाही, त्यास आपली वाट श्रीमंत मातोश्री बाईसाहेब शिंदे आलिज्या बाहादुर यांचे स्वारी बराबर याल अशी पाहात होतो परंतु आपली स्वारी नगराहुन परत गेली म्हणोन समजले पुढे आपली स्वारी कधी येणार यांचे काहीच समजत नाही व इंदुर मुक्कामी बंदोबस्त कसा कर्णे त्याचा मजकुर तपशीलवार पत्रे लिहून मोहर शिक्का करून श्रीमंत होळकर सरकार यास पत्र येक पाठवून द्यावे आणि येथुन राजश्री बांपुजी पाटील धार मुक्कामी काही कामाकरिता आजच जाणार आहेत त्याजकडे धार मुक्कामी पत्र मोहर सिक्याचे जसा बंदोबस्त करून घेणे असेल तसे पत्र डाक मार्गे प्रथक प्रथक ‟दुरास व धारेस पाटील याजकडे पाठवावे म्हणजे येथे श्रीमंत होळकर साहेब याजला पत्राचा मजकुर समजावून पुन्हापत्र आपणाकडे पाठवून देऊ. धारेस सरकारानी काही कामाकरिता बापुजी पाटील यास पाठवीले आहेत त्याजला तेथे महिना दीड महिना लागेल त्याचा धारेस पत्ता गौळी वाड्यात अनाजी जाधव याचे घरी राहातात आपले विषयी होळकर सरकार बहुत वेळा आठवण करितात त्यास या पत्राचे उत्तर पाठवण्यास अनमान सरसाहा होऊ नये. आपले पत्राची मार्ग प्रतिक्षा करीत आहो. आपण सरकारात पत्र पाठवाल त्यात बोलण्याचे काम वगैरे बापुजी पाटील बोलतील असे पत्रात लेख असावा. नानासाहेब हे काम ध्येनावर घेऊन आधी करावे. तुमचे आश्रयाने शेदोनसे मनुष्याचे अन्न निघोन कल्याण होईल सारांश शेवकावर कृपा दृष्टी करून पत्राचा जाब पुरवत लोभाची वृद्धी ठेऊन जरूर जरूर यावा. कळावे बहुत काय लिहिणे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

मीती श्रावण शु॥ १२ शके १७७७

लेखांक : ८४

कागल ज्युनिअर : ता. ८ जून १८५८

रावसाहेब मुषफक मेहेरबा कर्म फर्माय दोस्तां नारायणराव सो
सर्ज्याराव सलाम हुताला

अज ज्यानब रॉबर्टसन् साहेब पोलीटिकल सुपरिंटेडेंट ई॥ कोल्हापूर सलाम आंके येथील खैर जाणोन आपले खैरयतेस हमेशा कलमी करून दिल खुष करीत असावे. दरी आयाम सांप्रतचे काली काही संस्थानिक लोक यास दगलबाज व आपस्वार्थी लोकानी फिसलत दिल्या वरून ते उघडपणे बंडास प्रवर्तक होऊन आपला नाश करून घेत असोन आपले कुटुंबास दुर्दशेत घालीत आहेत. सबब ईज्यानीबा–आपले ईमानपणावर सुबुद्धीवर भरवसा ठेवून हाली व पुढे मेहेरबानासी सरब्यत्व राहाण्याची ईच्छा धरून कलमी करण्यात येत आहे तरी खाली लिहिल्याचे मनात होवून येविषयी मेहेरबानाचा आशय कसा आहे तो दील खुलाशाने काही पडदा ने राखिता कळविण्यात यावे अशी ईच्छा आहे.

आमेहेरबानास किंवा आमेहेरबानाचे घराण्यात हर कोणास काही मजकुर अथवा क्लेश कारक गोष्टी कळविणे असल्यास ते ईज्यानीबा अैकून घेण्यास फार खुषी आहेत व तो मजकूर स्नेह व सत्य भावाने दिलात घेवून जी तजवीज करणे ती करू मात्र नरगुंदकर याचे वर्तणुके प्रमाणे ईमान पणाचा आशय दाखविल्यास म्हणजे दिलात येक आणि बाह्यातकारी दाखविणे येक हे कपट कधी चालणार नाही. जमखंडीकर यानी उघड असा तर प्रकार दाखविला नाही पण काही हिंदुने भावपणाची वर्तणुक केली आहे त्यास असा दुजेभावपणा सरकाराकडे येक क्षणही चालणार नाही.

आजपर्यंत आमेहेरबानाचे नाव व प्रख्यात बुद्धी येकीण्यात आहे. त्याप्रमाणे आपला सुशीलपणा दाखविण्यात येईल असे आम्हीच पाहात आहो फक्त शब्दावर उपच्यारीक सलामीच्या लिहिण्यावर दिल लागणार नाही. याजकरिता आमेहेरबानाकडून असा कधी ईमानपणाचा प्रकार दृष्टोत्पत्तीस आल्याने आमेहेरबानाचे आणि सरकारचे मध्ये असलेला येकोपा वृध्दींगत होईल. सरकार आपले शत्रुचे पारिपत्त्य करून त्याचा निःपात खचीत करील तसेच सरकारचे जे खरे दोस्त असतील त्यांची बढती करण्यास सरकार,.......आहे.

सर्व संस्थानाविषयी आमचे दिलात परमस्नेहभाव असोन आपला मोठेपणा व मान महत्त्व आणि हक्क चालत आल्याप्रमाणे चालविण्यास आमची फार ईच्छा आहे. तशीच संस्थानीक याजकडुन पुढील वर्तणुक निष्कपटपणे चांगले प्रकारे होवून स्नेहभाव राहील अशी आम्ही आशा ठेविली आहे. संस्थानीक व ज्याहागीरदार याजकडुन सरकारचे दरयेक कामास कुमक मिळोन आपला स्नेहभावपणा वर दर्शविल्याप्रमाणे आमचे दिलात राहील अशी ईच्छा करीत आहो. प्रसिद्ध जाहाल्या जाहीरनाम्याच्या प्रती अजम इंच्यार्ज कारभारी नी॥ सरकार करवीर याजकडुन आपल्याकडे प्रसिद्ध होण्यासाठी आल्याच असतील त्याप्रा होण्याची तजवीज व्हावी ज्यादा काय लिहिणे त॥ २ माहे जून सन १८५८ इसवी मु॥ बावडे पेटा करवीर पोलीटिकल सुपरिंटेंडेंट

सही इंग्रजी

लेखांक : ८५

कागल ज्युनिअर : ता. २७ जून १८६०

साहेब मुषफक मेहेरबां कर्म फर्माय दोस्ता नारायणराव साहेब घाटगे सर्ज्याराव सलाम हुताला.

उलीयम हेन्री हवलाखसो। पोलीटिकल सुपरिंटेंडेंट ई॥ करवीर सलाम आंकी येथील खैर जाणुन आपले खैरयतेस कलमी करून दील आराम करीत असावे. दरीविला साहेबाकडून मे सन १८६० ई॥ नंबर २४ चे थैली पत्र आल्यात कागल प्रांत ईनामी देशमुखी सुध्धा वतन बाब आमचे घराण्यात वडीलपणाचे रुईने अधीकार आमचा असून हिंदुराव बाबा साहेब हक जाहाले त्याची स्त्री पार्वतीबाई साहेब घाटगे यास दत्तक पुत्र घेण्याची परवानगी सरकारातून मिळण्यात आली असे समजते त्यास तसे असेल तर आम्ही पुरवी तक्रारीच्या थैल्या वगैरे दिल्या त्याचा विचार होवून कोणते तऱ्हेने निकाल जाहला ते समजले पाहिजे. दरम्यान दत्तक सिध होण्यास मनाई असावी म्हणोन वगैरे मजकूर आहे तो अवलोकनात येवुन कलमी करण्यात येते की, — अस्मतपन्हा पार्वतीबाई साहेब याजला दत्त पुत्र घेण्यास परवानगी दिल्याब॥ मुंबई सरकारचे पत्र नंबर १७२७ येथील सन १८६० सोबत ठराव होऊन आला आहे की,

मरहुम हिंदुराव बाबासाहेब यांचे संस्थानावर आपला दावा पोहचत नसल्या ब।। सरकारची खात्री जाहाली आहे. सदरहु संस्थानचे उत्पन्न स्वर्गवासी सखा-रामराव घाटगे म्हणजे हाल्ली बाईसाहेबाचे श्वशुर याजला ईसवी सन १८०० साली कैलासवासी— (फाटून गेले आहे) माहाराज यानी सनदा वंशपरंपराचे कराराच्या करून दिल्या असून तशी वहिवाट प्रथकपणे त्याचे घराण्याकडे आज-पर्यंत चालत आली तेव्हा त्याजवर आपला हक्क पोहचण्यास संबंध राहात नाही. आपले जवळ माहाराज सरकारच्या.........चा कागद असल तरी तो अमलात न आल्यामुळे आधीक त्याचा विचार करण्याचे कारण नसून बाईसाहेबाचे भ्रतार हिंदुराव बाबा स्वदेशी मृत्यू पावले नसून त्यानी जिवंत असता दत्त पुत्र न घेतला म्हणजे त्याचे पश्चात त्याचे स्त्रीयेला पुत्र देण्यास काही हरकत नसून सरकारानी सर्व विचार करून बाईसाहेबास दत्त पुत्र घेण्याची परवानगी दिल्ही त्याप्रमाणे अमलात येईल. ते कळावे जादा काय लिहिणे ता।। २७ माहे जून सन १८६० ईसवी.

लेखांक : ८६

कागल ज्युनिअर : ता. १० नोव्हेंबर १८६०

साहेब मुबफक कर्म फर्माये दोस्तां नारायणराव घाटगे सर्जेराव सलाम हुताला अजतर्फ वुलियेम हेन्री हावेलाक साहेब पोलीटिकल सुपरिंटेंडेंट ईलाखा करवीर सलाम अंके येथील खैर जाणोन आपले खैरीयतेस हमेषा कलमी कराव दरीविला मेहेरबान अलीरेट हानराबल गोरनर साहेब बहादुर यांची स्वारी मु।। कोल्हापुरी येऊन दरबार होणार याजमुळे ईलाखे मजकूरचे दरज्यातील लोक तसेच मानकरी लोकांस सरंजामा निशी करवीरी येऊन दाखल होण्याविषी ज्याचे त्याचे नावे सन्मानपुर्वक थैली पत्रे ईकडून लिहिण्यात येऊन त्याप्रमाणे कित्येक आसामी येऊन पोचलेली आहेत व सदरहू प्रमाणे माहाराज सरकारातुन आज्ञा-पत्रे ही रवाना झाल्याचे समजून येते. दरबार मोठा भरून जसे ज्याची योग्यता आहे त्याप्रमाणे नेक नामदार सो। बहादुर मुलाखत होण्याची तजवीज करतील तेव्हा आशा प्रसंगी जाहागीरदार लोकांनी साहेब बहादुर यांची दरबारात भेट घेणे हे मुख्य आब्रुचे काम आहे आपण ईलाखे मा।।री अव्वल दरज्यातील जाहा-

गीरदार असता सदरहू दरबारात येण्यास थैली पत्र सांप्रदाया प्रमाणे जाण्याचे परंतु पेशजी मेहेरबान पोलीटिक्याल येजंट सो। बहादुर प्रांत कर्नाटक यांचे भेटीत बेआदबी आसाहेबाकडुन झाल्यामुळे सरकारानी आसोस दिवाणी फौजदारी कामाचा आखत्यार दिल्हा होता तो काढुन घेऊन आब्रु कमी केली. त्या अलीकडे थोडे दिवसावर माहाराज सरकारची बेआदबी केली वगैरे कित्येक गैरशिस्त हलके चालीचे काम आसाहेबाकडून जाहाल्याचे फिर्यादी वरून सुद्धा ईकडे समजून आले. म्हणोन त्याचे सफाईविषयी समक्ष येण्यास आसाहेबास ईकडून थैली पत्र नंबर ता।। १४ सपटंबर सन १८६० चे लिहिण्यात आले व आणखी सुचनाही करण्यात आली. परंतु सर्व हुकूम तोडून बेपरवा चालता तेव्हां याजबद्दल सरकारातून पुरा विच्यार जाहाला पाहिजे. सबब दरबारात आसोची भेट घेण्यास नामदार साहेबास खुषीची गोष्ट होण्याचे नसून याच कारणाने आ-साहेबास येण्याविषयी ईकडुन लिहिणेस अडचण आहे व हा समय आसाहेबाणी आल्यामुळे आसाहेबाचे महत्वास कमीपणा जाहला हे आम्हास बरेपणा वाटत नाही. ज्यादा काय लिहिणे हमेषा खत खडीत पाठवुन दील आराम करीत जावे. ता।। १० माहे नवंबर सन १८६० ईसवी.

लेखांक : ८७

कागल ज्युनिअर : ता. २२ मार्च १८६१

साहेब मेहरबां दोस्ता नारायणराव साहेब घाटगे सर्ज्याराव सलाम हुताला

अजी वुलियम हेनरी........साहेब पोलीटिक्याल सुपरिंटेंडेट ई।। करवीर सलाम आकी येथील खैर जाणोन आपले खैरीयतेस कलमी करून दील आराम करीत असावे दरीविली आसोकडून नंबर १५ ता।। २४ सप्टेंबर सन १८६० ई।।चे थैली पत्र ईकडून नंबर ६०० ता।। १४ सप्टेंबर सन मारचे थैली पत्र बंदोबस्त चांगला असणे यांचे बाबतीत गेल्याचे उतराचे आकरा कलमी आले ते अवलोकनात येऊन कलमी करण्यात येते की, मेहेरबान राव-बहादुर नेटीव्ह येजंट साहेब ईकडील भरवशाचे सरकारचे कामगार मोठे पद-वीचे ते स्वतः आपली स्थिती वगैरे पाहाण्यास पाठवीले याजवरून त्यानी जो मजकूर कळविला त्याजला आपलेकडून उलट दुसरे कामदार अमुक असावे म्हणोन लिहून येते असे लिहिणे आपल्यास आश्चर्य आहे आपले स्वाधीन

संवस्थानचा कारभार आल्यावर जाहाले कर्जातून काही फेड जाहली नसून नुकसान जाहाले असे आपण आठवे कलमी कबुलच करितात तसे होण्यास दुसऱ्याचे नाव दाखवीता पण सरकारनी मुखत्यारी आपल्यास दिली ती स्वतः काम करण्यास दिलेली असून दुसरेयाचे नाव दाखविल्यावरून आपण स्वतः काम पाहिले नाही असे उघड होते. व कागलास गेल्यावर दिवसें-दिवस अधिक कर्ज होत आहे असे ममजून येत आहे. नववे कलमी मजुम्रदार याचे लिहिण्यावरून आमचे घरात परस्परे कलह असोन स्वस्त चित्ताने कधीही राहू नये म्हणोन त्याचा ईरादा तो आम्ही कबूल करीत नाही म्हणोन लिहिले त्यांस परस्परे कलह नसून स्वस्थ चित्ताने असावे म्हणोन दाखविता परंतु आपलेकडून हर एक कामात कुटुंबाचा व आपला बेबनी वे असल्याचे लिहून येते ही केवढी शरमीची गोष्ट आहे व अशाने कागलास स्वस्थ चित्ताने असतो म्हणता हे काही तरी खरे आहे की काय ? व अशा गोष्टी येथपर्यंत आणण्यात आपले अब्रूस किंचितही बरे आहे असे आम्हास वाटत नाही पाच कलमी माहाराज सरकारची आपणाविषयी वगैरे लिहिले त्यास आप्तपणाचे कारणानेच ते काळजी वागवीत असून त्याजविषयी आपण कटकटीसारखा जबाव लिहिता हे अगदीच नापसंत आहे. आणखी कळविते की, ईकडेस फर्ज जातीने करण्यास फार लाच्यार होवून बळवंत रामचंद्र नवीन ग्रहस्त नेमिला तो फितुर करून टाकला असे नवे कलमी लिहिले याजवरून जो अब्रूचा ग्रहस्त असतो तो अब्रूकडे पाहातो व अशामुळे आपणास तो आवडत नाही व तो न आवडला म्हणोन त्याचे काही तरी लिहावे ईतकच दिसते आपले कडून आजपर्यंत कोणतीही खात्री समजून आली नाही. व ती म्हणोन आपणास बोलाविण्यात आले त्याप्रमाणे न येता उत्तर पाठविता याजवरून ईकडील हुकुमास असा प्रकार असल्याने कोणतेही प्रकारे आपले खरेपणाविषयी समजण्यात आंदेशा आहे अलीकडे नेक नामदार गव्हर्नरसाहेब बहादुर यांची स्वारी कोल्हापूरहून सर्व जाहागीरदार व मानकरी लोकांच्या मुलाखती जाहल्या व त्या वेळेस आपण येथे असता सो। बहादुर यांची मुलाखत जाहाली नाही व ती मुलाखत व्हावी असी इराद्याने पुष्कळ प्रकारे आपल्यास बोध करवीला असता तो मनात न ठेविता तसेच निघोन जाऊन कागलास गेल्यावर तेथुन थैली पत्र नंबर ३७ ता।। १६ नंवबर सन १८६० ई।। कागलास मुलाखत घेतली म्हणोन लिहून आले त्यास साहेब बहादुर याची

स्वारी कागलावरून गेल्यामुळे सवारी आपले पाहणात आली असेल परंतु जसी रुतब्या प्रमाणे होण्याची तशी जाहाली नसून या गोष्टीत आपण आपली किती मानहानी करून घेतली याचा विच्यार करणे याचा ते तसेच राहून आणखी इकडे लिहून पाठवीता हे आश्चर्य आहे माहाराज सरकाराची ताबेदारी नाही म्हणता परंतु त्यांचे ताब्यातील आपण खचीत आहा व तसे मनात आणाल तरच आपली योग्यता राहील हेही पुर्ते समजले पाहिजे. आलीकडे मुंबई सरकारास आपण परभारे कागल संस्थानाबद्दल थैली पाठवीली याजवरून ही सरकारचे हुकूम आलक्षतेत आणले आहे ते समजून येत आहे गेले सप्टेंबर महिन्यात कागलास ईज्यानीबाची स्वारी आली असता रूतबे प्रा॰ आपण भेटावयास आला नसून सरासरी टाळावे म्हणोन येक दोन दिवस पाच किंवा साहा वाजता भेटीस केव्हा यावे म्हणोन चिव्ह्या येत होत्या याजवरून किती पदवीने राहात आहात हे समजले तथापी आम्ही मेहरबानगीने हे शेवट आपल्यास कळविण्यात येते की माहाराज सरकारचे मनात आपले विषयी चांगले असून आपले मनात आले असेल त्याजविषयी वगैरे चांगली सल्हे ईकडून घेऊन सर्व प्रकार आपण नीट वागण्याची तजवीज होण्यास ईकडून अडचण येणार नाही याजकरिता हे थैली पत्र पावताच कोणती सबब न सांगता बावड्यास बंगल्यात भेटीकरिता आले पाहिजे म्हणजे आपण कसे काय वागावे ते पुर्तेपणे आपल्यास सांगण्यात येईल या लेखनाप्रे॥ न वर्तल्यास आपला आपण नाश करून घेत आहा असे स्पष्ट समजले पाहिजे आसाहेबास कळावे ज्यादा काय त॥ २२ मार्च सन १८६१

लेखांक : ८८

कागल ज्युनिअर : एप्रिल १८६४

कौन्सील माहाराणी ब्रिटीश सरकार यांचे हुजुरास जय मेहेरबां........ दौलत व येकबाल दौलत बक्ष आज नियाज मंद...........नारायणराव घाटगे सर्ज्याराव संस्थान कागल........मरातीब नीकाल्स = नारवानी व........ आलताफ व आकनाफ आलीमी.......मारूज जमीर मुजीर तवमुत खमीर मर्दानी दाम तारीख........माहे येप्रील सन १८६४ ईसवी. दरीआयाम खैर खुष लिहिले असे. बी तपशील—

(१) हाल्ली या थैली समागमे नंबर ९ चा वंशवृक्ष ज्या पुरुषापासून आहे त्यातील मुळ पुरुष विठोजीराव या पराक्रमी पुरुषावर बादशहा मेहरबां होऊन त्याला वजीरीचा आधीकार दिल्हा आणि खर्चावद्दल जो मुलुक कायम करून दिला त्या पो कागल परगणा ज्या वडील पुरुषाचे अधिकारात चालत होता तो विठोजी १ त्याचा पुत्र पीराजी २ याचा पुत्र आबाजी ३ आणि त्याचा पुत्र राणोजी ४ त्याचा पुत्र यशवंतराव ५ असोन त्याचा पुत्र तो मीच नारायणराव साहेब ६ आहे.

(२) हे ही........बादशहाचे देहनगीची आहे अशाविषयी फारसी हारफेची वगैरे फरमान ईसवी सन १६६४ व १६६७ यातील असील बमोजीब उतारे नंबर १।२ चे यालगत हाजर आहेत.

(३) या ईष्टेटीचा आधीकारी कोण आहे याची खबर आजपर्यंत सरकारास जाहीर नसल्यामुळे आमचे नुकसान होण्यास जे दरवाजे खुले होते ते येकदम बंद होवून खरा अधिकारी कोण आहे हे सरकारास नजरेस येवून ज्यास्त हाक त्याला होण्याविषयी तजवीज व्हावी या ईच्छेने सोळा कलमी जाहीर केले. हकीगतीचे मनन व्हावे असे मागणे आहे.

(४) वडील घराण्यातील नंबर ५ चे येशवंतराव म्हणजे आमचे तीर्थरूप हे घराण्यात मुख्य वडील असोन कागल जाहागीरीची वहिवाट यांचे ताब्यात चालत असता राजधानीचे आधीकारी त्यावेळचे श्रीमन्माहाराज छत्रपती साहेब सरकार करवीर याजवर पहिले कलमी नमोद केले वंशविस्तारातील बीरादार सखारामराव घाटगे यानी काही मदत केल्यामुळे त्यांची भीड बाळगुन—ईष्टेटीचे आधीकारी म्हणजे माझे वडील याजकडील परगणेचा आधीकार छत्रपती साहेब सखारामराव यांचे हाती आगटींग तरीक देवून त्या ईसवी सन १८०० यात जो करारनामा लिहून घेतला त्यासहीत छत्रपती साहेब याही यशवंतराव ....करार लिहून दिला ते असल करारनामे आम्हापासी हजर आहेत.

(५) आणखी जाहीर करितो की १७९३ या वर्षी आमचे वडील यशवंतराव व दुसरा बीरादार विश्वासराव म्हणजे सदरी दर्शविले वंशविस्तारातील नंबर ५ चा पुरुष यांचे खर्चीबद्दल त्याला यशवंतराव यानी वाळवे सु।। सहा गावे नेमणुकीस दिले होते त्यासंबंधी उभयतांचे दरम्यान ठरावाचा दाखला नंबर ५ चा हजर आहे.

(६) वरील ३।४ कलमी दर्शीत केल्या दाखल्याचे उतारे नंबर ३।४।५ चे असुन हाजर करून विनंती आहे की, सरकारची नजर या दाखल्याकडे व्हावी म्हणजे खचीत कळून येईल. या ईष्टेटीचा मुख्य आधीकार नंबर ५ चा असून त्याचे हाती वहिवाट चालत होती म्हणोन.

(७) नंबर ३।४ चे दाखल्याप्रमाणे पुढील वर्षी म्हणजे ईसवी सन १८०१ यात छत्रपतीसाहेब यानी सखाराम याजकडे परगणा माघारा दिल्हा आहे म्हणोन यशवंतराव यांचे नावे हुकूम दिल्हेला हाजर असून त्याचाही उतारा नंबर ६ चा यात सामील आहे. परंतु या दाखल्याप्रमाणे त्या........सखारामराव यास सिंदे आलीज्या बाहादुर यांचे जोरामुळे छत्रपती साहेब यानी आमलात नाईलाजामुळे आणण्यास विलंब केला.

(८) सखारामराव यांचा पुत्र जयसिंग उर्फ हिंदुराव घाटगे हे सदर ईस्टेटीची वहिवाट करीत असता ईसवी सन १८५५ या वर्षी मरण पावल्यावर त्याचे कुटुंब पार्वतीबाई यानी दत्त पुत्र मिळावयाविषयी आपली ईछा सरकारास कळविल्या प्रसंगी या ईष्टेटीचा आधीकार आमचे वडिलांचा असून आगटिंग.... छत्रपतीसाहेब यानीही सखाराम घाटगे यांचे हवाली करवीला होता....आजपर्यंत त्यांचा पुत्र हिंदुराव याजकडे राहिला तथापी त्या ईष्टेटीवर आधीकार आमचा आहे. कारण हल्याचे प्रसंगी त्याजवर पार्वतीबाईच्या ईच्छेप्रमाणे नवा दावेदार दत्त पुत्र उभा करणे विषयी मदत सरकारानी देवू नये अशा विषयी करवीर राजधानीचे पोलीटक्याल सुपरिंटेंडेंटसो यासी आम्ही पत्र द्वारे वारंवार कळविले त्या कामी हिंदुराव यांचाही हेतु आमचा शक आमचे जिमेत देवून पुर्ववत प्रमाणे मालकपणा आम्हाकडे चालवावा अशा विषयी पुर्तेपणी होता याचे खात्रीबद्दल हिंदुराव यानी आम्हास लिहिलेले पत्र ज्या कारकुनापासी होते ते सुद्धा साहेब मोसुफ यानी रेसीडेंट ग्वालेर यांचे मार्फत आणविल्याविषयी पोलीटिक्याल दप्तरी दाखल असावा येथपर्यंत त्या वेळी तजवीज चालविली असलेने विचार व्हावयाचा तो काहीच न होता पार्वतीबाई हिजला दत्त पुत्र केला तेंव्हा याचा योग्य विच्यार सरकार मेहेरबानीने करितील अशी उमेद आहे.

(९) जरी असा दत्त पुत्र सरकारानी केला तथापी सदरी दर्शविले कारणा....मर्जी जाहाले म्हणजे आमचा हाक्क त्या ईष्टेटी वरी........हे ईष्टेट आमचे ताब्यांत........प्रती बंद येणार नाही. नंबर ३।४।६ चे दाखले पुर्ण

नजरेने मनन होऊन या ईष्टेटीचा आधीकार ईकडील ताब्यात नीतीप्रमाणे देववीणे आवश्य असून याप्रमाणे घडून आल्यावर ही देहनगी बादशाहाची असोन राणी सरकार दी ग्रेट........बादशाहा आहे तेव्हा हा अधीकार आमचा आम्हास मिळाला म्हणजे बादशाही देहनगीचा जीर्णोधार केलासा होईल.

(१०) याखेरीज हल्ली दुसरा प्रसंग असा आहे की, सदरी ५ कलमातील नंबर ५ चे दाखल्यावर वाळवे वगैरे साहा गावची नेमणुकीची वहिवाट विश्वासराव यांचे पश्चात त्याचे कुटुंब रमाबाई वहिवाट करीत असता त्या सन १८५१ चे जुलई महिन्यात मरण पावल्यासमई त्या बाईनी दत्तक केला नसोन एक दत्त पुत्र जवळचे लोकानी करून बाईने केला असा बाहाणा केला. जर बाईनी दत्तक केला असता तरी हिंदु धर्मशास्त्रात ज्या रीती दत्तपुत्राविषयी लागू आहेत व खानदानीचे रूल आणि सरकारी निर्बंध वगैरे तजवीजीने होवून जाहाला असता परंतु ही गोष्ट मी खपा असल्यामुळे पोक्त विच्यार जाहाला नाही येविषयी सरकार दरबारात विच्यार होईल अशी उमेद ठेविली आहे.

(११) या विवादात सरकारास मुख्य जरूरीची विनंती हीच की, सन १७९३ यातील नंबर ५ चे दाखल्यावर सरकार नेक नजर व्हावी. म्हणजे वालवे ईष्टेटीस जरी समई दत्त करणे असेल तरी तो मुख्य आधीकार आमचा असोन आमचे ईच्छेची गोष्ट आहे. विश्वासराव घाटगे याला आमचे वडील यशवंतराव यानी नंबर ५ चे दाखल्याप्रमाणे नेमणुकी बद्दल वालवे सुद्धा ६ गावे दिल्ही होती ती खुद्द अगर त्याचे कुटुंबास औरस याला आम्ही ती नेमणूक चालिवणे आवश्य होती. परंतु आता तिसरा मनुष्य दत्त उभा करून नवा वारीस होण्याला आमची बिलकूल खुषी नसोन मुळची ईकडील देहनगी नेमणुकीची आहे सबब आता उभयता हक जाहले करिता ती सर्व ईष्टेट आमचे ताब्यात यावी अशी ईच्छा आहे.

(१२) वरील १।२।३।४ कलमी दाखल केल्यासहीत बयान केल्या योग्य कारणावरून येकंदर काम ईष्टेटीचे वडील आधीकारी आमचे तीर्थरूप मरहुम यशवंतराव यांचे पश्चात रूलप्रमाणे आम्ही आहो यावर सरकार कृपेची नजर राहावी—

(१३) हिंदुराव आणी विश्वासराव हे बिरादार मुख्यत्वे मालकी यांची आगदी नसोन त्यांचा वंश औरस कायम राहील तोपर्यंत चालीप्रमाणे खर्चाचा

बंदोबस्त मात्र राहण्याचा नेहुन जाजती या कामी दुसरा आधीक विच्यार कोणताही करण्यासारखा नाही.

(१४) हिंदुराव यासी मुंबई सरकारचे परवानगीने दत्त देण्यात आला तथापी त्या ईष्टेटीवर मालकीचा हाक्क आमचा असून हल्ली तो अमलात येण्याला या दत्ताची मातबरी जाणोन आटकाव येत नसून हल्लीचे उदार राणी सरकाराचे राज्यनीतीप्रमाणे ईकडील अधीकाराचा हाक्क वाळवे सुद्धा देतील अशी आशा आहे.

(१५) वाळवे येथील मरहुम रमाबाईचे पश्चात उत्पन्न जाहलेल्या दत्ता विषयी हल्ली सरकारासमोर विच्यार चालू आहे. ही ईष्टेट आमचे घराण्यात बादशाही देहनगीची असोन आमचे घराणे वडील यामुळे ईष्टेटीचा अधीकार तीर्थरूप मरहुम यशवंतराव यांचे वहिवाटीत असता खानदानीचे चालीप्रमाणे विश्वासराव याजकडे खर्चाचे नेमणुकीस्तव चालत आल्याचे खात्रीबद्दल वगैरे दाखले १।२।३।४।५।६ हजर केले आहेत. अवलोकनात आले म्हणजे वाळवे दत्ताविषयी तसदी सरकारास द्यावी लागणार नाही.

(१६) ही ईस्टेट फार दिवशी दिली आणि आलमगीर बादशाहा पासून आमचे घराण्यात वतनी ज्याहागीर प्राप्त जाहाली त्यावेळचे हुकूम नंबर १।२ चे सरकार खात्री करतील याशिवाय आलीकडे करवीर राजधानीचे मालीक श्रीमन्माहाराज छत्रपती साहेब याही ईसवी सन १६६४।१७९१ या वर्षांत नंबर १।२ चे दाखल्याप्रमाणे आमचा अधीकार कबुल करून आमचे वडील पुरुषाचे नावे लेखी हुकूम दिल्याचे उतारे नंबर ७। चे यालगत हाजर आहेत. ते अवलोकनात आले म्हणजे कागल परगणेची ईस्टेट करवीर राजधानीचे आधिकारी पुर्वीचे श्रीमन्माहाराज छत्रपती सरकार यांनी पुरातनप्रमाणे मानमरातब सुद्धा खुषीने चालवीत आल्याप्रमाणे खात्री होईल.

(१७) करवीर राजधानीचे आधीकारी हल्लीचे श्रीमन्महाराज छत्रपती साहेब यांची राज्यनीतीविषयी प्रौढता असून अन्यायानी कोणाचेही नुकसान न होता खरे प्रकार ज्याचा हक्क त्याला प्राप्त होण्यात लक्ष भरपूर आहे. तेव्हा हे ईष्टेटी या राज्यधानीचे कारणास्तव अमानत असलेले ते सदरी दर्शविले. नंबर ३ पासुन आठ पर्यंत दाखले या राजधानीचे जुनाट असोन आणखीही दप्तरी असतील.

(१८) श्रीमन्माहाराज छत्रपती सरकार आणि हिंदुराव याचा दत्त पुत्र व रमाबाईचा दत्त पुत्र म्हणविणार जे हली सरकार परवानगीची इच्छा करितात या .... बाळवे ईष्टेटीचा आधीकार कोणी .... अशाविषयी जरी हाल्ली सरकारास शक असेल तर त्यांचे निवारणास ईकडील नंबर ९ चा दाखला आवलोकनात आले म्हणजे बाजवी ज्याचा हक्क त्याला प्राप्त होवून योग्य ईन्साफ ग्रेट ब्रिटन् बादशहा राणी सरकार देतील अशी उमेद ठेविली आहे.

येकूण कलमी हकीगत पुरवणीचे कागद, नऊ या थैली पत्रा लगत रवाना केले आहेत.

लेखांक : ८९

कागल ज्युनिअर : ता. २६ नोव्हेंबर १८६५

श्रीमंत राजेश्री नारायणराव सो घाटगे सर्ज्याराव साहेबाचे सेवेशी विनंती सेवक दाजी बच्याजी दोन्ही कर जोडून विनंती विज्ञापना ता॥ मार्गेश्वर शु॥ आष्टमी रोज रवीवार शके १७८७ संमत १९१२ पोवतो मु॥ उजेन क्षेत्र आवंतीका येथे सरकार कृपेकरुन क्षेम असो विषेष उजेन मु॥ येवून पोचले नंतर विनंती पत्र मिती मार्गेश्वर शु॥ १ प्रतीपदेचे रवाना केले आहे. त्यात मजकूर लिहिला तो समजणेत आलाच असल

(१) खावंदानी श्रीमंत मातोश्री बाईसो शिंदे आलिज्या बहादुर यास व राजेश्री आप्पासो पाटणकर यास व खंडेराव: भाऊस यैसी व मो मालकमसो याजकडे याद दिलेची नक्कल येणेप्रमाणे पाठवील्या त्या सरकारात मातोश्रीसो ती पाहुनं कागलकर कामदार यानी खावंदाची आदावत लिहिली होती त्याजविषयी काहीसा मनातील किंतु निघाला आसा जाहाला आहे. म्हणोन राजेश्री खंडेराव भाऊनी आम्हास जबानी म॥र सांगितला आणि पत्राच उत्तर ही देणार आहे ते पत्रच आम्ही पाहुन रवाना कराव असे सांगितले वरून लि॥ आहे.

(२) दत्तका विषयी मो बडे सो हे उजेन मु॥ बाई सो यांचे मिलाखतीस आले होते ते समई बाई सो यांचा व बडे सो यांचा यकांत चार घटका होऊन नंतर श्रीमंत मातोश्री पारवतीबाई साहेब घाटगे याजकडे येऊन खैरखुषी बोलून नंतर सांगितले दत्तका विषयी मुंबईस लिहून पाठविल आहे.

आणखी लिहून पाठवून हुकूम दत्त घेणेविषयी आणवीतो याजविषयी काळजी करू नये असे बोलीले व श्रीमंत राजेश्री येसाजी सिंदे आलिज्या बहादूर याजकडील पगार येणेचा याजविषी आलिज्या मुखत्यार आहे. याची तजवीज करितो ऐसे बोलुन सा‍ो निघोन गेले ऐसे वर्तमान आम्ही आलेवर समजले वरून विनंती लि।। आहे.

३. खावंदानी करवीर मु।। सोकडे दत्तकाविषयी व तालोकाविषयी वगैरे बोलणेची यादी राजेश्री बाबा नाडगवडे यासी नमोद करून दिली व मुंबईस नाडगवडे नी।। राजेश्री गंगाधरपंत रुईकर यास पाठवीला असे वर्तमान येथे कागलाहुन लिहिणे आलेले वर्तमान समजल त्यास खरं असलेस ईकडील बाई सो शिंदे याच........राहणार नाही त्यास हे........राखणेच आसलेस वरचेवर मातोश्री बाईसो व मातोश्री पारवतीबाईसो पाटणकर यासी पत्र पाठवत जावे. परंतु पारबतीबाईसो यांचा मनोदय पिंपळगावकर यांचे मुल दत्त घ्यावे असा फार मनोदय आहे. बाईसो शिंदे यांचा मनोदय सोविषयी आहे. परंतु हुकूम आलेशिवाय कोणतेही होत....तशात दत्तकाविषयी करवीरकर याचे तेथ पोलटक्यालसोच रुकार होऊन मुंबईस रिपोर्ट गेले नंतर काये ते ठरून हुकूम करवीरास येईल व ईकडे ही लिहिणेत येईल. आस वर्तमान आहे.

४. राजेश्री बाबा नाडगवडे याजपाशी सोकडील दवलतीच साधन सुमार चांगल आहे म्हणोन पेशजी अैकत होतो त्याप्रमाणे असलेस कागद पत्र सो पाहुन त्यात सोचे मनोदयानुरूप कार्य जमणे विषयीची खातर जाहालेस करवीरकर श्रीमन्माहाराज छत्रपती खावंदास अनुकूल आहेतच त्याचे सलेने काम नेमणेच असलेस तिकड उद्योग चालु करावा व बडे देवले गाईकवाड याची मुंबईचे सोकडे बहुत भीड भाड आहे त्यासी आनुकुल करून घेऊन दत्तकाचा आगर तालोकेच काम नेमणेची तजवीज जाहालेस कराव हा समय आहे. जिकडून सादेल तिकडुन कार्य होई ते करणेस अनुमान करू नये.

५. श्रीमंत मातोश्री बाईसो शिंदे आलीजा बहादुर हे गाल्येरीस जाणेची तजवीज होऊन तयारीत आहे समागम पार्वतीबाईसो यासी घेऊन जातात किंवा देसी जाणेस निरोप देतात हे काही समजत नाही स्वारी गालेरीस जाणे डेरे देत समई काय ठरेल ते मागाहून लिहून पाठवितो

६. आमची भेट आद्यापी काही उभयता मातोश्रीसोकडेस जाहाली नाही राजेश्री खंडेराव भाऊकड व आपासो पाटणकर याजकडं दररोज जात असतो. परंतु भेटीची परवानगी जाहाली नाही. कारण गालेरीस जाणेचे तयारी मुळे काही कोणाची भेट होणेस परवानगी जाहाली नाही.

७. देशमुखीविषयीचे कामाकरिता दिल्लीत याद दिली होती. त्याचे परवानगी होऊन पत्र होऊन राहिली होती आम्हास निरोप होते समई पत्र देऊन रवानगी करणार होत ईतकेत बाबासो कैलासवासी जाहाले यामुळे ते काम तसेच राहिले ती पत्रे कामदारापासी आहेत असे वर्तमान समजलेवर आम्ही त्याचा शोध करून पत्र हस्तगत करणेची तजवींज केली परंतू काही दिले शिवाय काम होत नाही ऐसे समजून शे दोन शे पर्यंत बोलुन पाहिले परंतू जमेनासे जाहाल आणि सोस कळवीलेशिवाय आम्ही तरी कमिजास्ती कशावरून बोलावे याजमुळे त्या ग्रस्तास सांगून आलो की पेसी लिहून पाठवून तिकडून पत्राचे उपयोग आहे. आसे जाहालेस तिकडून लिहिणे आले म्हणजे रुपये सातशे पर्यंत देवून पत्र घेऊ ऐसे ठरवीले आहे. त्या पत्राचे उपयोग सोस आहे असे जाहालेस सदरी लि।। प्रो हुंडी पाठवावी. म्हणजे पत्र दोन कागलकर कारभारी याच येक व बाळवेकरबाई सोचे येक ऐसी दोन पत्रे आहेत ती पाठवून देतो पत्राचा उपयोग नसलेस पत्र पो म्हणजे त्याज प्रो सांगता येईल हा मजकूर कोणासी समजू देऊ नये मामलेकडील मनुष्येस समजले म्हणजे ईकडे लिहिणे येईल आणि पत्रास हीसका पडेल याजमुळे लि।। आहे—

८. आमचे खर्चा विषयी विनंती दिल्ली मु।। हुन लि।। होत व उज्जेन मु।। हुनही लिहिले आहे त्याप्रमाणे मागील शंभर रुपये व पुढे खर्चास पाठविणेची आज्ञा व्हावी आणि आम्हास येथे राहणेची आज्ञा असलेस राहतो अगर येणे विषयी आज्ञा जाहालेस येतो खर्चाची मात्र तजवीज करून पा।। शिवाय येणे होत नाही व येथे शंभर रुपये राजेश्री नाना वड्डेर याचे घेऊन राजेश्री लखमीचंद याचे दिले. त्याची निकड आहे. व खर्चासही पाहिजे येथे वाडेतून सिदा वगैरे काही मिळत नाही. याजकरिता खर्च जरुर जरुर हुकुम व्हावा शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक : ९०

कागल ज्युनिअर : ता. ८ मे १८६८

रावसाहेव मुषफक मेहेरबान कर्म फर्माये दोस्ता नारायणराव साहेब घाटगे सर्जराव संस्थान कागल सलाम हुताला आज ज्यानीब कर्नल ज्यार्ज स्लायगो अलेक्झांडर अंडरसन साहेब बहादुर पोलीटिकल येजंट प्रांत करवीर व कर्नाटक सलाम आंकी येथील खैरीयत जाणुन आपली शादमानी हमेषा कलमी करून दील आराम करीत असले पाहिजे. दरी आयाम आ रावसाहेबाकडुन ता। १९ माहे मे सन १८६५ इसवीचे थैली पत्र कागल संस्थानास दत्तक देण्याचे बाबतीत आल्यावरून सरकारास लिहून जावून सरकारचा ठराव नंबर १२१२ ता। ५ मे सन १८६८ इसवी आल्यावरून आपले चिरंजीव दत्ताजीराव यास काही शर्तीने कागल संस्थानास दत्तक घेण्याचे मंजूर करण्यात येईल. व त्या शर्ती मागाहून कळविण्यात येतील. मालुम व्हावे ता। ८ माहे मे सन १८६८ ईसवी ज्यादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत.

दस्तूर जिवाजी वासुदेव
कारकून

सही इंग्रजी
पोलीटिकल येजंट

लेखांक : ९१

कागल ज्युनिअर : ता. १६ जून १८८१

राजेश्री पांडोबा रेंदाळकर गोसावी यासी दंडवत विनंती विशेष संस्थानच दखल गीरीचे दोन चार बंद लिहून चिरंजीव आबासो यास दाखविली आहे यांची माहिती चिरंजीव बाळासाहेब (फाटलेले आहे) यांची दोन मुले यासी समजली पाहिजे (फाटलें आहे) हे दोन चार कागद तुम्ही नीट ठेऊन थोर जाहाले नंतर त्याचे स्वाधीन करावे. त्यानी मागील व्यवस्था पाहून पुढे तजवीज ठेवावी तुम्ही कागद ६ जतन करावे कळावे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती दुसरेस दाखवु नये.

सही इंग्रजी

१

यादी दखलबाज खाली लिहिलेप्रमाणे ता. १४ जून सन १८८१ संस्थानात सोनेचे व जडावाचे खासे व बायकाचे दागिने व घोड्याचे व हात्तीचे आसे दागिने व चांदीचे दागीने ब॥ व भांड्याबद्दल जाबते जाहाले आहेत याचप्रमाणे सणगाचे जाहाले आहेत मोत्याचे दागिने ब॥ सदरी लिहिले आहे. पादशाई व माहाराज सरकारचे सनदापत्रे ब॥ पेटी आहे. त्यात आहेत याजवर नजर चांगली ठेवीत जावी भाऊबंदीचे असल्याने कोणास देवू नयेत. काही सनदा आपा मुजुमदार याने भाऊबंदाकडे सामील होऊन नाहीसे केले आहेत. तसेच ती॥ स्वरूप जयसिंगराव घाटगे सर्जेराव यांजकडून गुलाम गौष-खान साहेब याचे नावे पत्रे तपशीलवार व आमचे नावचे आसुन त्यात आम्ही आपले मागे संस्थानास मालक आहेत दुसरे कोणी होणार नाहीत म्हणून आस-लेले, बाबासाहेब हाक जाहले नंतर काम चालतें वेळी लबाडीने नाहीसे केले पुढे ती पत्रे मोठे खटपटीने पांडोबा रेंदाळकर याने काढून आणिले पण पुरावे-वीणे संस्थानचा हाक्क नाहीसा झाला येणे करून घात केला याचप्रो आम्हात व माहाराजात बिघाड आणलेब॥ त्याजला संस्थानातून कमी केला होता पण ठरावात लुच्चेगिरीने कायम होऊन हल्लीही बरवे कारभारी यांचे फंदात असोन माहाराजाची निंदा हा व जामदार करीत असून कसा घात करतील याचा नेम नाही. सबब याचा वंश सु॥ दवलतीत ठेऊ नये. दवलतीत माणसे भरोशाची हुजरे व संवदलगेकर बीरजेचे घराणे जामदार ही (फाटले आहे) खाशाचे वेळे पासून मोठ मोठे संकट समई उपयोगी पडली आहेत सबब भरोसा ठेवावा पांडोबा रेंदाळकर याने येकीचे काम व वाड्याचे काम व आबासाहेब यांचे दत्तक प्रकर्णी व सीमांतर तंटेचे काम व वाड्याब॥ आशी महत्त्वाची केली असून त्याचा उपयोग त्याचे मनाप्रमाणे मुलाबाळाचे कल्याण ईकडून कैलासवासी माहाराजा कडून वतनाब॥ जाहाला नाही तर याचे घराणेत उत्पन्न योग्यते-प्रमाणे चालावे आणि यास माहायात्रा घडावी येसी गयावळ यासी पत्र देवुन ठेविले आहे आमचे कारण्यात १५०० रुपये ऐन याचे व्याज सु॥ देणे सीमांतर प्रकर्णी देऊन त्याचां गळा मोकळा आमचे वंवशीक यानी करावा या प्रमाणे व्यवस्था ठेवावी.

ता. १४-६-१८८१ सही इंग्रजी

२

श्रीमन्माहाराज बाबासाहेब माहाराज छत्रपतीसाहेब यांची स्वारी श्री त्र्यंबुलीस जाहाले वेळी बराबर हिंमत बाहाद्दर जाणेचे असता विलंब लागला. आम्ही जावून स्वारी गाठली त्याची........नौबती बरोबर आमचा जरीपटका हाती लागल्याने त्याचा सीरकाव जाहाला नाही. खासे माहाराजापासी रावसाहेब चव्हाण यानी कागलकर यांची नाचीकी केली की, आप्तपणाब।। यास मान देणेचा यानी (फाटले आहे) तलवार केली नाही व राज्याचा कारभार केला नाही असे असता........नौबती बरोबर चालतात याची योग्यता नाही असी बरीच भाषणे करून माहाराजास आमचा कमीपणा दाखविला.

तशेच गायकवाड वगैरे मंडळी यानी चिरंजीव आबासो यास राजे स्थापतिल की काय यासंबंधाने माहाराजास विनोद्रात कळविले की, हे राजे होतील तर बहुत करून सरदार मुडे होतील याचे कारण वाळवेकर याने बहुत लोक मुडे केले पो करनुरचाच हुजुरचे पाहाणेत होता तसेच हिंदुराव बाबासो यांची व खाश्यांची आशी कडवी चाल आहेत म्हणून आभक्तीस कारण केल्याने फार दुःख जाहाले. पुढे पांडोबाने समाधान केले की, पुण्ये आधीक आणि राजयोग ज्याचा असेल त्यासी ही गादी प्राप्त होणार आहे. आपले वतनदारीचे तालुक्येचे काम चालवावे म्हणोन चालिवले व पुढे काही काळाने पांडूने माहाराजाची आशी खात्री पेशवाचे पत्रावरून तीन पिढ्या तर कोल्हापूर राज्याचा कारभार केल्याची करून आपले नुकसान करून घेतले ब।। वाडी मुक्कामी श्रीचे सनीध....मराव तरी पदरी असता पांडोबाने जी माहाराजांची स्तुती आणि त्यात ईकडील उपयोग त्यातच आपले कल्याण मागुन घेण्यात कारभारी व माहाराजास फार आनंद झाला आणिं कारभारी यानी सला दिली की आसे या ईमानी सेवकाचे पुत्रवत पालन व्हावे आसे म्हणोन आबासाहेब याचा उपयोग केला (फाटले आहे)

येणे प्रमाणे व्येवस्था आसुन हाल्ली तर फार काल कठीण आला आहे. बरवे कारभारी याने घरभेद केला आसून फार आपमान माहाराजांचा व आमचा चालविला. या कामास भीड्या झटत आहे तर जी माणसे स्वामी कार्यांत झटतात त्यास अब्रुपणाने व बाळासाहेब व वंसीक याणी आंतर देवू नये

सही इंग्रजी

३

आम्ही लहान आसता वडील खासे वारल्या वेळी कोल्हापुराहून कारभारी नेमून दौलतीतील दागिनेचे वगैरे जाबते होवून गेले मातुश्रीस वापरणेस दागिने सणगे सणाचे दिवशी देऊन दागिने व सणगे संध्याकाळी जामदारखानेत ठेवणेची वहिवाट असता दामोदर परबतराव कारभारी याचे वेळी मातुश्रीचे ताबेत दागीने चांगले तितके दिले बाईने ते दागिने गंगापा सिंत्रे यांचे घरी ठेवून आजमासे पंचवीस हजाराचे नुकसान केले त्या कामात रावजी या (फाटले आहे) वामन कराड्या बाबानी मंडळीला नाना मुजुमदार (फाटलेले) व आपा मजमदार आसे होते. त्याजला बुडवुन ते दागिने व सणगे नाहीसे करून नुकसानी केली तितकी माणसे उपद्रव केला ती सुद्धा काढून टाकून जमीनी सु॥ खालसा केल्या ब॥ दाखले आहेत. ठरावाचे वेळी चिटणीस यास गाठून आपा याने कायम केली आहेत त्या दागिने पो मोत्याची काकणे आंगठ्या वगैरे सिताराम बापु मामलेदार यांची योजना करून आणिले. ते हुजुर ठेविले होते दादासाहेब निंबाळकर यानी उपयोग केला आहे.

आपाजीपंत याजकडे भांड्याचे काम स्वाधीन आसते वेळी याने चांगली भांडी आपले घरी नेऊन जुनी भांडी या भांड्यात घातली आहेत. हा माणूस किंवा यांचा वंश या दौलतीत उपयोगी नाही. ईकडील अन्न खावुन आपले कार्य होण्याचे बाबतीत कागलकर यासी कोणते प्रकारचा आधिकार नाही, अनाधिकारी आहेत, असे नारो रघुनाथ चिटणीस यासी माहीती देत असे. ही माहिती चिरंजीव आबासाहेब यासी जाहाली वरून त्याचे म्हणणे थोडे रोजात याचा विचार होईल असे मजपासी सांगितले आहे. हा सर्व प्रकार नफा नुकसानीचा चिरंजीव बाबासो। यांस कशाने समजणार करिता हाकीगत लिहून ठेविली आत फसवुन दत्तक प्रकर्णी (फाटले आहे) स्त करून घेतलेब॥ गोविंदराव भाऊ खासगी कारभारी यास समजले वरून साहेबास कळवुन तो कागद मजपासी नाही असे सिंत्रेचे वेळी काम चालविले ते खासगी खात्यातून रामभाऊ ऐनापुरकर याने नाहीसे करून बरवे याने रक्कम .... व जामदार लक्ष्मण व आत्माराम असे मिळून सिंत्र्यास सामील होवून नुकसान जाहाले आहे. बरव्याचा संधी पाहून विच्चार करू असे आबासो म्हणाले पण त्याचाही आपोक्तपणा आहे आसा जाहाला प्रकार मनात आणून व्यवस्था ठेवावी.

सही इंग्रजी

४

हाल्लीचे शिवछत्रपती याची छळणा बरवे कारभारी याने चालविली असले बद्दल माहाराजांची स्वारी तुफान होवून घोडा सरफेट सोडून फार पला करून आमचे वाड्यात येऊन फार उदासीन पणाची भाषणे केली. हा सर्व मजकूर आबासाहेब यास कळ्ला. आपल्यास राज्ये नको माझी नाचीकी मुंबईस साहेबास........वगैरे लोकात केली माझी दशा कशी आहे ती पाहणेस आबासाहेब यास कळवावे व मजला राजकोटास वगैरे जिकडे व्हेतील तिकडे येऊन भेटावे. चोरटी पत्रे कोल्हापुरास येत आहेत त्याजवर बातमी ठेवीत जावी म्हणजे जामदार वगैरे मुजुमदार यांची क्रीया समजोन येईल म्हणोन जाहाले मजकुराबद्दल आम्हास चिठ्ठी पाठविली वरून आबासाहेब व येसवंता असे बसून पांडोबा यास बोलावून वे. विठ्ठल भट जोशी बोवा आष्टेकर यासी माहाराजाचे टिपण देऊन त्यांनी वर्षफल करून आणोन खात्रीने सांगितले की या गंडातरातून पार पडणे कठिण परिहार करावा म्हणोन बोलले वरून पांडोबा बोलला की, निपाणकर यांचे पत्रीकेप्रमाणे आबासाहेब यांची पत्रिका करून द्यावी म्हणाले वरून आबाचे म्हणणे चिरंजीव बाबासाहेब व बापुसाहेब यांची करू असे ठरवून उभयता मुलांची टिपणे दाखविली ती पाहून जोशी बुवा याने कळविले की, बाबासाहेब यास राज्ययोग चांगला आहे छत्रच्यामर प्राप्त होतील बापुसाहेब आपले स्वसंपादीत सांभाळून नीट राहतील म्हणोन बोलले वरून जोसी बोवा यांची........आबाने केली पण (फाटलेले आहे) खात्रीचा ब्राह्मण असून माहाराजाचे वेळी आमची व पांडोबाची पत्रीकेचा आनुभव घेतला आहे तेव्हा याजवर भरवसा ठेऊन परमेश्वर कल्याण करील तर आमचे खासेचा उधार होईल. माझे लिहिणेवर नजर देवून ईमानी माणसाचेच कल्याण करावे. बेमानाचे पारपत्य केले असता पातक नाही.

जेणे करून आपले स्वकार्य करणेकडे लक्ष असावे. कोल्हापुरचे लोकांनी फार विटंबना केलेली आहे. गुप्त तजवीज ठेवावी दुसरेस समजू नये.

सही इंग्रजी

५

शिवाजी माहाराजांची छळणा बरवे यानी चालीविली. यानी गावात मातोश्रीकडे येऊ नये बंगल्यात असावे लक्ष्मण जामदार व रामभाऊ अैनापुरकर

यांचे ताब्यात राहावे म्हणोन वहिवाट चालली. वडील मातोश्रीस वर्ज्य केले योगाने माहाराजास वाईट वाटत असून नजीकची मुलेही माहाराजास उटाळणी देऊ लागले व गावात लोकांत गैर दिसू लागल्याने थोडे रोजाखाली मातुश्रीचे संबंधाने नाना भिडे याने खटपट करून मातोश्रीस त्या ठिकाणी संरक्षणास ठेवावी म्हणोन विचार करून सांगितले वरून तो खटपटीस लागल्या वरून बरवे यांची पत्रे स्वारीतून खेळू लागली ती पत्रे नानाकडे देवून उघडकीस आणावे म्हणोन धोंडबा फडणीस याजबरोबर चिठी लिहून पत्रे पाठविली त्यात आबा-साहेब यानी काही आंदेशा काढून आमचे समाधान केले की, लांचवलेले जनावर जसे ठिकाणास येते त्याप्रमाणे आणखी काय काय होते ते पाहू मी गुप्त बातमीत आहे म्हणोन सांगितले. भीड्या व बरव्या गावी नाहीत यशवंत मोरेश्वर कारभारी याने व अैनापुरकर व आत्माराम जामदार व विष्णूपंत आपटे याने फार इकडे ज्याली व बनावट निरोप पाठवून माझे तर्फेची मंडळीची फोडाफोड करून पीडा दिली आहे.

या कामात परिणाम बरव्या नीट करील असे वाटत नाही. नाना भिड्या यास ईश्वर यश देईल तर या कामाचे त्यास श्रेय येणार आहे. आमचे प्रकृतीचा भरवसा वाटत नाही (फाटलेले आहे) नीट असू तर त्याचा उधार माहा-राजाकडून होतच आहे. अथवा मागे स्रील्वान मंडळी आहेत त्यानी ईमानाने झटलेले लोकांस पोटासी धरून आपला दौलतीचा चांगले प्रकारे उपभोग करून घ्यावा.

सही इंग्रजी

ही दखलबाज लिहून ठेवण्याचे कारण ही कालकीर्द निराळी असून या प्रमाणे पुर्वी वडील खाश्याचे वेळी कैलासवासी आबासाहेब माहाराज यांचे वेळी प्रसंग घडला होता तो इतिहास आम्हास कळावा म्हणोन भोसेचा बावाजी बोवा निंबाळकर याजपासी ठेविले प्रमाणे आम्हीही ठेवला आहे

सही इंग्रजी

६

कैलासवासी सिवाजी माहाराज छत्रपती यानी वडिलाकडील तालुका सन १८०० ईसवी साली आपलें उपयोगासाठी काढुन घेतला आणि ती।। सखाराम बापु घाटगे यासी दिला आम्हास मोबदला मिळणेचा तो मिळाला नाही साहा

गावे व वाडा पागा राहिली. आबासाहेब माहाराज याचे रोषाबद्दल बावासाहेब माहाराज यानी कागलावर स्वारी करून नुकसान केलेची....साहेब माहाराज यानी आमचा वाडा बंद केला होता पण ते कडेस गेले नाहीत. अपमान केला. बाबासाहेब महाराज यासी सर्व हकीगत समजले वरून विच्यार मनात आणोन ....सी आमची समजूत घातली की थोडे रोजात पुर्ण अधिकाराआंती वाळवे संस्थान आबासाहेब सज्ञान झाले नंतर देऊ दोन्ही संस्थाने सरासरीचे मानाने समान–उत्पन्न जाहाले नाही खालसा वहिवाट जाहाली पाहिजे. याचे कारण भाऊ बंदी तक्रार राहाणार नाही असे विषयी खाजगी कारभारी याचे पत्र आहे. पांडुचे जिखरी वरून तजवीज केली पण लौकर ही वस्तु नाहीशी झाली त्यापुढे राजाराम माहाराज यांचे वेळी मुंबईस स्वारी जाहाले वेळी आतील सन्मान बरोबर राहिला नाही याप्रा। या राजधानीत आप्तपणा असता व्येवस्था होत आली तेंव्हा माहीतगार आणि जातीवंत याचेवर भरोसा ठेवून योग्य माणसाची सला घेऊन वागावे–आसे म्हणणे आहे (सही ईंग्रजी)

ता॥ जीजाही सो माहाराज यांचें आज्ञा पत्रात आमचे ज्याहागिरीवर नवीन उपसर्ग होणार नाही असे असलेले पत्र आहे.

सही इंग्रजी

लेखांक : ९२

कागल ज्युनिअर : ता. ५ एप्रिल १८८३

मुंबई क्यासल ता॥ फेब्रवारी १८८३ ईसवी ता॥ १ माहे डिसेंबर सन १८८२ ई॥ चे नंबर ५४ चे पोलीटिकल येजंट कोल्हापूर आणि सदर्न मराठा कंट्री याजकडून आलेले पत्र त्यात कोल्हापूरचे दिवाण याजकडून आलेले पत्र सोबत पोलीटिकल यजंटचे नावाची थैली व सरकारचे नावचा कागलकर यानी केलेला इंग्रजी अर्ज व तत्संबंधी छापील पत्र-व्यवहार पोलीटिकल यजंट म्हणतात की, कदीम ईनामा बद्दल वारस चौकशी करण्याचा व नजराणा घेण्याचा व नोकरी अंश घेण्याचा हाक्क — आपला आहे असा कागलकर यानी हाक्क — दाखविला होता. तो कार्नेल पार यानी तारीख ३० आगष्ट सन १८८१ ईसवी रोजी दावा नाकबुल केला. त्यांजवर हे आपील आहे व

सदरील पत्रास पोलीटीकल यजंट यानी आपला आभिप्राय दर्शविला आहे त्याजवर सरकारचा हुकूम मागतात.

ता।। ४ जानेवारी सन १८८३ ईसवीचे पोलीटीकल येजंट कोल्हापूर व सदर्न मराठा कंट्री यांचे पत्र त्यात या खात्याचे पत्र नंबर ६२११ ता।। २७ डिसेंबर चे गेल्या वरून ईसवी सन १८००च्या सनदेची खरी नक्कल कोल्हापूरचे दिवाण यांचे सहीची पाठवून त्यात असे लिहिले आहे की, आपले समक्ष नक्कल व अस्सल सनद याची बरोबर रुजुवात घेतली आहे व कागलकर याची मुळची सनद आहे त्याची ही अस्सल बरहुकुम नक्कल आहे अशी आपली खात्री आहे असे पोलीटिकल येजंट यानी नमुद केले आहे.

नंबर १५९ ता, २४ जानेवारी सन १८८३ सरकारचे .... लेटरचे पत्र त्यात ईकडील नंबर ११० तारीख ११ चे पत्राबरोबर पाठविलेली सनद परत पाठविली आहे. .... (फाटून गेले आहे) नामाही बरोबर आहे म्हणून ठराव.

(१) ज्या गोष्टीबद्दल ठराव करावयाचा आहे ती सांगण्याचे पूर्वी ईतकेच लक्षात ठेवले पाहिजे की, कागलकर यांची जाहागीर कोल्हापूरचे माहाराजाचे ताब्रेतली आहे ही जाहागीर कागलकर यानी मूळ मराठी राज्याची स्थापना होणेचे पूर्वी विजापुरचे पादशाहाकडून मिळविली होती व मागाहून ही देहनगी कोल्हापूरचे व सातारचे माहाराज यानी मुकरार केली होती व शेवटी सन १८२६ त कोल्हापूरचे माहाराजानी ईंग्रज सरकारासी तह केला त्या वेळेस असा करार केला आहे की हिंदुराव घाटगे कागलकर यास प्राचीन काळापासून वहिवाटी प्रमाणे (फाटून गेले आहे) व जमीन चालली आहे त्यामध्ये हरकत करणार नाही. मुळचे देहनगीचे कराराप्रमाणे ही जाहागीर ईनाम होती व याजवर नोकरीअंश बसलेला नव्हता. परंतु दोन वेळा मेहेरबानी खातर जेव्हा दत्तक देणेची परवानगी दिली त्यावेळेस ही जाहागीर सरंजामी आहे असे मानले आहे व लष्करची जी नोकरी करणे त्याबद्दल वर्षास आमुक पैसा........

(२) कागल घराणेत दोन हिस्से आहेत वडील घराण्यास येक वेघळीच जाहागीर आहे. त्यास देशमुखी वतन असे म्हणतात. कागलकर याजकडे मुख्य जाहागीर आहे व ते कनिष्ट घराणेतील वारस आहेत ही जाहागीर कोल्हापुरचे माहाराजांनी या घराणेतील सखाराम घाटगे यांचे नावची ईसवीसन १८०० ची

सनद करून दिली आहे त्याजवरून या घराणेकडे चालली आहे. ज्या गोष्टी-बद्दल ठराव करावयाचा आहे तरी ठराव ह्या सनदेच्या बरोवर आर्थावर आवलंबुन आहे. असे वाटले वरून ओरीएनटल ट्रॉन्सलेटर याजकडुन या सनदेचा तर-जुमा या सनदे लगत जोडला आहे. सनदेत जे सखारामराव सांगितले आहेत त्यांच्यापुढे त्याचे पुत्र ,ईंदुराव हे संस्थानास वारस जाहाले व ते १८५५ त दिल्ली येथे मैत जाहाले. त्यांच्या विधवेस दत्तक सखाराम रात्र या नावचे दिले. परंतु हे सखारामराव निपुत्रक मरण पावले. तेव्हा हल्लीचे मालक जयसिंगराव आबासाहेब घाटगे यास दत्तक घेतले आहे.

(३) कागलकर व कोल्हापूर माहाराज याजबद्दल संबंध काय आहे तो पुर्वीच वर्ती सांगितला आहे व आता ठराव करावयाची ईतकीच गोष्ट आहे की,........स्थ यास काही लोकांस जे हाक्क व ईनाम दिली आहेत त्याजबद्दल वारस चौकशी करणेचा व नजराणा घेणेचा हाक्क कागलकर यांचा आहे आगर कोल्हापूरचे माहाराज यांचा आहे. ईसवी सन १८०० त कागल करास जेव्हा पासोन सनद दिली तेव्हा पासोन हे हाक्क व ईनाम कागलकर याजकडे चालत आहेत ही गोष्ट कबूल आहे. परंतु ईसवी सन १८०० च्या पुर्वी जी कदीम ईनामे त्याजबद्दल विच्यार व्हावयाचा आहे कोल्हापूर दरबार— यानी गावचे कामगार याजबद्दलची जी वेतने व लहान हाक्क याजबद्दलचा आपला दावा सोडला आहे. परंतु देशमुख व देशपांडे याजबद्दलची जी ईनामे व हाक्क याजबद्दलचा मात्र विच्यार होणेचा आहे.

(४) ईसवीसन १८०० मध्ये जी महाराज सरकारानी कागलकर यास सनद दिली आहे त्याप्रमाणेच कागलकर यांचे हक्क आहेत यात संशय नाही त्या सनदेचे तात्पर्य ईतकेच आहे की कागल परगणा व त्यातील गाव घाटगे यास ईनाम करून दिलेली आहेत परंतु दंगे धोप्यामुळे काही गाव त्यांचे ताब्यातून गेली आहेत. सखाराम घाटगे महाराजांच्या पुष्कळ उपयोगी पडले आहेत ....६९॥ गावे पादशाही सनदे प्रमाणे कुल बाब कुल कानु हाल्ली पट्टी पेस्तर पटी जल तरु पाषाण निधी निक्षेप सखाराम घाटगे यास ईनाम करून दिली आहेत व त्यांच्या पुढे खेरीज हक्क दार ईनामदार हे शब्द आहेत.

(५) या गोष्टीचा बराबर निर्णय होणे वर लिहिल्या शब्दाच्या बरोबर अर्थात मुख्यत्वे करून आवलंबुन आहे या मध्ये शंका येणेस ईतकेच कारण आहे की, खेरीज शब्द ज्या ठिकाणी उपयोग केला असेल त्या प्रमाणे शिवाय व आणखी असे दोन आर्थ होतात. कागलकर यांची पहिल्याने अशी तक्रार होती की, वर लिहिलेल्या शब्दावरून हक्कदार व ईनामदार यांचा आपले देहनगीत उघड समावेश होतो. परंतु कोल्हापूर दरबारचे असे म्हणणे आहे की, वरील शब्दावरून हक्कदार व इमामदार हे देणगीतून गाळलेले आहे. नंतर कागल करानी सरकारास अपील केले त्यात असे लिहिले आहे की, त्या शब्दाचा आर्थ हकहार व ईनामदार याचे हाक्क खेरीज करून ओरीअेंनटल ट्रान्सलेटर यानी त्याचा तरजुमा केला त्यात हाक्कदार व ईनामदार यांचे हक्क खेरीज करून असेच लिहिले आहे. आता वरील शब्दाचा खरा अर्थ हाक्कदार व ईनामदार यांचे संबंधाने काही येक गोष्ट शिवाय करून .... खेरीज ईतकाच आहे यात संशय नाही. परंतु विच्यार ईतकाच आहे की कोणाची गोष्ट खेरीज करून अशी आहे खेरीज करून म्हणजे हक्कदार व ईनामदार यांचे हक्क खेरीज करून किंवा हक्कदार ईनामदार यास ज्या जमीनी दिल्या आहेत त्यात कोल्हापूर सरकारचा भावी व परत घेणारा हक्क दर्शविला आहे किंवा दोनही दर्शविली आहेत.

(६) खेरीज या शब्दाचा उपयोग केल्याने कोल्हापुरचे माहाराजांचे तत्संबंधी हक्क (फाटलेले) नाहीत परंतु हक्कदार व ईनामदार यांचेच हक्क दाखविले आहेत असे ओरी अेनटल ट्रान्सलेटर यानी लिहिले आहे त्याप्रमाणेच गव्हरनर ईन कौन्सिलचे मत आहे. सर्व सनद पाहिली असता कोल्हापुरचे माहाराजास जो सर्व आधीकार व हाक्क होता. तो सर्व हाक्क सनदवाले यास दिलेला आहे. परंतु हक्कदार व ईनामदार यास उपद्रव होऊ नये कारण ते लोक मोठे आहेत व ते खुष राहावेत यास्तव सरकारची अशी वहिवाट व कारस्थान होते यास्तव कागलकर यास त्याचे भोगवटेत हात घालणेस मनाई केलेली होती. परंतु हक्कदार व ईनामदार यांचे घराणेत सरळ वारस नाहीसा जाहाल्यास त्याजबदल नजराणा घेणे, वारस चौकशी करणे, याजबद्दल जेव्हा प्रसंग येईल तेव्हा तो हक्क कोल्हापुरचे माहाराजानी आपलेकडे ठेविला आहे या बा॥ सनदेमध्ये काही ठराव नाही व ह्या वेळ पावेतो कागल संस्थानास कोल्हापुरचे माहाराजानी आशा प्रकारचा हक्क कधी चालविलेला नाही व पेशव्यांचे राज्य "ग्रज सरकारनी घेतले

नंतर माहाराज व कागलकर यांचा जो संबंध आहे त्याच प्रकारचा ईंग्रज सरकारचा व जाहागीरदाराचा संबंध आहे परंतु असा हक्क ईंग्रज सरकारने चालविलेला नाही. शिवाय सनद दिलेल्या तारखेपासून जे हक्कदार व ईनामदार जाहालेले आहेत त्याजबद्दल कागलकरांचा हक्क आहे असे कबुल आहे व इतकी गोष्ट लक्षात ठेविली पाहिजे की ईसवी सन १८०० ची..नद निःसंशय नवे देणगी सारखी आहे. तथापी प्राचीन काळापासोन घाटगे याजकडे जे हाक्क चालत होते तेच हाक्क त्या सनदेत मुकरार केलेले आहेत यास्तव गव्हरनर ईन कौन्सिलचा आसा आभिप्राय आहे की या विषयी माहाराजांचा हाक्क निराधार आहे व आशा बाबतीबद्दल कागलकरांचा पुर्ण आधिकार आहे असे मानले पाहिजे.

सी. गान
चीफ सेक्रेटरी टु गव्हरमेंट

पोलीटिकल येजंट कोल्हापूर अन सदर्न मराठा कंट्री याजकडे.
खरे भाषांतर तयार तारीख १० माहे येप्रील सन १८८३ ईसवी.
मु।। गेलेवाडी सं।। सावंतवाडी

सही इंग्रजी

मु।। नंबर ५४८ तारीख ५ माहे एप्रील सन १८८३ ईसवीचे हुकुमासोबत राजेश्री कारभारी संस्थान कागल याजकडे दाखल्याकरिता व वहिवाटीकरिता रवाना तारीख ५ माहे एप्रील सन १८८३

सही ईंग्रजी सही इंग्रजी
मु।। पाटगाव पेटा भूदरगड

लेखांक : ९३

कागल जुनियर : ता. २६ एप्रिल १८८४

राजश्री नानासाहेब ईंगळे मु ।। महाबळेश्वर गोसावी यासी—

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने।। जयसिंगराव आबासाहेब घाटगे सर्जाराव वजारतमाब सं. कागल राम राम विनंती वि।। आज आम्ही म्हारकी व जोगमीर हाकणे करिता तयारी करून निघालो आणि म्हारकीचे

रान धरणेस जिकडे वाट फिरलेली आहे तिकडे आम्ही फिरत असता जोगमरिचे बाजूस वाघाने गाय धरली अशी ओरड अैकून थांबलो आणि मेहरबान पोलीटीकल येजंट सो यानी विश्वासराव यास घोड्यावरून तिकडील बातमी करीता जरूर पाठविले ती त्यांनी नुकतीच वाघाने गाय धरली अशी बातमी आणली म्हणजे बरोबर आम्ही सर्व मंडळी उभयता सो यानी डंगाचे व जोगमीरची म्हारकी कडचे दगडाचे बाजुवर बसलो. माझे अलीकडे बुवा सो होते. व त्यांचे पलीकडे हुमरी जवळ जेथून मी जखमी सांबराचे बोडकीवर गोळी मारली होती तेथे मेहेरबान रीव्हज साहेब पोलीटिकल येजंट व त्यांचे पलीकडे मेहरबान वाकर सो व त्याचे पलीकडे विश्वासराव बसले होते त्याचे पलीकडे कोलका कडील बाजूचे डंगास आणि वाघ जेथे बुवा सो बसले होते तेथे यक सुमार पंधरा वीस कदम ईतके अंतरावर येवून त्याने भांग्यातून डोके उलटुन ओरडून पलीकडे पुन्हा जोगमीरात गेला म्हणून आजरोजी कोणाची गोळी उडाली नाही त्याचे नशीब मोठे. नाहीतर देव बासिंग उतरणेसच तयार होते हा वाघ बहुतेक कालचाच म्हणून जागेवर न येता आणि तेथे पंधरा मिनीटे सुमार वाट पाहून परत मनुष्यातून दुर मुसंडी देऊन गेला आज पुन्हा आणखी पावसाने सचैल स्नान घातले गारा एवढया मोठ्या पडल्या की लहान आंब्या ऐवढया पडल्या व आम्ही हत्तीवर बसलो असल्याने आमचे अंगावर जेथे जेथे पडल्या तेथे तेथे शरीर बधीर जाहाले आमची प्रकृती चांगली आहे. चिरंजीवाचे प्रकृतीस आपण जपतच असाल त्यास माझे आशिर्वाद सांगणे लोभ करावा हे विनंती.

सही इंग्रजी
जयसिंगराव घाटगे

लेखांक : ९४

कागल ज्युनिअर : ता. २८ एप्रिल १८८४

राजेश्री आबासाहेब ईंगळे

गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ जयसिंगराव आबा सो घाटगे सर्जाराव व वजारत माब सं. कागल रामराम विनंती विषेष परवा दिवशी गोठ-

ण्याचे रानात वाघाने गाय मारली त्याची बातमी येवून आजरोजी रांजणेचे रान हाकण्यास गेले व रान हाकविण्यात वाघ उठला व तो मेहेरबान रिव्हज साहेब बहादुर यांचे अंगावर गेला. त्यानी सुमारे तीस यार्डावरून गोळी मारली पण चुकली आणि वाघ निघून डंगात गेला. वाघ प्रचंड होता. नंतर साहेब बहादुर याचे पुढे तेथेच येक........सांबराचा आला तो त्यानी जखमी केला व पुढे बुवा सा़ो यानी मारला : आपले पत्र पोचले काल रोजी हरीपंत पाठवीले त्यात मागितलेले जिन्नस पाठविणेचे करावे विश्वासरावनी व बुवासाहेब यानी आपणास दंडवत सांगितले आहेत रा. रा. हरीपंत यानी रामराम सांगितले आहेत कळावे लोभ करावा हे विनंती

सही ईंग्रजी
जयसिंगराव घाटगे

लेखांक : ९५

कागल ज्युनिअर : ता. १३ आक्टोबर १८९७

यादी संस्थान कागल दि॥ श्रीमंत दत्ताजीराव घाटगे सर्जेराव यांचे संस्थानसंबंधी माहितीचे कागदाबद्दल माहे आक्टोबर सन १८९७ ईसवी.

१. श्रीमंत राणोजीराव घाटगे सरजेराव यांचे या नावे रघुनाथ बाजीराव पेशवे यांचे पत्र छ ६ माहे रबिलाखरचे.
२. श्रीमंत यशवंतराव घाटगे सरजेराव यांचे नावे बाळाजी बाजीराव प्रधान यांचे पत्र छ ५ रजेब सु॥ सन सीतेन मया व आलफचे
३. श्रीमंत यशवंतराव घाटगे सर्ज्याराव यांचे नावे बाळाजी बाजीराव प्रधान यांचे पत्र छ २० जमादिलावलचे.
४. श्रीमत राणोजीराव घाटगे सर्ज्याराव यांचे नाव श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाबाई साहेब माहाराजचे पत्र छ ३० रबिलाखरचे.
५. श्रीमंत जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव यांचे पत्र-गुलाम गोषरवा यांचे नावे छ ८ रजेब शके १७७३ दिल्ली मुक्कामचे
६. सदर प्रमाणे पत्र छ ७ जमादिलावलचे मु॥ दिल्लीचे शके १७६८ चे

७. दादा सो खासगी कारभारी नि॥ सरकार करवीर यांचे नावे-
सखाराम कृष्ण कारकुन याचे पत्र ता. २१ मे सन ईसवी १८६५

८. श्रीमंत नारायणराव घाटगे सर्ज्याराव यांचे नावे श्री. जयसिंगराव घाटगे सर्ज्याराव याचे पत्र छ ७ रबिलावलचे

९. श्रीमंत नारायणराव सो घाटगे सर्जेराव यांचे पत्र ता॥ १६।६।१८८१ ई॥ चे पांडोबा रेंदाळकर यांचे नावे.

१० दखलबाज यादी श्रीमंत राजश्री नारायणराव साहेब घाटगे सरजेराव यांचे हातची स्वदस्तुरची ६ याजवर लिहिलेली ता॥ १४।६।८१

११ श्रीमंत नारायणराव साहेब घाटगे सर्ज्याराव याचे नावे जयसिंगराव आबासो घाटगे सर्ज्याराव यांचे पत्र ता॥ १८ एप्रील सन १८८१ माहे मे ईसवीचे महाबळेश्वर मुक्कामचे

१२ सदर प्रो पत्र ता॥ २० मार्च्य सन ई॥ १८७९ चे

१३ श्रीमंत नाना सो धाटगे सर्जेराव सं॥ कागल यांचे नावे अंताजी रघुनाथ खासगी कारभारी नि॥ सरकार करवीर यांचे पत्र ता॥ १५ १८६५ ई॥ चे

१४ श्रीमंत नाना सो घाटगे सर्ज्याराव यांचे पत्र पांडुरंगपंत रेंदाळकर यास मीती वैशाख शु॥ १२ चे

१५ सदर प्रमाणे पत्र ता॥ मिती नाही

१६ श्रीमन्माहाराज छत्रपती बाबासो माहाराज छत्रपती यांचे नांवे श्रीमंत नाना सो घाटगे सर्ज्याराव यांचे पत्र सन १८६१ ईसवीचे

येणे प्रमाणे कागद सोळा असेत ता॥ १३ माहे आक्टोंबर सन १८९७ ईसवी मु॥ करवीर.

वासुदेव लिंगो कारभारी

१७ डे-नंबर $\frac{४०८}{२७।६।६०}$ चे थैली हासम साहेब याजकडील आलेची नक्कल

१८ जयसिंगराव घाटगे यांचे पत्र गुलाम गोषखा यांचे नावे छ ७ साबान

१९ यादी कागल सं॥ चे माहितीचे प्रकर्णी केलेची नक्कल.

२० ....पत्राची नक्कल

२१ देह झाडा शके १७६९

२२ वंशावळीचे माहितीच्या यादी दोन-२

२३ जयशिंगराव घाटगे यांचे पत्राच्या नक्कला गुलाम गोषरखा यांचे नावे व रावजी काकडे यांचे नावे,

२४ हु॥ जावक नंबर १२२।१०-६-५६ चा उतारा

२५ यादी-राजमंडळ पोलीटिकल सुपरिं. सो यांचे नावची रामचंद्रराव-राजाज्ञा हिंदुराव गायकवाड यानी लिहिलेली छ. १९ जमादिलावल

२६ शिवछत्रपतीचे पत्र पीराजी घाटगे सर्ज्याराव यांचे नावे पत्रे दोन छ ५ जिल्हेज १ चे व शके १५९० माघ शु॥ ७ सप्तमीचे १

येणेप्रमाणे कागद असे

वासुदेव लिंगो
कारभारी

सही इंग्रजी
सेक्रेटरी



लेखांक : ९६

कागल ज्युनिअर : ता. १५ सप्टेंबर १८९८

यादी माहितीचे टिपण संस्थान कागल ज्युनिअर येथील स्टांपाचे व नोंदणीचे वगैरे उत्पन्न हल्ली करवीर सरकारात जात असते ते तिकडे न जाता संस्थानाकडे जमा व्हावे अशाबद्दल संस्थानचा काय हक्क आहे याजबद्दल माहितीचे टिपण सन १८९८ ईसवी माहे सप्टेंबर

१. मूळ विज्यापुर बादशहाकडुन कुलबाब कुलकानु हल्ली पेस्तरपट्टीसह ६९॥ गावे कागलकर घाटगे यांचे घरात त्यानंतर श्रीमन्माहाराज शिवछत्रपती साहेब व करवीर माहाराज सरकारातुन त्याच गाव बा॥ कुलबाब कुलकानु व हल्ली पट्टी व पेस्तरपट्टी अशा शर्थीच्या सनदा व बाहादरी पत्रे वेळोवेळी मिळाली आहेत त्यापैकी सं॥ कागल ज्युनियर हा यक भाग आहे. मुळ सनदे वरून जे हक्क बाब या संस्थानास प्राप्त जाहाले त्यापैकीच हा यक भाग असले

मुळे मूळ सनदेने जे हक्क प्राप्त जाहाले ते या संस्थानासही सर्वस्वी प्राप्त जाहालेच आहेत.

१ कागल ज्युनिअर हे संस्थान जरी कागलचे ब्रांच आहे तथापी करवीर ईलाख्यातील बावडा–विशाळगड–ईचलकरंजी–तोरगल या संस्थानाप्रमाणे या संस्थानचा मान मरातब वगैरे चालत असोन अधीकार (दिवाणी फौजदारी) ही स्वतंत्र आहेत खेरीज सन १८६२ ईसवी सालात ब्रिटिश सरकारचा व श्रीमन्माहाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांचा जो तह झाला (बाबासाहेब माहाराज यांचे मोखत्यारीचे वेळेस जाहालेला) त्यात हे संस्थान इतर संस्थानाप्रमाणे स्वतंत्र गणलेले आहे.

१. आलीकडे १८९८ ईसवी मार्च महिन्याचे २३ चे तारखेस हल्लीचे दौलतीचे मालक श्रीमंत राजश्री दत्ताजीराव बाळासाहेब घाटगे सर्जेराव यास मोखत्यारी देणेत आली त्यावेळेस करवीर ईलाख्यातील इतर संस्थानाप्रमाणे हे संस्थान समजुन मोखत्यारीचे वेळेस ईतर संस्थानास जे दिवाणी फौजदारी मुलकी वगैरे अधिकार आहेत ते सर्व आधिकार ईकडे देणेत आलेले आहेत.

१. स्टांप व रजिस्ट्रेशनचे जे उत्पन्न आहे ते बाकीचे संस्थानचे जिकडील तिकडे चालते व तिकडे रजिस्ट्रेशन व स्टांपयाची खातीही स्वतंत्र आहेत करवीर दरबाराकडे यांचा संबंध नाही. उत्पन्न ज्याचे ते स्वतंत्रपणे घेतात. स्टांपाचे उत्पन्न न्यायखात्याचे आंगभूत असून रजिस्टार खात्याचा तरी न्यायाशी निकट संबंध आहे. व स्टांपाचे संबंधाने करवीर दरबाराकडून कंपनशेशनही मिळते.

१ मुख्य न्यायाचे काम जर ईकडचे इकडे सर्व बाकीचे संस्थानप्रमाणे चालते तर त्याचे आंगभुत स्टांप व रजिस्ट्रेशनचे उत्पन्न ईकडचे ईकडे असणे न्यायाने जरूरीच आहे.

येणेप्रमाणे हकीगती वरून स्टांप व रजिस्ट्रेशन या संस्थानचे स्वतंत्रपणे इकडे वहिवाटीस असणे जरूर आहे.

सेक्रेटरी सो सं॥ कागल ज्युनियर याजकडे माहिती करिता रवाना

ता. १५ सपटंबर सन १८९८ वासुदेव लिंगो कारभारी

लेखांक : ९७

कागल ज्युनिअर :

परगणे कागलच्या दिवाणाकडून श्रीलक्ष्मीच्या पुजेनंतर परगणे मजकूरचे मोकदम व गावातील रयत याजकडे लिहिण्यात येते सु॥ खमस आशर व आलफ इ. स. १६१५ तारीख १३ जमा दिलावलचा बादशाही फर्मान तारीख रमजान रोजी येऊन दाखल झाला त्यातील मजकूर येणे प्रमाणे :—घाटगे यानी बादशाही दरबारी अर्ज केला की, परगणे मजकूरची देशगी पीढी दर पिढी आमच्या वडलांच्या नावे चालू आहे. माजी बादशाहांच्या वेळी जेव्हा तेथे कोणी सैन्याने लढाई उठविली होती तेव्हा बादशाही सैन्याकरिता आमचे वडील लखोजी व राघोजी यानी रसद म्हणजे सैन्याकरिता हरयेक प्रकारची पुरवठा घेऊन गेले होते. पुढे उठविलेली लढाई मिटविल्या नंतर हुजुराकडून आम्हास घाटगेची पदवी मिळाली पुर्वी यांचे नाव सुर्यवंशी होते. तेव्हांपासून हीच पदवी पिढी दर पिढी म्हणजे लखोजी, त्याचा पुत्र खेलोजी, त्याचा पुत्र लोकाजी, त्याचा पुत्र संभाजी, त्याचा पुत्र विठुजी, त्याचा पुत्र खोताजी, त्याचे पुत्र रामोजी, तुकोजी, जाखोजी व विठुजी याच्या नावी चालू होती त्यापैकी जाखोजी व विठुजीस देशगीचे काम पाहाण्यास नेमीले. आणि रामोजी व तुकोजी हे चाकुरी करीत होते. पुढे जाखोजी व विठुजी हे उभयता येकमेकात भांडुन आपल्या वडिलाजवळ आले. अशावेळी देशगीचे काम पाहाण्यास कोणी मनुष्य नसल्यामुळे मौजे डिगरजात राहाणारा बाहादर कमानदार होता व पुर्वी त्याने देशगीचे व वसुलाचे काम चालविले होते त्यास देशगीचे काम चालविण्यास ठेविले तो मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र शिकुंदर हा काम चालवित होता त्यानेही काही फितुर केल्यामुळे बंधु तुकोजीचे मुलगे विरोजी हे काम चालवु लागले पुढे सैफ-ऐनल-मुलुकच्या लढाईत परगणे मजकूर चा मूलुक खराब जाहिल्यामुळे विरोजीची वाईट आवस्था जाहली म्हणून पुन्हा शिकंदर मजकुर काम चालवू लागला आणि रामराज्याच्या लढाईत आमचे वडील पडले. पुढे विठुजी घाटगे

(अपूर्ण)

लेखांक : ९८

कागल ज्युनिअर :

यादी वंशावळी घाटगे देसाई प्रा कागल मुळ पुरुष राऊजी बाजी याचे लेक कृष्णाजी बाजी घाटगे याजपासून विस्तार—

वडील पदाजी बाजी घाटगे याचे पुत्र ३

१ नरसोजी सरज्याराव वडील

१ कृष्णाजी बाजी उर्फ रत्नोजी

१ आलसोजी बाजी तीसरे

वडील नरसोजी सर्ज्यांराव याचा विस्तार यांस बायका ३

१ पहिले बायको जिऊबाई ईजला

१ पदाजी बाजी

१ आबाजी बाजी

० गगुंबाई कन्या

० दुसरे बायकोस पुत्र नाही कन्या एक होती.

२ तिसरी बायको गंगुबाई यास पुत्र

१ सिवाजी बाजी

१ आबाजी बाजी

० कन्या आवुबाई

लेखांक : ९९

कागल ज्युनिअर :

पिराजी घाटगे याजकडे—

तुम्ही बादशहाच्या कृपाळू दृष्टीत पुर्ण जाहाले असे तुम्हास कळविण्यात येते की— तुम्ही जो अर्ज पाठवीला तो येऊन पोचला त्यात किल्लेदार मान घेऊन आपल्या वतनास पळून जाणे, किल्ला मोकळा पडले रयताची दुर्दशा होणे सीरपत याने खोट्या रीतीने चोहीकडून येऊन ठाणे कोल्हापुरावर हल्ला करणे हा यकंदर मजकूर लिहिलेला समजला. याजवरून बादशाही हुकूम सादर

होत आहे की, सैन्य येवून पोचे पावेतो ज्याप्रमाणे तुमच्या हातून किल्ल्याचे संरक्षण होत असेल त्याप्रमाणे करावे आणि हुजुराची मेहेरबानी तुम्हावर दिवसा-नो दिवस वाढत आहे असे समजावे. तारीख १२ सफर सन आहादे.

लेखांक : १००

कागल ज्युनिअर :

वजारतमाब राजश्री

संताजी घाटगे सर्ज्याराव गोसावी यासी मो हु॥ल हजरत सातकी प्रत माहाराज सिवराज छत्रपती तुम्ही फौज सुद्रा पटा-अभिषेकाचे वेळेस हाजर होवून आला. कार्यसिद्धी आनंदनाम संवत्सर श्रावण शु॥ २ प्रत जाहाली ते समई चवकसी पाहाता तुम्ही व तुमचे वडील भानजी घाटगे सर्जेराव यासी देव ब्राह्मण राज्याविषयी कितीक उपयोगी पडले. हजरत साहेब यांचे दरबार हरयेक विषी मेहनत केली ती मनास आणली व तुम्हास हजरत साहेबानी वतन जाहा-गीर करून सुटीसानकी फरिमाण करून पेशजी दिले आहेत ते अवलोकन करून स्वामी तुम्हा वरी कृपाळू होऊन सनदा सादर केल्या आहेत.

१ मळवडी बुध याचे गाव को। नलगुंद देहे दरोबस्त देसकत सुटी सानकी

१ प्रा। कागल देहे कर्यात ६१॥ यात देशमुखी नाडगौंड सरनाईकी सर देशमुखी सर देश कुलकर्णी सुटी सानकी दरोबस्त चालत आहे.

१ सदरहु तुम्ही याल तेव्हा भेटी समई

१ च्यादर

१ निरोपा समई पोशाख सनग

१ कंठी तुरा मोत्याचे

१ घोडा

१ ताजीम समक्ष

येणे प्रमाणे सदरी प्रमाणे तीन कलमाचा उपभोग करून स्वामीच्या राज्याची कुमक करून पुत्र पौत्रादी वंश परंपरा आनुभवुन सुखरूप राहणे. यात कोणी वंशजे होइल ते चालवीतील यात कोणी केले तर आपले पुर्वजाचे शपथ जाणे लेखन सीमा मोर्तबा

लेखांक : १०१

कागल ज्युनिअर :

राजश्री पीराजी सर्ज्याराव घाटगे गोसावी यासी

अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य प्रती राजश्री राजा शाहु छत्रपती उपरी तुम्ही विनंती पत्र पाठवीले ते प्रविष्ट झाले लेखनार्थ अवगत जाहला व राजश्री राव जाधव यानी तुमची........निष्ठा सांगितली निश्चय उद्याचा केला त्यावरून स्वामी बहुत संतोषी जाहाले अैसीयास तुम्ही स्वामीची ममता धरिता याकरिता स्वामी तुमची भेटी घ्यावी हेच आवश्यक आहे तरी स्वामी उदेक........ समई स्वार होऊन येतात दुसरा अर्थ काही नाही–तुम्हास कळावे म्हणुन लिहिले आसे प्रातःकाळी स्वार होऊन येतात येविषयी संदेह न धरणे तुम्ही स्वामीस ....करिता यास्तव स्वामी हे तुम्हास च्याहातात दुसरा अर्थ नाही जाणीजे बहुत काय लिहिणे

पो १ शाबान

लेखांक : १०२

कागल ज्युनिअर :

राजेश्री राणोजी बावा सर्ज्याराव घाटगे गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ शेषो नारायण आशीर्वाद विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत गेले पाहिजे. विषेष ईकडील वर्तमान सविस्तर सौभाग्यवती बाईचे पत्री लिहिले आहे त्यावरून आवगत होईल वीस रोजाचा वायेदा राजश्री यशवंतरायानी पुणेस यावीयाचा केला वीस रोज होत आले ढालायेत आद्यापी आहेत आणखी येक पत्र श्रीमंताचे यशवंत रायास जलदीने येणे म्हणोन पाठवून द्यावे ढालायेत राहिले आहेत पत्र घेवून कागलास जातील या उपरी तेही यावीयाचे करतील पत्र मात्र श्रीमंताचे पाठवणे जासुद पत्र लिहून श्रीमंताकडे पाठवीले आहेत. लोभ असो दीजे हे विनंती

लेखांक : १०३

कागल ज्युनिअर :

राजेश्री यशवंतराव आपा घाटगे सर्जेराव गोसावी—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने।। दिनकरराव गाईकवाड राम-राम विनंती येथील कुशल ता। १९ माहे रमजान पर्यंत वर्तमान यथास्थित असे. विषेष आपण पत्र पा।। ते पावले लिहिला मार कळो आला. बाळाबाई आक्का साहेब यासी हजरत पीर गैबी यांचे उरसाबद्दल मिठाई वगैरेची यादी आलाहिदा व तीर्थस्वरूप श्रीमन्माहाराज मातुश्री दिवाण सा। यासी विनंती पत्र राजेश्री चिटकोपंत यास समागमे पाठवीले ते प्रविष्ट करून यादी प्रमाणे मिठाई वगैरे सामान गुदरून आज्ञोत्तर मशार नील्हे समागमे पा।। आहे मौजे बाचणी व खेब-वडे येथील सीमांतराचे चौकशीस हुजुरून आज्ञापत्रे व कारकून रवाना जाहाले आहेत व आपु आमत्या शेंडूरकर याज विषयी लि।। त्यास आमत्या मार यासी नागदेव वाडीहून हुजूर आणवणे विषयी तेथील वहिवाटदार यांसी ताकीद जाहाली आहे. हुजुर आणवुन चौकशी करणेची आज्ञा जाहाली आहे सीमांतरचे चौकशीस कारकून रवाना झाले आहेत येवून पोहचतील वरचेवर पत्र पा।। संतोषवीत जावे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १०४

कागल ज्युनिअर :

राजेश्री यशवंतराव सर्ज्येराव घाटगे गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राज्यमान्य श्री. नारायणराव व्यंकटेश आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत जाणे विशेष राजश्री राणोजी घाटगे यांचा व तुमचा कज्यानिमित्य तुम्ही श्रीमंता पावेतो गेला. त्यांचा फडशा न होता निघोन माघार आलेत या करिता विषाद जाऊन विलयास जावयाचा प्रकार दिसून आला. तुमच्या आमचा स्नेह या करिता नाना प्रकारे सांगोन यांचे मनोदया नुरूप आपले आज्ञे प्रमाणे करून देतो म्हणोन श्रीमंतापासी करार करून समागमे घेऊन आलो ये विषयीच

विचार बोलावा लागतो तर तुम्हा कडील कारकुन शाहाणा मनुष्य पाठवून देणे छ ५ माहे सवाल मु॥ ईचलकरंजी बहुत काय लिहिणे.

लेखांक : १०५

कागल ज्युनिअर :

राजश्री यशवंततराव घाटगे सर्ज्येराव गोसावी यासी

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत लक्ष्मणराव सिंदे सेना खासकील रामराम विंनंती येथील खुशाली ता। छ २४ माहे शवाल जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असले पाहिजे विषेष चिरंजीवी आकुबाईचे विवाह लग्न फाल्गुन शु॥९ नवमी गुरुवारी करणे निश्चय केले आहे शरीर संबंध चिरंजीव राजश्री शाहजीराव भोसले आक्कलकोटकर यास नेमिले असे. आपण सहकुटुंब सहपरिवार येऊन मंडप शोभायमान केला पाहिजे. हा कार्य आपल असता पत्री उपच्यार लिहीणे लागत नाही. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विंनंती.

लेखांक : १०६

कागल ज्युनिअर :

तीर्थरूप मातुश्री नानीबाई सा।
घाटगे वडिलांचे शेवेशी

आपत्या सौ. बाईजाबाई शिंदे चरणावर मस्तक ठेवून दंडवत विज्ञापना येथील कुशल ता॥ ११ माहे साबान वडिलांचे आशिर्वादे करून यथास्थीत असे. विषेष वडिलाकडोन छ रजेबचे पत्र आले ते प्रविष्ट जाहाले त्यात मजकूर की करवीरकर माहाराज यानी दंगा करून चिकलीत आमल बसविला याज करिता निपाणीस येवून राहिलो म्हणोन विस्तारे करून लिहिले ते मनन होवून चित्तास बहुत खिन्नता प्राप्त जाहाली आहे आपले कडील पत्र आले ते सरकारासही दाखविले. सरकारानीही पाहुन तेच पत्र बजीनस ईंग्रज बाहादर याचे वकिलाकडे पाठविले त्यानी पाहुन बहुतखातर जमा केली आहे. आम्ही पुण्याचे

साहेबास लिहून येविषयीचा बंदोबस्त करवुन मातुश्री साहेबाची खातरजमा करवितो म्हणोन सरकारचे येथे वकिलानी खात्री केली आहे. आपल्यास कळावे. बंडु बाळ यानेही करवीरकर माहाराजानी उपद्रव केल्याचा मजकूर लिहिला आहे त्याजवरून ही समजले त्यास चिंता नाही येथे ईंग्रजाकडील वकिलानी सरकारची खात्री केलीच आहे व ईकडुन सरकारकडूनही वकिलास निकड आहेच त्याचे म्हणणे आहे की तेथे मातुश्री साहेबाची खातरी करून त्याजकडील पत्र राजीनाम्याचे आणवून देतो म्हणोन करार केला आहे हे न जाहल्यास त्याचा बंदोबस्त करून देवु यैसे बोलण्यात आणिले आहे. आपल्यास कळावे. चिरंजीव बाबासाहेबही तिकडील काळजीमुळे बहुत उदास आहेत. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना



लेखांक : १०७

कागल ज्युनिअर :

दरीविला साहेबाचे हुकुम घेवून आम्ही करविराहुन निघोन कागलास येवून आपले वाड्यात राहिलो आहो. श्री मन्माहराज याजकडुन आम्हास ईजा जाहली ये विषीची याद आलाहिदा आहे. त्याजवरून सर्व ध्यानास येइल कागलचे मोबदला नऊ गाव व चिरंजिवास दुधा बद्दल येक गाव ईनाम येकूण दाहा गाव दिले होते त्याची जप्ती केली. सात वर्षे जाहाली. आलीकडे चार महिने ते समई कागलचे वाड्यातील जिंदगी होती ते दरोबस्त लुटून नेली नंतर करवीर मुक्कामी स्वारी आल्यावर तेच दिवशी आरबाचा पाहारा बसविला कारण काय म्हणोन विचारले असता तो ....तुम्ही कागलचे वाड्यात का ठेविले याचा जाबसाल जाहाला पाहिजे तेव्हा दोन तीन दिवस पाहारा बसवुन बंदि केली तेव्हा वीस हजार रुपये घेवून पाहारा उठविला याचप्रमाणे आम्हास उपद्रव जाहाला ये विषयी साहेबी दर्याप्ती करून हा गाव व जिंदगी वीस हजार रुपये माघारे देविले पाहिजे ये विषयी आर्ज करावया करिता वकील पाठविले आहेत आर्ज करतील मेहेरबानगी होवून बंदोबस्त करून दिल्हा पाहिजे.



लेखांक : १०८

कागल ज्युनिअर :

दरवीला आम्हास करवीरकर माहाराज छत्रपती याजकडोन ईजा जाहाली ये विषयीचा सर्व मजकूर राजश्री दौलतराव दाजी घोरपडे आमीरूल ऊमराव यानी साहेबास जाहीर केलेच असेल. अलीकडे च्यार महिने झाले. कागलचा वाडा लुटोन नेला व वीस हजार रुपये पाहारा बसवुन घेतले तेव्हा ईजा सोसवेना याजकरिता मेहेरबान बेबर साहेब करवीर मुक्कामी आले समई कानावर मजकुर घालुन आज्ञा घेऊन निघालो. कागलास आपले वाड्यात येवून राहिलो आहो ये विषयी थैल्या देवून वकील मेहेरबान कमीशनर सा। बहादुर याजकडे रवाना केले आहेत त्यास साहेबी हा मजकुर ध्यानास आणुन आमचा बंदोबस्त होऊन येई ते करणे. साहेबाकडे करवीर इलाख्यातील आम्ही आहे असे आंदेशा साहेबाचे मनात असल्यास दर्याप्ती करून आमचा बंदोबस्त गाव खेडी जप्ती केली आहेंत ती व नागाव वाड्यातील व वीस हजार रुपये माघारे देवावे आसाहेबाकडे सरदारीचा पेशा तेव्हा आम्हा लोकाविषयी मेहेरबानगी करणे जरूर.

लेखांक : १०९

कागल ज्युनिअर :

सेवेशी विज्ञापना ऐसीजे – आज्ञा जाहाली होती त्यास बेळगावास चित्रगार नाहीत येथे नवलगुंदकर चित्रगार आहेत ते जिन्नस चांगला करितात त्यास तबकडी करणेचे जरूर असलेचे आज्ञा आले प्रमाणे किंमतीचा विचार ठरवून मागाहून लिहितो द्यावे लागतात. जिन्नस हातास आलेवर द्याव लागल. परंतु चितारी मात्र कसबी आणि बहुत केलेले खातर जमेचे आहेत तबकडी किंमत किती पडती हे सरकारचे लक्षात असेल येथे हिशेब करून शेवेशी लिहितो येथेच करवीली असता तर बर होईल बेळगावास चित्रगार नाहीत यास्तव लिहिले असे. बेबर साहेब यांचा आग्रह येविषयी पराकाष्टेचा आहे परंतू त्याचे चित्तानरूप कडेस जाईल हा नेम दिसत नाही. कयामेटी संबंध कुंपणी सरकारास दरमहा आलेले सरदार वगैरे मिळोन बारा हजार रुपये

माहाल खर्च पडत आहे पुढे कसा घाट उतरतो पाहावे कयामेटी सुरू झाले नंतर होईल तो मजकुर शेवेशी वरचेवर लिहितो वरकड मजकूर बसापा विनंती करील त्यावरून निवेदनात येईल. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना



प्रतिनिधी दप्तर

यापुढील पत्रे पंतप्रतिनिधी विशाळगडकर, यांच्या दप्तरातून उपलब्ध झाली आहेत. करवीरचा इतिहास आणि छत्रपतींचे घराणे यांच्याशी प्रतिनिधी घराण्याचे संबंध अतिशय निकटचे होते हे सर्वविदित आहे. त्या दृष्टीने प्रस्तुत कागदपत्रांचे महत्त्व लक्षात येऊ शकेल.

—संपादक

लेखांक : ११०

प्रतिनिधी दप्तर : ता. २९ ऑगस्ट १६९२

स्वास्तीश्री राज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे आधिक भाद्रपद बहुल त्रयोदशी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती स्वामी यांनी रुद्राजी बीन सोनजी साळवी यास दिल्हे वृत्तीपत्र ऐसीजे तुम्ही पुरातन स्वामीचे सेवक येकनिष्ठपणे सेवा करीत आहे. स्वामी सेवेचे ठायी बहुत येक चित्त यास्तव तुमचे उर्जीत करून वंशपरंपरेने चालवणे हे स्वामीस आगत्य या करिता स्वामी तुम्हावरी कृपाळू होवून तुम्हास नुतन ईनाम मौजे फुणस तपे हरचेरी सुभा प्रांत राजापूर देखील वाडीया देह १ येक रास कुल बाब कुल कानु हल्ली पटी व पेस्तरपटी झाड झाडोरा पडिले पान सहीत खेरीज ईनामदार व हकदार करून गाव ईनाम दिल्हा असे चतुःसीमा भूमी पुर्वील मर्यादेप्रमाणे गाव आपले स्वाधीन करून घेवून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने ईनाम आनुभऊन सुखरूप असणे. या वृत्तीस जो कोणी हिंदु अगर मुसलमान होऊन ईस्कील करील त्यास आपल्या महीन....ही आण असे हे पाप जाणोन तुम्हास वृत्ती सुरळीत चालवीतील. जाणीजे निदेश समक्ष मोर्तबा असे.

संमत सचीव

तारीख २६ जिल्हेज सु॥ सलास तीसेन आलफ

लेखांक : १११

प्रतिनिधी दप्तर : ता. ४ मार्च १६९३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगिरानाम संवत्सरे फाल्गुन शुद्ध सप्तमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती यानी मश्रुल विठोजी केसरकर पंच .... नामजाद किले पावनगड यासी आज्ञा केली ऐसीजे किले मजकुरास मानेदीन फौजेनिशी येऊन वेढा घातला आणि बैसला कित्येक प्रकारे किल्यास लगट केलां होता यासी तुम्ही हिंमत धरून लोकांचा दिलासा करून शर्तीनिशी भांडण दिले मोर्चा मारून चालविला पुढेही गनीमाचा हिसाब धरीत नाही हे वर्तमान राजेश्री रामचंद्रपंडित अमात्य

यानी लिहिले त्यावरून कळो आले. तुमचा मुजरा बहुतच जाहला तुम्ही कदीम व कामाचे पहिलेपासून आहा. तुम्हा पासून स्वामी कार्यास व कस्तीस अंतर पडणार नाही हे स्वामीस बरे विदीत आहे या प्रसंगी लाजीम खर्च केला हे गोष्टीवरून स्वामी तुम्हावरी संतोषी आहेत तुमचे उर्जीत करावयासा राजेश्री रामचंद्र पंडित अमात्य यासी आज्ञा केली आहे ते करितील तुम्ही आपले समाधान असो देणे व लोकांचे समाधान करणे आणि रात्री दिवस हरकीस्त करून गलीमास मारून काढणे स्वामी त्या प्रांती येतील तेव्हा तुमचे बहुता प्रकारे गोमटे करितील जाणीजे निदेश समक्ष मोर्तब

लेखांक : ११२

प्रतिनिधी दप्तर : ता. १३ नोव्हेंबर १६९३

स्वस्ती श्री राज्याभिषेक शके २० श्रीमुख नाम संवत्सरे कार्तिक बहुल दशमी रवीवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजाराम छत्रपती यांनी राजश्री कासी रंगनाथ उपनाम ओर्पे यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही या राज्यातील पुरातन सेवक राजेश्री कैलासवासी छत्रपती स्वामीचे कारकीर्दीस कष्ट मशागती केल्या आहेत सांप्रत किले पनाळी यासी मोगल गनीम........वेढा घालून बसला होता. त्या प्रसंगी तुम्हास कित्येक स्वामी कार्यानिमित्त किले मा। नामजाद ठेविले होते. तेथे तुम्ही स्वामी सेवा येकनिष्ठेने केली स्वामी कार्याचे आणि स्वामीच्या पायासी येकनिष्ट आहा या करिता स्वामी तूम्हावर कृपाळू होऊन नूतन ईनाम दिला असे जमीन चावर

ता। मलकापूर सुभा प्रांत	सुबा प्रांत पनाळपैकी
मा। पैकी जमीन चावर ०।।१०	जमीन चावर ०।२०

येणेप्रमाणे येक चावर जमीन आपल्या राज्यात बिघावणीचा तह चालत आहे तेणे प्रमाणे हे ईनाम दिल्हा असे मलकापुर प्रांते भात रोपे तीस बिघे जमीन दिल्ही असे ये जमीनीचे कीर्दीस पाहिजे ते सालाबादप्रमाणे दिल्हे असे याच्या सनदा आलाहिदा दोही सुभाच्या देशाधिकारी यास सादर केल्या असत त्याप्रमाणे सदरहू जमीन तुम्हास मोजून बिघावणी करून नेमून चतुः-

सीमा करून देऊ याचे दुमाले करितील ते घेऊन पुत्रपौत्रादी वंशपरंपरा अवलादी अफलादीस उपभोग करणे जाणीजे. लेखनालंकार मोर्तबा असे

लेखांक : ११३

प्रतिनिधी दप्तर : ता १० मे १६९४

राजश्री भालजी रघुनाथ सुबेदार व कारकून हाल व इस्तकबाल सुभा मलकापूर गोसावी यास अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य सेवक रामचंद्र निलकंठ आमात्य नमस्कार सु॥ आर्बा तिसैन अलफ काशी रंगनाथ कुलकर्णी मौजे वळूर ता॥ मलकापूर किले पन्हाळा येही हुजूर येऊन विनंती केली जे म॥ वरकड गावगना गाव कुलकर्णी मिरासदार आहेत. त्यास इनाम जमीन आहे मौजे म॥रांस कुलकर्णी यांस सालाबाद इनाम नाही. अशास मौजे म॥र चे कुलकर्णी आपाजी सिवदेव व बाबांजी सिवदेव देश कुलकर्णी किले पन्हाळा याची मिरास होती. त्याने आपल्या संतोषे साल म॥र आपणास विकत दिले. त्याचा महजर आणून सेवेसी विदीत केला, त्याजवरुन स्वामीनी आपले माथा सेरणी ठेऊन मौजे म॥चे कुलकर्णी आपल्या दुमाला केले. परंतु इनामा खेरीज आपला आवकांत चालत नाही. तरी स्वामीने कृपाळू होऊन मौजेम॥रचे गाव कुलकर्णीस आपणास इनाम देविला पाहिजे. म्हणून त्याजवरून मौजे म॥रास सालाबाद नाही या करिता नवा इनाम जमीन रक्कम कुडो १० दहा

येकूण पाच कुडवी दोनी यास त॥

गावरान मिळून सेत	वाडी दरवेश मिळोन हाले
बैहीरव पैकी नजीक इनाम पटी	सेत........पैकी नजीक
वाजर जमीन कुडो ५ पाच	इनाम देश कुलकर्णी जमीन
येकूण पाच कुडवे	कुडो ५ पाच

येणेप्रमाणे जमीन रक्कम कुडो दाहा एकूण पाच कुडवी दोनी नवा इनाम करून दिल्हा असे. सदरहू प्रमाणे म॥ईलेचे दुमाले करून पुत्र पौत्री यास चालविणे तालीक लेहून घेऊन असल म॥इले जवली भोगवटीयास परतोन देणे रु. २५ रमजान निदेश समक्ष मोर्तब

लेखांक : ११४

प्रतिनिधी दप्तर : ता. १५ ऑगस्ट १६९५

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री रामचंद्र निलकंठ आमात्य सु॥ सीत तिसेन आलफ त॥ गावगनानी मौजे पुसाल कर्यात नेवरे यास आज्ञा केली यैसीजे मौजे म॥रचा कुलकर्णाचा कथला खेरामध्ये व पुसालकरामध्ये लागला होता म्हणून हरी सोमनाथ पुसालकर हुजूर येऊन विदीत केले. त्याजवरून तुम्हास लिहिले आण मनास आणणेस जे आपल्या मनास आणिता खेराचे कुलकर्णी नव्हे पुसालकर कुलकर्णी लिहितात असे केले त्यावरून हरी सोमनाथ यास कुलकर्ण सांगोन पाठविला आहे. याचे हाती लिहिण्याचे काम घेत जाणे. पहिला लिहिणार हुजुराने पाठविला असे तो दूर केला. याचे हातून सेवा घेत जाणे दुसरीयाचे हाते सेवा घेत न जाणे. म्हणून पुसालकर यास पत्र दिल्हे होते. त्याजवरी कर्यात मजकुरचे देशक व खोत देशकाणी व मोकादम हुजुर येऊन विदीत केले की मौजे मजकूरचे कुलकर्ण खेराचे नव्हे व पुसालकराचे नव्हे कुलकर्ण भिन्न आहे. त्यास हबसी यानी कुल-कर्णी म्हणोन खंड घेतला. याजकरिता गावातून निघोन गेले आहेत. वतनदार कुलकर्णी गावात्र येईतो आम्हां कुलकर्णी याजकडे गावकुलकर्ण चालवावे असे मुलकांत चाल आहे. त्याजवरून मनास आणिता मौजे मजकुराचे वतनी कुल-कर्णी फाटकांचे असे कागदोपत्री व साक्षीतील अन्वय पाहता फाटकाचे कुलकर्णी असे खरे केले. त्यास वतनदार हजर होय तो पावेल तो खेर देश कुलकर्णी याजकडे मौजे मजकूरचे कुलकर्णाची सेवा घेत जाणे. वतनदार कुलकर्णी हुजूर येऊन आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करणे. कुलकर्णास मुशारा पहिलेपासून असेल तो देशकुलकर्णी यास देणे. पुसाळकर याजपासून कुलकर्णीचे कामकाज घेत जाणे जाणीजे. छ. १४ मोहरम निदेश समक्ष मोर्तब असे.

लेखांक : ११५

प्रनितिधी दप्तर : ता. १२ मार्च १७०१

स्वस्तिश्री राज्यभिषेक शके २७ विक्रम नाम संवत्सरे फाल्गुन शु॥ १४ सौम्य वासरे क्षत्रियकुलावंतस श्री राजा शिवछत्रपती यानी विठोजी केसरकर

नामजाद किले पावनगड यासी आज्ञा केली अैसीजे—आम्ही हमेशा कस्त करून गनीमास नतीजा पाठविता येक दोनी वेळ मोर्चा मारिला औरंगजेब आला तरी........ द्यावा अशी उमेद धरिता म्हणून हे वर्तमान रघुनाथराव फडणीस यांनी विदीत केले त्यावरून तुमचा मुजरा जाहला ऐसीयास तुम्ही येक निष्ठ सेवक तैसेच आहा या उपरी औरंगजेब आला आहे तरी याचा हिशेब न धरिता स्वामीचा जागा जतन करणे स्वामी उर्जित हरबाब करितील दिलासा असो देणे लेखनांलकार मोर्तबा

लेखांक : ११६

प्रतिनिधी दप्तर : ता २८ एप्रिल १७०१

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके २७ वृषनाम संवत्सरे वैशाख शु॥ १ सोम वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपती यानी विठोजी केसरकर यासी आज्ञा केली—अैसीजे किले पावनगडास गनीमाने मोर्चे चालवून यलगार केला आहे त्यास तुम्ही जमावानिशी किले मजकुरी राहून अलग नौबत चौकी पहारा स्वामी सेवा करिता हा अर्ज राजेश्री त्रिंबकजी ईंगळे हवालदार किल्ले पनाळा व कानोजी ईंगळे हावालदार किले मजकूर यांनी स्वामीचे शेवेशी लिहिले त्यावरून तुमचे शेवेचा मुजरा जाहाला तुम्ही स्वामीचे राज्यातील कदीम सेवक आहा पुढेही गनीमाचा हिसाब न धरिता स्वामीसेवा करीत जाणे स्वामी तुमची हरबाब मदत करितील. उर्जीत करून गोमटे करतील सकल विषयी आपले समाधान राखोन स्वामीची जागा जतन करणे आणि आपले सेवेचा मुजरा करून घेणे जाणीजे नीदेश समक्ष मोर्तबा

लेखांक : ११७

प्रतिनिधी दप्तर : ता. १० एप्रिल १७०५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ३१ पार्थीव नाम संवत्सरे चैत्र बहूल त्रयोदशी भौमवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपति याणी राजश्री आपाजी विश्वनाथ नामजाद व कारकून वर्तमान व भावी ता॥ संगमेश्वर यासी आज्ञा केली यैसीजे.

बाळाजी गोसावी, विसो बलाल भिडे याचे पुत्र याणी हुजूर स्वारी सनीध किले प्रसिद्धगडचे मुकामी येऊन विनंती केली की आपले घरामध्ये धर्मादाय आपले पिते विसो बलाल यास दाहा मण व आपणास दाहा मण व बंधू नरहर भट यास दाहा मण येकूण दीड खंडी कोठी यादे दिल्हा आहे. तो काही येक दिवस पावत होता सांप्रत ताम्राचे आगमन कोकणात जाहाले त्या दिवसापासून अविछिन पावत नाही. कुटुंब वछल आहो. मौजे माभले ता॥ मजकूर येथे राहोन स्वामीस त्रिकाल कल्याण चिंतोन राहिलो आहे. स्वामी धर्म परायण आहेत. तरी इनाम करून देऊन कुटुंबाचे संरक्षण होय ते केले पाहिजे. म्हणोन विदीत केले. त्यावरून मनास आणिता बाळाजी गोसावी बहुत थोर भले आहेत. यास धर्मादाय आहे तो फिसरती करिता सुरलीत पावत नाही. कुटुंबाचे स्वास्थ चालली पाहिजे. याकरिता यास व याचे पिते व बंधु यैसे त्रिवर्गास दीड खंडी तांदूळ धर्मादाय आहे ते दूर करून हाली यास नूतन इनाम मौजे माभले ता॥ मजकूर या गावा पैकी दाभोली करी ७२ बाहात्तर रास दिल्हे आहे. तरी सदरहू बाहत्तर करीची जमीन पडी पैकी विसापांडाच्या बिध्याने...............चौ प्रतीची राजश्री आणाजी पंताचे कारकीर्दीत जमिनीस धारा व गल्यास नीर्ख आहे त्याप्रमाणे चतु:सीमा मौजे मजकूर पैकी नेमून देऊन यास व याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने इनाम कुलबाब कुलकानू देखील हली पटी व पेस्तर पटी खेरीज हकदार व इनामदार करून खुरक्षीत चालवीत जाणे. वर्षवर्षी नवीन पत्राचा अक्षेप करीत न जाणे. या पत्राची प्रती लेहून घेऊन असल पत्र भोगवटी यास बाळाजी गोसावी याजपासी परतोन देणे जाणिजे लेखनालंकार.

लेखांक : ११८

प्रतिनिधी दप्तर : ता. २९ डिसेंबर १७०६

राजश्री सुभेदार व कारकून वर्तमान सुभा प्रांत राजापूर गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य सेवक परशराम त्र्यंबक प्रतिनिधी नमस्कार सु॥ सन सबा मया अलफ प्र॥ गणेश भिकाजी व संभाजी व चिमणाजी बलाल व गुणाजी भास्कर शेणवी प्रभावलीकर याही सारंगडचे मुकामी हुजूर येऊन विदीत केले की कसबा प्रभावली येथील कुलकर्ण व मामले याची

हासमनि........जकायतीचा पतके घाट गा....व ...आडमार्ग कातरकडा असे वतन पुरातन आदलशाई कालकीर्दी पासून पिडीदरपिडी चालत आले आहे. त्यास देशकुलकर्णी दरम्यान कसबेचे कुलकर्ण आपले वतन पुरातन आदल-शाही कालकीर्दी पासून अलीकडे राजश्री थोरले कैलासवासी स्वामीस हा देश आजीबी जाहाला. राजश्री रावजी सोमनाथ मामलाचा सुभा चालवीत होते. तेंव्हा आपले वडील भानजी लख सेणवी व सिवाजी माय शेणवी याणी कुलकर्ण चालविले. त्या उपर राजश्री तुकाराम यासी सुभा जाहाला ते समई काही दिवस चालविले. त्या उपर राजश्री आणाजी पंत सुरनीस या प्रांती........ तह करून आले माहालो माहलचे कागदपत्र कैद केले तेंव्हा कसबेचे कागद तुकोपंती कैद करून............चोरी मारी बाल्टं काढून भागविले त्यामुळे खराबी होऊन गेलेसे जाहाले. कोठे उभे राहावयास जागा नाही........हैराण गत जाहाली. तेंव्हा आम्ही आपला पोट भरावयास जागा जागा स्वामी सेवा करून राहिलो. त्या दारभ्य देश कुलकर्णी कसबेचे कुलकर्ण बळेच करून खात आहे. त्यास तीस पस्तीस वर्ष होऊ आली.

स्वामीच्या राज्यात कित्येकास नवीन वतन जाहाली. आम्ही भाऊबंद देखील स्वामी सेवा एक निष्ठेने करीत आहो. इतकी फिसादात जाहलिया इना-मास अंतर जाहाला नाही. तरी स्वामीनी कृपाळू होऊन आमचे कसबेचे कुलकर्ण आमचे दुमाला करून स्थापना केली पाहिजे. म्हणोन त्यावरून केसी नरसो देशकुलकर्णी यासी तलबा करून हुजूर आणिला तेंव्हा चुकविलं. आला नाही. त्या उपर मागती तलबा केलियावरी आबाजी साबाजी व कासी साबाजी त्याचा चुलत भाऊ सारंगगडास आले. त्याही रदबदल केली की हमेशाही व गावच वतन फार मनसुपीस जमा कराव लागतात. त्याबद्दल राजश्री नानाजी दत्तात्री त्या प्रांताचे कारभारास रत्नागिरीस रवाना केले. बरोबर दिले पाहिजे व नानाजी पंती रदबदल केली की उभयता समागमे द्यावे. रत्नागिरीस मनसुबी करील म्हणोन घेऊन गेले. तेथे मनसुबी होता न्यायास सेणवी गेले नाहीत. सडिया साक्षीस वतन फार पुरातन देखील ओकील असे म्हणण्यापैकी येक विठल गणेश काकीड सबनवीस मामला हे बहुता दिवसाचे त्याची संमती आणविली. त्याचे सु छ. १५ मोहरम सनसीत तेथे लिहिले की परागंदा जाहाले. ते प्रसंगी कसबा लिहीणार पाहिजे. रायाजी नरसी देश कुलकर्णी सुभा होते याणी तुकाराम यासी

रदबदल करून केसी नरसीयांस मागोन घेतलं. त्या उपरी राजश्री आणाजीपंता-जवळ विशालगडचे मु॥ भाने शेणवी उभे राहून कुलकर्णाची रदबदल केली. त्यावरून विठल नारायण पोतदार त॥ खेळणा भेटीचा हवाला क॥ मा॥रचा होता. त्याजकडे मनसुफी सांगितली. त्याही गावकर कसबेचे वतनदार आणून महाराज केला. आपले कुलकर्ण खरे असे करून महाजर देऊन रा॥ आणाजी पंताकडे रवाना केले तेही महाजर मनास आणोन कुलकर्णाचे सनदेची परवानगी दिल्ही. त्यास आम्ही शेणवी लोक....पक्षी कोणही नाही. देश कुलकर्णी त्याचे साहित बहूत जन करीत. यादो आपाजी विशालगडीच सबनिसी होती ते मेहुणे त्याही सोमाजी दत्तो याकडून राजकारण करून सनद तटविली. पंताचा स्वारीचा उद्देश जाहला. स्वारीहून आल्यावरी पत्र करून देऊ म्हटले. कसबा त्यास भाने शेणवी या खेरीज लावणी साचणी नव्हे म्हणोन कसबे मा॥रची तर्फदारी सांगोन ठेविले. कुलकर्णाचे पत्रास विक्षेप पडला. त्या उपरी दिवसें दिवस काळ विलक्षण पडून श्रमीच जाहालो. कुलकर्णामुळे देशकुलकर्णी यानी सत्यानास करविला घरदार लुटविली ते वखतीस राज्यक्रांतीमुळे पूर्वील कागदपत्र होत तेही गेले. नायकवाडी व हरदू दोघाही अर्ज केला की माल हसील तर्फा........फाला हसील बाजार व बलुते व बाजे कमाविसी इजमाई अलाहिदा खेरीज मोकासा होऊ लागली. यास येक लिहिणार दिल्हा पाहिजे. म्हणून मामलेचे हवलदार याजपासी रदबदले केली. त्यावरून संभाजीराम चिमणाजी बलाल याचा पणजा म्हणजे हशमनीस पुरातन वतनदार देखोन कुलकर्ण सांगितले. त्यापासून तीन पिडीया त॥ कारकीर्द अदलशाही कसबेचे कुलकर्ण हशमनीस चालवीत आले. ही गोष्ट आमच्या वडिली आम्हास सांगितली होती व महाराज राजश्री छत्रपती स्वामीनी पनाला घेऊन काउजी प्रभू व बहिरजी सिंदे जमाव देऊन खिलणा घ्यावयास पाठवीले. तेही गड हस्तगत केला ते वख्ती प्रभावलीस मामलेदार कारभारी मुकासा होते. ते निघोन विजापुरास गेले. यावरी आपण व भाने शेणवी राजश्रीकडे जाऊन पनाळा भेट घेतली. वर्तमान विदीत करून कूलवतनदारास कौल घेऊन काऊजी प्रभूकडे विशालगडास घेऊन येऊन त्या बरोबरी प्रभावलीस येऊन अवघ्याची भेट करविली. ते मामला चालवीत असता भान शेणवी आपले कुलकर्ण चालवीत होत. त्याउपरी राजश्री स्वारी करून मुद्धक व सैदागर लुटून फना केले. ते समई प्रभावलीकर नाइक-

वाडी आम्ही व भाने शेणवी कबिल्यासह वर्तमान परागंदा होऊन घाटावरी गेलो काही दिवस घाटावरी होतो. मुल्क वोस पडला. वसाहत नव्हते. तेव्हा राजश्री राऊजी सोमनाथ यांस सुभा सांगोन पाठविले. ते या प्रांतास आलियावरी वतनदारास मुलकास कौल देऊन मामुरी केली. प्रभावलीकर नाईकवाडी व हशमनीस व आम्हास कौल पाठवून आणील. ज्यास रोजगार सांगणे त्यास सांगितल. वतनदार होते त्याचे वर्तमान मनास आणोन ज्याची वतन त्यास करार केली ते समई हशमनीस याचे कसबे प्रभावलीचे कुलकर्ण याचे यास करार केले. सात वर्षे सुभा होता तो कुलकर्ण चालवीतच होता.

त्या उपरी त्र्यंबक लुकदेव सुभा करून आले. तेव्हा ही चालवीत आले. त्र्यंबक लुकदेव मृत्यू पावले वरी सुभा तुकाराम करून आल. त्यावरी राजश्री आन्नाजीपंती........बाईच्या प्रसंगात तुकाराम यासी आज्ञा केली की मुलकात माहलोमाहला बारसुद घेणे. त्यावरून प्रभावली कसबेचा बारसूद मनास आणिता भान सेणवी याकड येक पैका उचापत काढली. ते समई कुलकर्ण अनामत करून तकादा लाविला. आपले तगादिया खाले हैरान जाहले. सबब चार महिने कुलकर्णीची कमाविसी राहिली. ते समई रामाजी नरसि देशकुलकर्णी याणी सुभेदाराची निशा करून आपले तर्फने येक लिहिणार प्रभावलीस ठेविला. त्याजपासून आजिपावितो त्याचे निसबतीन चालत आले आहे. हे गोष्टीस तीस पसतीस वर्षे जाहाली.

दुसरी — राजश्री कासी रंगनाथ पोतदार कदीम राज्यांत मामले करीत आले. त्याच पत्र छ ७ मोहरम सन सीत त्याही लिहल आहे की आदिलशाही कारकीर्दीस आम्ही लहान होतो, करिना ठाऊक नाही. मग वेव्हार झाला असता तरी आमचे वडील व आणखी कोणाच्या मुखोतर आम्हास कलला असता. या राज्यामध्ये राजश्री रावजीपंत सुभा करीत होते. त्या पासी आम्हास राजश्री.........छत्रपती थोर कैलासवासी याणी परवर्दा व्हावयास ठेविले. तदनिमित्य दोन चार वर्षे दप्तरदारी केली. त्या समई भाने शेणवी व सिव सेणवी कसबेचे कुलकर्णाचे कागदपत्र करावयास येत होते. हे ठाऊक आहेत. त्या वरी आम्ही हुजूर सुरनिसीकडे राहिलो. मागे तुकाराम याचे कालकिर्दीस काये जाहले ते आपणास ठाऊक नाही. त्यामागे शेणवी याचा भोगवटा चालिला आहे. तिसरी—सडी फोत खान मुकादम नाईकवडी मामले प्रभावली कागद छ १२ जमा।

कर सु।। सबा तिसेन अलफ रोा रामाजी अनंत सुभा करीत असता काही कथला जाहला. त्याकरिता मोकादम माारचे पत्र लिहिले ऐसाजे. संभाजीराम चिमणाजी बलाल यामध्ये व देश कुलकर्णी यामध्ये गरगशा वतना संमंध लागला आहे. याच करिता संभाजीराम याणी आम्हास कितावत पाठविली की तुम्ही प्रभावलीचे वतनदार तुम्हास कदीम मामला वतनदारी कूल दखल आहे. तरी तपसीलवार करिणा लेहून पंडीत मशारनिलेस पाठविला म्हणजे ये गोष्टीचा निवाडा होतो. म्हणोन लिहीले. त्याजवरून जरूर मोहिबास लिहिणे.

संभाजीराम चिमणाजी बलाल देखील गोत्रज हे कदीम प्रभावलीमध्ये गावकुलकर्ण व घाटगावडी व आडमार्ग देखील जकातीचे पतका व हशमनिसी असे चालवीत होते. वतनदार खरे. या उपरी राजेश्री आणाजी पंतांचे कारकीर्दीस देशकलकर्णी यामधे व शेगवी यामध्ये कुलकर्णाविसी खटला जाहला. सेणवी याणी कुलकर्ण बहूत दिवस चालविले होते. परंतू पंडीत माार निल्हे याणी देशकुलकर्णी यास दिल्हे. आणि शेणवीयांस कसबाच्या हुदा वतन करून दिल्हे. आणि हरदूजणाची समजाविसी केली. घावडीघाट देखील आडमार्ग येथीले खतला व हशमनीसी शेणवी याचे कदीम वतन व नवी मरामत कसबाचा हुदा असे सेणवी याचे आहे. असा करिणा आम्हास मालूम आहे. पुरातन वडीलोवडील असे सांगतही आले. या उपरी साहेब धणी आहेत. हरदुजणाची समजाविसी करोन वतनदार सुखरूप राहते असे केले पाहिजे.

सदू येसाजी जाधव रजपूत नाइकी—छ. २२ मोहरम सन सीत बहुता दिवसाचा. त्याचा करिणां लिहून दिल्हा यैसाजे. मुसलमानांचे कारकिर्दीस कसबा हवालदार अब्दुल कादर होता. ते समई कुलकर्णाचा कारभार भान शेणवी चालवीत होते हे आपणांस ठाऊक आहे. त्या येलीकडे राजेश्री आणाजी पंताचे वेलेस............आम्ही पंताजवळ चाकरीस होतो. ते समई रायाजी नरसींह, केसो नरसींव्ह याचे भान शेणवी याचे व कुलकर्णाबदल वाद विशालगडी पंताजवळ होत होता. ते समई समजाविसी काय केली ती नकळे. परंतू त्याचा कारभार भान शेणवी यास सांगितला. आणि गावचे लागवडे पाठविले. कुंलकर्ण रायाजी नरसिंव्ह याचे ताबील केले इतके ठाऊक आहे. परंतू रायाजी नरसिंव्ह देशकुलकर्णी यांचे वडील कुलकर्ण चालविता देखिले नाही. त्यास आमचे सबनीस विठल गणेश काकिरडे व दुलभाई कुलकैफीयत त्यास ठाविकी

आहे. ते निवेदन सेवेसी करतील आपणास करिणा ठावका आहे. तो लिहिला आहे.

किता तकरीर रत्नागिरीचे मुकामी राजश्री नानाजी दत्तात्रयाणी माहालो महालचे वतनदार मिळवून हजीर मज्यालस केली तेव्हा—-

किता	वतनदार
१ राजश्री शामजी रंगनाथ	४ ताा देवले
१ गुणाजीराव खानवलीकर	१ केसो रंगनाथ देसाई
१ सुभानजीराव खानवलीकर	१ केसो गोपाळ देसाई
१ काडोजी पवार खिनराऊत	१ कृष्णाजी नारायण देश-
१ माणकोजी सोडकर	कुलकर्णी
३ कारकून सुभा	१ राघुभट आठले
१ दामाजी आत्माजी	४
१ श्रीपाजी गदाधर	४ ताा हातखांब
१ प्रल्हाद लिंगाजी	२ संभाजी व कृष्णाजी
३	सावंत देसाई
१ राघोनारायण हवलदार	१ केसो हरी कुलकर्णी
ता. पावस	१ माहादो भास्कर खोत
९	मौजे टिके
वतनदार ताा देवरूख	४
१ तानकोबा नाईक देसाई	३ ताा हरचीरी
१ विष्णूभट मुा	१ लक्ष्मण बु. देसाई
हरी विश्वनाथ देसाई	१ रामजी कासी कुलकर्णी
१ कासी गोविंद मु॥	१ गणेश अनंत खोत
देश कुलकर्णी	संगमेश्वर
३	३
	१ ताा. पावस नारोकृष्ण देसाई.
	१२

वतनदार कर्यात नेवरे	तपशील
१ केसोनारायण देसाई	९
१ शामजी केशव देसाई	१२
१ कृष्णाजी केशव मु॥	५
१ महादजी विठ्ठल कुलकर्णी	३
१ विसाजी रुद्र कुलकर्णी	२९

मौजे पुसाले

५

येणे प्रमाणे मज्यालसीस होते. त्या समई कसबे मजकूरचे. वतनदार व नाइकवडी याचे तकरीर बी तपसील.

फोतखान मुकादम	रोफ अलिशा दिंवाण
१	१
रामजी नाईक	रामजीनाईक भुजदलराव
१	१

अण्णाजी यशवंत राऊ फडनाईक कसबे मजकूर

१ भिकाशेट शरपा
१ संबाशेट चौगुला
१ तुकाशेट रानपी
१ गोविंदशेट सेरपा सोनार
१ ताबाडज्या गुरव श्री हणमंत बागजाई
१ माहार

६

येणेप्रमाणे अकराजण तकरीर केली असोन मुसलमानाचे कारकिर्दीस हशमन वीस कसबेचा कारभार करीत होते. दर कुळास सहा रुपये प्रमाणे पावत होते. भान शेणवी येत समजाविसी करीत. राम सेणवी हशमाचा कारभार करीत या प्रे॥ हा ठाई पावेतो या राज्यात चालले. त्या उपरी देश कुलकर्णी कसबेचा

कारभार करितात इतके ठाऊक आहे की सदूबाजी चंद्रराऊ आपले इनामबादार खोरेत आहे तेथ सेणवी याचा इनामसेत पोकलणाजी व कादील बीहडा व बान खोरीत तीस करीचा इनाम आहे. इनामतीची तीन ठिकाण कुलकर्णी याचे ईनाम तिसी आहेत हे आपलेस देखील वडिली सांगितले आहे.

किता सदुराम ठाकूर देसाई ता। राजापूर........प्रभूदेसाई ता। संवेदल याणी लिहिले जे आदलशाई काल किर्दीस आम्हास काही ठाऊके नाही या राज्यात आणाजी पंताचे कालकीर्दापासून देश कुलकर्णी का। प्रभावलींचे कुलकर्णी याचे कारभार चालवितात. या प्रो रत्नागिरीस निवाडा जाहला. त्या उपरी राजश्री नानाजी पंती हुजूर लिहून हारजितीचे कतबे घेतले होते. त्या यैवजी

....याचे पत्र आणून पैके घेतले हुजूर सारंगगडास गेल्यावर निवाडा जाहला. या प्रो सनदा करून घ्याव्या........करून संभाजीराम व चिमणाजी बलाल व गणेश भिकाजी यांस वस्त्रे देऊन निरोप दिल्हा त्या उपरी राजश्री नानाजीपंत सारंगगडास आले. त्यावरी चिमणाजी बलाल व संभाजीराम हे ही हुजूर आले. सनदा पत्राचा उपक्रम केला. तेव्हा देश कुलकर्णी आणून त्या समक्ष पत्र करून घ्यावी लागतात बोलिले. त्यावर कासी सांबाजी यास बोलाऊ पाठविले. ते येई तो वर महिनाभर राहिले. कासी साबाजी आले. यावर मजालस करून मनसुबीचा उत्पन्न केला ते समई सर्व........राजश्री नरहर कृष्ण खानवलीकर व दाभोळे सुभाचे मुकादम व खोत तह बादल राजश्री नरहरीपंताचे वि। आलेवर का ग्रहस्त कारभारी होते. मनसुबीस देश कुलकर्णी याचे अलीकडील भोगवटा प्रति पाहून सेणवी यास........असा प्रसंग दिसून आला. नूतन वतनदार सार मोकादम याणी देश कुलकर्णी याचे जिव्हाळा धरिला देखोन वाद सांगात्रयास उभे राहिला नाही. हे मनसुबीस राजी नाही. परस्थली मनसुबी लाऊन घ्यावी असे सेणवी मजकूर विचार करून बोलले. त्यावर निरोप दिला. सेणवी आपल्या धंद्यावर गेले.

त्याउपरी राजश्री नरहरकृष्ण व केशवकृष्ण खानवीलकर सरमोकादम व राजश्री नानाजी दत्ताजी यानी देशकुलकर्णी याचे आगत्य धरून रदबदली करून पत्र करून देविले. असीयास अदिलशाही कालकीर्दीपासून या राज्यात दहाबारा वर्षेपर्यंत का। प्रभावलीचे कुलकर्ण सेणवी यानी चालविले. असे स....

यात करारे वरून खरे दिसून आले आणि तेथील हाशमनिसी जकातीचे दोन पतके घर जागा ठिकाण भोग्य व लेख साक्ष नाही असे देश कुलकर्णी असे सांगून पत्री लिहीवले ते....तर केले. देश कुलकर्णी असे लोक आले. हाशमनीस म्हणजे हशमाचे खासगत लिहिणार म्हणोन सांगितले. त्यास हषमनवीस यास वतनास मौजे ता। देवरूख हा गाव आदिलशाही कालकीर्दीस चालिला आहे. व कसबे मध्य................या चालत आला वडील बरेच नांदले. आपले कालकिंर्दीस धामधुमीमुळे........पंदरी पडली. या मुळे देशकुलकर्णी कथला करावयास लागले. घर जागा कसबा प्रसिद्धच आहे म्हणोन शेणवी यानी विदीत केले. यावरून हा करिणा देशकुलकर्णी याचा बार केले जाहला. "व कसबा म्हणोन आठरा माहाल्या खाले तो आपला राहता जागा तेथील कुलकर्ण दुसरीयांस सरत नाही म्हणोन देशकुलकर्णी याही सांगितले. त्यास कसबा दाभोळे व कोकणात कितियेक जागा कसबेयास कुलकर्णी निराळे व देशकुलकर्णी निराळे. तैसेची वरघाटेही आहेत. या अर्थे देशकुलकर्णी याणे आपले कुलकर्णी कसबेचे म्हटलं प्रमाणे रुजू पडते असे नाही, कासी साबाजीस पत्र करून दिल्हे असे वर्तमान चिमणाजी बलाल यास कलल. त्यावरून गणेश भिकाजी देखील हुजूर येऊन अतिशय लोक....घालावे यास सुधा जाहाले. असीयास काशी साबाजी माळी मातिले. पत्र करून शेणवी या अपरोक्ष घेतले. त्याचे सांगितले करिना मध्ये तफावत दिसून आले. यैसीयास हरदोजणाचे पुनरुतगान मनसुभी लाऊन घ्यावी तर कासी साबाजीने देवणेचे पत्र घेतले. ते माळी मातीचे जाहाली. त्याची सनद रद्द करून पैके घेतले हे गुन्हेगारी देशकुलकर्णी याजकडील करार केले असे. त्यास कसबे मजकूरचे कुलकर्णासी निसबत नाही. शेणवी प्रभावलीकर याचे कुलकर्ण कसवे मजकूर येथील पुरातन. आदिलशाही कालकिर्दी पासून अलीकडे या राज्यात चालले आहे. त्याप्रमाणे हाली याचे यास करार करून याजपासून शेरणी घेतले रुपये ३५०

पेशजी राजश्री नानाजी दत्ताजी याणी पेशजी घेतले ते रुपये २५०	हाली हुजूर करार केले. रुपये १००

येकूण साडेतीनशे रुपयाचे माथा करार करून कसबे मजकुरीचे कुलकर्ण सेणवी यास राजश्री गणोबा नाईक सरदेसाई मामले प्रभावली मामले दाभोले याचे विद्यमाने वतनाचे पत्र करून दिले आहे. तर कसबे मजकूरचे कुलकर्ण चिमणाजी बलाल, संभाजीराम, गुणाजी भास्कर, गणेश भिकाजी याचे दुमाली करणे आणि यास व याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवीत जाणे या पत्राची प्रति लिहून घेऊन असल पत्र परतून सेणवी याचे याजवळ भोगवटी यांस देणे. जाणीजे छ ४ सेवाल प॥ हुजुर मोर्तब असे.

लेखांक : ११९

प्रतिनिधी दप्तर : ता. २८ नोव्हेंबर १७०८

स्वस्ती श्री राज्यभिषेक शके ३५ सर्वधारी नाम संवत्सरे कार्तिक बहुल येकादशी गुरुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्रीराजा शिव छत्रपती यानी पारपत्यगार व कारकून तर्फ संगमेश्वर यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री दशरथ जोतिषी जोशीराव यानी हुजूर विदीत केले की, कसबे संगमेश्वरि आपला घर जागा मिरासचा आहे. त्यास आपल्या परसास पाणी असावे लागते तरी स्वामीनी कृपाळु होऊन कसबे मजकुरी पाण्याचा पाट येतो त्या प्रो दिवाणचे मोहिनीतुन आपणास पाटाची मोहीन करून दिल्ही पाहिजे म्हणोन विनंती केली अशास वेदमूर्ती तेथील स्थाईक बहुत थोर ब्राह्मण याचे सर्व प्रकारे चालवणे स्वामीस आगत्य यास्तव दिवाणचे मोहिनी पो पाटाचे पाणी दररोज घटका तीन पाण्याच्या परसास द्यावयाची आज्ञा केली असे हे जाणोन याप्रमाणे पाण्याकडे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे या पत्राची प्रत लिहून घेवून हे पत्र याजवळ देणे लेखनालंकार सीमा.

लेखांक : १२०

प्रतिनिधी दप्तर : ता. २ मार्च १७१२

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके ३८ खरनाम संवत्सरे, फाल्गुन शुद्ध सष्टि रविवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी देशमुख

व देश कुलकर्णी ता।। मलकापूर यांसी आज्ञा केली यैसीजे चिमणाजी बलाल व दादाजी बलाल व प्रलाद बलाल शेणवी यानी हुजुर येऊन विंनती केली. आपण स्वामीच्या राज्यात बहुत दिवस एकनिष्ठेने सेवा केली याकरिता पो मा।।री शहाचे कारकीर्दीस नाडगौडा होता तो मृत्यू पावला. त्याचे नकल जाहाले त्याच वेळी नाडगौडकीचे वतन आमानत होते ते राजश्री परशराम पंडीत प्रतिनिधी याणी आम्हास दिल्हे.

देहे		जकायती
१ कसबा	१ शेंबवणे	१ आणस्कुरे
१ येसूर"	१ कुंभवडे	१ गावडी
१ आंबर्डे	१ यलवणे	१ आंबा
१ अरूल	१ मांजरे	१ गजापूर
१ हुबवळी	१ बारकी	१ आडमार्ग
१ उचन	१ आणस्कुरे	१ बाजार कसबा
१ माण	१ बुरवाल	६ एकूण
१ परले	१ कालजवडे	गोली धनगर महाल
१ म्हसवडे	१ कोबरे	१
१ कासारडे	१ किसरूळ	
१ जावली	१ पिसाभी	
१ करंगुले	१ कोलीक	
१ अल्हर	१ गिरगाव	
१ पुसाळे	१ मिले	
१ ककणे	१ गोठणे	
१ वारूण	१ भोलगाव	
१ चांदोली	१ ससेगाव	
१ आंबे	१ चनवाड	
१ गजापूर	१ पणुदरे	
१ गावडी	१ कोपारगे	
	१ येकूण	
२०	२१	

येकूण देह ४१ व जकायती सहा व गोलीधनगर महाल येक, येथील नाडगौडकीचे वतन दिल्हे आहेत. आपणास उत्तरोत्तर चाले ऐसी आज्ञा केली पाहिजे. म्हणोन विनंती केली. त्याजवरून मनास आणिता चिमणाजी बलाल व दादाजी बलाल व प्रलाद बलाल हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक सेवा येकनिष्ठेने करीत आले आहेत. याचे चालविणे हे स्वामीस आगत्य याकरिता पो मलकापूर महालाचे नाडगोडकीचे वतन आजरामरामत करून दिल्हे आहे. तरी तुम्ही हे जाणून पैकी मा।र निल्हेस नाडगोडकीचे वतन परशराम पंताचे सनदे प्रो यास व याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालविणे व हक लाजिमा गावइनाम व बाजे इनामत चालत असेल त्या प्रमाणे चालवीत जाणे मोर्तब असे

लेखांक : १२१

प्रतिनिधी दप्तर : आक्टोबर १७१६

अर्ज स्वारी राजश्री चिंतो वामन सुभेदार तालुके रत्नागिरी त।। दालदी होडेकर बखूम जमाती मौजे सोमेश्वर त।। हरचेरी सु।। सबा अशर मया व अलफ हसनजी वो आलजी वस्ता होडेकर मौजे मजकूर हली व।। राजऊड याजकडे काजीचे पाठीमागून दुसरा मान सोमेश्वरकर दालदी याजकडे चालतो त्या विसी वस्ता याचा व धोंडू डोंगरा होडेकर व।। मौजे मजकूर यांचा खटला लागोन सुभा आले. त्याजवरून हरदुजणाचे फतवे करीणे घेऊन पंचाईत मते मनास आणता डोंगरा याणे फतव्यात लिहिले की मुसलमान यातीत वस्ता यास न्हावी म्हणावयाची चाल आहे. हसनजी यास मान पावतो हा वतनदारीचा नव्हे. याने सुंता करावी व विंजण करावे आणि काजिचे पाठीमागून मान घ्यावा. याप्रमाणे पुरवणी करून देऊ. न देऊ तरी सरकारचे गुनेगार व गोताचे अन्याई म्हणोन. वस्ता याने लिहिले की न्हावीपणा सुंता आपण व आपली वडिलानी कधी केली नाही व विंजण करावयाचीही आपली चाल नाही. आपला काजीचे पाठीमागून मान चालतो हा वतनदारीचा. आपला वडील तास कामी होता यामुळे त्याचे नाव वस्ता असे पडले, त्यापासून वस्ता असे म्हणतात. या प्रमाणे पुरवणी करून देईन. डोंगरा होडेकर म्हणतो याप्रमाणे त्याने पुरवणी करून दिल्यास सरकारचे गुणेगार म्हणून.

त्याजवरून काजी सोमेश्वरकर यास पुसता वस्ता व डोंगरा यांच्या बोल ण्यावरून कटकट जाहाली त्या वेळेस विंजणाचा मात्र जाबसाल पडला होता. वस्ता यास आपण न्हावी म्हटले नाही व कोणास म्हणावयासही सांगितले नाही. या प्रमाणे काजी हसन सोमेश्वरकर याने लिहून दिले. यावरून वस्ता यास, हा न्हावी याने सुंता करावी, डोंगरा म्हणे तेव्हा त्याची पुरवणी त्याच्याने जाहाली नाही. हसनजी याने कागद दाखविले त्यांत त्याचा वडील पूर्वी कसब हरचेरी येथे होता. तो तास कामी कसबी चांगला यामुळे हकिमाने यांस मान करून दिला व तेव्हा पासून वस्ता असे नावे पडिले असे. दाखला कुलकर्णी याचे हातचा दाखविला व सुभाची ताकिद कमावीसदार मौजे मजकूर याचे नावे सन खमस सलासीन मया व अलफेचे सालची नक्कल दाखविली. त्यात हसनजी होडेकर याचे वडील काम काज करीत आले असतील त्याप्रमाणे' त्याचे हातून घेत जाणे. दालदी यांचे वडिलकीचे मानपान यासी देववीत जाणे व ढेबा गोरा फड फर्मास दालदी यासी सांगणे ते याजकडून सांगवीत जाणे. वरकड होडे-कर याचे हातून वर्तवीत जाणे म्हणोन लिहिले आहे. तेव्हा वस्ता याचे बोलणे प्रमाणे दिसते. डोंगरा वस्ता यास न्हावी म्हणत होते ते लटके पडिले या-वरून ठराव करून सांगावा. परंतु हे मुसलमान याचे यातीत चाल कशी आहे ही पाहावी व आमचा न्याय चार काजी आणवून त्याजकडे नेऊन द्यावा व ते सांगतील त्याप्रमाणे वर्तणूक करून याप्रमाणे हरदुजणाचे बोलणेही पडलें. त्याजवरून काजी कसबा हरचेरी व काजी अबदुल रजा कसबा पावस काजी इस्राल कसबा माजगाव हे चार आसामी सुभा आणविले त्यानी सदरहू कागद व अब्दुल रहिमान सुवर्णदुर्गकर वा। राजउडा मुदजी होडेकर बाा केल्ये यानी डोंगरा मजकूर याजबरोबर येऊन जबान्या दिल्या होत्या. त्या सुद्धा कागदपत्र पाहुन सांगितले की या कागद पत्रावरून वस्ता यासी न्हावी म्हणत होते पुरवणीत येत नाही व आमचे कीताबेतही असे नाही. याने काजीचे पाठीमागून मान घेत आल्याप्रमाणे घेत जावा. म्हणून त्यावरून ताकिद सादर केली असे. तरी सोमेश्वरकर दालदी होडेकर वगैरे मुसलमान याजकडील पूर्वीपासून काजीचे पाठीमागून दुसरा मान वस्ता याजकडे वतनदारीचा सुदा-मत चालत आला असेल त्याप्रमाणे देत जाणे. या ताकिदीची प्रत लिहून घेऊन अस्सल ताकिद वस्ता होडेकर याजवळ परतोन देणे सवाल मोर्तबा सुद

राजापूर मोर्तब असे.

परगणे शिराले

व्यंकोजी बिन गंगाजी
चोरगे पाटील मौजे कडवे

लक्ष्मण भगवंत कुलकर्णी
मौजे कडवे

सिदु बिन विठोजी शिंदे
चौगुले मौजे कडवे नि।।
आडिश्री

गादोजी बिन नाइकजी
मधुरे मौजे येलुर

दामाजी बिन म्हसाजी व
सयाजी बिन सखोजी जावले
प।। माजे येकणे

राघो शिवाजी कुलकर्णी
मौजे येकणे

बंडोजी बिन रुद्राजी
चौगूले मौजे येकणे
आडिश्री

तुकोजी बिन नाइकजी चोरगे पाटील
मौजे कडवे परगणे वरुण;

संताजी बिन सेटी व बावकरजी
बिन सेटी दिंडे प।। मौजे नरवे

ताा मलकापूर

जिजोजी बिन बाजी व संताजी
बिन रायाजी व जिजोजी बिन बमोजी
प।। माड
मौजे माण

राघो देवजी कुलकर्णी
मौजे माण नाइकजी बिन
रामजी चौगला मौजे माण
नि।। आडिश्री

जोगाजी बिन कासी कानडे
प।। मौजे कोपरडे

राघो नागेश कुलकणी मौजे माण

नाइकजी बिन रामजी
मौजे कोपरडे

कलंत्रे चौगुले मौजे करगले	जिजोजी बिन देवजी व बाबाजी बिन
आडिश्री	संताजी
बाबाजी दिनकर कुलकर्णी	मानाजी बिन राजी मोरे
मौजे करगुले	पा। मौजे परळे जिजाई
भिवाजी बिन कोमजी	
कलंत्रे चौगुले मौजे	
करंगुले आडिश्री	
	रघुनाथ दिनकर कुलकर्णी मौजे मजकूर
नाना वलद जोतनाक	कृष्णाजी बिन विठोजी चौगला
मौजे करंगुले	मौजे पर्ले जिजाई आडिश्री
नि।। निमदोर	रामा मानाक व।। नाईक
	नामा व।। लक्ष्मण
निदोजी बिन बाबाजी व	परलेजी नाईकजी विमदोर
देवजी बिन बहिरजी नाथाजी बिन	
आर्जुना मौजे बारुळ	बाबोजी बिन रखमाजी
हिरजी बिनजोती गोलावड पा।।	उदव चौगुला मौजे
मौजे अलदूर	अलपूर आडिश्री

या समक्ष हुजूर माहाजर करून दिल्हेजे
राजश्री बापूजी हरि उपनाम केतकर गोत्र गार्ग्य

लेखांक : १२२

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १७१६

म।। अनाम गणेश भिकाजी शेणवी कुलकर्णी व।। प्रभावळी यासी कृष्णाजी परशराम प्रतिनिधी आशीर्वाद सु।। सबा आशर मया व आलफ तुम्ही हुजूर विशालगडचे मुक्कामी विनंती केली की, मौजे मोसुब देहे त।। मलकापूर येथील पाटीलकीचे वतनास कोणी नाही नीपुत्रीक गावचीं कीर्दी जाहाली पाहिजे या करिता मौजे म।।र मुकासी यानी कानोजी धारा यासी पाटीलकी चालवावया गावी ठेविला त्याने दोन वर्षे पाटीलकी चालविली त्यावरून हुजुर वर्तमान विदीत जाहाले जे कानोसी बारा मौजे म।।रची पाटीलकी बगेर हुकूम खातो त्यास स्वामीनी तलबा करून आणोन गुन्हा लाविला जे दिवाणचा हुकूम नसता पाटीलकीचा अमल चालविला. गुन्हेगारी लावून खंडाची तहसिली लाविली त्यावरून वारा म।।र याने अर्ज केला जे आपण पाटील नव्हे मोकासीयाचे ब।। पाटीलकीचा अमल चालविला व आपणापासोन गुन्हा जाहला आहे. आपली जीवन माफक खंड माथा ठेविलीयाने वसूल देईन त्यावरून वारे मजकूर याज पासुन रुपये १५ पंधरा घेतले व त्यास मौजे म।।ची पाटीलकी पाहिजे तर शेरणी देऊन घेणे. त्यास पाटीलकी नको म्हणोन कतबा लिहोन दिल्हा या उपरी स्वामीनी आपणास आज्ञा केली जे मौजे म।।ची पाटीलकी शेरणी देऊन घेणे. त्यावरून विनंती केली जे गावचा अदमास पाहोन खेडे लहान मुग्याचा भात शेत नाही. पाटीलकीचे वतन पाहोन शेरणी ठेविली याने मान्य करू येविषयी विठोजी देसाई देहे २८ त।। मलकापुर यानी विनंती केली म्हणोन त्यावरून मनास आणोन मौजे म।।ची पाटीलकी तुम्हास वतन करवून दिल्हे असे अन-भवुन सुखरूप राहाणे पाटलाचा घर जागा व शेत भात झाड झाडोरा जे असेल ते तुमचे स्वाधीन करविले असे. व पाटीलकीच्या वतनास हक्क व लाजीमा व इनामत मानपान पुर्वापार चालले असेल त्याप्रमाणे घेत जाणे. या वतनाची शेरणी तुम्हापासून रुपये १०० येकशेहे हुजुर पोता जमा जाहाले सदरहू वतन

तुम्हांस व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने दिल्हे असे. जाणीजे छ २४ जमादिलाखर नीदेश समक्ष मोर्तबा असे.

लेखांक : १२३

प्रतिनिधी दप्तर : ता. २७ मार्च १७१७

राजेश्री चिमणाजी बलाल सुभेदार व कारकून वर्तमान व भावी प्रांत मलकापूर गोसावी यासी—

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो कृष्णाजी परशराम प्रतीनिधी आशिर्वाद अनुक्रमे नमस्कार सुहुर सन सबा अशर मया व आलफ हुजुर विशाळगड्च्या मुक्कामी गणेश भिकाजी शेणवी उपनाम राजादिक्ष गोत्र कौंडण्य शाखा आश्वलायन कुलकर्णी कसबा प्रभानवली यानी विनंती केली की, मौजे मोसुंब देहाय २८ ता मलकापूर गावीचा पाटील मयत झाला. यांचे वंशी कोणी नाही निपुत्रिक. गावीची कीर्द जाहाली पाहिजे या करिता मौजे मजकुरेचे मोकासी यानी कानोजीराव यासी पाटीलकी चालवावया गावी ठेविली त्याने दोन वर्षे पाटीलकी चालविली त्यावरी हुजुर वर्तमान विदीत जाहाले जे कानोजी वारा मौजेमजकूरची पाटीलकी बगर हुकूम खातो त्यास स्वामीनी तलब करून आणुन गुन्हा लाविला जे दिवाणचा हुकूम नसता पाटीलकीचा अमल चालविला या करिता गुन्हेगारी लाऊन खंडाची तहशील लाविली त्यावरून वारा मजकूर याने अर्ज केला जे आपण पाटील नव्हे मुकासीचे बोलणे पाटीलकीचा आंमल चालविला हा आपणापासून गुन्हा जाहला आहे. आपले जीवन माफक खंड माथा ठेवीलीयाने वसुल देईन त्यावरून वारा मजकुर याजपासून रुपये १५ पंधरा घेतले व त्यास मौजे मजकुरची पाटीलकी पाहिजे तरी सेरणी देऊन घेणे त्यास पाटीलकी नको म्हणवुन कतबा लिहुन दिल्हा याउपरी स्वामीने आपणास आज्ञा केली जे मौजे मजकुरचे पाटीलकी सेरणी देऊन घेणे.

लेखांक : १२४

प्रतिनिधी दप्तर : ता. १९ जून १७१७

राजेश्री गणेश भिकाजी शेणवी कुलकर्णी का। प्रभानवली हशमनीस मामले प्रभावली गोसावी यासी —

आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य विठोजी बीन तुलाजी दळवी देसाई देह २८ अठावीस ता। मलकापुर रामराम सु। सबा आशरे मया व आलफ मौजे मोसुब ता। मलकापूर देहे आठावीस पा। पुर्वी मांगला म्हणोन मराठा पाटील होता. त्याचे नकल फार दिवस होवून पाटीलकीचे वतन पडले होते. गावास पाटील नाही. वतन खराबी खाली पडते याबद्दल हे वर्तमान आम्ही हुजूर राजश्री पंत प्रतिनिधी स्वामीस विदीत केले आणि अर्ज केला जे मौजे मजकूरचे पाटीलकी यासी वतन करून ध्यावी त्यावरून दिवाण मेहेरबान होवून पाटीलकीचे वतन तुमचे दुमाला केले. अलाहिदा हुजुरची पत्रे आहेत तरी मौजे मजकुरचे पाटीलकीचे वतन तुम्ही भोगवटेस घालोन पाटीलकी चालविणे ईनाम वाहक लाजीमा पुर्वापार चालला आहे त्याप्रमाणे आनभवुन वतन चालवीत जाणे छ २० जमादिलाखर हे विनंती.

लेखांक : १२५

प्रतिनिधी दप्तर ता. ३१ मे १७१९

स्वति श्री राज्यभिषेक शके ४६ विकारीनाम संवत्सरे ज्येष्ठ बहूल नवमी रविवासरे क्षत्रिये कुलावतंस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री गंगाधरकृष्ण यासी आज्ञा केली यैसीजे. वेदशास्त्रसंपन्न राजश्री रघूभट बिन विश्वनाथभट उपनाम आठले गोत्र काश्यप सूत्र आश्वलायन, शाकलशाखाध्याई, वास्तव्य कसबा देवले, हे बहूत थोर, विद्यासंपन्न, कुटुंब वच्छल, यांचा योगक्षेम चालविलियाने स्वामीस व

स्वामीच्या राज्यास परम श्रेयस्कर याकरिता यांस नूतन ईनाम, कुलबाब कुल-कानू हली पटी व पेस्तर पटी जलतरू काष्ट पाषाण निधि निक्षेप सहीत खेरीज हकदार व इनामदार करून मौजे शिपोसी ता॥ देवले, प्रा॥ राजापूर हा गाव व इनाम सर्व मान्य देऊन सनद देशाधिकारी प्रांत—मजकूर याचे नाव सादर केले आहेत. तर तुम्ही मौजे मजकूर रुद्रंभट आठल्ये यांस व याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने इनाम सर्वमान्य चालवणे. याची पत्राची प्रति लिहोन घेऊन मुख्य पत्र भट गोसावी यास परतोन देणे. बहुत काय लिहिणे तरी सूज्ञ असा

लेखांक : १२६

प्रतिनिधी दप्तर : ता. २३ नोव्हेंबर १७१९

राजमान्य राजश्री हरी महादेव हवालदार व कारकून व भावी ता॥ देवले गोसावी यासी स्ने॥ निळकंठ बलाळ दंडवत सुहूर सन आशरे मया आलफ दादसेट बीन गोंद सेट कारकून सर महाजन माहाला नीहाय ता॥ खिलणा व कसबा प्रभाणवल्ली व कसबा लांजे याने राजेश्री छत्रपती स्वामीच्या पायाशी येक निष्टपणे वर्तोन स्वामी सेवा बहुत केली हे वर्तमान हुजूर राजश्री स्वामीस विदीत जाहाले त्या उपरी त्यास हुजूर दर्शनास बोलाविले आणि ता॥ मजकुरी मला जमीन बिघे ८५ पांच यास ईनाम द्यावयास आज्ञा केली त्यावरून ता॥ मजकुरी ईनाम मला जमीन बिघे ८५

मौजे देवे बिघे	व भडकंबे
८२	८३

एकूण पडजमीन मला बिघे पाच रास देवीली असे. तरी मोजुन चतुःसीमा करून देवून पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवीत जाणे. या पत्राची तालीक लिहून घेवून अस्सल पत्र भोगवटी यास देणे. छ २९ मोहरम मोर्तबा.

लेखांक : १२७

प्रतिनिधी दप्तर : ता. २७ फेब्रुवारी १७२१

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री पंडीत प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे. वे॥ राजश्री लक्ष्मणभट गुणे ग्रामोपाध्ये व उपाध्ये मौजे मठ त॥ हातखांबे तो॥ रत्नागिरी याणी हुजूर येऊन करवीरचे मुकामी विनंती केली की श्री........देव सोमेश्वर माहा जाग्रत स्थान मौजे मजकुरी आहे. त्यास श्रावण मासाभिषेक व कार्तिकी पौर्णिमा व शिवरात्रीचा उछाह आहे. त्याच्या खर्चाची सोय नाही. त्यास मौजे मजकूर येथे गावची आठवी तक्षिम कुंणबत्रा राजश्री भिकाजी गोपाळ व सखाराम सदाशिव व गणेश धोंडदेव गुणे ग्रामोपाध्ये व उपाध्ये मौजे मजकूर याच्या वतनी आहेत. तो पेशजी बाबुराव केशव ठाकूर यासी विशाळगड तर्फेने ईनाम करून दिल्हा होता. तो काही दिवस चालिला. पुढे त्याचा काल जाहल्यापासून विशाळगडाकडे वसूल घेत असतात. त्यास तो कुणबावा देवास इनाम करून दिल्हा असता देवाचे खर्चाची सोय होईल म्हणोन त्याजवरून देवाचे खर्चास इनाम करून दिल्हा असता राज्यास श्रेयस्कर जाणोन गुणे याचा कुणबावा गावची आठवी तक्षीम देवास इनाम करून देऊन सनदा सादर जाहल्या आहेत. त्याप्रमाणे कुण-बावा गावची आठवी तक्षीम विशाळगड तर्फेकडील दरोबस्त वेट बेगार—कारसाई सुद्धा खेरीज हकदार करून देवास ईनाम दिल्हा असे सालदरसाल वसूल देवाकडे देत जावा आणि देवाचे संस्थानची वेवाट वे॥ लक्ष्मण भट उपाध्ये यांजकडे हुजूरून सांगितली आहे. तरी आठवे तक्षिमेचा वसूल यांचे व यांचे पुत्र पौत्रादी वियमाने देवाकडे देत जावा. प्रतिवर्षी नवीन पत्राचा उजर न करिता या पत्राची तालीक लिहून घेऊन असल पत्र भोगवटीयास वे॥ कडे देणे जाणिजे सु॥ इहीदे अशरीन मया व अलफ रवाना छ ११ माहे जमादिलाकर. बहुत काय लिहिणे तरी सूज्ञ असा.

लेखांक : १२८

प्रतिनिधी दप्तर : ता. १७ फेब्रुवारी १७२४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५० शोभन नाम संवत्सरे माघ शुध त्रितीया भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शाहू छत्रपति स्वामीयानी देशमुख देशपांडे

संमत इंडी प्रांत विज्यापूर यास आज्ञा केली यैसीजे राजश्री सदाशिव परशराम हे स्वामीच्या राज्यातील पुरातन सेवक शेंवा निष्ठेने करीत आहेत. यांचे वंश-परंपरेने चालविणे आगत्य याकरिता स्वामी यावरी कृपाळू होऊन प्रां मजकूरची नाडगोडी वतन अजराम-हामत करून दिले असे. या वतनास हक लाजिमा ईनामत मोईन करून दिल्ही आहे.

गावगना आकार होईल त्यास दरसदे रयेत नि॥ हक रुपये दोन २	इनाम गावगना दर चावरी बिंघे दोन. २
लाजिमा मानपान तश्रीफ निशाण फसकीं सेवाधार व वरकड कानुबाब बाजे वतनदारा प्रा॥ कलम. १	जकातीस हक दरगोणीस रुका येक. ४१

येणेप्रमाणे दरसदे रुपये दोन व दरचावरी बिघे दोन व दरगोणीस रुका येक वगैरे कलम येक मोईन वरून दिल्ही आहे. तरी तुम्ही मा॥र निल्हेस पा॥ मजकूरचे नाडगोडीचे वतन पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवणे. हक लाजिमा इनामत वगैरे सदरहूप्रमाणे चालवीत जाणे. दरसाल ताजे सनदेचा उजूर न करणे. या पत्राची प्रति लेहून घेऊन असल पत्र भोगवटीयास देणे. लेखनालंकार



लेखांक : १२९

प्रतिनिधी दप्तर : ता. ११ आक्टोबर १७२५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५२ विश्वावसू नाम संवत्सरे अश्विन बहूल प्रतिपदा इंदुवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शंभू छत्रपति स्वामी याणी राजश्री देशाधिकारी व कारकून वर्तमान भावी सुभा प्रांत राजापूर यासी आज्ञा केली ऐसीजे वे॥ राजेश्री गंगाधर भट बिन सोमनाथ भट उपनाम कात्रे गोत्र काश्यप, सूत्र आश्वलायन हे बहुत ब्राह्मण कुटुंबवच्छल विद्यापात्र याचे योगक्षेमाची अनुकूलता करून दिलीयाने स्वामीस व स्वामीच्या राज्यास बहूत श्रेयस्कर यास्तव रोज गुदस्ता आश्विनी पौर्णिमेस राहू परांग चंद्रग्रहणी मौजे कडील श्री कृष्णातिरी ग्रहण पर्वकाली आकंठ जली भूमिदान स्वामीनी धारादत्त

लारी दाभोली पाच शत ५०० लारीची भूमी संकल्प करून मौजे काडेगाव तर्फ देवले प्रांतमजकूर देविली असे सदरहू भूमी मौजे मेढें तर्फ मजकूर या गावचे सिमेस मौजे मजकुरची वाडी आहे ते चतुःसीमा करून देणे. ते वाडीचे दस्त असेल ते सदरहू बेरजेत लेहून देणे काम जाले तर उरले वेरजेची जमीन मौजे मजकूर पे।। पड जमीन नेमुन देणे. वाडीचे जाजती दस्त असेल तरी पाचशे लारीची जमीन नेमुन चतुःसीमा करून राजश्री आणाजी पंताचे कारकीर्दीस जमिनीस धारा व गला यांस निर्ख होता त्याप्रमाणे सदरहूप्रमाणे पाच शत लारीची भूमी वेदमूर्तीचे स्वाधीन करणे. 'आणि हे वृत्ती यासी व याचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने कुलबाब कुलकानू खेरीज हकदार व इनामदार करून वेदमूर्तीस उत्तरोत्तर सुरक्षित चालविणे. वर्षे प्रति-वर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे. या सनदेची तालीक लिहुन घेऊन असल पत्र भोगवटीयास परतोन देणे जाणिजे निदेश समक्ष मोर्तबा असे.



लेखांक : १३०

प्रतिनिधी दप्तर : ता. १७ डिसेंबर १७३७

स्वस्ति श्री. राज्याभिषेक शक ६३ अनलनाम संवत्सरे पौष शु।। षष्टी इंदुवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शंभू छत्रपती स्वामी यांनी वेदमूर्ती राजश्री विश्वनाथ भट बिन नारायण भट उपनाम साठे यासी दिले वृत्तीपत्र यैसीजे तुम्ही करवीरचे मुकामी स्वामी संनिध विनंती केली की कसबे देवरूख सुभा राजापूर या गावी श्री देवस्थान पुरातन जागृत आहे. येथील श्रावणमासी श्रीदेव याचा मासाभिषेक करीत आहो. आपल्या योगक्षेमाच्या अन-कूलतेस राजेश्री कृष्णाजी पंडीत प्रतिनिधी या जवळी विनंती केली. त्यावरून पंडीत मा।र निल्हेनी देवरूख येथे जकातीवर दर बैली रुका येक वृत्ती करून दिल्ही आहे. तरी माहाराजानी भोगवटाचा कालाची दिवाणाची पत्रे करून द्यावयाची आज्ञा झाली पाहिजे म्हणोन विनंती केली येविसी स्वामी संनीध पंडीत मशार निलेनी विनंती केली. त्यावरून मनास आणिता तुम्ही भले सिष्ट तुमचे योगक्षेमाची अनुकुलता करून दिधल्या श्रीचा श्रावणमासीचा मासा-भिषेक सांग चालेल. येणे करून स्वामीस श्रेयस्कर आहे. याकरिता हाली

तुम्हास तर्फ देवरूख सुभा प्रांत राजापूर येथे जकातीवर दर थैली रूका येक वृत्ती करून दिल्ही आहे. तरी तुम्ही सदरहू दर बैली रूका घेऊन श्रीचा अभिषेक करीत जाणे. आणि हे वृत्ती तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने अनभाऊन स्नान संध्या करून स्वामीस कल्याण इच्छोन सूखरूप राहाणे जाणीजे निदेश समक्ष मोर्तब

लेखांक : १३१

प्रतिनिधी दप्तर : ता. ७ मार्च १७६०

कौलनामा आजि स्वारी राजश्री मोरोजी सिंदे सुभेदार तालुके जंजिरे व रत्नागिरी ताा बालमानि व बाबादेमानी........मौजे पुसाळे कर्यात नेवरे सुभा प्रांत राजापूर सु॥ इहीदे सितेन मया व आलफ....कौल नामा यैसाजे. तुम्ही जजिरे मजकूरचे मुकामी सुभा येऊन अर्ज केला की वाडा मजकूरी आपले खाजण बहुत दिवस दर्या गर्क पडिले आहे. त्याची बांद वंदिस्त करावया मेहनत श्रम भारी आहेत. त्यास साहेबी कृपाळु होऊन मेहनतीचा अजमास मनास आणून माफी इस्तावा दिल्हिया उमेदीने खाजण्याची बांदवंदिस्त करून किर्दीस आणू म्हणोन तपसीले विनंती केली. त्यावरून नारो केशव कारकून सुभा म॥ खाजणाची मेहनत श्रम बांद वंदिस्त करावया पश्चिमेकडील बांद लांबी हात ४८० उंची सरासरी .... पूर्वेकडील बांद हात सुमारे ३०० उंची चार पाच हात. उत्तरेकडील बांद लांबी हात २४० येकूण जमीन अजमासे बिघे ८१० दहा बिघे यांची बांदबंदिस्त करून कीर्दिस आणावया मेहनत श्रम बहुत मनास आणून कीर्दीवर नजर देऊन इस्तावा माफी व कामधारा माफी पेस्तर पेरणी

सु॥ सन इसने सितेन	कामधारा दरबिघा
ताा सन इहीदे सन अर्बेन	भात केली.
माफी साले. ४	८२॥ सन इसेन सबैन
	८३॥। सन सलास सबैन
	.।. सन अर्बा सबैन
	.।१। सन खमस सबैन
	.।=॥ सन सितेन सबैन

येकूण पंधरा साले पेस्तर पेरणीस सन इसने तागायत इहीदे सबैन साले दहा कामधारा दरबिघा भात सन ईसने सबैन अडीच मण सलास सबैन पावणे चार मण, सन अर्बा सबैन पाच मण; सन खमस सबैन सवासहामण व सन सितेन साडेसात मण येणेप्रमाणे करार करून दिल्हा असे सालोसाल उगवणी-करून देणे इस्तकबालियावरील सरकार तर्फेने पाहणी होऊन आकार होईल त्याप्रमाणे मुलुक शर्त उगवणी करून देऊ. कीर्द करून सुखरूप राहाणे कौल असे जाणिजे छ. १७ रजब.

लेखांक : १३२

प्रतिनिधी दप्तर : ता. २३ जुलै १७६९

सौजन्य श्री खेत्रोजी शिंदे पाटील मौजे ढवळे का।। ईरे यास राणोजी घोरपडे देशमुख व भगवंतराव त्र्यंबक देशमुख का।। म।। र सु।। ईहिदे सीतैन मया व आलफ तुमचा व संताजी शिंदे पाटील मौजे मजकूर याचा होळीचे पोळीचा व सवास्णीचा कज्या होता त्यांस पूर्वी राजेश्री आणोजी शिंदे यांनी दोन्ही कलमे कर्जाबदल दिली होती त्यासंबंधे कज्या होवुन तुम्हास मौजे अंबरपूरचे थल दिले. तेथे राजेश्री संताजी शिंदे यांनी थलकरी यांचे विद्यमाने दोन्ही कलमे होलीची पोळी व सवास्ण तुम्हांस दिली. पत्र तुम्हास लिहून दिले त्यावरून हे दुमाल पत्र सादर केले असे. तरी तुम्ही दोन्ही कलमे होलीची पोळी व सवास्ण आनभउन सुखरूप राहाणे जाणीजे छ. १९ माहे रबीलावल सन ११७० मोर्तब

लेखांक : १३३

प्रतिनिधी दप्तर : ता. ११ मे १७७०

द।। बो।। खंडोजी बीन बसोजी व कुसाजी बीन मल्हारजी सजुगरे कासार वस्ती मौजे घोलसवडे ता।। मलकापुर सु।। सबैन मया व आलफ कारणे—साहे-बाचे सेवेशी किले विशालगडचे मुक्कामी लिहुन दिले खूट पत्र असीजे—मल्हारजी सजुगरे आपला वडील भाऊ मौज मजकुरी कार्तीक मासी मृत्यु पावला त्यास मौजे केरले ता।। मजकुर येथे मांती द्यावयास घेऊन गेलो. त्यास खंडोजी बीन

आत्माजी साळवी पाटील मौजे मजकूर यांचा लेक जोती देवळात होता त्याने बाहेर येऊन दाही दिली जे............... तुम्हास मढे आणून आमच्या गावी देवळाजवळ माती द्यावया कारणे काय. त्यावर पाटील मजकुरही तेथे येवून देवाची व दिवाणची दाही दिल्ही आणि आपण घरास गेलो त्यानंतर हुंबोलीकर व घोलसवडेकर मढे पाहावयास आले होते ते कज्या देखोन येकीकडे जाहाले आम्ही रात्री दाही मोडून मढयास माती दिली त्या उपरी खंडोजी पाटील हुजुर येऊन वर्तमान विदीत केले त्यावरून सरकारातून आपणास व हुंबोलीकरास व घोलसवडेकरास बोलावणे करून हुजुर आणवुन वाजपुसी केली त्यास हुंबोलीकर व घोलसवडेकर बोलिले जे आपल्यास बोलाविले म्हणोन मढयाबरोबर गेलो. वरकड आपणास ठाऊक नाही. त्याजवर आम्हास आज्ञा केली जे तुमचा मजकुर कसा काय आहे तो विदीत करणे त्यावर आपण करिना बोलिलो जे पेशजो आपली म्हातारी हुंबोलीत मेली तिला मौजे केरले येथे आणून देवळाचे पोवली बाहीर माती दिली. याकरिता त्याच जाग्या-वर याजला माती दिली. आम्ही तेथील वतनदार साळवी म्हणवितो. आम्हास तेथील देवधर्म लागतो असे असोन हे कज्या करितात. येविषयीची चौकशी करून ईनसाफ हरदुजणाचा करवावा त्यावरून धन्याही कागद कतबे राजी-नामे जामीन सरकारात घेऊन देसकांस व भोवर गावचे वतनदारास आज्ञा करून मौजे मजकुरी मनसुबीस थल नेमुन दिल्हे त्यावरून देसकाही येणेप्रमाणे मनसुबीस जमा केले. बी तपशील—

देसक ता॥ मजकूर	भोबरगाव ता॥ मजकूर
२ देह ४१	१ उभी पांढर मौजे मजकुर
१ बालोजी कोंकरे देसाई	१ मौजे आंबे
१ जगन्नाथ मोरेश्वर देशपांडे	१ मौजे तलवडे
	१ ,, मानोली
३ देह २८	१ ,, हुंबोली
१ महिमाजी दळवी देसाई	१ ,, घोलसवडे
	१ ,, जावली
१ तुकोजी दळवी देसाई	१ ,, कार्सोड
१ सदाशिव गोविंद	१ ,, वटकूर

सातपुते नी॥ देशपांडे	१	,, चांदोली
५	१	मौजे वारूण
	१	मौजे टाकाळी
	१	मौजे आलतुर
	१३	

याप्रमाणे जमा होवून मौजे मजकुरचे थली मनसुबी केली त्यास पंचाईताच्या मते फुरशीस करिता आपल्या वतनाच्या साधनुकीचे कागदपत्र भोग भोवरा सडी साक्ष आमच्या हातून पुरवणी न होय ऐसे जाहले तेव्हा पंचाईतात खोटा जाहालो तदनंतर पुन्हा मनसुबदाराही आम्हांस सांगीतले जे आणखी काही तुमचे वतनाचे साधन असेल तर घेवून येणे त्याजवर पंचा जवळ आपण बोलिलो जे वतनाचा वडील आपला बंद भाऊ धोंडाजी साळवी खारापाटणी आहे. त्यास आणुन त्यांची पुरवणी करून देवू ऐसे बोलोन मुदत मागोन घेतली परंतु मागती दोही दिवसाही पंचात येवून सांगितले जे धोंडजी आपल्या हातुन येत नाही तुम्ही मनसुबदार सांगाल त्यास आपण मान्य असो. यैसे बोलिलो. त्यावर देसकांनी हरदु जणास हुजुर आणुन वर्तमान विदीत केले त्यावरून धण्याही हुजुर मनसुबीची चौकशी मनास जाणुन आज्ञा केली की तुमचे साधन साक्ष असीला तर घेवून येणे. त्यावर आपण सरकारात अर्ज केला जे आपला बंदभाऊ वतनाचा सरीला धोंडजी साळवी खारापाटण येथे आहे. त्यास आणवावा तो सांगेल ते आपणास मान्य. त्यावरून हुजुरे पाठवून धोंडजीस हुजुर आणुन हजरत पीर मलीक शहान याचे दरोगीयात पांचाचे साक्षीनशी बोलविला त्याने सांगितले जे सजुगरे आपले बंदभाऊ नव्हत. पाटीलकीसही संबंध नाही. साळवी म्हणवून सांगतात परंतु साळव्यात सोईरीका आहे ऐसे पुरवून दिल्हे आपणास वतनासी संबंध नाही न्यायास खोटा जाहालो त्यावरून धण्याही येजीतपत्र व खुंट पत्र देणे म्हणवून आज्ञा केली त्यावरून आपल्या खुश रजा मंदीने येजीत पत्र पाटील मजकुर यास लिहून दिल्हे. व खुंट पत्र सरकारात लिहून दिल्हे या उपरी आम्ही सदरहु मौजे मजकुरच्या पाटिलकीच्या वतनाचा कजीया सांगो अथवा बोलो तरी दिवाणचे अन्याई हे खुंट पत्र लिहून दिले सही छ१४ मोहरम

लेखांक : १३४

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १७७१

विरेश्वर भट बीन रुद्रंभट व भट बीन अनंत भट आठल्ये वास्तव्य कसबा देवेले सु॥ ईहिदे सबैन मया व आलफ लिहून दिला करिना अैसाजे आपलें वडील रुद्रंभट व बाळंभट व श्रीधरभट व रामभट व बाबणभट हे पाच बंधु कसबा देवळे मध्ये येकत्र असते समई हरी विश्वनाथ मोघें यांच्या मोहरा पावणाशे ठेवणुकेस होत्या त्याचा खर्च शामभटी व बाबणभटी व तीर्थरुपी केला त्यानंतर घरामध्ये कलह उत्पन्न होवून बाळंभट विभक्त जाहाले ते येक वर्ष बाहेर होते वरकड बंधु येकत्रच होते त्यावरी श्रीधरभट व रामभट व बाबणभट या त्रीवर्गाही विच्यार करून वेगळे निघोन सोप्यामध्ये येकत्र राहिले त्यावरी रुद्रंभट रत्नागिरीस गेले होते तिकडून घरास आले बाळंभटास बोलावून आणून सांगितले की, तुम्ही आपली मुले, मनुष्ये घेवून येवून येकत्र राहणे. तुम्ही आम्हास सोडून जावू नका. बरे उत्तम, म्हणवुन माणसे घेऊन येवून येकत्र राहिले. त्यावरी रुद्रंभटी व बाळंभटी विच्यार करून त्रिवर्गांस बोलावून सांगितले कीं, कर्ज व संपदा यथाविभागे वाटून घेणे तेंव्हा संपदा बाराशे व कर्ज सोळाशे जाहाले त्यासमई त्रीवर्ग बोलिले की, संपदा व कर्ज आपणास नको. तुम्ही उभयतास मनाने घेणे देणे. ते वेळेस आमचे वडील बंधु यांचा व आमचा जन्म जाहाला नव्हता. पाच बंधु विभक्त जाहाले अैसे यैकोन हरी विश्वनाथ यानी ठेवणुकेचे मोहराकरिता निकड करून कारकून व माणसे बसविली तेंव्हा बाळंभटी व रुद्रंभटी यांचा गुंता उरकून फारीखत घेतले ते समई गणेश भटांचा जन्म जाहाला त्यावरी काही दिवसानी आमचाही जन्म जाहाला. सहा महिन्याचे आम्ही होतो. ते वेळेस हबशी यांची स्वारी येवून तीर्थरूपास व मातोश्रीस व आपणास व गोविंदनाईक सरदेसाई यास धरून अंजनवेलीस नेले तीर्थरूपास व गोविंद नाईक यास येक बेडी घालून तीन दिवस येकत्र होते तेंव्हां दादोबा नाईक सरदेसाई यानी हबशी यास अर्ज करून दोघांची बेडी काढविली आणि आपल्या स्वाधीन करून घेतले. सहा महिने होते तदनंतर गोविंद नाईक यास दंड हजार रुपये केला. तीर्थरूपास साहाशे पंचवीस दंड केला. तीर्थरूपी दादोबा नाईक यास जामीन देवून मातोश्रीस व आपणास बोलीस ठेवून निरोप घेवून आले. रामाजी बावाजी यांचे........घेतले की, आपली व सीदी सात

यांची भाऊबंदकी आहे तुमचा........व पुत्र सोडवून आणितो त्यावरून निरोप घेवून श्रीमंत प्रतिनीधीच्या दर्शनास आले. सविस्तर वर्तमान निवेदन केले. श्रीमंती रामराव बावाजी यांस पत्र लिहिले की, भटजीचा....... व पुत्र आंजनवेलीहून सोडवून आणवणे म्हणवून पत्र पाठवीले. श्रीमंती दोनशे रुपये तीर्थरूपास दिले. पनालीयास महाराजांच्या दर्शनास श्रीमंत जावू लागले ते समई भटजीसही समागमे घेऊन गेले. भटाबरोबर श्रीधरभट तांबे होते भटजीस राजदर्शन श्रीमंताही करविले. सविस्तर निवेदन केले. माहाराज भटजीस पाचशेहे रुपये कर्नाटक प्रांती देत होते. ते घेतले नाहीत व पुत्र हबसी याच्या बंदी आहे तो सोडवुन आणवावे म्हणवून भटजीनी अर्ज. त्यावर रामराव बावाजी यास सरकारची पत्रे पाठविली. त्यावरी काही दिवस तेथेच होते. श्रीमंती माहाराजास अर्ज करून मौजे शिपोशी हा गाव ईनाम करून देवून राजपत्रे व ईकडीले पत्रे भोगवटीयास करून देवीली त्यास मागे घरीं हबशी याने उपद्रव करून साडे-तीनशेहे दंडाचे यैवजी घेतले बाकी यैवज राहिला तो रामराम बावाजी यानी मना करून मातोश्रीस व आपणास सोडवून रत्नागिरीस आणिले. भटांस भोलावून नेऊन आपली व मातुश्रीची भेट करविली भटांचा सन्मान करून घरास लावून दिले.

त्यानंतर साताऱ्यास शाहु माहाराज यांच्या दर्शनास गेले समागमे महादेव भट नवाथ्ये होते. राजपत्रे घेवून घरास आले कृष्णभट आठल्ये मौजे पडवण ता। लांजे येथे होते त्यास पत्र पाठवीले की, शिपोशी हा गाव नुतन ईनाम मिळविला आहे. तो वोस आहे त्याची वस्ती जाहली पाहिजे त्यास तुम्ही व आणखी कोणी ब्राह्मण मिळाले तरी घेवून येणे त्यावरून कृष्णभट सांगोन पाठवीले की, श्रीधर भट व रामभट व बाबणभट हे त्रीवर्ग बिलवडे प्रांत राजा-पूर प्रांती आहेत. त्याजवळ कुणबी पांच चार आहेत त्यासही घेऊन या म्हणाला तरी घेऊन येतो. ऐसे सांगोत पाठवीले त्यावरून रुद्रंभटी उत्तर पाठवीले की, आमचे त्रीवर्ग बंधु व कुणबी व तुम्ही गावास येणे त्यावरी कृष्णभट व श्रीधरभट व रामभट व बामणभट कुणबी सुद्धा मौजे शिपोशीस आले, त्यावरी आमची मुले माणसे गावात आली कृष्णभट व त्रीवर्ग आमचे बंधु येकत्र घर बांधोन राहिले. आमचे घर वेगळे होते. गावची लावणी त्यानी व आम्ही मिळोन केली. दीड वर्ष ते गावात होते. चौधलीचा भाग आम्हास दिला त्यावरी त्रिवर्ग निघोन जाऊन

दाभोळच्या ईनामतीच्या ठिकाणात राहिले. त्यानंतर रामभट बाबा पनालीयास जावून दोनशे लारीची वृत्त मिळवून पत्रे घेवून आले. दाभोलीत वृत्त मोजुन घेतली त्रीवर्ग येकत्रच होते. तीर्थरूपाची वृत्त व काकांची वृत्त कसबा देवले व जंगल व दाभोळे व मेघी येथे पाच बंधु येकत्र असता आहे त्याजवर जो पैसा पडेल तो पाच जण देत आलो. तीर्थरूप वेगळे जाहल्यावर ईनाम गाव घेतला. त्याजवर तीर्थरूप पंचवीस वर्षे होते. मृत्यू पावल्यावरी रामभट काकाही कलह करून देशमुखाकडेस आम्हास नेले. देशमुखाही दाहा ग्रहस्त व वे।। बाबाजी दिक्षीत व बापुभट आठल्ये व सरदेशकुलकर्णी यैसे मिळोन साक्ष पाहोन पंचाईती केली ते समई रामभट काकांचे पुत्र चंद्रभट व दिनकरभटचे पुत्र नारायणभट व आपण उभयता बंधु ऐसे होतो कलहनिवृत्त करून परस्परे स्वदस्तुरची फारीखते जाहाली त्यावरी ईनामतीची लागवड जाहाली त्याची पाहाणी दिनकर भट व चंद्रभट व आम्ही त्रिवर्गी मिळोन केली. गला आला तो पांचानी येथा विभाग वाटुन घेतला दोन वर्षांनी रामभट काकानी व दिनकर भटानी ईनामती मोजुन घ्यावयाचा उद्योग केला त्या समई आम्हास काही गुंता होता यास्तव पुढे मोजून घेवू यैसे म्हणत होतो. परंतू न यैकता वृत्तीचा विभाग न देता सारिखे जाहाले हे लिहून दिले सई.

लेखांक : १३५

प्रतिनिधी दप्तर : ता. ६ फेब्रुवारी १७७१

जबानी माहदेव भट नवाथ्ये उमर वर्षे १६ वास्तव्य मौजे आडवली ता।। लांजे सु।। ईहिदे सबैन मया व आल्फ वेदमूर्ती विरेश्वर भट व याचे चुलत बंधु वेदमूर्ती गंगाधर भट व जीवभट व येसंभट आठल्ये या उभयतांचा मौजे शिपोसीचे वाटपाचा कज्या लागोन हुजूर विशाळगडास आले याकरिता आम्हांस बोलावून आणुन उभयताचे भाऊ खटलेचे वर्तमान लिहून द्यावयाविषयी आज्ञा दिले. त्यावरून आम्हास हकीकत ठाऊक आहे ते सत्योदरे लिहुन दिल्हे अैसीजे कलमे—

वेदमुर्ती रुद्रंभट व बाळंभट हे दोघे सहोदर बंधु वेदमुर्ती श्रीधरभट व रामभट व बाबण भट हे त्रिवर्ग सापत्न बंधु एकत्र होते. प्रथम बाळंभट वेगळे गेले ते येक वर्ष गणो नारायण वैशंपायन याचे घरामध्ये देवालयाशेजारी राहिले. श्रीधरभट त्रीवर्ग भटजी जवळ एकत्र होते एका वर्षानंतर हे त्रिवर्ग बंधु कर्जा निमित्त्ये वेगळे शेजारी कोठार घर होते त्यामध्ये जावून राहिले हे त्रिवर्ग बंधु वेगळे राहिल्यानंतर भटजीचे घरी अचाल यास्तव बाळंभटास बोलावुन आणून एकत्र राहाणे अैसे बोलिले त्यावरी बाळंभट बोलिले की, त्रिवर्ग बंधु निराळे गेले हे पुन्हा घरात एकत्र व्हावयास येत अैसे असले तर आपण येत नाही त्या उपरी भटजी त्रिवर्गास पुसिले की, तुम्ही एकत्र होणार की, वेगळे राहणार ? तेव्हा त्रिवर्ग बोलिले जे कर्ज लोकांचे देणे आहे याकरिता आम्ही एकत्र होत नाही बाहेर राहून पोट भरू तुमची संपदा व कर्ज आम्हास लागत नाही तेव्हा कर्ज सोळाशे रुपये देणे व यांस अैवज पाहाता बाराशे रुपयाचा तो अैवज हंडे भांडे गुरे-ढोरे व बायका वरील अलंकारसुद्धा बाराशेचा ऐवज बायकावरील अलंकार त्रीवर्गाच्या वेगळ्या गेल्या त्यावरी होते ते त्याकडे राहिले या दोघी व एक सून बाळंभटाची येकुण तिघी जणीवर त्याच प्रो। होते ते याकडे राहिले हा बाराशे अैवज येणे प्र।। कलम १

रुद्रंभटजी गडाहुन घरास गेल्या उपरी आठ-पंधरा दिवसा रात्रौ स्वप्न जाहला जे तुम्हास व गोविंद नायक सरदेसाई यास धरून आंजनवेलीस न्यावयास हबसी यांचे वरातदार स्वारी येत आहे अैसा दृष्टांत पडिल्यावरी संध्याकाळचे श्री देव स्वर्गेश्वर याचे दर्शनास जाऊन तेथुन गोविंद नायकांच्या घरास संध्याकाळी आले. त्या पाशी दृष्टांत सांगितला ते बोलिले की, आजी चार प्रहर रात्र गेली उपरी उदेक हर कोठे बाहेर जाऊ अैसे बोलतात तो तेच समई स्वारी घडून उभयतास धरिले भटजीचे घरास स्वारीतील लोक जाऊन भटजीची स्त्री व साह महिन्याचा पुत्र अैसी उभयता घेवून आंजनवेलीस गेले तेथे हबशास पुसिले जे आम्हांस धरून आणावयास निमित्य काय. त्यास हबसी बोलिला जे तुम्ही माहालाचा कारभार नायकास मिळोन करिता आपले भेटीस येत नाही. यास्तव धरून आणिले. भटजीनी आपणाकडे कारभार विच्यार काही नाही आपण वैदिक ब्राह्मण आपणासारखे ब्राह्मण तुमचे राज्यात दाहा सहस्र आहे त्यामध्ये मी एक अैसे बोलिल्यापरी हबशी बोलिला की, तुम्ही

रामचंद्रपंताचे व आप्पा यांचे गुरू थोर आहा सहस्त्र रुपये आपणास द्या त्यास भटजी बोलीले जे आपणास कवड्या मिळत नाही. त्यावरी भटजीस कारागृही घातले. त्यांची स्त्री व पुत्र सरदेशमुख नायक यांनी आपले हाती घेऊन घरास नेली. भटास बेडी व थोक घातला एक दिवस होता. दुसरे दिवशी अपराध दो चौघामी जाऊन रुपये कबुल करा म्हणत. हे आपणास रुपया मिळत नाही यैसे क्षणोक्षण म्हणत. मग हबशी याने तोखबेडी काढवून आणवीले तेव्हा हबशाजवळ आपणास पैसा मिळत नाही अैसे बोलीले तेव्हा हबशी बोलिला जे सोळाशे रुपये तुम्हास आंगरे याने दिले तुमचे यजमान रामचंद्र पंत व आप्पा असता रुपयास उणे काय आहे ? तेव्हा भट बोलिले की तुम्हास उणे काय आहे ? मी ब्राह्मणाने भिक्षा मागोन तुम्हास आणून द्यावे, तुम्हास उणे आहे अैसे नाही तेव्हा सातशे पंचवीस रुपये घेऊन यात उणे होत नाही. म्हणवून हबशाने शफत केला त्यावरून रुपये द्यावेसे जाहाले तेव्हा वोलीस बायको व पुत्र विरेश्वर भट तेथेच ठेवून आपण निरोप घेवून घरास आले या उपरी दोन दिवसा रामराव बावाजी यानी रत्नागिरीहुन

भटास बोलावयास माणसे पाठविली भटजी निघोन रत्नागिरीस गेले भेट जाहाल्या उपर रामराव बोलिले की, तुम्ही चिंता न करावी तुमची स्त्री व पुत्र आपण सोडून आणितो त्याचे आपला स्नेह चालत आहे. तेथून निघोन देवाल्यास आले तो विशाळगडहुन गंगा धर पंत प्रतीनिधी यानी मनुष्य बोलावणे पाठविले. गडास आले. त्यास बहु मान पुरःसर भेटी जाहाल्या. तेव्हा पंती भटास आश्वासन दिले जे तुम्हास हबशी दंड करील तो आम्ही वारऊन तुमची मुले माणसे आणवितो. कलम १

भटजी आश्वीन मासी सातारीयास जावयास निघाले तेव्हा बराबर आम्हास नेले तेथे पावलो. पंतप्रतीनिधी यांनी पत्रे श्रीपतराव प्रतीनिधी यांस व गोविंद रामाजी मुतालीक यास यैसी दोन पत्रे दिली होती ती घेऊन विठ्ठल हरी तळवलकर यांचे विद्यमाने रायाचे दर्शन घेतले. त्या उपरी मुतालीकाची भेट जाहाली. पंताचे पत्र रायास दिल्हे पत्र वाचून रात्री उत्तर लेहिले जे संभाजी राजे यांचे राज्य मोडके जाहाले ते गाव लुटितात. भलत्यास गाव देतात. आमचा राजा देत नाही. त्यास तुम्ही थोर ब्राह्मण आले आहा अन्यत्र आष्ट प्रधान आहेत त्यांच्या भेटी घ्याव्या आपले साहित्यास आम्ही अंतर न करू. यैसे बोलिल्या-

वरी भटजी आवश्य यैसे बोलिले गोविंद पंताची भेट घ्यावयास सांगितले. गोविंद पंताचे भेटीस गेलो पत्र त्यास दिले. त्यानी राव काय बोलीलेसे पुसिले. तेव्हा राव बोलिल्या प्रो सांगितले त्यांस मुतालीक बोलिले की, जे राव बोलिले ते करितील त्यात आम्ही अंतर करणार नाही. त्यावरी आबुराव मजमदार व चिटकोपंत सचीव व खंडोबल्लाळ चिटणीस व नारबावा मंत्री व मुदगल बाबा पंडीत राये यांच्या भेटी घेऊन चिमाजी आपा पेशवे यांची भेट जाहाली नित्य व येका दिवसाआड यांचे दर्शन घेत होतो. महिना दीड पावेतो सातारा होतो. कार्यसिद्धी होऊन येत्या समई राव प्रतिनिधी व फत्तेसिंग बाबा हे कर्नाटक प्रांतीचे मसलतीस जावयाची सिधतेत होते. डेरे माहुलीवर दिल्हे. फत्तेसिंगबाबाची दिवाणगिरी नील प्रभु यास होती. नील प्रभु विशाळगडी असता भटांचा त्याचा अत्यंत स्नेह. यामुळे त्याचे भेटीस रोज जात असत. परंतु त्यास फौजेच्या तरतुदीमुळे बोलावयास गांठ पडली नाही बाजार पेठ्याचे पलीकडे त्याची फौज उतरली होती. तेथे भटजी भेटीस जात असेत. आम्ही बिऱ्हाडास भोजनास महादेवभट आठल्ये याचे घरास येत. बाजार पेठ्याचे आली कडे येतेसमई मार्गी नील प्रभुची पालखी पाठीमागुन येत होती. भट पुढे जातात हे पाहोन पालखी उभी करून उतरले. भटजीस बोलाविले. भटास पुसिले की आपण कोणा कारणास्तव येथे आले त्यास भटजी बोलिले की, राजेश्री संभाजी माहाराजानी आपणास गाव ईनाम करून दिल्हा आहे त्याप्रमाणे राजश्री शाहु माहाराज यांस विनंती करून ईकडून ईनाम गावची पत्रे करून घ्यावी या आर्थे आलो. यैसे बोलिल्या उपरी नीलप्रभु बोलिले की आम्ही माहाराजांची आपली भेट करून देतो आणि फत्तेसिंग बावास सांगोन माहाराजास आपणा विषयी विनंती करून आपले कार्य होय ते करू. आपण दर्शनास जावयास नारळ घेऊन कृष्णाजी नाईक जोसी याचे दुकानी बसावे. दरबारास जावुन तेथून आपणासबोलावयास माणुस पाठवितो आपण यावे. तेथून भेटीस घेऊन गेले. दर्शन जाहाले तेथे समक्ष भटाची स्तुत केली. माहाराज आवश्य म्हणोन बोलिले श्रीपत रायांचे जिल्हे तीलगाव सिपोसी ऐसे सांगितले त्यावरून माहाराजांनी हात चिठी पत्रे लिहावयास कारकूनास दिली. चिटनीसानी पत्रे दिली. त्यावरून नील प्रभु यानी भटजीस खंडू प्रभु चिटनीवीस याचे स्वाधीन करून यांची

पत्रे करून सत्वर यास निरोप होय ते करावे म्हणोन वडील बंधुस सांगीतले त्यावरून पत्रे लिहिली सिक्के व्हावयास आठ च्यार दिवस लागले तदनंतर पत्र सिक्के वरीस लागली तेव्हा सर कारकून मुछदी करून खेरीज होते तेथे गोविंदरायाजी मुतालीक यानी भटजीस सिपोशी गाव द्यावयाचा नव्हे विशाळगडचा तनखा येसे बोलिले. फत्तेसिंगबाबा व निलोबायानी भटजीस आणुन भेटवीले गाव द्यावयाचा करार करून पत्रे जाहाली असता, काय म्हणता म्हणोन माहाराजानी पुसीले तेव्हा गोविंद रायाजी बोलिले की राव मसलतीहुन आले म्हणजे सिक्के होतील येसे म्हणता त्या वेळेस पत्रे राहिली.

कलम १

पनाळ्याची राजपत्रे घेतली ते समई रामचंद्र पंत नव्हते. ते पंत प्रतीनिधीची व रामराव बाबाजी व बाजीराव आमात्य यांची पत्रे घेतली आहेत.

कलम १

प्रथम कलमातील रुद्रभटापासुन सापत्न बंधु उभयता वेगळे गेले. बाबण भट दादा तुमचे पाय सोडून जात नाही म्हणोन त्यापासी राहिले. पंधरा दिवस भटाजवळ होते बायकास न पटे. तेव्हा बाबणभटी आपले बायकोस सोप्यात काही दिवस ठेवीले. तेव्हा भट बोलिले की उपाहास होते. मातुश्री व तुमचे बंधु वेगळे गेले तुम्ही बंधुजवळ जाणे. त्यावरून बंधूकडे गेले.

हरी विश्वनाथ मोघे यानी भटाजवळ पावणाशे मोहरा ठेव दिली होती त्यास भटजीचे बंधु विभक्त जाहाले असे वर्तमान मा॥र नीलेस कळले. त्यावरून रुद्रंभटजीकडे रामाजी पोमेडीकर व वरातदार ठेवीचा अैवज मागावयास आले. ते समई भटजी रत्नागिरीस रामराव बाबाजी यानी बोलावून नेले होते. वरातदारानी घरी अतीशय करू लागले या करिता श्रीधरभट व रामभट व बाळंभट गडास आले. हरीपंताजवळ श्रीधरभट व रामभट आपण वेगळे जाहालो म्हणोन बोलिले कर्ज व संपदा भटजीकडे लागली आम्हाकडे कर्ज मागावयास तुम्हास संबंध नाही. येसे बोलिल्या उपरी बाळंभट यानी कर्जाचा भाग वाटितो येसे मान्य करून आठ दिवसाचा वायदा केला. दादं जोशी मोघे हातखंबेकर यासी जामीन होऊन आपण खाले गेले. मुदतीस वरातदार गेले. घरात वरातदारानी अतिशय केला. भटजीनी वस्तत्र कर्ज वाम मेळवुन त्यासमई पांचशे रुपये दिले. रुद्रंभटजी कर्जाच्या परिहारा निमित्ये कुलाब्यास कान्होजी

आंगरे सरखेल याकडे गेले. समागमे श्रीधरभट तांबे नेले. सरखेलावर कवीत. पावणाशे श्लोक केले होते ते तेथे भेट घेवून वाचीले. त्याचा अर्थ सांगितल्यावरून सरखेल संतोष होऊन भटजीस पुसिले प्रस्तुत आपले आगमन काय निमित्य जाहाले. त्यास भटजीनी सोळाशे रुपये आपल्यास ब्रम्हस्व आहे. यास्तव आपले दर्शनास आलो अैसे बोलिले. त्यावरून आंगरे यानी ब्रम्हस्वाचा निकाल आपण करितो यैसे बोलिले. तीन वर्षांत ब्रम्हस्वाचा तुमच्या परिहार होईल. प्रस्तुत पांचशे रुपये देतो दोन वर्षांत अकराशे रुपये देवू त्यावरून पाचशेहे रुपये घेवून घरास आले. तेथुन गडास येऊन हरीपंताचे कर्जाचा परिहार करून फारीरवत घेऊन गेले. कलम १

रामराव बाबाजी याचा हबशी यांचा स्नेह चालत होता याकरिता त्याकडे मनुष्ये पाठवुन भटाची स्त्रीपुत्र आपणा जवळ आहेत ती सोडुन देणे त्याजवळ रुपया मागाल तो आपण देवू यैसे लिहून पाठविल्यावरी हबशी याने भटाकडे निकडीचे वरातदार पाठवून दोन अडीचेशे रुपये वसुल पाडिला बाळंभट घरी होते त्यापासुन रुपये घेतले त्यावरी भिक्षेचे उद्देशे भटजी पनाली यास गेले तेथे पंत प्रतीनिधी होते त्यांचे विच्यारे माहाराजांची भेट घेतली त्याचे पुर्वी वाडीगाव घ्यावया निमित्य फौजा जमा करून माहाराज वाडीगावी होते त्यावरी राव प्रतीनिधी फौजा सातारीयाहुन घेऊन आले. माहाराजांचा मोड जाहाला. मातुश्री आईसाहेब व मुत्सदी आदी करून सातारी यास नेले. माहाराज निघोन पनालीयास आले त्यावरी भटजी दर्शनास गेले तेव्हा पंत प्रतीनिधी तेथे होते. माहारांजोच दर्शन करविले. भटजी काय निमित्य आले यैसे माहाराजानी पंतास विचारिले त्यास भटजीचे स्त्रीपुत्र हबशी याने धरून नेऊन खंड सातशे पंचवीस रुपये मागतो. बोलीस स्त्रीपुत्र ठेविले आहेत. यास्तव माहाराजाचे दर्शनास आले. तेव्हा बोलिले की, प्रस्तुत फौजेचा दंगा आम्हास पडिला हा कळतच आहे. भटजीस द्यावयास तूर्त हाताखाले यैवज नाही. सोंधे बिदनूर प्रांताचा अैवज येणे आहे. त्या अैवजावर वरात दोनशे रुपयाची घ्यावी अैसे बोलिले. त्यावरी भटजी बोलिले की, सौंध्याचा यैवज आमचे हातास कैसा येतो. माहाराजास या वेळेस आशीर्वाद करून जातो. यैसे बोलिल्या उपरी पंत प्रतीनिधी यानी माहाराजांस विनंती केली ब्राम्हण थोर आहेत कुटुंब वछल्ल. यास माहाराजानी गावएक

लहान थोर पाहुन द्यावा. त्यावरून गावचा शोध मनास आणिता माहाली गाव मोकासी ईनाम व देशमुख देशपांडे–यांचे गाव रिणकोचा–याकरिता शिपोशी गाव माहाराजाकडील या बद्दल या गावची ईनाम पत्रे करून पंत प्रतिनिधी यानी देविली ती पत्रे घेऊन घरास आले. ते वेळेस भट बरोबर श्रीधरभट तांबे बाळंभटचे मेव्हुणे होते. घरास आल्या उपरी रामरावानी हबसी याजकडुन स्त्री व पुत्र सोडवुन रत्नागिरीस आणविली. भटास बोलाऊ पाठवीले. भट रत्नागिरीस गेले. भटास व बायकास वस्त्रे देवून रवाना केली ते घरास आले. साहा-च्यार महिने घरी होते मग सप्तरुषीस जावयाचा उद्योग केला. कलम १

पत्रे सिक्के व्हावयास राहिली. दुसरे दिवशी चिमाजी आपा पेशवे यांचे दर्शनास भटजी गेले त्याजवळ आपांनी सांगितले की तुमचे पत्रास अडथळा गोविंदजी रायाजी यानी केला सिके जाहाले नाही यैसे बोलिले. मग खंडो प्रभु चिटणीस याचे भेटीस गेले. त्याही त्यामाणे सांगितले. मग गोविंदरायाजी याचे दर्शनास गेले त्यानी त्यावेळीस पत्रे तुमची राहिली राव आल्या उपरी पत्रे होतील. मग खंडोप्रभु चिटणीवीस याचे घरांस गेले. पुढे काय करावे म्हणोन पुसीले. त्यांस चिटनीसानी सांगितले जे आम्ही फत्तेसींग बाबास व निलोबास पत्रे लिहिंतो. जासुदा समागमे आपण लष्करात पंचगंगेवर जावे. त्यावरून भटजी भोजन करून निघाले. आम्ही समागमे गेलो होतो. संध्याकाळी पालीस गेलो दुसरे दिवशी बेलवड्यात वसंत गडाखाले भोजन करून संध्याकाळी कऱ्हाडास गेलो तेथे कृष्णाजी विठ्ठल पेंढारकर सुभेदार यांचे घरी भोजन करून निघालो ते संध्याकाळी वाठारास गेलो. तेथुन दुसरे दिवशी वारणेवर स्नाने करून आस्तमानी पंचगंगेवर लष्करात आप्पाजी विश्वनाथ कानीटकर यांचे पालास गेलो. तेथे पर्जन्य अतिशय पडिला. दुसरे दिवशी लस्करचा मोकाम जाहाला. प्रातःकाळी नीलप्रभुचे दर्शन घेतले. जासुदाने दोन पत्रे अगोदर त्यास पावती केलीच होती. नील प्रभु यानी भटजीस स्नान करून भोजन करून यावयास सांगितले. भोजन करून गेले तेथे त्यांच्या डेऱ्यात सा च्यार घटका बसिलो होतो. संध्याकाळ जाहाला. यास्तव भटजी आपण बिऱ्हाडास जावे आपली पत्रे तयार करून ठेवितो. तेव्हा बिराडास जावुन दुसरे दिवशी प्रातःकाळी भोजन करून गेलो. तो लष्करचे बहुतेक कुच होवुन गेले खास खासे राहिले होते त्यासमई सर्वांनी

निघावे तेव्हा नील प्रभु बोलिले की, भटजी तुम्ही रायाकडे चला, तो पाठीमागून आम्ही पत्रे घेऊन येतो. त्यावरून रायाचे दर्शन घेतले तेव्हा राव बोलिले की, भटजी मार्गाने कैसे आले येतसमई आपले दर्शन न जाहाले. यास्तव आपले दर्शन घ्यावयास आलो, यैसे भटजी बोलिले. तो पत्रे घेवुन नील प्रभु गेले. त्यांनी रायाचे हाती पत्रे दिल्ही. ही पत्रे रायानी वाचुन पाहोन व आपले स्वस्ताक्षरनीशाण करून दिल्हे. मागे कऱ्हाडास मार्गाने पोहचावयास .... पंचवीस राऊत दिल्हे. रावतास ताकीद केली की, भटजीस कराडास पावुन तेथे पावली याची पोंच भटाचे हातीचे अक्षरे घेवून येणे. त्या रावतांचे सोबतीने ईसलामपुरास आलो तेथे बालाजी जनार्दन गुण्ये यास मामला होता. त्यांचे घरी राहोन रावतांजवळ पावली याचे उत्तर रायास देवुन तेथे दोन दिवस भटजी राहिले. तेथुन कऱ्हाडास आलो तेथुन सातारी यास येऊन भेट घेतली. जासुदानी पत्रे लस्करची अगोदर खंडो प्रभुस व गोविंद पंतांस नेवून दिल्ही गोविंद पंताचे दर्शन जाहाले त्यानी माहाराजाकडून सिके पत्रास करवुन पत्रे पेशव्याकडे गेली. आष्ट प्रधानांची निशाणी शिके जाहाले. पत्रे हातास आली. तेथुन कुलाब्यास आंगरे यांकडे जावयाचा उद्योग करून ईनाभ पत्रे वे॥ रघुनाथ भट साठये या बरोबर घरास पाठवून दिली. बाळंभटा जवळ द्यावयास सांगोन आपण निघोन कुलाब्यास गेले समागमे आम्ही गेलो. तेथे च्यार महिने लागले. घरांस आल्यानंतर गावची वस्ती करावयाचा उद्योग करावयांस लागले. तेव्हा गावामधील कूल डाळ (!) नाही त्या समई त्रीवर्ग बंधु बिलवेड येथे होते. कृष्णंभट आठल्ये पडवण ता॥ लांजे येथे होते त्यास सांगोन पाठवीले की, गाव शिपोसी ईनाम आम्हास जाहाली वसाहत करावी लागते ती तरी दोन चार ब्राह्मण व काही कुणबी रयत मिळेल ते घेवून यावे. आम्ही त्यास तीर्धल चौथल प्र॥ पाठऊ यैसे सांगोन पाठविले. त्या वरून कृष्णंभट सांगोन पाठविले की, आपले बंधु त्रीवर्ग बिलवडे ता॥ राजापुर येथे आहेत. त्याजवळ दोन च्यार रयत कुणबी आहेत. त्यास आणावे यैसे सांगोन पाठविले तर ते व आम्ही गावास येऊ. त्यावरून भटजीनी कृष्णभटास त्रीवर्ग बंधु व कुणबी यास घेवून तुम्ही देखील येणे म्हणोन निरोप पाठविला त्यावरून वर्षप्रतीपदेचा मुहुर्त पाहुन गावात कृष्णंभट व त्रीवर्ग आले. भटजीची मनुष्ये धामधुमीमुळे मठास लग्नास अनंत भटाचे गेली होती. ती

मठात येवून राहिली. तेथुन वर्षप्रती-पदेस मनुष्ये घेवून शिपोशीस आले. कृष्णभट व त्रीवर्ग यानी येक घर बांधोन राहिले शेतभात एकत्र चौघानी केले राजभाग चौथल प्रो जाहाला तो भटास दिला. त्यावरी दोन वर्षे जाहाल्या-नंतर भटाचे घरी दरवडा आवसीच-पडिला. त्यानी सर्वस्व घर लुटून नेले. त्यामध्ये आम्हचे सर्वस्व गेले. पोष्य पौर्णिमेस चोरानी लुटून नेले. ते समई भटाची खासगत संपूष्ट देवाचा समागमे फिरवावयाचा होता ते देव गडबडोन पडिले. ते देव सापडले. वरकड देव गेले. भटजीनी नागावा-गेला त्याची याद लिहिली ती खर्गे-श्वराचे पुढे नेऊन ठेविली. रात्री दृष्टांत जाहला जे चोर बावड्यास गेले आहेत. तेथे गेल्या उपरी सांपडतील. त्यावरून बावड्यास गेले. माहादाजी अनंत शेवडे कारभारी होते. त्यांनी चोर धरिले त्यांनी वस्तवानी खर्च केला बाकी राहिले ते देवमूर्ती व हांडे, भांडे काही सांपडले ते दिले. पोथी पाजरट रानात टाकिले. ते गेले. सापडले नाही. चोरास मारीत होते. ते यानी त्यापासून सोड-वीले. नीट मारू दिले नाही. जे हातास आले ते घेऊन घरास आले. त्यावर एक वर्ष त्रिवर्ग बंधु गावी होते. श्रीधर भट यांची स्त्री बाळंत होवुन मेली. या करिता त्रिवर्ग निघोन दाभोळचे कोंडांत जाऊन राहिले. त्यावरी त्रीवर्गांनी गावा विषयी भटासी कज्या केला हे आज-पर्यंत अैकिले नाही पनास वर्षे गाव-भटाकडे चालत आला आहे दोन तीन वर्षे कज्या करितात हे अैकितो.

कलम १

सदरहु प्रमाणे त्या उभयता वाद्यांचे वृत्त देखिले व ऐकिले होते. ते कलमे आठ लिहुन सत्त्योतर दिल्हे असे. छ. २० शेवाल सही.

लेखांक : १३६

प्रतिनिधी दप्तर : ता. १८ ऑगस्ट १७७१

मा। अनाम देसाई व देशकुलकर्णी ता। देवळे प्रां। राजापुर यासी आबाजीराव कृष्ण प्रतिनिधी सुा। ईसने सबैन मया व आलफ वो। यसंभट बीन दिनकर भट व जीऊभट बीन रामभट व गंगाधरभट बीन बाबणभट आठल्ये यांचा वो। विरेश्वरभट बीन रुद्रभट व गोपाळभट बीन अनंतभट आठल्ये यांचा मौजे शिपोशी ता। मांार हा गाव ईनाम येथील विभागाविषयी

व मौजे दाभोळ व कसबा देवले व मौजे मेघी व जंगलवाडी येथे वृत्ती आहेत त्याच्या विभागा विषयी कज्या लागोन मनसुबी हुजूर किले विशाळगडचे मुक्कामी आली. त्यावरून कतबे, करीने, व राजीनामे व वर्तवावयाचे जामीन घेवून हजीर मज्यालसीस पंचाईताकडेस मनसुबी नेमून दिली. त्यावरून पंचाईतानी मनसुबीची चौकशी करिता येथास्थीत साधन पुरावे निवाडा न पडे तेव्हा विरेश्वरभट बोलिले की बाबणभट काका व वडील वृद्ध आहेत यानी किल्ले मारी पिराच्या दरोग्यात शपथ करावी. त्यावरून बाबणभट यास हुजूर बोलावून आणुन पुसिले. त्यावर बाबणभट बोलिले की आपण सदंभटाजवळ असता रुद्रंभटी शिपोशी हा गाव ईनाम संपादीला. गावची राजपत्रे घ्यावयासी रुद्रभट गेले. त्या समागमे रामभट होते. सातारीयासी गेले तेव्हा समागमे आपण होतो. याप्रमाणे दिव्य करू. त्यावरून पंचाईत मते, ब्राह्मणाचा विषय पिरात शपथ करावे हे उचित नव्हे. यानी श्री कृष्णेचे सत्य करावे. त्याप्रमाणे बाबणभट मान्य होऊन कतबा लिहून दिला. बाबणभट अशक्त. मार्गी जावयाची निभावणी न पडे या करिता त्याचे पुत्र गंगाधर भट दिव्य करितो म्हणून कबुल करून कतबा लिहून दिला. त्यास विरेश्वरभट व गोपाळभट मान्य होवून कतबा लिहून दिला त्यावर दशरात्र दिव्याचा नेम करून येथाविधी दिव्य करावे म्हणोन करार करून येस भट व जिऊभट व गंगाधरभट व विरेश्वरभट व गोपाळ भट ऐसे पाच जण बराबर बाबूराव केशव कारकून व खिजमतगार सरकारचे देवून रवाना केले. ते कराडास गेले. तेथे सरकारच्या पत्रा प्रो देशमुख व देशपांडे व समस्त ब्राह्मण जमा करून श्रीकृष्णा तीरी गंगाधरभट यास पुसिले कीं हे श्रीचे दिव्य माहाकठीण आहे. गंगाधरभट बोलिले की आमचा विषय खरा आहे. श्री पार पाडील. त्यावर विरेश्वरभट व गोपाळभट यास सांगीतले की, गंगाधरभट दिव्यास सिद्ध जाहाले. तुम्ही हातावर उदक घ्यावे तेव्हा विरेश्वरभट बोलिले की, आपले वस्तु हातावर उदक घेववत नाही. ऐसे सर्वा समक्ष श्रीच्या तिरी बोलोन दिव्यास माघारले. यावर देशमुख व देशपांडे व समस्त ब्राह्मण व गोविंदराव लक्ष्मण कराडचे सुभेदार यानी सरकारात पत्रे लिहून पाठविली की, गंगाधरभट दिव्यास सिद्ध झाले. विरेश्वरभट दिव्यास माघारले. उभयता वाद्यामध्ये येक अमान्य झाला म्हणजे सहजच अप्रमाण ऐसी पत्रे आली यावर ती पत्रे हजीर मज्यालसीत वाचून पाहाता सर्वांच्या मते विरेश्वर भटी विभक्तपणे रुद्र-

भटी गाव मिळविला म्हणोन लिहून दिल्हे. त्याची यथास्थित पुरवणी न होय दिव्यासही माघारले. यावरून खोटे जाहाले. येसंभट व जिऊभट व गंगाधरभट यांनी लिहून दिल्हा प्रमाणे खरे जाहाले. त्यावरून तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी तुम्ही मौजे सिपोसी ईनाम गाव व कसबा देवळे व मौजे दाभोले व मेघी व जंगलवाडी येथील वृत्ती आहेत त्या व गाव पाचा जणाकडे चालवीत जाणे. या पत्राची प्रती लिहून घेवून अस्सलपत्र भोगवटीयास परतोन वे॥ येसंभट व जीऊभट व गंगाधरभट याजवळ देणे. जाणिजे छ ७ माहे रबिलाखर निदेश समक्ष

लेखांक : १३७

प्रतिनिधी दप्तर : ता. १५ सप्टेंबर १७७४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०१ जय. नाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध दसमी गुरुवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री आबाजीराव पंडीत यांसि आज्ञा केली येसीजे. तुम्ही स्वामीचे सेवेसी विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ठ जाहले. आज्ञे प्रमाणे हशम लोक राजश्री आपाजी भगवंत याबराबर रवाना केले आहेत. वरकड सेवक कज्या वृत्त मशार निले सेवेसी निवेदन करतील म्हणून विनंती लिहीली. तरी लोक पाठविले त्यांची हजिरी असामी ८५ पंच्यायसी लागली. मा॥र निलेनी स्वामीचे सेवेसी तुम्हाकडील अर्थान्वये विनंती केल्यावरून विदीत जाहाला. हुजरून मशार निलेस आज्ञा होऊन तुम्हाकडे पाठविले आहेत. आज्ञेप्रमाणे सांगतील व राजश्री यशवंतराव सिंदे सर सुभेदार यासी आज्ञा जाली आहे. आज्ञेप्रमाणे तुम्हांस लिहितील. त्यावरून कलेल. जाणिजे बहुत लिहिणे तरी सूज्ञ आसा.

लेखांक : १३८

प्रतिनिधी दप्तर : ता. २ नोव्हेंबर १७७६

सकल गुणालंकरण आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री आबाजीराव पंडीत स्वामी गोसावी यासी—

पो माधवराव नारायण नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणुन स्वकीये कुशल लिहीत जाणे विषेष तोतयाचे पारपत्य करावयास राजेश्री माहादजी शिंदे व भीवराव यशवंत यास फौजसुद्धा पाठविले यानी राजमाचीस जावून पारपत्य केले तो पळोन गेला त्याचे पाठीवर उभयता गेले त्यास तोतयाचे लोक जागा जागा घाटा खाली आहेत. तेथे फौजा रवाना केल्या असत. त्यास तोतयाचे लोक ईकडील सर्व पळाले व मारले याजकरिता तुम्हास लिहिले असे तरी तिकडे जे लोक त्याचे असतील त्यांचे तुम्ही पारपत्य करावे. अतःपर त्या लोकांची हिंमत राहिली नाही बेलाशक असतील त्यांचे पारपत्य करावे. छ १९ रमजान सु॥ सबा सबेन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती

लेखांक : १३९

प्रतिनिधी दप्तर : ता. १८ जानेवारी १७७७

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री सदाशिव केशव गोसावी यासी—

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सु॥ सबा सबेन मया व आलफ ता॥ विशाळगड येथील दुतर्फा मुलकात वेठ बेगार ब कारसाई विशाळ गडकरी घेत आले आहेत, त्यास तुम्ही धीकत करिता म्हणोन हुजूर विदीत जाहाले. त्याजवरून हे पत्र सादर केले असे. तरी सालाबाद चालीप्रमाणे घेतील त्यास तुम्ही नवीन धीकत न करणे जाणीजे छ ८ जिल्हेज

लेखांक : १४०

प्रतिनिधी दप्तर : ता. २० एप्रिल १७७७

राजेश्री आपाजी भगवतराव यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ समान सबेन मया व आलफ शिवाजी गोपाळ व विरुपाक्ष शामजी व आबा दाजी आनंत ऐसेत्रिवर्ग तुम्हा समागमे पाठविले आहेत आशास सदरहु त्रिवर्गास स्वामीचे शिवाय न सोडणे राजश्री आबाजीसव पंडीत प्रतीनीधी याज पासी विशाळगड बळकटनिशी ठेवणे तुम्ही राजेश्री यशवंतराव शिंदे सरसुभेदार याजपासी बोलोन गेला त्या प्रमाणे राजश्री बालाराव गोविंद यासी आणवुन यांची चिठ्ठी राजश्री महादजी शिंदे यासी पाठवून करवीरचे मोर्चे सत्वर उठोन जात ऐसे करणे वर-

कड विस्तारे राजश्री सर सुभेदार यानी लिहिले आहे त्यावरून कळेल जाणीजे. छ ११ माहे रबिलावल

लेखांक : १४१

प्रतिनिधी दप्तर : ता. २४ मे १७७७

स्वास्ति श्री राज्याभिषेक शके १०३ हेमलंबी नाम संवत्सरे वैशाख बहुल द्वितीया मंदवासरे – क्षत्रीय कुलावंतस श्री. राजा शिव छत्रपती स्वामी यानी समस्त राजकार्य धुरंधर विश्वास नीधी राजमांन्य राजेश्री आबाजीराव पंडीत प्रतीनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे – स्वामीचे शेवेशी तुम्ही विंनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. राजेश्री भवानराव पंडीत यासी बहुत समाधान नाही म्हणोन निकडीने गेलो, ऐसे विंनंती पत्री व राजेश्री यशवंतराव शिंदे सर सुभेदार यासी पत्र पाठविले त्याजप्रमाणे राव मा॥र नीले यानी विनंती केली त्यास तुम्ही गेला ते उत्तम. राजेश्री भवानराव पंडीत यासी स्वामीचे चरणी निष्ठेचा आर्थ सांगून दोन्ही जरी पटके व दोन्ही हात्ती तुम्ही येते समई घेवून यालच. स्वामीचे शेवेशी ये विषयी तुम्हांस आज्ञा करून कळवावी ऐसे नाही. जाणीजे बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक : १४२

प्रतिनिधी दप्तर : ता. १३ सप्टेंबर १७७७

राजेश्री आप्पाजी भगवंतराव यासी आज्ञा केली ऐसीजे— सु॥ समान सबेन मया व आलफ स्वामीचे शेवेशी—तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ठ होवून लेखनार्थ विदीत जाहाले. बातमीचे वर्तमान राजेश्री यशवंतराव शिंदे सर सुभेदार यांचे पत्री लिहिले वरून निवेदन जाहाले. विजयदुर्गकरी यानी जमाव करून दुण्डागड बांधावा ही योजना आरंभीली आहे म्हणोन विनंती पत्री लिहिले अशास राजेश्री आबाजीराव पंडित प्रतिनिधी यांचा प्रांत लगतेस आहे तरी तुम्ही पंडित मशार निले यांसी सांगोन दुण्डा डोंगरास चौकीस जमाव लोक ठेवून तेथे कोणी डोंगर बांधो न द्यावे. याप्रमाणे बंदोबस्त करवणे यासी आंतर जाहालेस स्वामी तुम्हास आज्ञा करून विचारतील हे समजोन तेथील बंदोबस्त करवणे जाणीजे. छ १० माहे शाबान

लेखांक : १४३

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १७७८

यादी श्रीमंत माहाराज राजश्री शिवछत्रपति स्वामीस सिबंदीचे खर्चाबद्दल व करार जाब त॥ निभावणी विसी विनंती माधवराव नारायण पंडीत प्रधान वि॥ माहादजी सिंदे गु॥ बालाजी गोविंद व राणेखान ज॥ नि॥ सिंदे सु॥ समान सबैन मया व अलफ.

यैन मामलत सिबंदीचे खर्चाबद्दल १५००००१ रुपये.

तपसील

४००००१ हाली रोख घ्यावे, मग करवीरचे मोर्चे उठतील.

११००००१ चार महिन्यानंतर घ्यावे.

१५००००१

येकूण पंधरा लक्ष रुपये घ्यावे, याचे करार केले. पैकी चार लक्ष सावकारी निशा करून देऊ. अकरा लक्ष वाइ-द्याने घ्यावे येणे प्रमाणेवी ता।

४००००१ रोख सावकारी निशा करून देऊ. तेव्हा मोर्चे उठवावे.

११०००००० चार महिने उपरात देऊ यासी निभावणीस सटवोजी भोसले याचा लेख पत्र करून देऊ.

१५००००१

येणेप्रमाणे करार

पेशजी तीर्थरूप कैलासवासी नाय-यणराव याचे वेलेस करार जाबता ठरला आहे. त्याज पो तालुकेची चिकोडी मनोळी व मौजे लाट व रांगोली याच्या सनदा दरोबस्त....आमच्या आम्हास द्याव्या व बाकी कलमे करार जाबत्या प्रभाणे परस्परे निभावावी राजमंडळा-तील आम्हाकडे वचने दिली आहेत. त्या प्रो स्वामींनी निभावावी. कलम १

राजेश्री नारायणराव पंडीत कैलास-वासी याच्या कारकीर्दीस पहिले करार राजश्री सखाराम भागवंत व आपाजी शामजी व निवाजी भोसले याचे विद्य-मानेच्या करारा पैकी तुम्हास लाट रांगोळी व चिकोडी मनोळी याच्या सनदा तुम्हास दरोबस्त द्याव्या बाकी वर हुकुम जाबते व आलाहिदा यादी याप्रमाणे तुम्ही वर्तोन सरकारात जरा बाजरा ठाणी व खेडी द्यावी तुम्ही कराराप्रमाणे वर्तावे आम्हांकडून ही जाबते प्रमाणे निभावणी केली जाईल. येणेप्रमाणे कलम १

राज्याची अभिवृद्धी व आमचे कल्यण तेच स्वामीनि करावे. फोल फितूर करू

नये. तीर्थस्वरूप राजश्री दादा वगैरे राज्यातील व पर राज्यातील हैदर नाईक वगैरे याजकडे संधान लाऊन राज्यांत बैदा करू नये. राज्यातील व पर राज्या तील कोणी फितुर लबाड स्वामीकडे येईल. त्यास जागा देऊ नये.

पडिल्या घोड्याबद्दल व जखमी वगैरे रोख द्यावे

रुपय ४०००0१

येकूण चार लक्ष रुपये घ्यावे याचा करार बी तपसील.

२००००१ तूर्त सावकारी निशा दिल्या-नंतर मोर्चे उठावे

२००००० ठाणे वडगाव वगैरे ठाणी खासगत राजमंडळचे गावा पौ वसूल घेतला असेल त्याजमुळे तुमचा आमचा लढा त्यासी सदरहू सावकारी निशा आम्ही देतो त्याला वसूल रुजुवातीने ठरेल तो राज-मंडलाचे गावचा मजुरा देऊन बाकी यैवज सावकारास याजपासून ध्यावा

४००००१ एकूण चारलक्ष एक

दरबार खर्चाबद्दल रोख द्यावे: रुपये

५०००० नि॥ पंतप्रधान

५०००० नि॥ सिंदे

१०००००

येकूण येक लाख रुपये साहा महि-न्याचे वाइदयाने सावकारी निशा देऊ येणे प्रो। करार.

चौ महिन्याचे वायद्याने द्यावे रुपये

११०००००

सदरहु अकरा लाख रुपयेचे उगव-णीस मातबर कोणी दरम्याने द्यावा. दरम्याने मातबर द्याल त्याने चहू महि-न्याने निशेची चिठी देऊन यैवजाची निशा करावी. स्वामींनी मातबरचे चिठी प्रमाणे निभावणी करावी. कलम १

चोहो महिन्याचे वाईदेणे रुपये अकरा लाख त्यांचे उगवतीस सटवोजी भोसले दरम्यान देऊन मा॥र निले-कडून कराराप्रमाणे चहू महिन्यांची निशा चिठी लिहून देऊ. यैवजाची निभावणी करून देऊ. येणेप्रमाणे करार

जिवाजी गोपाळ व विरुपाक्ष शाम व रामचंद्र गणेश व कानेरे त्रिंबक यांचे लढाईत वगैरे आम्हाकडील लहानमोठे धरून नेऊन बंदी घातले आहेत ते सोडून द्यावे कलम १

जिवाजी गोपाळ व विरुपाक्ष शामजी व रामचंद्र गणेश व कानेर त्रिंबक याचे लढाईत तुम्हाकडील सापडले असतील ते त्याची स्वतंत्रपत्रे सुद्धा तुमचा खिज-मतगार ठेवणे त्यादेखत पनालेहून विशालगडास पाठवुन देऊ. तेथुन राजश्री प्रतिनिधी पंत तुम्हाकडे पोहच वितील.

लेखांक : १४४

प्रतिनिधी दप्तर : ता. १२ डिसेंबर १७७८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०४ हेमलंबी नाम संवत्सरे पौष शुद्ध बहुल चतुर्दशी भोमवासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यांनी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री आबाजीराव पंडित प्रतीनिधी यांसी आज्ञा केली ऐसीजे– तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ श्रवण जाहाला राजेश्री यशवंतराव शिंदे सर सुभेदार यांनी राजेश्री आप्पाजी भगवंतराव यासी जमावाविषयी सांगितले असतां अद्याप जमाव न आला याज वरून आज्ञा करणे ते काय. हाल्ली आज्ञा पत्र सादर होते क्षणी हजार पांचशेहे माणूस रवाना करून देणे. राजेश्री सर सुभेदार करवीरी आहेत शत्रूशी नित्यानी लढाई होत असती हे श्री चे वरदारास्य आहे. ज्या समई जे घडावयाचे ते घडेल बहुत लिहिणे तरी सुज्ञे असा.

लेखांक : १४५

प्रतीनिधी दप्तर : ता. १ जानेवारी १७८१

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री परशराम रामचंद्र स्वामी गोसावी यांस.... माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वामीचे कुशल गृहीत जावे विशेष राजश्री आबाजीराव पंडित याज–पासूनच येवज घ्यावा म्हणोन करवीरकरानी तुम्हास सांगोन पत्रे व कारकून हुजूरे पाठविले त्याजवरून त्या समागमे तुम्ही लोक घेऊन विशाळगडास रवाना केले आहेत. त्यास पंडित मशारनिले सरकार लक्षात. त्या पक्षी यास हर एक विसी उपद्रव लागो न देणे लोक पाठविले असतील त्यास माघारे आणवणे जाणीजे छ ५ मोहरम सु॥ ईहीदे समानीन मया व आलफ बहुत काय लिहीणे हे विनंती.

लेखांक १४६

प्रतिनिधी दप्तर : ता. २७ मे १७८१

आज स्वारी राजश्री महिपतराव कृष्ण सुभेदार तालुका रत्नागिरी ताहा खोत वाडे गत १वाडा बासणी १ वाडा परींदवणे १ वाडा सडिये १ वाडा आरे १ वाडा कालबादेवी १ वाडा कासार वेली १ वाडा नूल मौजे पुसोळ कर्यात नेवरे सन ईसने संमानीन मया व आलफ हूजुरची सनद छ११ रबिलावलची आली ते पो॥ छ २ जमादिलाखरी सादर जाहाली. तेथे आज्ञाजे मौजे पुसाले कर्यात नेवेर तालुके रत्नागिरी येथील कुलकर्णाचे वतनाविषयी व ठिकाण चिंट्टेतील शेत भात मीठ आगर सुध्या बहीरिंभट बीन गणोबा गोसावी फाटक यांचा व रंगाजी राम पुसालकर यांचा कज्या लागोन पेशजी मनसुबी हुजूर पडली तेव्हा उभयतानी तकरीरा व फुरसीस तकरीराची उत्तर लिहून देवून साधकाचे कागद पत्र दाखविले. आणि साक्षीदाराचे नावनीसीची याद लिहून दिल्ही त्या प्रमाणे सरकारातून कारकून पाठवून सह्या आणि ह्या त्याजवरून पंचाईत मते मनास आणिता मौजे मजकुराचे कुलकर्ण व ठिकाण चिरटे ३ तीन येकूण ठिकाण येक हे पुर्वीले फाटकाचे वतीने या प्रमाणे ठरावात आले. परंतु पुसालकरांनी फाटकाचे ठिकाणावरी राहुन कुलकर्ण बहुत दिवस चालवून वतन संबंधी कसाले सोसीले व कागदोपत्री कुलकर्णी लिहीत आले ते कागद पत्र सरकारात व ईतर लोकाजवळ असतील त्याजवरून पेस्तर वादास प्रवर्तल्यास भोगवटी यांचे दाखले पुरतील यास्तव पुसालकरास केवळ दूर करणे ठीक नव्हे हे जाणोन ठिकाण चिरटे ३ सेत भात मिठागर सुद्धा फाटकाचे मिरास फाटकाचे स्वाधीन करून कुलकर्णाचे वतन निमे फाटक याजकडे व निमे पुसाळकराकडे याप्रमाणे वाटणी करून दिली असे ये विषयीची तपशीलवार निवाड पत्रे मागाहून सादर केली जातील त्याप्रमाणे वर्तवणे उभयताकडे सरकारचे नजरेचा ठराव जाहाला त्या पो। फाटकानी नजरचा फडशा करून दिला सबब फाटकाचे तीन चिरटे या पैकी येक चिरटा व फाटकाकडे चालत आहे बाकी दोन चिरट्यात पुसालकराचे घर आहे त्याची व झाड झाडोरा व विहिरी पुसालकरानी केल्या असतील त्यांची किंमत आकारून जो पैका होईल तो पुसालकरास देववून घर व दोन चिरटे चिरट्यावरील शेते वगैरे जमीन, मिठागर

असतील त्यासुद्धा फाटकाचे स्वाधीन करणे आणि निमे कुलकर्ण फाटकाकडे चालत आहे पुसालकर आपले भाऊबंद येक जागा होवून सरकारचे नजरेचा फडशा करून देवू तेंव्हा निम्मे कुलकर्णाचे पत्र करून घेवू म्हणतात सबब निम्मे कुलकर्ण सरकारात अमानत ठेवणे म्हणोन त्याजवरून हे ताकीद तुम्हास सादर केली असे तरी हुजुरचे आज्ञेप्रमाणे फाटक याजकडे सदरहु सात वाड्याचे निम्मे कुलकर्ण चालते केले असे तरी फाटक चालवीतील त्याजकडून कुलकर्णाचे काम काज घेत जाणे छे ३ जमादिलाखर

लेखांक : १४७

प्रतिनिधी दप्तर : ता. २७ जानेवारी १७८२

अज स्वारी राजश्री महिपतराव कृष्ण सुभेदार तालुका रत्नागिरी खोत अनामत मौजे मठ ता॥ हातखंबे प्रांत राजापूर सु॥ इसने समानीत मया त आलफ कृष्णाजी विष्णु व सदाशिव भट बीन अनंत भट व धोंडो जनार्दन गुणे ग्रामोपाध्ये मौजे मजकुर यांचा व धोंडो हरी डोंगरे मौजे मजकुर याचा घरानजीक जमीनीचा कज्या लागोन हर दुजण सुभा आले आपलाली हकीगत विदित करून कतबे करीने व फुरसीसा व साक्षीदारांच्या यादी लिहून दिल्या त्यावरून गावी कारकून व तीराईत पाठवून ठिकाणाची चौकशी व मोजणी करून ग्रामस्ताच्या जबान्या लिहून आणिल्या त्यावरून ठिकाण जमीनीचा निर्णय न होये तेंव्हा चौघाचे मते हर दु वादी यातून येकाने सत्य करून जमीन घ्यावी असे ठरले त्यावरून गुणे सत्य करावयासी मान्य जाहले. त्यास उभयता वादी राजी होऊन कतबे लिहोन दिले व सदरहु ठिकाणात बाबाजी गोविंद हळबे यांची पाच पांड जमीनीत नेमावणी कीर्द चाळीस पंचेचाळीस वर्षाची आहे त्यास सारे जमीनीचे गुण्ये यांनी सत्य केले म्हणोन आपण जमीन सोडून देवू म्हणोन हळबे याने लिहोन दिले. त्याजवरून गावी कारकून व प्यादे पाठवून श्री देव मौजे मजकुर याचे देवाळई देशक व शिष्ट ब्रांह्मण व मौजे मजकुरचे ग्रांमस्त जमां करून त्यांचे समक्ष वादी धोंडो हरी व बाबाजी गोविंद हळबे यांचे देखता श्रीच्या देवालई घाटे खाले सदाशिव भट गुणे उभे राहोन सत्य केले जे आपले घर आहे त्या ठिकाणाचे पुर्वेस पाणंद पाटावरती

व दक्षिणेस सारण पाणंदी पासून आगर पाटपर्यंत पश्चिमेस आगरपाट व उत्तरेस आगर पाटाच्या धरणांपासून पुर्वेस टोक आहे. त्याजवर ता। बांध तेथ पावेतो जमीनीची हद्द हे चतुः सीमा पुर्वक ठिकाण जमीन गुण्ये यांची आपली ऐसा उच्चार करून बोलावे म्हणून ठरले, त्याप्रमाणे सदाशीव भट गुण्ये यांनी सर्वा समक्ष वदोन सत्य केले. उपरांतीक डोंगरे व हळबे यांसी पंचाईतानी पुसिले की, गुण्ये यांनी सत्य केले यात तुमची काही बोलावयाची दिकत राहिली की काय ? त्याजवरून डोंगरे व हळबे बोलिले की, आमची काही दीकत राहिली नाही. सदरहू ठिकाण जमीन गुण्ये यांची खरी जाहली ऐसे बोलोन डोंगरे यांनें लिहोन दिले जे गुण्ये याचा व आमचा ठिकाणा विषयी कज्जा होता त्याची तोड सुभाहून आमचे मान्यतेने ठरली त्याप्रमाणे गुण्ये यानी करारा प्रमाणे सत्य केले या उपरी ठिकाणा विषयी गुण्ये यासी भांडणार नाही. याप्रमाणे धोंडो हरी याने आपले दस्तुरे लिहून दिले व बाबाजी गोविंद यांची पाच पांड जमीनीत कीर्द होती त्यास सेरणीच्या शिरस्ते प्रमाणे गुण्ये याजकडून हळबे यांस पैका देवीला. सदरहू जमीन दरोबस्त गुण्ये याची खरी जाहाली. धोंडो हरी भांडत होता तो खोटा पडिला त्याज पासून गुन्हेगारी देवून गुण्हे सत्य करून पार पडीले. जमीन त्याची खरी जाहाली सबब त्याजपासून जीवन मेवा घेऊन गुण्ये यांचे नावे आलाहिदा निवाड पत्र देवून हे पत्र तुम्हास सादर केले असे. तरी सदरहू ठिकाण जमीन चतुःसीमा पुर्वक गुण्ये यांची यांजकडे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने चालवणे या पत्राची प्रत लिहून घेऊन हे अस्सल पत्र गुण्ये याजवळ भोगवटीयास परतोन देणे. जाणीजे, छे १२ सफर मोर्तबा सुधा.

लेखांक : १४८

प्रतिनिधी दतर : ता. २५ मे १७८४

तहनामा सरकार राजेश्री पंत प्रधान सु॥ सन आर्बा समानीन मया व अलफ राजेश्री आबाजीराव पंडित प्रतीनिधी याजकडील तालुके विशाळगड व तालुके रत्नागिरी नीसबत सरकार येथील दुतर्फा अमल आहे. त्यास पंडित मशारनीले कडील अंमलदाराकडून काही जाहाली ज्याजती वैवाट होऊ लागली

म्हणोन साल गुदस्ता तिकडील अंमलाची जप्ती केली होती ते मोकळीक करून दुतर्फा सुरळीत चालावयाची कलमे ठरावून दिल्ही बी तपशील.

प्रांत मजकुरी जमाबंदीचा ठराव मक्ता अगर पाहाणी होऊन होणे ते सुदामत दुतर्फा जमाबंदी होत आल्याचा दाखला पाहाऊन पेशजी पासुन चालत आल्याप्रमाणे चालो व नवीन दुतर्फाही करू नये कलम १

सन समान सबेनात हुजुरून रयतेस बाबती सोडिल्या आहेत त्या प्रमाणे हिशाबर हुकूम विशाळगड तर्फे कडून सोड द्यावी कलम १

प्रांतात कमावीस दंड गुन्हेगारी होईल त्याची वैवाट सुदामत चालत आल्याप्रमाणे चालावी कलम १

प्रांतात न्याय मनसुबी होणे त्यास फिर्याद वादी जिकडे जाईल तिकडे मनास आणीत असता दुसरे कडून वादीयास उपद्रव नसावा सुदामत चाली प्रमाणे दुतर्फा चालावे. कलम १

बंदर संगमेश्वर येथील जकातीत विशाळगडाचा हिस्सा आहे त्यास बाजाराचे जकातीत शेकडा रुपये पंधरा हिस्सा सुदामत चालत असता येकशेहे पंधरा रुपयास पंधरा रुपये धंदा असे जकातदार म्हणतात त्यास सुदामत शेकडापंधरा रुपये घेत आल्या प्रमाणे घेत जावे. कलम १

कैलासवासी आप्पाजी राव प्रतीनिधी याची स्त्री सकवारबाई याचा खर्चवेच दान धर्म चालीला पाहिजे याज करिता तुम्ही आपल्याकडील तालुक्यापैकी दोन हजार रुपये गाव न्हेमी त्याचे खर्चास लावून याचे नीसिबतसि द्यावे. यापैकी पेशजी गाव लावून दिला असेल त्यासुद्धा दोन हजाराची भर करून द्यावी ती जिवंत आहे तो घालमेल करू नये निर्वेध चालवावे कलम १

माहालात वसुलास वरातदार मनस्वी येतात तेणे करून रयतेस उपद्रव होतो याजकरिता दोन शिपाई न्हेमी दर माहाली ठेवून सरकारचे चालीप्रमाणे वसुल घ्यावा कलम १

मुलकी खाते पाटील हिसेबा करिता महिना दोन महिने किल्यावर राहून.... होतात याज करिता च्यार रोजा हिशोब करून निरोप देत जावा कलम १

साल होताच श्रावण भाद्रपद मासी सरकार तर्फेचे मुलकी हिसेब होतात त्या आन्वये आश्वीन कार्तीक मासा-अलीकडे विशाळगड तर्फेचे हिशेब व्हावे कलम १

वेठ बेगार फड फर्मास रयतेकडील

किल्याचे बेगमीस ध्यावयाची पेशजी-पासून चाल आहे त्यापैकी सरकार तर्फेने कोठी रयतेस सूट दिली आहे त्या आन्वये विशाळगडाकडून ध्यावी.
कलम १

तालुके मजकुरी....रुपया ध्याव-याची चाल आहे याजकरिता चाली प्रमाणे रुपया ध्यावा बटा कोणापासून घेऊ नये. कलम १

मीठ सरकार तर्फेने सरकारच्या मीठागरा पैकी रयतीस घालुन दरा-प्रमाणे पैका वसुल येतो त्यास विशाळ गड तर्फेने मीठ न घालित पैक्या-विषयी रयतेस तगादा होतो तो होऊ नये. कलम १

सुलकी जमाबंदी पैकी विशाळगडीचे आमलाचे गावी अेक जिन्नस वैवाट करणे ते ज्या गावी सरकारचा अमल नीमे व विशाळगड नीमे मिळोन वीस खंडी जमाबंदी व असेल त्यापैकी दाहा खंडी सरकारच्या जावून बाकी दाहा खंडी विशाळगडच्या राहिल्या त्यापैकी हरीक दरोबस्त तसीर होतात ते खेरीज करून राहिल्या गेल्या पैकी चवथाई तसीर चौथाई सरकार सिरस्ते प्रमाणे घेवून बाकी राहील त्या पैकी चौथाई गला किल्यावर कोठीस ध्यावा व बाकी राहिला गला सरकारनेच होईल त्या प्रमाणे करून पैका ध्यावा व ज्याजती दर घेऊ नये कोठीचे नेमणुकेप्रमाणे ज्याचा जो गला कोठीस तरी जरूरीस त्याचे सेराचे दर आहेत त्या पेक्षा पाच रुपये ज्या-जती घेत जावे याच आन्वये चौथाई हिशाचे गावी वैवाट करावी लगत गावी सात आठ कोसी असतील तेथील गल्ला सालाबाद प्रमाणे किल्या-वर नीमे आमल पैकी चौथाई कोठीस ध्यावा तसे सिरस्ते प्रमाणे व कोठीचा गल्ला सदरहु नेमणुके प्रमाणे वजा करून बाकी ऐन जिन्नस राहातो त्यापैकी रयतेने आपले संतोष करून साखरपयाचे फडावर दिल्यास ध्यावा सक्ती करून घेवू नये सदरहू प्रमाणे वैवाट करावी कलम १

तर्फ देवले येथील हबसी पटीचा मक्ता व मौजे सालपे व मौजे भोवडे तर्फ मजकूर या गावचे जमाबंदीचा मक्ता पेशजी पासून सुदामत चालत आल्या प्रमाणे विशाळगडाकडे चालेल.

सिवाजी बलाळ हे पहिल्या पासून तुमचे पदरचे कारकून दरबारी जा बसायला येत होते त्याविषयी हल्ली तुमचे मनात संशय आला आहे याज करिता तुम्ही आपल्या कडील शाहाणा माहितगार ईतबारी कारकून दुसरा जाब सालास दरबारी ठेवावा. त्याचे हाते तुमचे नीस बतीचे कामकाज

घेतले जाईल सिवाजी बलाळ याजकडे तुम्हाकडून गाव वेतन पाहिल्यापासून चालत आल्या प्रमाणे चालवावे आकस आदावत करू नये कलम१

बंदर संगेश्वर येथे खाडीतोन मीठ येते त्यासही जोरदार जकाती लावून मौजे वानरी व कसबा कोंडविरे येथे किरकोळ मीठ उतरून विकतात तेथे आपले कडील हिस्सा जमातीचा येणे तो जकातदार घ्यावयासी हिमत करितो तो देवावा म्हणोन तुमचे कारकुनाचे बोलणे त्यास ये विषयी राजेश्री महिपतराव कृष्ण यास आला-हिदा पत्र सादर केले आहे त्याप्रमाणे ते मनास आणून मागील दाखला पाहून सुदामत चाल आखली यास जकातदारास ताकीद करून चालवी-तील सुदामत नसल्यास चालणार नाही. कलम १

सन ईहिदे समानीनात प्रांताची जमाबंदी पाच साला जाहाली आहे. त्याप्रमाणे पंचसाला भर तो चालावे ज्याजती रयतीस कोणेविषयी उपसर्ग काडीमात्र होऊ नये. कलम१

एकूण कलमे सत्रा १७

येणेप्रमाणे सत्रा कलमे ठरावून देऊन तहनामा करार करून दिला असे तो सदरहू प्रमाणे दुतर्फा ही सुरळीत चालावे. छ २९ रजब आज्ञाप्रमाणे मोर्तब असे.

लेखांक : १४९

प्रतिनिधी दप्तर : ता. १४ एप्रिल १७८७

सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री आबाजी राव पंडित प्रतिनिधी यासी—

प्रती रामशास्त्री आशीर्वाद उपरी येथील कुसल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष भिकाजी हरी व गोविंदभट बीन केशवभट सोहनी मौजे सोमेश्वर हरचिरी तालुके रत्नागिरी यानी विदित केले की मौजे मजकूरचे ठिकाणाविषयी रामाजी बल्लाळ व सदाशीव विश्वनाथ जोशी यांचा व आपला पेशजी कज्या लागोन कैलासवासी माधवराव साहेब याजपाशी मनसुबी सरकारात पडली ते समई ग्रामस्त पुण्यास आणून श्री ओंकारेश्वरी सड्या साक्षी घेऊन पंचाईत मते ठिकाण आमचे खरे जाहाले सबब आम्हांपासून तीनशेहे

रुपये हर्की घेवून सन सलास सीतेनात आम्हास निवाड पत्र करून दिले. त्यानंतर राजेश्री पंतप्रतिनिधी याजकडे विशाळगडास गेलो. त्यांनी संन खमस सीतेनात दोनशेहि रुपये ठिकाणा संबधी म्हणोन मोघम आम्हा पासून घेऊन जोशास व आम्हास सावंताचे वाडीस पंचायत नेमून दिली. तेथेही आम्ही खरे होऊन विशाळगडास आल्यावर आम्हास निवाड पत्र करून द्यावे ते न देता जोशापासून आंतस्थ दोनशेहे रुपये घेऊन त्यास माळूमाती पत्र करून दिले. परंतु ठिकाण आम्हाकडेसच चालत असता वादी यानी पुरंधरचे मुक्कामी सरकारात मन माने तैसे समाजावून सन तीसा समेनात ठिकाणाचे पत्र करून घेतले. सबब आम्ही हुजूर येऊन ठिकाणा विषयीचे वर्तमान सरकारात निवेदन केल्यावर फिरोन पंचाईत मते ठिकाण आमचे खरे जाहाले. जोशी खोटे जाहले त्याजवरून पेशजीचे निवाड पत्राअन्वये सन इहिदे समानीनात आम्हास सरकारचे पत्र करून दिले त्याजवर विशाळगडास जावून जाहाले वर्तमान समजावून सरकारचे पत्राप्रमाणे त्याचे पत्र मागत होतो. परंतु दिले हल्ली आमचे चुलते नारोगोविंद यास विशाळगडी बोलावून नेऊन ठिकाणासंबंधी दोनशेहि रुपयाचा कतबा जबरदस्तीने लिहून घेतला आहे त्यास पेशजी ठिकाणासंबंधी दोनशेहे रुपये त्यानी आम्हापासून मोघम घेतले आहेत तेवढ्यावर हरकीचा निर्वाह करून हल्ली दोनशेह रुपयांचा कतबा लिहून घेतला आहे तो माघार देववून निवाड पत्र होय ते जाहाले पाहिजे. म्हणोन त्याजवरून हे पत्र आपणास लिहिले आहे. तरी भिकाजी हरी व गोविंदभट सोहनी हे ठिकाणाचे कज्यास खरे होऊन पेशजी सरकारचे निवाडपत्र जाहाले आहे त्याजवर सोहनी याज पासून तुम्ही दोनशेह रुपये मोघम घेऊन सावंताचे वाडीस मनसुबी नेमून दिली तेथेही जोशी खोटे होऊन सोहनी खरे जाहाले असता त्यास निवाडा पत्र करून दिले आणि हल्ली दोनशेह रुपयाचा तगादा करून कतबा लिहून घेतला असे असल्यास सोहनी गरीब व यांचा विषयही खरा असून उगीच ब्राह्मणास दुःख द्यावे हे योग्य नव्हे. यास्तव हल्ली दोनशेह रुपयाचा कतबा घेतला असेल तो माघारा देऊन पेशजीचे दोनशेहे रुपये हरकीत मजरा घालून सरकारचे पत्रान्वये सोवनी यास आपले निवाडा पत्र करून द्यावे छ२५ जमादीलाखर शु ।। सबा समानीन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद

लेखांक : १५०

प्रतिनिधी दप्तर : ता. ११ जून १७७६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०३ दुर्मुखी नाम संवत्सर आषाढ शु॥ पंचमी गुरू वासरे क्षत्रीय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपती स्वामी यानी समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री आबाजीराव पंडित प्रतीनिधी यास आज्ञा केली ऐसी जे.तुम्ही स्वामीचे शेवेशी विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले. राजेश्री सदाशीव चिमणाजी हे जमावसुद्धा साखरपेत्र आले याचा शोध करून मागाहून राजेश्री अप्पाजीराव यांची रवानगी हूजूर करितो वरकड राजेश्री यशवंतराव शिंदे सर मुभेदार यांचे पत्री वर्तमान लिहिले आहे विनंती करतील म्हणून लि॥. अशांस राजेश्री सर सुभेदार यासी तुम्ही लिहिलेप्रमाणे सविस्तर निवेदन केले. आप्पाजी भगवंतराव कोकणांत गेले होते हे वर्तमान परस्परे निवेदनांत आले तेव्हा साखरपेत्र येवून मुक्काम केला आहे ये विषयीचे तत्वता वृत्त तुम्हास कळलेच असेल सविस्तर विनंती पत्री लिहून पाठविणे. जाणीजे बहुत लिहिणे ती सुज्ञ असा.

लेखांक : १५१

प्रतिनिधी दप्तर : ता. ९ फेब्रुवारी १७७८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०४ हेमलंबी नाम संवत्सरे माघ शु॥ त्रयोदशी इंदुवासरे क्षत्रीय कुलावंतस श्री राजा शिव छत्रपतीस्वामी यानी समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजेश्री आबाजीराव पंडित प्रतीनिधी यास आज्ञा केली ऐसी जे स्वामीचे सेवेशी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होवून लेखनार्थ विदित जाहाला. आशा समयोचीत महदसेवा तुमचे हातून होवून यावी हा स्वामीचा खातरजमा असून राजेश्री यशवंतराव शिंदे सर सुभेदार करवीरी राहून शत्रूसी हिमतीने लढाई देत असता तुम्हाकडून हजार दोन हजार जमाव रवाना होवून उपरळा होत नाही तेव्हा आज्ञा करणे ते काय तरी आज्ञा पत्र सादर होते क्षणी हजार दोन हजार जमाव निसी तुम्हाकडून उपराळा जाहलेसि यास समई तुमचे सेवेचे रूप आहे ते तुम्हाकडून न जाहालेस हे राजेश्रीचे वरदी आहे राजीश्री सर सुभेदार हिंमतीने तो

लढाई शत्रूशी देतच आहेत श्रीकृपेने ज्यां समई जे घडणे ते घडल समय मात्र राहील. आज्ञा करून आपणास कळवावेसे नाही. जाणीजे * बहुत लिहिणे तरी सुज्ञे असा.



लेखांक : १५२

प्रतिनिधी दप्तर : ता १८ सप्टेंबर १७९१

सकल गुणालंकरण आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री आबाजी राव पंडित प्रतिनिधी स्वामी गोसावी यासी—

प्रति माधवराव नारायण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहित जावे. विषेश रामचंद्र मोरेश्वर उपनाम पंडित व आत्माजी बापुजी शेणवी या उभयताचा ता॥ पावस येथील देश कुलकर्णी विषयी कजा लागला आहे यास पेशजी हरदुजणाचे कज्यामुळे वतनाची जप्ती जाहली त्याजवरून पन्नास साठ वर्षे वतन जप्तीस होते कज्याचा फडशा जाहला नाही असे असता आत्माजी बापुजी यानी सीत सीतेनात सरसुभा त्रिसाजी केशव यास समजाविले की पंडित मा॥ने वतन जप्त करून ते देशात गेले. वादास उभे राहात नाही. याज करिता वतनांची मोकळीक करून आपणाकडे चालवावे. पंडित मा॥र वादास उभे राहिल्यावर मनास आणून फडशा करावा त्यावरून पंडित मा॥र वादास उभे राहात नाहीत याज करिता तुर्त जप्ती मोकळीक करून शेणवी याजकडे वतन चालवणे म्हणोन पत्र दिले. त्याजवरून शेणवी याजकडे वतन चालते जाहले हे वर्तमान पंडित मा॥रस कळल्यावर दुसरे साली सन सबात हुजुरचे पत्र सुभास व सरसुभास घेतले की वतन जप्त आहे तसे ठेवून दोघांचा ईनसाफकरून हुजूर लिहून पाठविणे या प्रमाणे पत्रे नेली परंतु मनास आणिले नाही त्यास वाजबी मनास आणोन फडशा करावा म्हणून रामचंद्र मोरेश्वर यानी विदीत केले त्याजवरून महादजी राम शेणवी यास बोलावून आणवुन हर दु जणा जवळील कागदपत्र पाहता बहुता दिवसाचा कज्जा आहे याचा फडशा जाहल्याविना येकाकडे वतन चालवावे हे ठीक नाही व सरसुभातुन पत्र घेवून वतन चालवितो त्याच पत्रात पंडित मा॥र वादास उभे राहिल्यावर वतनाची जप्ती करावी असे स्पष्ट लिहिले आहे. सबब वतनाची जप्ती करून ईनसाफ मनास

आणावा या प्रमाणे पंचाईत मते ठरले यास्तव ईनसाफ होय तो त।। मजकुरचे दुतर्फा गाव असतील तेथील वतनाची हिशावर हुकूम पेशजी प्रो जप्ती करावी १९ मोहरम सु।। ईसने तीसेन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक : १५३

प्रतिनिधी दप्तर : ता. ६ जुलै १७९४

समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री आनदराव पंडित प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शैववी आपण विनंती पत्र पाठविले तेथे लिहिले की, मौजे ससेगाव येथील गावकर व रयतामुळे मनुष्ये सोडून देणे विषयी आज्ञा पत्र सादर होवून हुजूरे पाठविले त्यासी बाबू च्यावरा याची बायको व बहीण मौजे कोपर्डेहून किल्ले पनाळेस धरून नेली आहेत येविषयी राजेश्री बापुजी सखाराम यांचे पत्री लिहिले आहे विनंती करतील म्हणोन लिहिले. आशास पेशजी आज्ञा पत्राप्रमाणे मौजे मजकुरचे गावकर रयतामुळे मनुष्ये सुद्धा हुजूरे यांच्या स्वाधीन करून पाठवून द्यावी चावऱ्या मजकूर यांच्या बायका किले पनालेस नेल्या आहेत म्हणोन विनंती लिहिली त्यासी किल्लेचे मामलेदार यासी आज्ञा पत्र सादर होवून :बायका सोडून देणेची आज्ञा होईल तरी मौजे मजकुरचे कुळास मसालेविषयी तगादा न करिता सोडून देणे. जाणिजे सु।। खमस तीसेन मया व आलफ छ ८ माहे जिल्हेज बहुत लिहिणे तरी सुज्ञे असा.

लेखांक : १५४

प्रतिनिधी दप्तर : ता. १८ जुलै १७९४

राजश्री नरहर कृष्ण भोसले यांसी आज्ञा केली येसीजे सु।। खमस तिसैन मया व अलफ राजश्री आनंदराव पंडित प्रतिनिधी याजकडील गल्ला पटी मसलत पटी व चौथाई बाबत बारासेहे रुपये तुम्हाकडे हुजूरने देविले. ते हली हुजूरने पंडित मशार निल्हे याजकडे वर्ष श्राद्धाबद्दल दील्हे असेत. तरी सदरहू यैवजा विसी तगादा न करणे. जाणिजे.

छ २० माहे जिल्हेज

लेखांक : १५५

प्रतिनिधी दप्तर : ता. १९ ऑगस्ट १७९४

श्रीमंत राजेश्री पंत प्रतिनिधी स्वामीचे सेवेसी,

विनंती सेवक कृष्णराव महीपत मु॥ जंजिरे रत्नागिरी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता. छ. १६ मोहरम पर्यंत वर्तमान यथास्तीत असे विशेष प्रांतात दुतर्फी गावगना आपणाकडून रयतेस कारसाई विसी वगैरे उपद्रव भारी होतो. यांजमुळे रयतेची वसाहत व्हावयाची कठीण गेली. भली कुळे त्यांची कारसाई वजा न देता सालाबाद नेमणूके प्रमाणे यैन जिनस कारसाई वसूल घेऊन मागती बाकी काढून पैका घ्यावा व यैन वसूल सालचे सालात घेऊन पेस्तर सालचा पैका काही घेतला, ही चाल नवीनच. असे होऊ नये. ये विसि पेशजी दोन तीन वेला पत्रे लिहिली परंतु मुलकातील उपद्रव कीमपी चुकत नाही, व कजे माहाली देश कुलकर्णी यांचे हक्क तिकडून अमानत कारण नसता केले आहे. त्यास सालाबाद नेमणूक हकाची असेल त्या प्रो॥ तरी वसूल घ्यावा तो एक रुपयास तीन रुपये वसूल घेतात म्हणोन लांजे माहालाच्या खोताचा बोभाट आला व कारकूनी दरकदार इकडे सेकडा दीड रुपाया आहे. त्या प्रमाणे घ्यावा. त्यास तिकडे सवा दोन रुपयाप्रमाणे घेऊन आणखी जाजती कारकुनी दरकदार येतात येसे आइकण्यात आहे व काही खोताचेही बोलण्यात आहे. किल्लयाकडील गाव नेमणुकी आहेत. त्या गावावर कारसाई विसी व कारकुनी विसी व जाजती वसूल घ्यावयाविसी निग्रह बहुतच होत आहे रयतेचा बचाव जाहल्यास उभय पक्षी उत्तम न जाहल्यास यांचा उद्योग करणे प्राप्त आहे. हुजरून रयतेच्या बंदोबस्ताविसी लिहून आले आहे. त्यास आपणाकडील बंदोबस्त होतो किंवा नाही याचे उत्तर आले पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

छ २२ मोहरम खमस तीसैन मया व अलफ

लेखांक : १५६

प्रतिनिधी दप्तर : इ.स. १७९५ (?)

श्रीमंत राजेश्री पंत प्रतिनिधी स्वामीचे शेवेशी–

बालाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणुन स्वकीये कुशल लिहित असले पाहिजे. विषेश वाडा बसणी व मौजे निवळी ता। केले हे दोन गाव आपले कडून राजेश्री आनंदराव विश्वनाथ यास ईनाम आहेत तेथे साल गुदस्ता हरदु गावास येक साला वसुलाचा तगादा केला आहे त्यास गांव ईनाम दिल्या पासून वसुल कधीही घेतला नाही म्हणोन मशार नीलेनी सरकारात विनंती केली त्याजवरून हरदुगावास वसुलाचा तगादा करू नये ये विषयी पेशजी सरकारचे पत्र गेले असता साल मजकुरी गावचे खोतास धरून नेवून मसाले घेतले आणि कागद लिहून घेवून वसुलाविषयी गावी प्यादे बसविले आहेत म्हणोन कळले ऐशास मशारनीले कडे ईनाम गाव चालत आल्या प्रमाणे चालवावे दरदु गावास नवीन वसुलाचा तगादा होवू नये प्यादे बसविले असतील ते उठवून खोता जवळून मसाले व कागद लिहून घेतले असतील ते माघारे देवावे. छे १२ रजेब बहुत काय लिहिंणे लोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक : १५७

प्रतीनिधी दप्तर : ता. २६ जानेवारी १७९६

निवाडा पत्र श्री शालिवाहान शके १७१७ राक्षस नाम संवत्सरे पौष वद्य द्वितीय भोमवासरे थळ पंचाईत मुक्काम सोवेत प्रांत सिराळे सु॥ सीत तीसेन मया व आलफ जोती बीन खळोजी व वाघोजी बीन माहादजी शिंदे मौजे मजकूर याज बरोबर बहीरजी बीन कुसाजी व येसांजी बीन सिदोजी शिंदे वस्ती मौजे मजकूर यानी पाटिलकीच्या कज्या लावून वतन आमानत पाडिले आणि गावचा बखेडा केला सबब सरकारातूनन पंचाईत मौजे कजकुरी नेमून दिली हूजूरून राजेश्री बाजी नीळकंठ कारकून देसाई लांजे व संभाजी भोसले हुंजरे पाठविले देशमुख व देशपांडे पा॥ म॥र याच्या आणुन व फडनाईक व

नाईकत्रडी व समस्त देव सिराळे माहाल व बसणे यैसे मिळून मौजे मजकुरी मनसुभी श्री केदारलिंगाचे देवालयी वसून ईनसाफ मनास आणिला–येणे प्रमाणे—

जोती व वाघोजी पा सिंदे यानी करिणा लिहून दिले त्यातील आन्वये पुरातन पाटिलकी कानूकायदेसुद्धा आमची आम्ही वहिवाटीत आहे आमचा वडील सिवाजी पाटीलकी करीत असता रखमाजी सिंदा म्हालसवडेहून आला व त्याचे मागून केदारी पावरे ही आला ते वागदरेचे वेडेनजीक घर बांधून राहिले पडरान शेत करावयासी दिले पाच चार वर्षे चोराचा उपद्रवा-स्तव गावात आले घरास जागा नाही तेव्हा परषेचा घराचा जागा पडला होता त्याजवर घर बांधून सुखवस्तु राहिले रखमाजी सिंदा मिलताऊ मनुष्य आणि कर्तृत्वाचा तेव्हा गांव गावकी बोलणे चालणे दीवाणे दरबारास जाऊ येवू लागला.

आमच्या वडिलाबरोबर-करीत असे तो ममतेनेच होता. पुढे त्याचे लेक अप्पाजी सिंदा वडील, त्याचे पाठचा दुलबाजी, त्याचे पाठचा कुसाजी सिंदा तेही कर्तृत्वाचे चांगले निघाले. तेव्हा दुलबाजी सिंदा गावच्या बोलणे वहिवाटीत असता लोकाकडून पाटील म्हणवून घेई पुढे दहा पंधरा वर्षे आमच्या कानुकायद्यात होळी पोळीस दुराई देवून आमानत पडली. तेव्हा आमचे बाप खलोजी पा।। होता तो नाकर्ता आणि वाद सांगावयासी सामर्थे नाही त्यापासुन आजपर्यंत कानु कायदे आमानत पडले आहेत.

पंचाईतानी फुरसेस केली की मुळ पुरुषाने वतन कैसे मिळविले ते सांगोन देणे. आमचा मुळ पुरुष बंद्री मालपा गाव येथून गावास आला त्या समई गावी कासांरे पाटील होता त्याजवळ आमचे वडील उमाजी रयेतावा करीत होता. पुढे उमाजी मृत पावला व कासारे पाटीलही मेला. त्याचा लेक येत होता तोही दाहा पाच वर्षांनी मेला. कासोर पाटील नकल झाले तेव्हा आमचा वडील उमाजी याचा लेक काळोजी विजापुरास जाऊन तेथे नकल जाहाले पुढे गावांस अधि-कारी कोण तेव्हा त्यानी आज्ञा केली की तुझी डोई तेथे येक गुदरली आहे. तूच तेथील पाटिलकीची वहिवाट करणे. तेव्हा तेथून हुकूम घेऊन काळोजी आमचा वडील गावास आला त्यापासून आम्हास कोणी वारसदार नाही. मुळ पुरुष काळोजी त्याचा लेक केदारजी याचा लेक खळोजी याचा

लेक केदारजी व कृष्णाजी या दोघांचे पुत्र केदारजीचा सिवजी, कृष्णाजीचा उमाजी. याचे पुत्र सिवजीचा जिवाजी व उमाजीचा रघोजी. रघोजीचा लेक संताजी व जित्राजीचा नाईकजी हाल्ली आहे. तेव्हा प्रमाणे करिणा लिहून दिला असे.

यासी...साक्षीस देवासंनीध आंगारा ठेवून लिहून घेतल्या

गोपाळभट बीन विश्वनाथभट जोशी मौजे मा।र यांनी लिहून दिले जे रखमाजी सिंदा मौजे म्हलसवडहून आला त्यास सिंदेच म्हणत होते. आलीकडे कुसाजी सिंदा व रवलोजी हे मिळून कारभार करू लागले तेव्हा कुसाजी सिंदा यासी लोक पाटील म्हणू लागले. हे आपले वडील बोलले

आबाजी देवडी मखदुम मौजे मजकूर याने गोपाळभट जोशी याने लिहून दिल्याप्रमाणे यासी लिहून पडली आहे. पिलाजी बीन जोती न्हावी याचे जे माझा बाप तीन वर्षाचा होतो तेव्हा निघोन विशाळगडास गेला. त्याजवर मजला रवलोजी याने गावास आणिले माझ्या बापाने मजला काही सांगितले नाही. रवलोजी व उमाजी सिंदा यास होळीपोळी खटला पडोन आमानत पडले हे आम्हास ठाऊक आहे

म्हसाजी बीन लकमोजी निकम सुखवस्तु वर्षे ७५।– रयत मौजे मजकूर याने लिहून दिले जे माझ्या आज्याचे वेळी रखमाजी सिंदा पाटीलकी करीत नव्हता. माझे बापाचे वेळेस दुलबाजी सिंदा व येसु दोघे मिळोन पाटिलकीचा कारभार केला व पुढे रवलोजी व कुसाजी दुलबाजीचा भाऊ या उभयतानी पाटीलकीचा कारभार चालविला माझे वेळेस जोती व केदारजी सिंदा कारभार करीत आहेत. जोती याकडेस पाटीलकी कानुकायदेस सिंदे यानी अडथळा केल्यापासून आमानत पडले आहे इतके आपणास दखल आहे.

जबानी नाईक बिन मैनाक म्हार म्हेतर मौजे मशार याने लिहून दिलेजे कुसाजी याचे वेळेस होळी पोळी राहाट राबणूक पाटीलकी करीत आला. पुढे कुसाजी यांचे पुत्र दोघे सिवाजी व दादजी यांचे वेळेस रखमाजी सिन्दे होते. परंतु पासरीची वहिवाट सिवजी व दादजी याजकडे चालत होती. नंतर रवलोजी पा।। याचे वेळेल कुसाजी सिंदे म्हणून उभयता पासरीची वहीवाट करीत होते. परंतु रवलोजी याचेकडे वतनाचे कानुकायदे चालत आले. पुढे जोती याचे वेळेस व बहिरजी सिंदे या उभयतात पंचायती मांडिली मग कुसाजी सिंदे यांनी होळीस

दुराई देवून अमानत पाडले ईतके ठाऊक आहे.

जब्रानी कुसनाक व सावनाक म्हार म्हेतर मौजे मा।र याने लिहून दिले जे रखमाजी सिंदा हा रयत सुखवस्तु होता हे खरे. गावचा मानपान होळी पोळी सिवजी अनुभवीत होता. सिंदा रयताचा करून होता. सिंदे याची पाटी भोपलेवाडी मौजे पणुदरे येथून आलीबाग दरेत उतरली तेथून चोराचा उपद्रव झाला. मग गावात आला तो घरावर सुखवस्तु राहिला, ईतके ठाऊक आहे.

नाईकजी बीन राणोजी व महादजी बीन केराजी पोवार मौजे सावर्डे खुर्द ता। मजकूर यांनी लिहून दिलेजे काळोजी पा। याचा लेक केदारजी याचा लेक खलोजी खलोजीचा लेक सिवजी हे पाटीलकी करीत आले. सिवजीचे वेळेस रखमाजी सिंदा मौजे पणुदेर इकडे नांदत होता तो येथून सिवजी याज पाशी कुणबीक शेत पडसार रान मागितले ते शेत दिले तेथेच घर बांधून कुणबाव करून होता. पुढे ओसाडीमुळे गावात येऊन राहिले त्यास सिवजी याचा लेक येसाजी यात व दुलाजी शिंदे यात पाटीलकी विषयी कटाक्ष वाढला पुढे येसाजी यासी देवज्ञा जाहाली....आपले....... सिंदे यासी लागो दिले नाही. पुढे येसाजीचा भाऊ खलोजी यात दुलाजी व कुसाजी सिंदे या उभयतात वतना संमधे कज्या लागला त्यापासून आज पर्यंत होळीपोळी कानुकायदे अमानत जाहले. याशिवाय शिंदे यांचा मागील दाखला आम्हास दखल नाही.

संताजी व बहिरजी बीन राणोजी व निळोजी वीन खंडोजी लाड व जानोजी चौगुला मौजे सावेतो मार यानी लिहून दिलेजे सिवजी याचा पुत्र खलोजी याचा पुत्र जोती आहे ईतक्या होईता सिवजीचे वेळेस रखमाजी शिंदा मौजे म्हलसवडेहून आला बागदरा येथे राहिला ते ओसडीमुळे येऊन गावात राहिला रखमाजी सिंदा याचा पुत्र आप्पाजी व दुलाजी व कुसाजी सिंदे यात व खलोजी यात होळीपोळी व कानुकायदे विषयी अडथळा पडला पासरीवरील घराची जागा व मसोड्या थडी चौकशीकरिता शिंदे यानी घर बांधिले आहेत ती जागा परटाची म्हणून पासरीची साक्षे आली. जोती मुळ पुरुषाचे घरावरचे आहेत जोती याच्या वडिलांचे थडे आर्थाने कासाराच्या थड्याजवळ पडत खाले पाचा हाताच्या हा दरम्यान आहे. त्यास झाला पुसणे त्यात घालतात दुसरा गडगा मसोटीच्या केदारलिंगाच्या

देवळामागे शंभर हातावर माळावर आहे त्यात जोती व वाघोजी याची बायको मुले मृत झाल्यास घालीत असतात व पाहुणा पै व इष्टमित्र कोणी मेल्यास त्यास दोन च्यार जागे करून ठेविले आहेत व त्या गडग्यात पूर्वेच्या आंगास सिंदे यासी जागा दिली आहे. त्यात रखमाजीपासून पुसणे घालीत आले तेंव्हा वतन विषय यातच समजला हे बहीरजी सिंदा याचे तोंडून खरे जाहले कलम १

बहीरजी व येसाजी सिंदा याने कारणे लिहून दिले त्यातील आन्वये नुलचा पाटील मलापा कासारे आडनाव गरगटे पाटीलकी करीत आसता आमचे मुळ घर प्रभावलीचे नाईकवडी विशाळगडी चाकरीस होते. त्यास सेकोजी सिंदे आमचे वडील चाकरीचे नात्याने चौकीस पाठविले तेंव्हा सेकोजीचा लेक पदमाजी बरोबर होता पाच चार वर्षाचा करी केली तेंव्हा कासोर याने आपली मुतालकी सांगोन सेकोजीस विज्यापुरास पाठविले. तिकडे मृत पावला त्याचा लेक मागे पदमाजी होता. त्याने कासारास म्हटले की, तुझ्या कामावर माझा बाप मृत्यू पावला माझी वाट काय. कासारें बोलिला की, पाटीलकी आहे ती तुझी त्यावर विषयी पदमाजी याने नीकड करिताच कासारे पळून गेला. मग सरकारात जाऊन वर्तमान विदित केले. तेंव्हा पाटिलकीचे वतन पदमाजीस दिले त्या पासून पदमाजीचा लेक भोजजी सिंदा पाटीलकी करीत होता ते समई काळोजी हारी म्हणून खेडासने नजीक सीराळ येथुन आला. गावात कुणबावा करून होता. आमचा भोजजी याचा लेक गणोजी याचे वेळेस काळोजी हारी याचा लेक रवलोजी गणोजी बरोबर वहिवाट करू लागला तेंव्हा गणोजी यानी म्हटले की गावांतून जाणे, आम्हा बरोबर वहिवाट न करणे तेंव्हा खटला पडून रवलोजीने पाटणकर कुमकेस आणून त्यानी व याने जीवे मारिला आणि माळावरी उभा राहून रवलोजी बोलला की, गणोजी यास मारिला तेंव्हा गणोजीची बायकोने ऐकताच दोघे मुले होती ती घेऊन आमेणीस नागोजी पा॥ याजकडेस गेली त्याने सिरसकराचे घरास माहेरास पोचविली.

गावी आमचे कोणी नाही मागे वहिवाटी रवलोजी करीत होता. गणोजीचा लेक नागोजी सिरसीसने येऊन होळीची पोळी बांधीत होता. तेंव्हा खलोजीचा लेक केदारजी याने खटला केला उपरांत नागोजी याने गावावर दावा केला. त्याची पाळत

राखोन मागितलचे. सिंदे वाडीवर धरून सिराळेस नेला

सिराळेत मोगली ठाणेदार होते. तेथे हजर केला तेव्हा ठाणेदारानी विच्यारले की, दावा का केला माझा न्याय करावा असे नागोजी बोलिला ते ठाणेदार यानी म्हटले की रवा घेतोस की काय त्यास हाजर झाला. तेव्हा रवा रवेत नागोजी खरा जाहाला तेव्हा केदारजी पा॥ याज कडून गुन्हेगारी सातशे व्हान घेतले व नागोजी जवळ हारकीची तीनशे व्हान घेतले. त्यापासून वतन सुरळीत चालू लागले गावी कोदारजी व आमचा आबाजी शिंदा वहिवाट करीत होते. आबाजी मृत पावला नागोजी शिंदा याची बायको मृत पावली नागोजी याचा लेक रखमाजी शिंदा हा बहिणीजवळ कोंलगावी शिपुगडा पाटील याचे घरी येवून आपण काशी यात्रेस गेला रखमाजीने विशालगडी चाकरी धरून चाकरीची सनद म्हलसवड येते दिली तेथचे घर होते सोवते येथील दुप्त्या म्हार म्हेतर बापलेक यासी केदारजी व कृष्णाजी यानी जीवे मारिले त्यासी काट व....आहेत त्याने तरी रखमाजी शिंदा म्हलसवडात नांदत असता सिवजी पा व तुळजी केसरा व सोमाजी न्हावी व राणाक म्हार जावून रखमाजी शिंदा यासी गावभर घेवून आले ते समई वतन विभाग....चालत आला. जबरदस्तीने होळीस पोळी सिवजी पाा बांधीत असे. सिवजी मृत पावला तेव्हा रवलोजी पाा बांधु लागला. तेव्हा रखमाजी लेक उम्हाजी शिंदा याने होळी पोळीस दोहाई दिली. त्या पासून आजपर्यंत आमानत आहे. यावरते आपणास ठावूक नाही.

कलम १

सुभानजी केसरा रयत मौजे माार यासी गणोजी सिंदो व रवलोजी होता. उभयतांत कज्या लागोन गणोजी सिंदा रवलोजीने जीवे मारिला. रवलोजीचा पुत्र केदारजी गावी होता सिंदे याचा मारा झालेवर देशांतरास गेले.

केदारजी याने पाटीलकी केली त्या समई म्हार बाप लेक दोघे मारिले उपरांत गणोजी सिंदा यांत व केदारजी यात कज्या लागला ते समई आमचा फरिंगाजी केसरा यास सिवजी पाा याने गावास आणिला त्यास गावची देखरेख ठाऊक नव्हती माझे आज्या तुळोजी केसरा याचे वेळेस रखमाजी सिंदा गावास आला पुढे उभयतात कज्या लागोन वतन आमानत जहाले म्हणून लिहून दिली. त्याची चौकशी पाहाता पक्षपाताने सहि लिहून दिली— मारेचे दुन्दा पाटणेकर म्हणुन सहि

दिली त्याची रुजवात पाटणेकर आणून केली तेंव्हा निरुत्तर जाहाला आणि कतबे लिहून दिला की मी सहि लिहून दिली परंतु त्याची पुरवणी होत नाही तेंव्हा सहि लिहून दिली ती खोटी सही १

सहि परीट मौजे मशार या।ने लिहून दिलेजे मी बारावर्षांत होतो ते समई आमचे वडील चुलता व आजी यानी मजला सांगितले की, गावांत घर केदारजी पा। याचे व आमचे म्हारोडत घर येक म्हाराचं. सिंदे कोठोन आले आगर गावीच होता अैसे काही सांगितले नाही. सहि. १

शिवजी बीन लिंगापा गुरव वस्ती मौजे मा।र याने सहि लिहून दिली जे माझ्या वडिलाने भाजीचा फुरवारवलोजी पा।। याचे घरी दिला व माझे मीही देत आलो. होळीसपोळी जिवाजी पा। याचे घरचे आणून बांधीत होता यैसे आमचे बापाने सांगितले सहि १

म्हादजी बीन केदारजी पोवार कुलवाडी मौजे याने लिहून दिले जे सिवजी पा। व रखमाजी पा। सिंदे पाटीलकी करीत आले पुढे रवलोजी पा। व दुम्हाजी सिंदे पाटीलकी करीत आले ते समई होळीचा कज्या लागोन अमानत जाहाले. रखमाजी सिंदे म्हलसवडहून सोवेतेस आला त्याचे मागने आमचा वडील केदार पोवार आला येवून सोव्रतीस राहिला म्हणून लिहून दिले त्याची चौंकशी करिता साक्ष माझ्यानीसी पुरवणी न पडे तेंव्हा ऊलटी होऊन करिना लिहून दिले तो पक्षपातान दिला सबब खोटा जाहाला गुन्हेगारीस लागो जाहला म्हणून करिणे लिहून दिले आहे.

सई १

दुम्हानाक म्हार मौजे मा।र याने लिहून दिले जे सेकोजी सिंदा यांचा लेक पदमाजी याचा लेक भोजजी याचा लेक गणोजी याचा लेक नागोजी याचा लेक रखमाजी याचा लेक कुसाजी व दूळाजी त्यास गणोजी सिंदा यासी रवलोजी याने ठार मारिला तेंव्हा गणोजीची बायको आमणीस पळोन गेली. अमणेकरांनी खेडास पोचविली. पुढे दोघे म्हार गावात होते ते केदारजी व कृष्णाजी यानी ठार मारिले-पाटीलकी केदारजी व कृष्णाजी यानी वहिवाटली. रखमाजी सिंदा कैसा आणिला हे मला दखल नाही म्हणून लिहून दिले त्याची चौकशी करीता त्याची वस्तु पुरवणी ते पडेथेरा जाईल तेंव्हा मला ज्याने शिकविले त्याचे नाव जोतीबीन आप्पाजी सिंदा याने शिकविले होते. ते मरून आज दीड महिना झाला. सबब लिहुन दिले हे खोटे.

बाबाजी व गोंदाजी माने मौजे सिपे ता। मजकूर याने लिहून दिले सिवजी यांचे वेळेस रखमाजी सिंदा आला. याने कोठून आणिला, याचे-मुळ ठिकाण आम्हास ठाऊक नाही. सिवजी याजा पुत्र जिवजी यांचे वेळेस कुसाजी सिंदा व दुलाजी सिंदा यात व त्यात कज्या वतनासंबंधे लागला होळी पोळी वतन विभाग आमानत जाहाला इतका दखल आहे. राणोजी व नाईकजी व केदारजी व सूलतानजी व बालोजी सावंत व सिवजी चौगुला मौजे शिरगाव प्रांत मजकूर यानी साक्ष लिहून दिली जे रवलोजी याचा पुत्र केदारजी याचा सिवजी पाटिलकी करीत होते ते वेळेस रखमाजी सिंदा आला यैसे सिवजी याचा पुत्र रवलोजी व रखमाजी शिंदा याचा पुत्र कुसाजी शिंदा उभयता पाटीलकी करीत आले हाली जोती व कुसाजीचा लेक बहीरजी शिंदा यात कलह लागला आहे इतके आपलेस दखल आहे.

बहीरजी व भुजंगे मौजे कापशी ता। वरुण यानी लिहून दिले जे सिवजी याने भोपळवाडीहून शिंदे आणिले ते वाडीत गावाच्या होत ते येवून गावात राहिले तेव्हा हे व ते कसे चालिले हे आम्हास दखल नाही.

बहीरजी शिंदा याने कारणे लिहून दिला. त्याची पुरवणी साक्ष मौजेनीसी करून देणे म्हणून पंचाईतानी विच्यारिले. तेव्हा उत्तर केले जे त्यातील दाखल्याचा कागदपत्र देश-काकडेस आसेल व गणोजी सिंद्याच्या मोत्यास पाटणेकर आले होते. येईशा दोन पुरवण्या करून देईन. वरकड माझे वस्तु पुरवणी दाखलेनिशी होत नाही म्हणून मत बोलुन दिला आणि पंचास न पुसता देसेकाकडे आठ दिवस गेला तेथून मल्हार विठ्ल नी।। देशमुख व रामाजी नाईक पोटे नी।। देशपांडे व बनाजीपंत महाजन यासी व बरोबर दाहा लोक घेऊन आला तेव्हा त्यास कागदपत्र साधन काय आणिले आहेस ते दाखविणे म्हणून पाच दोननी विचारले. त्यास त्यानी येणे प्रमाणे दाखविले. त्यास त्याच्या हातच्या यादी बजीनस आहेत चौकशी पाहाता वंशावळची यादी दिली ती तुमचे घरी दत्परी होती की काय, त्यावरून त्यानी उत्तर केले की बहीरजी शिंदा यांच्या जबानी वरून लिहून दिली तेव्हा यादी सहेजच खोटी पडली दुसरी यादी........साक्षी आहे म्हणून दाखविली. ती .... लिहून दाखविली रुजुवातीस पडावयाची नाही सबब ती याद खोटी कलम ७

लेखांक : १५८

प्रतिनिधी दप्तर : ता. ११ मार्च १७९६

आज्ञा पत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास नीधी राजमान्य राजेश्री आनंदराव प्रतीनिधी ताहा जोती बीन रवलोजी व वाघोजी बीन म्हादजी शिंदे पाटील मौजे सोवते पा सीराळे सुा सीत तीसेन मया व आलफ तुम्ही किले विशालगडचे मुक्कामी हुजूर येवून विनंती केली की बहीरू बीन कुसाजी व येसोजी बीन सीदोजी सिंदे वस्ती मौजे मजकुर यानी मौजे मजकुरचे पाटीलकीच्या वतनाविषयी आम्हा बराबर कज्या लावुन वतन चाळीस पन्नास वर्षे अमानत पाडिले आहे अैशी यास त्याचा व आमचा पाटीलकी विषयी संबंध नसता वतनास जडावे अैसा विचार केला आहे. त्यास पेशजी शिंदे कुलवाडी मौजे म्हलसवडे ताा मलकापूर येथुन रखमाजी सिंदा मौजे मजकुरी नांदावयास आला त्यास साठ सत्तर वर्षे होत आली. आपल्या वडिलानी सिंदा यास रयताव्याचे शेतभात देवून गावात ठेविला. आणि दिवाणात आपणाबरोबर गावकीच्या जाबसालास शाहाणा माणुस म्हणोन नेऊ आणु लागले व गावकीच्या काम काजात ही होता तो मेल्यांनंतर त्याचे लेक दुलबाजी व कुसाजी सिंदे यानी आम्हासी निमे पाटीलकीचे वतन आमचे म्हणोन कज्या करू लागले. आणि होलीचे पोळीस द्वाही देवून आमानत पाडिली आहे. याकरिता स्वामीनी कृपाळु होवून त्याचा व आमचा वाजबीचे रीतीने हक्क ईन्साफ मनास अणुन निवाडा करून देवीला पाहिजे म्हणोन त्यावरून तुमचे हरदुजणाच्या मनसुबीस मौजे मजकुरी थल सरकारातून नेमुन देवून राजश्री बाजी निलकंठ कारकून व संभाजी भोसले हुजुरे व विठोजी चालके चाकर सरकार व प्रांत मलकापुर व वारूण व सीराले या माहालचे पाटील व देसाई देशपांडे वगैरे वतनदार यास मौजे मारी जावून मनसुबीचा निवाडा यथास्तीत करून निवाडयाचे कागदपत्र हुजूर आणून दाखवावे अैसी आज्ञा करून पाठवीले त्यानी मौजे मजकुरचे थली जमा होऊन हरदु वादी याजपासुन कतबे करिणे राजीनामे घेवून व उभे पांढरीच्या व सीवधडे भुवरगांवच्या साक्षी लिहोन घेवून सर्वाचे मते निवाडा केला त्यात बहीरू व येसु सिंदा यांचे पुरातन पाटीलकी विषयीचे साधन सुत्र काहीच न पुरे येसे ठरले त्यावरून सिंदे माार यानी पंचाईतापासी

आपणास पाटीलकीस संबंध नाही वादास खोटे अैसे म्हणोन कुंटीत पत्र लिहून दिले ते वगैरे कागद पत्र मनसुबी प्रकर्णी व नीवाड पत्र व हरदु वादी यास घेऊन हुजूर आले. आणि पंचाईतीचे वृत्त निवेदन केले ते मनास आणिता व कागदपत्र व निवाड पत्र पाहाता बहिरू सिंदा व येसाजी सिंदा यांचे पाटीलकी विषयीचे साधन सुत्र काहीच नाही. घटाईने कज्या सांगत आले ते मनसुबी मुळे खोटे पडिले पाटीलकीचे वतन पुरातन तुमचे त्यास संबंध नाही त्यानी हुजूर आल्यावर सरकारातून पुसीले की, तुम्ही मनसुबीस खोटे पडिला त्यास या परते आणखी साधन सुत्र तुमचे काही असल्यास आणुन दाखवणे तेव्हा देशपांडे याकडे जावून आपल्या साधन सुत्राचे कागदपत्र आहेत ते आणून दाखवितो अैसे बोलोन नेमोत्तर लिहून देवून सिराळ्यास जाऊन देशपांडे यांचे कारकून घेवून आले त्यानी मागील महजराच्या तालका म्हणोन च्यार कागद दाखविले हे पाहता मागील दोन तालका शे सवाशे वर्षांचे पत्राच्या होत्या त्यावर साक्षी होत्या त्या तुमच्या वडिलांचे नावाच्या अलीकडे पन्नास साठ वर्षात सरूड येथील मनसुबीचे महजराची तालीक होती त्यात मात्र हरदुजण वादी याचे वडिलांची साक्ष लिहिली आहे. चवथे पारशीपत्र होते त्याची नक्कल होती त्यातील मजकूर पाहाता दोन बिघे खुनकाटे जमीन मौजे मा।री पनाळ्याचे मुकामी यवनी अमलदार होता त्याने सिंदे मजकूर याचे वडिलास दिली असे देशकाचे नावे ताकीद त्या पत्रात सन चाळीस म्हटले आहे त्याची चौकशी पाहाता गावात खुनकाटे जमीनीचा दाखला आगर भोगवटा शिन्दे यांचा काहीच नाही. तारखेचा व सनाचा आजमास पाहाता अकराशे पासष्ठ वर्षाचा सन आहे आणि पत्र ही अस्सल नव्हे, नक्कल होती. ते प्रमाण कशावरून धरावी. यावरून देशपांडे कडील कारकूनास अस्सल पत्रे आणुन दाखवणे व पुरवणी करून देणे अैसी आज्ञा जाहाली. त्यास आपले वस्तु पुरवणी करून देवत नाही व या परते आणखी साधन सुत्र आपणापासी नाही. होते ते आणुन दाखविले असे बोलोन निरोप घेवून गेले. तेव्हा हाही दाखला खोटा पडिला हे जाणोन तुम्हावर कृपाळु होवून मौजे मा।रचे पाटीलकीचे वतन तुमचे तुम्हाकडे करार करून देवून भोगवटीयासी हे पत्र सादर केले असे तरी पाटीलकीचे वतन संबंधे मानपान कानु कायदे व होळीची पोळी व ईनाम जामीन पुरातन प्रमाणे तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने अनभवुन पाटीलकीचे वतन चालऊन सुखरूप राहावे

वतन संबंधे तुम्हा पासून सरकारात हरकी रुपये ४०० चारशेहे घेतले असेत छ १ रमजान

▭

लेखांक १५९

प्रतिनिधी दप्तर : २० सप्टेंबर १७९६

राजेश्री आनंदराव प्रतिनिधी गोसावी यासी—

सकल गुणालंकरण आखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहांकीत नारायणराव घोरपडे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असले पाहिजे विषेश आपण मोहरमचे पत्र पाठविले ते पाहून बहूत संतोष जाहाला अैसेच निरंतर पत्री मानस तोषवीत आसावे या नंतर आपण कार्यैभागाविषयीचा मजकूर कित्येक प्रकारे लिहिला तो सर्व ध्यानी आला राजेश्री दौलतराव शिन्दे यासी पेशजी समजाविलेच आहे आणखी वरचेवरी बोलतच आहो. आपले कार्याविषयी आंतर तीलमात्र होणार नाही श्रीसत्तेकडून घडेल ते प्रमाण आपला आमचा रुणानुबंध वडिला तागायंत पूर्वापार चालत आला आहे. नुतन घडावा आसा अर्थ नाही. कैलासवासी आबांजीराव यांचा व आमचा बहूत स्नेह होता त्या आन्वये आपलाही असावा पत्री उपरोधीक लीहून कळवावे अैसे नाहीं. वरकड सविस्तर मजकूर रामजी तळेकर यास सांगितले आहे. आपणास सांगतील त्यावरून कळेल. रा। छ ९ सफर बहूतकाय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

सदरहू राजेश्री दौलतराव शिंदे यासी पत्र प्रविष्ट केले त्यांनी आपणास उत्तर लिहिले आहे. त्या वरून कळेल कृपा दीजे ही विनंती.
छ १६ सफर सन सबा तीसेन मया व आलफ श्रावण वद्य २

लेखांक : १६०

प्रतीनिधी दप्तर : ता. २४ जानेवारी १७९९

सकळ गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजेश्री आनंदराव पंडीत स्वामी गोसावी यासी—

पो बाजीराव रघुनाथ प्रधान नमस्कार विनती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावे. विशेष बावडेकरी यांचे लोक प्रांत कोकण येथील सरकार तालुक्यात येवून दंगा केला आहे त्याचे पारीपत्त्यास गणपतराव जिवाजी यासी आज्ञा केली आहे तरी तालुके विशाळगड पैकी कुमकेस लोक पाठवया विषयी मा॥र नीले तुम्हास लिहीतील त्याप्रमाणे चांगले मर्द माणूस बराबर सरदार देवून दारू व गोळा व रोजमुरे याची बेगमी करून यांचे सांगितल्या प्रमाणे वर्तणूक करणे म्हणोन ताकीद करून जलद रवाना करावे तुम्हाकडून लोक कुमकेस न आल्यास विशाळगड तर्फेचा अमल जप्त करून लोक ठेवितील र॥ छ १५ रजेब सु॥ मयातेन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती



लेखाक : १६१

प्रतिनिधी दप्तर : ता. ३ आक्टोबर १७९५

श्रीमंत राजेश्री पंत प्रतिनिधी स्वामीचे शेवशी — पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असावे. विशेष आपण पत्र पाठविले ते पावले. ईकडील काम काजे होवून यावी या अन्वये राजेश्री महादजी बापुजी व चिमणाजी भिकाजी याजवळ सांगोन पो। आहे ते येथील सांगीतल्याप्रमाणे आपले जवळ बोलतील तो अर्थ चित्तात आणून ईकडील लक्ष धरून पुर्वीपासून कामे करून देत आल्या अन्वये साभीमान पूर्वक करून देत जावी म्हणोन विस्तारे लिहिले ते कळले. अैशास आपले कडील काम काजे करून देण्याविषयी लक्ष आहेच. सांप्रत उभयतास आपण पाठविले याज पासून मजकूर समजोन घेवून श्रीमंतास विनंती करून आज्ञा होईल त्या प्रमाणे कामे काजे होऊन येतील आपले विषयी दुसरा अर्थ नाही. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे. हे विनंती
१९ रबिलावल सन सीत तिसेन भाद्रपद



लेखांक : १६२

प्रतिनिधी दप्तर : ता. २३ जून १८०१

राजेश्री आणाजी बीन तपाजी व काळोजी बीन विठोजी पा॥ वाडी होडुबा मौजे कोनोली ता॥ वरूण तर्फ समज पत्र बहीरजी बीन रायाजी व

धनजी बीन रघोजी पाटील ईथापे मौजे दुर्गवाडी ता।। मजकूर सु।। ईसने मयातेन व आलफ कारणे लिहून दिल्हे समज पत्र असीजे. मौजे म।।र व वाडी होडुबा येथील सिवेच्या रानाचा कज्या होता या करिता तुम्ही व आम्ही मिळोन सरकारात आलो त्यावरून सरकारातून राजश्री बालाजी मोरेश्वर कारकून व विठोजी माने हुजरे यास व देशमुख देशपांडे व भुवरे गावकरी यास आज्ञा पत्रे देवून गावी मनसुबी नेमून दिल्ही त्याप्रमाणे कारकून व हुजरे यानी सारे जमा करून निवाडा केला तेथे आमची आशंका न पुरे सबब भंडा घेऊन शीव चालतो असा करारनामा पंचाईतात लिहोन देवून सरकारात आलो. त्यावरून भंडा द्यावयाची आज्ञा होवुन बराबर राजश्री गोपाळ लक्ष्मण कारकून व रायाजी सिंदे हुजरे यास समागमे देऊन रवाना केले तेथे तुम्ही आमान्य होऊन हुजुर येऊन भंडा न चालावा असे सरकारचे आज्ञा पत्र घेवून आला त्यावरून भंडा द्याववयाचे राहोन कारकून व हुजरे या समागमे तुम्ही व आम्ही मिळोन हुजुर आलो त्यास मनसुबीची ताडणुक हुजुर होत असता तुम्ही व आम्ही विनंती केली की, आमचे सीवधडे करडेकर ते आम्हास सीव सांगतील त्यास मान्य याप्रमाणे विनंती करून मान्यतेचे कतबे सरकारात लिहून दिल्हे. यावरून करडेकर भगु बीन रायाजी पाटील व विठोजी बीन संताजी ईंगवले व गणु बीन जोती गुरव हुजुर आले होते त्यास सदरहु शिवेचा मजकूर सत्योत्तरे सांगणे विषयी हजीर मजालस सरकारातून आज्ञा जाहाली तेव्हा करडेकर यानी सत्योत्तरे सीव सांगतो याप्रमाणे बोलोन सीव जे पुरातन रान मौजे दुर्गवाडीचे मोकदम यानी होडुबाकडे श्री देवास दिल्हे त्याची सीमा खड कालीचा ओढा पश्चिमेकडोन करड्याचे सिवेपासून पाण लोटाने निघाला तो धनगर वाड्याचे मावळते कडून कड्याचे धारेने आला तो म्हार मला मौजे म।।र यांचे बांधाजवळ कोनास मार्गावर मिळाला तेथुन सीमा डोंगरकड सरेने श्री देव मावल्याचे बांधावरून सेवरीच्या बांधावर ओढयास मिळाली तेथुन सीमा तिकोना............ओढ्या आलीकडील होडुबाकडे श्री देव पावणाईचा राहोन मधोन बांधाने सीमा राम डोहाचे उशास वरणेस मिळाली याप्रमाणें सांगितले त्यास याप्रमाणे आपण त्या संतोषे मान्य होवून तुम्हास हे समज पत्र लिहून दिल्हे असे. सदरहु प्रमाणे पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने चालो ये विषयी तुमचे पत्र आम्हाजवळ व आमचे पत्र तुम्हाजवळ असे या उपरी खटला करणार नाही खटला करू तर देवाचे

अन्यायी हे समज पत्र लिहून दिले सही छ. ११ सफर उर्फ जेष्टमास शके १७२३ दुर्मती नाम संवत्सरे नी।। नांगर



लेखांक : १६३

प्रतिनिधी दप्तर : ता. २९ जानेवारी १८०२

अभयपत्र—समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री आनंदराव पंडीत प्रतीनिधी ताहा रामाजी कान्हो कामत मौजे खानवली ता।। लांजे सुभा प्रांत राजापुर सु।। सन ईसने मयातैन व आलफ तुम्ही किल्ले विशाळगडचे मुक्कामी हुजूर येवून विनंती केली मौजे मजकुरी ठिकाण ताबणदे पो उमाजीराव व गणपतराव खानवीलकर खोत यानी आपणास सोळा बिघे च्यार पांड जमीन वरकस मिरास करून देवून वतनपत्र लिहून दिले आहे. त्या जमीनीत घर बांधोन राहिलो घराचे दक्षिणेस व उत्तरेस वरकस परंतु खडकाल जंगल जमीन होती ते खणोन आंतील दगड फोडुन बांध बांधोन काही जमीन कुडपाट प्रतीची केली व काही करावयाची आहे. त्यास पैका सुबलग लागणार ये विषयी रत्नागिरी कडुन कारकून नेऊन जमिनीचा व मेहनतीचा अदमास करून माफी ईस्तावयाचा व ईस्तावा भरलीयावर चवथाई ईनाम ध्यावयाचा करार करून कौल दिला आहे तो पाहोन स्वामीनी कृपालु होवून त्या प्रो माफीचा कौल देवावा म्हणोन त्यावरून तुम्ही रत्नागिरीकडील कौल छ २९ जिल्हेज सन तीसा तीसेन मया व आलफेचा आणुन दाखविला तो पाहुन त्याप्रमाणे करार करून दिला

कुडपाट बिघे जमीन रुपये ६३।३। केल्यास तयार होईल.

प्रत जमीन थोरले नदीचा पाट आणित होतो परंतु आला नाही पाण्याचे आश्राने जमींन तयार केली नदीचा पाट आल्यास दुपिकी होईल

८।।। =।। पाटावली कडील

८४। १।। प्रत व।। कुडपाट जमीन तयार होणे पाच च्यार वर्षानी मेहनत

मेहनतीचा खर्च बदल ७२५ जमीन थोरले नदीचा पाट काढुन पाणी आणीत होते त्याखाली व पाटाखाली जमीन तयार केली त्यास आजमासे १५५० किता जमीन तयार होत आहे त्यास आजमासे

येकूण जमीन साडे सात बिघे पावणे पाच पांड जंगल गर्क डांगोला दगडील होती त्यापैकी काही जमीन तयार जाहाली व काही तयार होणे आहे त्यास पैका मुबलग लागला व आणखी लागणार आशास जमीन थोडकी आणि श्रम बहुत हे जाणोन मेहनती बद्दल माफी साले ई।। लागवडीचे साल सन तीसा तिसेन त।। सन तीसा आशर पावेतो साले २१ येकवीस माफी करार करून दिल्ही आहेत. माफी भरल्यानंतर मुलुक शर्त पाहाणी होवून आकार होईल त्या प्रो चौथाई जमीन जमिनीची पत्रे ईनामाची करून घेणे मजुरा पडेल तरी कोण विषयी शक न धरिता कष्ट मेहनत करून दिवाण दस्ताची उगवणी करून देवून सुखरूप राहाणे अभय असे छ २४ रजमान हुजूर मोर्तब

लेखांक : १६४

प्रतिनिधी दप्तर : ता. ९ फेब्रवारी १८०४

श्रीमंत राजेश्री पंत प्रतिनिधी साहेबाचे शेवेशी— विंनती सेवक आनंदराव धुलप मुक्काम जंजिरे विजयदुर्ग कृतानेक दंडवत विज्ञापना त।। छ २६ माहे सवाल पावेतो वर्तमान यथास्थित आहे. विशेष तालुके रत्नागिरी येथील माजी मामलेदार याजकडील कारकून पळूम गेले त्यानी विशालगडच्या घेऱ्यांत राहून जमाव करून साखरपे येथे येवून गावचे खोत कमावीसदार धरून नेतात आणि बखेडा मांडिला आहे. आपल्याकडून त्यास पुस्त पन्हा आहे. अैशास त्याचा बंदोबस्त करावा म्हणोन वो।। राजेश्री वैजनाथ भटजी मामा यांचे पत्र आले त्याज वरून हे पत्र आपणास लिहिले आहे. तर हुजुरच्या लक्षाशिवाय मामलेदाराचे कारकुनास घेऱ्यात जागा देवून सरकार मुलुखात बखेडा केला हे ठीक न जाहाले या उपर त्याचा पुस्त पन्हा न व्हावा व त्याचे मिलाफी असतील त्यांची पारिपत्ये होवून उत्तर आले पाहिजे. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना. पो।। छ २८ माहे शोवाल सु।। आर्बा मयातेन व आलफ

लेखांक : १६५

प्रतिनिधी दप्तर : ता. ९ मार्च १८०४

समस्त राज कार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री आनंदराव पंडीत प्रतीनीधी यास आज्ञा केली यैसाजे. हुजुर लग्नाबद्दल आपणाकडुन रुपये

५०००० पन्नास हजार आणवीले असेत. तरी आज्ञे प्रमाणे सदरहु रुपये करवीरचे मुक्कामी हुजुर पाठवून द्यावे. जाणीजे सन आर्बा मयातेन व आलफ रवाना छ २६ माहे जिलकाद बहुत लिहिणे तर सुज्ञ असा.

लेखांक : १६६

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १८०४

सरकार हैदरी

साहेब मेहेरबान मुशफक कर्म फर्माय दोस्ता फैज बक्ष फेजरसा श्रीमंत आनंदराव प्रतिनिधी असलम हुताला. ——

आजी दिल येकलास उमर आली नबाब उसफ बकशी सलाम बादज सलाम आंकी येथील खैर तारीख ११ जमादिलावर जाणोन आ साहेबी आपलें खैर खुशाली हर हमेशा बात मोहबीकी कलमी केली पाहिजे दर आयात राजेश्री बाबुराव बाबा पाटणकर यानी आपणाकडील वर्तमान सांगितले वरून दील मुराद खुशी हासील जाहाले तर आम्ही विज्यापुर प्रांतात मुक्काम करून राहिलो आहो त्यास राजश्री दौलतराव शिंदे आलीज्या बहादर व राजेश्री यशवंतराव होळकर व राजेश्री नागपुरकर राजे भोसले व मिरजकर येणेप्रमाणे आमचे कामाची अगत्य धरून करीत आहेत त्याजप्रमाणे आपण दया करून आमचे बरे होय ते करावे पुर्वीपासुन तुमचा आमचा स्नेह असे समजून आपणाकडे पत्र पो आहे या पत्राचा अभिमान आपणासच आहे लिहून कळवावे असे नाही या पत्राचे उत्तर आले नंतर राजेश्री बाबूराव पाटणकर आपणाकडे पाठवून देवू. बहुत काय लिहिणे. प्यार मोहबत तरकी असावे हे किताबत.

लेखांक : १६७

प्रतिनिधी दप्तर : ता. ९ जानेवारी १८०५

कौलनामा अज स्वारी राजश्री बालाजीराम सुभेदार तालुके रत्नागिरी ता॥ दादजी बीर्जा भंडारी रा॥ मौजे शेंबवणे ता॥ संगमेश्वर सु॥ खमस मया तेन व आलफ तुवा चोरटे याचे संमतीस होतास असे सरकारात समजले त्याजवरून

तुझे घरची जप्ती करून चौकसीबद्दल सुभा तुजला आणीला त्यास चोरीचा मजकूर मनास आणीता तुजकडे अपराध लागत नाही. सबब तुझे घरची वस्तवनी वगैरे जप्त केली होती ते तुझी तुझे हवाली करून हा कौल सादर केला असे. तरी....गावी जावून राहाणे कोणे बाबे शक अंदेशा न धरणे कौल असे जाणीजे छ १ सवाल

लेखांक : १६८

प्रतिनिधी दप्तर : ता. १२ फेब्रुवारी १८०५

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास नीधी राजमान्य राजेश्री आनंदराव पंडीत प्रतिनिधी ता॥ कमावीसदार कसबा माजगाव सु॥ खमस मया तेन व आलफ कसबे मजकुरी नवीन जाफरशा पीर जागृत स्थान जाहाले त्यांचे दिवाबत्ती बद्दल पेशजी खैरात नेमणुक आहे. परंतु ऊरसाचा खर्च चालला पाहिजे ये विषयी राजेश्री बापुजी देश कुलकर्णी ता॥ मजकुर यानी किल्ले विशाळगडचे मुक्कामी हुजूर येऊन विंनंती केली की काजी ईसा कसबे मजकूर यानी मशिदीनजीक खाडी किनारा दर्यागर्क खाजण जमीन होती त्याची बंदिस्ती चिरेबंदी बांध बांधोन लागवडीस आणली त्याचा इस्तावा भरावयाचा आहे. ते खाजण जमीन आजमासे पावणे दोन बिघेपर्यंत आहे त्याचा आकार पीराचे नावे जमाबंदी खेरीज जमा धरून पिराचे खर्चाबद्दल देविली. या उर्जा होवून पीराचे चालेल म्हणोन त्यावरोन मनास आणिता पीर जागृत नवसास पावतो त्याचे ऊरसाचा खर्च चालावा हे जाणोन सदरहु खाजण मशिदीचे दक्षिणेस खाडी किनारा अजमासे जमीन बिघे ०१॥|. पावणे दोन आहे. त्याची माफी भरल्यावर सरकार दस्ताचा आकार होईल तो कसबे मजकुराचे हिशेबी जमाबंदी खेरीज जमा धरून जाफरशापीर यांचे नावे खेरात खर्च पडत जाईल तरी साल दरसाल खाजणाचा आकार होईल तो पीराकडे देत जाणे. प्रतीवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची प्रती लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटी यासी काजी मजकूर याजवळ परतोन देणे छ ११ जीलकाद नीदेश समक्ष मोर्तबा असे.

लेखांक : १६९

प्रतिनिधी दप्तर : ता. १४ जुलै १८०६

राजश्री बाळाजी हरी पाटणकर मौजे आरवली ता।। कोंडित्ररे गोसावी यांस सेवक चिंतो वामन सुभेदार तालुके रत्नागिरी नमस्कार सु।। सबा मयातैन व आलफ तुम्ही सुभा येऊन विनंती केली की मौजे कुचांबे ता।। संगमेश्वर येथील खोती रामजीराव सुर्वे यांची त्यास गाव दुतर्फा वेटीचे उपद्रव बहुत व पेशजी आपती पडली. त्यामुळे कुळें नादारीस आली दस्ताप्रमाणे गावात उत्पन्न नाही तोटा येऊ लागला. तो देऊन गावाची उगवणी त्याचे वस्तू न होय सबब त्याणी दिवाणचे बाकीस द्यावयासी पैका आम्हापासून घेऊन गाव गहाण आम्हास दिला. त्याची वैवाट आम्ही करू लागलो. परंतु कुले नादारीस आली होती. व अलीकडे आपती पडली. त्यामुळे मयत व परागंदा जाहली. गाव दरोबस्त वोस जाहला. यास्तव लागवड अगदी पडली. तेव्हा साल गुदस्ता आपण सुभा येऊन सदरहू मजकूर विदीत केला. त्याजवरून तुम्ही उमेदीने मौजे मजकुरी वतनदार वगैरे कुले आणून लागवडीस लावणे. पेस्तर कीर्दीचे अन्वये वसूल घेतला जाईल म्हणून सुभा आज्ञा जाहली. व रयतास गावी येऊन लागवड करणे म्हणून कौल दिल्हा त्याजवरून आम्ही काही बंदकरी कुळे लाऊन साल मा।।रची लागवड केली आहे. त्यास वहिवाटीचा व कीर्दीचा अन्वय मनास आणून दस्ताचा ठराव करून दिल्हेयांस उमेदीने कष्ट मशागत करून गाव भर दस्तांस आणू म्हणून व रयताचा कौल आणून दाखविला. त्याजवरून मनांस आणितां गावांत कूल अगदी नाही. जुजबी लागवड बंदकरी कुलानी केली आहे. त्याणे भर दस्ताची उगवणी होणार नाही. यास्तव सूट दिलीया विना कमावीसदार यांस उमेद होऊन कीर्द महामुरा होणार नाही. हे जाणोन गावचे आबादीवर नजर देऊन पेस्तर सालापासून भरदस्त जमाबंदी प्रमाणे व साल मा।।री लागवडीचा अन्वय मनास आणून वसूल घ्यावयाचा ठराव छ. १५ जिलकादी होऊन याद मखलासीची जाहाली. त्यास भरमक्ता निमे विशालगडचा हिस्सा वजा होऊन बाकी निमे तक्षीम सरकार बाकी वसुली. तुम्ही हिसेब इजमाली साल गुदस्त सनसीत मयातैन व अलफ येकूण एकशे त्रेसष्ट रुपये दोन आणे व गला साडे तीसेरी मापे पावणे चार खंडी साडेतीन मण दीड पायली साल मा।।री व पेस्तर

सालापासून भरदस्त मक्तेबंदी प्रमाणे मौजे म॥रचा वसूल घ्यावयाचा ठराव करून देऊन हे पत्र तुम्हास सादर केले असे तरी उमेदीने गावाची लावणी संचणी करूल सदरहु ठरावाप्रमाणे मुलुक शर्त उगवणी करून देऊन कोण बाबे शंका आंदेशा न धरता सुखरूप राहाणे छ. २७ रबिलावल अखेर बहुत काय लिहीणे

लेखांक : १७०

प्रतिनिधी दप्तर : ता. १६ आक्टोबर १८०६

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी त॥ गणेश घोडका सु॥ सबा मयातेन व आलफ तू पेठ कसबा मलकापूर येथून परागंदा जाहलास म्हणोन हुजर विदीत जाहाले. त्याजवरून तुजला हे अभयपत्र सादर केले असे. तरी बेवसवसा पेठ मजकुरी येऊन उदीम व्यवसाय करून कोणेबाबे शंका अंदेशा न धरिता सुखरूप राहणे जाजती जलाल होणार नाही अभय असे. छ ३ रजब निदेश समक्ष.

लेखांक : १७१

प्रतिनिधी दप्तर : ता. १८ एप्रिल १८०७

यादी मक्ताबंदी ठराव सु॥ सबा मयातेन व आलफ गांव त॥ संगमेश्वर येथील रत्नागिरीकडून जमाबंदीचा ठराव साल मजकुरापासून करून घेतला त्या अन्वये सरकार तर्फेने ठराव करून दिला गांव विद्यमान रो॥ गोपाल वासुदेव मुळ्ये—

मौजे सिवणे त॥ मजकूर

१ रत्नागिरी कडील चडत्या खंडाने मक्ता दस्ताव साहा साली करून सातवे साली भर मक्ता घ्यावा, म्हणोन ठराव करून दिला ते ठरावाची यादी तुम्ही सरकारात आणून दाखविली आणि ईकडील त्या अन्वयें दस्ताव घ्यावा म्हणोन विनंती केली त्याजवरून इकडील ठरावाची यादी पाहोन त्याप्रमाणे तुमची कबुलायत घेऊन हे ठरावाची याद तुम्हास दिली असे. सदरहु अन्वये सात साली रत्नागिरी— कडील दस्ता-

ज्याचे हिशेब होतील त्या अन्वये सरकार चालीप्रमाणे फडशा करून वहिवाट करणे कलम

१ स्वामीत्व दरसाल रुपये ३ तीन प्रमाणे करार करून दिल्हे त्या प्रमाणे साले साल भर मक्ते प्रमाणे देत जाणे.

१ करसाई गाव खराब पाडिला. रयता खराब जाहाली सबब साल गु॥स काही सुट घाल्हून साल मजकुर पासून दर साल रुपये २।॰ प्रमाणे करार करून दिल्हे आसत साल १२ भर मक्त्या पर्यंत देत जाणे कलम.

मौजे करबेले ता॥ मजकूर

१ रत्नागिरीकडील चडत्या खंडाने दस्ताव व आठसाली करून नववे साली भर मक्ता ध्यावा म्हणोन ठराव करून दिला ते ठरावाची याद तुम्ही सरकारात आणुन दाखविली आणि ईकडील त्या अन्वये दस्ताव करून ध्यावा म्हणोन विनंती केली. त्यावरून तिकडील ठरावाची याद पाहून त्याप्रमाणे तुमची कबुलायत घेवून हे ठरावाची याद तुम्हास दिली असे सदरहू अन्वये तिकडील दस्ताव्याचे हिसेब होतील त्या अन्वये सरकर चाली प्रो फडशा करून देवून वहिवाट करणे

१ स्वामीत्व दरसाल रुपये दोन प्रमाणे करार करून दिले त्याप्रमाणे साले साल भरमक्तेपर्यंत देत जाणे.

१ करसाई गाव खराव पडिला रयत मयत जाहाली. सबब साल गुदस्ता काही सोड घाल्हून साल मा॥र पासुन दरसाल रुपये २।-प्रमाणे करार करून दिले असत साले साल भरमक्ते पर्यंत देत जाणे

येणेप्रमाणे ठराव करून तुम्हास ठरावाची याद करून दिली असे सदरहु अन्वये वैवाट करून सरकार दस्ताची उगवणी करून देत जाणे आप्त फीसरत जाहलीया शर्त मजुरा दिल्ही जाईल. छ ३ सफर मोर्तबा असे.

लेखांक : १७२

प्रतिनिधी दप्तर : ता. ९ जून १८०७

यादी श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधी ता॥ विशाळगड याजकडे तालुके रत्नागिरी येथील दुतर्फी मुलखांत सुदामत चालीसीवाय रयतेस उपद्रव होतो यविषयी विनंती करून बंदोबस्त करून द्यावयाचा.

१ माहाला निहाय गावगन्ना सालाबाद वसुल होणे तो होवून ज्याजती

फाजील गावगन्नाची गेली असतील ती चौकशीस कारकून दुतर्फाचे पाठवून गावचे हिशेब मजुरा द्यावी येणेप्रमाणे.

१ पोशाख पट्टीचा अैवज पेशजी ईकडून रोखे होवून घेतला सबब तिकडुन रोखे जाहाले त्यास ईकडुन मनाई ऐवजाची जाहाली आहे आणि रसदेत गावगना मजुरा दिले त्याप्रमाणे मनाई होऊन रोखे पुढे होऊ नये. अैवज घेतला असेल तो मजुरा रयतेस द्यावा.

१ साल मजकुरी व पेशजी ब्राम्हणाचे घरी मुलीची लग्ने जाहाली त्याची चौकशी होणे म्हणोन मसाले जाहाले आहेत त्यास ईकडून चौकशी होऊन वाजवी अैवज ठरेल त्याचा हिस्सा तुम्ही घ्यावा दरम्यान रोखे ईकडून झाल्या खेरीज करू नये. रोखे होऊन अैवज घेतला तो देवऊन हाल्ली तगादे जाहाले आहेत ते मना करावे.

१ वाडा बसणी का। नेवेर येथे मसाल्याचे वगैरे रोखे व ज्याजती अैवजाचे रोखे होवून गावास तगादा जाहला आहे तो मना करावयाचा तगाद्यामुळे सरकारचे वसुलास खलेली जाहाली आहे.

१ कसबा हातखंडे येथे मनेश्वी कुभांडे काढून रयतेस मसाले व खंड गुन्हेगारी, याचे रोखे होऊन रयतेस उपद्रव जाहाला यामुळे काही कुळे तजावजा जाहाली आहेत. ते रोखे मना होऊन गावची कुळे तजावजा जाहाली आहेत ती गावचे गावी येवून गावची आबादी जाहाली पाहिजे.

१ पटीचा अैवज मक्त्याचा अखेर सालापूर्वी पा। तो आद्याप आला नाही सालपे व भोवडे येथील ऐवज आला नाही त्यास तीनशे त्र्याऐंशी रोखापटी पो आले बाकी त्याचे भरीचे रुपये सहाशे सत्तावीस व सालपे व भोवडे येथील आठेचाळीस रुपये आले बाकीचे रुपये द्यावे

१ वसुलास वगैरे पयादे येतात ते रयतेस वगैरे जलेली बहुत करितात यांचा बंदोबस्त व्हावा रयतेस सरकार अमलाचे चाली खेरीज ज्याजती तगादे वगैरे जलेली होऊ नये.

१ चोरट्याचा व दरवड्याचा वगैरे प्रांतात उपद्रव होणे त्याचे बंदोबस्तास सरकारचे लोक मुलकात स्वारीस व जागा जागा नाक्याचे चौक्यास लोक ठेवावयाचे त्यास तिकडील लोक स्वारीस वगैरे बंदोबस्त न करिता असामी

शाहाणे माणुस सरदार व कारकून खर्चाचा बंदोबस्त करून देवून पाठवावे म्हणजे सरकारचे लोक व ते नाकेबंदीचे चौक्यास व फिरत्ये स्वारीस ठेवून बंदोबस्त करावयास येईल यास्तव लिहिल्याप्रमाणे दोनशे माणूस सत्वर पाठवावे.

१ रयतास वगैरे सहज बोलावणे जाहले—असता मसाला होतो ही चाल सरकार अमलात नाही तिकडून होय ती होऊ नये.

१ मौजे कोट व नाखरे वगैरे गाव आप्तीमुळे :खराब होवून तोट्याखाली आले रयत मयेत जाहाली वतनदार खोतानी गाव सोडिले व ते सरकारात कमाविसी खाली आहेत त्याची करसाई मागील चाली प्रो घेता याजमुळे जुजबी कुले गावी होती ती परागंदा जाहाली याजमुळे सरकारची नुकसानी बहुत आहे याजकरिता गावगन्ना वेठीची कुळे कोण गावी किती आहेत याची चौकशी करून जीवन मागील शिरस्ते प्रो करसाई घ्यावी जाजती घेऊ नये.

१ पोशाख पट्टी व बावा छपाई व भूतपटी व देव डबी ही च्यार कलमे ईकडून घेतली नसता गावगन्ना रोखे करून रुपये घेतले असतील ते सन संबाचे हिसेबी गावगन्ना मजुरा द्यावे, ये विषयी रयतेचा बोभाट बहुत आहे.

अकरा कलमे लिहिली आहेत याप्रमाणे काम काजाचे उलघडे व्हावे छ २ रबिलाखर जेष्ठ मास सु॥ समान मया तेन व आलफ.

लेखांक : १७३

प्रतिनिधी दप्तर : ता. १७ सप्टेंबर १८०७

आभये पत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनीधी राजमान्य राजश्री भगवंतराव पंडीत प्रतीनीधी ता॥ शेटे व माहाजन व समस्त माहा पेठ शुक्रवार कसबा मलकापूर सु॥ सबा मयातेन व आलफ दिल्हे आभये पत्र ऐसीजे दीजे तुमची करवीरच्या वगैरे बैद्यामुळे खराबी बहुत होवून तुम्ही परागंदा जाहला आहा त्यास तुमचे बाबे राजेश्री आप्पाजी शामजी व जोती भीवाजी देशपांडे यानी हुजूर विनंती केली अशास गुदस्त कराडचा बैदा पडोन पेठेतील घरे दग्ध होवून पेठेचा उद्वस्थ जाहला सबब तुम्हांवर नजर देवून ज्याची घरे दग्ध जाहाली त्यास फालापटी व चौथाई तीन साला व वरकड रयतास फाला पट्टी व चौथाई दोन साले माफ साल मजकुरापासून करार करून देवून साल गुदस्त

कौल दिला आहे त्यास आगोटीस दुसरा बैदा करवीरचा पडोन पेठेची बहुत खराबी होवून उध्वस्त जाहाली हे जाणोन तुम्हावर नदर देवून पेसजी कौल दिल्हा तो बाद करून हाल्ली साल मजकुरापासुन करार करून दिल्हे बी तपशील ———

५ फाला व पटी माफ साले

३ स्वारी पटी चौथाई व वेट बेगार माफ साले

येणे प्रमाणे फाला पटी पांच साले व स्वारी पटी व वेट बेगार तीन साले येकूण पाच साले माफ करार करून देवून हे आभयेपत्र सादर केले असे तरी बेवसवसा पेठेत येवून उदीम व्यवसाये करून सुखरूप राहणे माफी करार करून दिला याप्रमाणे चालविले जाईल. शक न धरणे. आभये असे छ ४ रजब नीदेश समक्ष

लेखांक : १७४

प्रतिनिधी दप्तर : ता. १ नोव्हेंबर १८०७

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंत-राव पंडीत प्रतिनिधी ता।। मोकदमानी मौजे दाभोले ता।। देवले सुभा प्रांत राजा-पूर सु।। समान मया तैन व आलफ राजश्री चिटको विनायक बिन बापूजी नायक सरदेसाई ता।। खेलणा व देशमुख ता।। मा।र याणी हुजुर किले विशालगडचे मुकामी येऊन विदीत केले की मौजे मा।र ची खोती वतनी पुरातन आमची आम्हाकडे चालत असता सन आर्बा सबाइनात राजश्री पंत प्रधान याकडे महादाजी बलाल करकरे याणी मौजे मा।रची खोती बेवारसी येथील कमाविसी आपणाकडे सांगावी ऐसा गैर वाका समजाऊन सनद घेतली. हे वर्तमान आम्हास कळल्या वर भोगवटी याच्या दाखल्याचे कागदपत्र करकरे यांस समजाविले त्यावरून त्याची खातरजमा होऊन त्याणी आपले पत्र महिपतराव कृष्ण माजी मामलेदार ता।। रत्नागिरी यास दिल्ही त्याजवरून घालमेल न होता आमचा गाव आम्हा-कडे चालत आला असता तन इसने मया तेनात चिमणजी सदासीव करकरे याणी पुण्याचे मुकामी सरसुभा गैरवाका समजाऊन तीविसी सनद घेतली. त्याचा निदेश सरसुभा होऊन करकरे याणी सनद घेतली ते गैरवाका असे

ठरले. सबब सनद माघारे घेऊन मौजे मजकूरची खोती आमची आम्हाकडे करार करून देऊन भोगवटी यास पत्रे करून दिल्ही आहेत. ते पाहून स्वामींनी कृपाळू होऊन भोगवटी यासी पत्रे करून दिल्ही पाहिजेत. म्हणोन विनंती करून सरसुभाची पत्रे व माहादजी बलाल याचे पत्र भोगवटी यांच्या वहिवाटीचे कागद पत्र आणून दाखविले. यावरून मनास आणिता मौजे मारची खोतीचा भोगवटा पूर्वीपासून बहूत वर्षे अविछीन सरदेसाई याजकडे चालत आला. असे असता सन आर्बा सबाइनात माहादजी बलाल करकरे याणी राजश्री प्रधानपंत याजकडे मौजे मजकूरचे खोती बेवारसी यैसा गैरवाका समजाऊन कमावीस आपणाकडे सांगावी म्हणोन सनद घेतली. तेव्हा सरदेसाई यांजकडील मौजे मारची खोती समंधे कागदपत्र समजोन घेऊन महिपतराव कृष्ण माजी मामलेदार ता॥ रत्नागिरी यास करकरे याणी आपले पत्र दिल्हे. त्यात मौजे मा॥रची खोती सरदेसाई याची. त्याचा गाव त्याणी करावा सनद गैर विल्हेस लागली. पुढे निघाल्यास....धरावयाची नाही. सदरहू गावास आमचा कज्या नाही. सरदेसाई याचा गाव चालत आल्याप्रमाणे चालवावा म्हणोन सरसुभाच्या पत्रात चिमणाजी सदासीव करकरे याणी सनदा घेतल्या त्या गैरवाका सबब माघाऱ्या टाकून मौजे मा॥रचे खोतीचे वतन सरदेसाई याचे याजकडे करार करून देऊन पत्रे करून दिल्ही असा अन्यवये आहे. यावरून व भोगवटीयाचे कागद पत्रावरून पाहता मौजे मजकुरचे खोतीचे वतन वडिलोपार्जीत चिटको विनायक सरदेसाई याचे याजकडे अविछीन भोगवटा बहुत वर्षे चालत आला हे जाणोन याजवर कृपाळू होऊन मौजे मजकूरचे खोतीचे वतन मा॥र निल्हे सरदेसाई यास करार करून भोगवटी यासी अलाहिदा पत्र करून देऊन हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असे. तरी मौजे मा॥रची खोती व मानपान व फडफर्मास पुरातन चालत आल्याप्रमाणे सरदेसाई पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने उपभोग करतील तुम्ही यासी रुजू राहोन याचे रजतलबेत असावे.

लेखांक : १७५

प्रतीनिधी दप्तर : ता २३ मार्च १८०८

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी ता॥ मोकदमानी मौजे चांदोली देह ४१ ता॥ मलकापूर

सु॥ समान मयातेन व आलफ मकनाक बिन मादनाक माहार मौजे मजकूर याणी किले विशालवाडचे मुकामी हुजूर येऊन विनंती केली की पेशजी आवडोजी बिन गोंदजी सालवी पाटील व चंदोजी बिन संबाजी सालवी पाटील याचा मौजे मा॥रचे पाटिलकी संमधे कजिया लागोन हुजूर आले. त्यावरून देशमुख व देशपांडे व भोवार गावचे पाटील वगैरे वतनदार याचकडे सरकारातून मनोसोबी विसी आज्ञा होऊन मौजे मजकुरीचे थली निवाडा होऊन आवडोजीकडे वडिलकी व चंदोजीकडे निमे भाऊ वाटणी ठरोन सरकारची पत्रे जाहाली. आवडोजीकडे सेरणी व मनसुबी संमधे खर्च वगैरे लागेल ते द्यावयाचे सामर्थ्य नाही याकरिता मजपासून कर्ज घेऊन उलगडा केला त्याचा फडशा करावा तो मयत जाहला. पोटी संतान नाही याजकरिता करजाऊ ऐवज येणे तो राहिला. अशास स्वामीनी कृपाळु होऊन कज्याबद्दल आवडोजीची तक्षीम माझे हवाली करावी म्हणोन याजवरून मनासी आणिता आवडोजीस मनसुबी संमधे सेरणी वगैरे खर्च लागला तो माहार मजकुरापासून कर्ज घेऊन दिल्हा त्याचा फडशा करावा तो मयत जाहला त्याचे पोटी संतान नाही. सबब आवडोजी मजकूर याची तक्षीम मकनाक याचे हवाली केली आहे. वंशपरंपरेने याजकडे चालवीत जाणे छ. २५ मोहरम निदेश समक्ष मोर्तब असे.

लेखांक : १७६

प्रतिनिधी दप्तर : ता. ९ नोव्हेंबर १८०८

अभय पत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री आनंदराव पंडीत प्रतिनिधी ताहा दामोदर सदाशिव करंदीकर माहाजन वाडा म्हाबळ कसबा पावस तर्फ मा॥र सु॥ तीसा मया तैन व आलफ लिहून दिले अभय पत्र ऐसाजे तुम्ही हुजुर किल्ले विशाळगडचे मुक्कामी येवून विनंती केली की, कसबे मजकुरी आपली खाजण जमीन खुद दर्या गर्क नजीक फणसवाडी येथील होती त्यास नदी पाण्याचे बांधाने व आतुन खाच खलगे भरून काढुन जमीन तयार केली त्यास पैसा खर्च मुबलग लागला ऐशास स्वामीनी कृपाळु होवून मेहनतीचा अजमास पाहोन माफी दस्तावेयाचा कौल व माफी भरली यावर कमधरा व चौथाई द्यावयाचा करार करून दिली या उमेदीने कष्ट मशाकत

करून कीर्द माहामुरा करू म्हणोन याजवरून मनास आणून कीर्दीवर नजर देवून तुम्ही येविषयी रत्नागिरी कडील कौल छ १५ मोहरम सन ईहिदे मया तेनचा आणुन दाखविला तो पाहुन तुम्हास कौल दिला.

मा।र निल्हे सरदेसाई यास करार करून भोगवटीयासी अलाहिदा पत्र करून देऊन हे आज्ञापत्र तुम्हास सादर केले असे. तरी मौजे मा।रची खोती व खोती समंधे व मान पान व कानु कायदे फडफर्मास पुरातन चालत आल्या प्रमाणे सरदेसाई पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने उपभोग करतील तुम्ही यासी रुजू राहोन याचे रजतलबेत वर्तोन वसूल मासूल याजकडे देत जाणे. प्रतिवर्षी नवीन सनदेचा अक्षेप न करणे छ ३० साबान निदेश समक्ष. मोर्तब

एकूण ऐकोणीस बिघे पावणे पांच पांड जमीन दर्या गर्क होती ते मेहनतीने रवाजण प्रतीची तयार केलीत त्यास खर्च दोन हजार दोनशेहे साडेसात रुपये जाहाले हे जाणोन मेहनती बद्दल माफी ईस्तकबील सन ईहिंदे मयातेन ता। सन खमस आशरीन पावेतो साले पंचवीस व माफी भरल्यावर कमधारा दर बिघा भात सन सीत आशरीत सव्वामण व सबा आशरीन अडीच मण व समान आशरीन पावणे च्यार मण व तीसा आशरीन पांच मण व सलासीन सव्वासहा मण येणेप्रमाणे माफी व कमधारा करारा करून हे अभय पत्र तुम्हास सादर केले असे तरी उमेदीने कष्ट मशागत करून कीर्द करणे. माफी भरल्यावर पाहाणी होवून आकार होईल त्या प्रे।। चवथाई धारा ईनाम वजा करून बाकी दस्ताची मुलुक शर्त उगवणी करून देवून सुखरूप राहाणे ज्याजती होणार नाही अभय असे छ १९ रमजान

लेखांक : १७७

प्रतिनिधी दप्तर : ता २३ मार्च १८१०

आज स्वारी राजश्री चिंतो वामन सुभेदार तालुके रत्नागिरी ताहा खोत वाडा बासणी मौजे पुसाले कर्यात नवरे सु।। अशर मया तैन व आलफ हुमरोजी बीन कृष्णाजी व बाजी बिन ज्ञानोजी भोले खोत वाडा कालबादेवी का।। मा।र याचे शेत गोताय बसणी येथे आहे. त्याविषयी साल मा।री कृष्णाजी बीन धमोजी भोला खोत याने खटला केल्यामुळे सदरहु शेताचा गला तीराईताकडे अमानत

ठेविला त्यांस मनास आणिता शेत नारोजी व बाजी यांचे वडिलानी कृष्णाजी यांचा वडील विभक्त जाहाल्यावर मेळविले त्यांची बांध बंदिस्त करून लागवडीस आणून आज तारीख अविछिन्न उपभोग करीत आले. कृष्णाजी यांचा वडील व कृष्णाजी गावी असता आजपर्यंत कधीच कज्या केला नाही याप्रमाणे पुरवणीत आले त्याजवरून शेताचा गला तिराईताकडे ठेविला होता तो नारोजी याजकडे देववुन हे ताकीद सादर केली असे तरी सेताचा उपभोग पुर्वेत्रत प्रमाणे नारोजी व बाजी करून सरकार दस्तदेत जातील याजकडुन उगवणी करून घेत जाणे जाणिजे छ. ११ सफर मोर्तबा

लेखांक : १७८

प्रतिनिधी दप्तर : ता. २६ जून १८१०

श्रीमंत राजेश्री पंत प्रतीनिधी स्वामीचे शेवेसी.

विनंती सेवक चिंतो वामन मुक्काम रत्नागिरी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। छ १९ जमा दिलावलपर्यंत वर्तमान यथास्थीत असे विशेष मौजे लाजुळ ता।। फुणगुस येथे करबुडे येथील कुणबी यानी सन सीत तिसेनात शेतीकी केली होती त्याचे थलीचा फडशा जाहाला असता खोत यानी कुणब्यास अडाऊन खत करून घेतले त्यास तिराईत मते रुपये देणे ठरल्यास आपण देवू असा जिमा करबुडेकर खोत यानी घेतला परंतु पंचाईत न करिता लाजुळकर खोत यानी विशालगडकरी शिपाई परभारे कुणब्याकडे पाठवुन तगादा करवीला शिपाई यानी कुणब्याचे पोरास मारामार केली हे कुणबी घरी आल्यावर समजले. तेव्हा कुणबी लाजुळास शिपाई याजकडे गेले. तेथे बोलाबोली होवून कुणबी झिंगल्यामुळे त्याची यांची कटकट जाहाली ये विषयी समजी होत असता शिपाई निघोन विशालगडास गेले. त्यावरून कुणब्यास साठ रुपये मसाला होवुन वरातदार गावी आले. त्यांनी कसर खुलाई शेर सिधा मिलोन शंभर रुपयेपर्यंत घेवुन गेले त्याचे बोलण्यास खोत याजकडून कारकून गेला त्यास तेथे दोनशेहे रुपये खंडाचे लावून मनस्वी तगादा होत आहे म्हणोन समजले. त्यास कुणबी झिंगल्यामुळे शिपाई याजबरोबर कटकट जाहाली ईतक्याचवरून साठ रुपये मसाला होवून शंभर रुपये पावेतो खर्च पडिले असता कारकून बोलण्यास गेला त्यांस तेथे तगादा आणखी

खंडाविषयी होतो ऐशास येथे थलीचा म॥ मनास आणिता बाकी देणे ठरत नाही. परंतु शिपाई याची कटकट जाहाली त्यांचा विचार त्याच आन्वये व्हावा ते न होता कुणव्यापासून ईतका मसाला वगैरे रुपये घेऊन कारकूनास तगादा व्हावा हे चांगले नाही हंगामाचे दिवस या दहशतीमुळे गावातून कुळे परागंदा होऊन लागवड पडणार दुतर्फी आमलात अशी निमित्त्ये ठेवून तगादे करावयाचे असल्यास उत्तम आहे. लागवड पडिल्याने सरकार नुकसानी होईल याजकरिता हल्ली कारकून यास तगादा होत आहे तो मना होवून निरोप व्हावा आणि रयताचे नावे कौल येऊन गावची लागवड होणे ते जाहाले पाहिजे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक : १७९

प्रतिनिधी दप्तर : ता. १४ सप्टेंबर १८१०

राजेश्री बाळाजी लक्ष्मण उपनाम बोरवणकर पतकी व बंदरनीस, बंदर राजापूर गोसावी यास

सेवक भगवंतराव आबाजी प्रतिनिधी नमस्कार सु॥ इहीदे अशर मया तैन व अलफ. तुम्ही हुजूर किले विशालगडचे मुकामी येऊन विनंती केली की कसबा राजापूर येथे श्री देव सोमेश्वर याचे देवालय प्राचीन आहे व नीट करून जीर्णोधार केला. परंतू श्रीचा नैवेद्य नंदादीप पूजा उर्ज्या चालली पाहिजे. याजकरिता स्वामींनी कृपाळू होऊन सरकारातून माही नंदादीपाबद्दल नेमणूक करून दिल्ही पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता तुम्ही सरकारच्या पदरीचे. कसबे म॥री श्री देव सोमेश्वर याच्या देवालय बंदिस्त तीगस्ता करून जीर्णोद्धार केला. त्या सरकारातून काही नंदादीपास नेमणूक करून दिल्ही असता श्रेयस्कर हे जाणोन मौजे बाजी बु॥ ता॥ लांजे येथे श्रीचे नंदादीपाबद्दल नक्त रुपये ९ नऊ नेमणूक करून देऊन भोगवटीयांस तुम्हास हे सादर केले असे तरी सदरहू रुपये नऊ मौजे मजकूरपैकी साल दरसाल श्रीचा नंदादीप चालवीत जाणे. १४ शाबान निदेश समक्ष मोर्तब असे.

लेखांक : १८०

प्रतिनिधी दप्तर : ता. ७ जानेवारी १८११

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री भगवंतराव पंडीत प्रतीनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे–गोपाळ पंतोजी याजकडील (फाटले आहे) सांगलीस जात होता. त्या समागमे हुजुरचे दस्तक होते यैसे असोन आपले कडील जकायेतदार यानी जकायतेचे हाशीलाविषयी सदरहु कडील माणुस किले विशाळगडास नेऊन हासिलाविषयी तगादा केला म्हणून हुजुर निवेदन जाहाले त्यावरून आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी जकायेतच्या हासिला विषयी व हरयेक विषयी तगादा लागो न देता सोडुन देवावे पंतोजी हुजुर चाकरीस आहेत. यास्तव कोणे विषयी तोसीस न लागो देता सोडून देणे विषयी आज्ञा जाहाली असे. तरी सदरहुचे माणसांस सोडून देवावे ये विषयी दुसरे आज्ञापत्राचा अक्षेप न करावा जाणीजे. सु॥ ईहिदे आशर मया तैन व आलफ ११ जिल्हेज बहुत लिहिणे. तरी सुज्ञे असा

लेखांक : १८१

प्रतिनिधी दप्तर : ता. ६ फेब्रुवारी १८११

वेदशास्त्र संपन्न राजमान्य राजेश्री रामकृष्ण भट बिन पांडूरंग भट, वेरुळकर गोत्र मेगाक्ष सुत्र कात्यायन शाखा वाजसनीये उपनाम शुक्ल वास्तव्य क्षेम करवीर यांसी प्रति जानकीबाई प्रतिनिधी नमस्कार सु॥ इसने अशर मया तैन व अलफ. शके १७३३ प्रजापती नाम संवत्सरे माघ शु॥ १२ गुरुवार दिवसी भुमीदान यैसीजे. आमचे पति कैलासवासी आनंदरावजी प्रतिनिधी यांचा काल जाहला ते समई भुमीदान द्यावयाचे ते सांप्रद तुम्हास ठाणे कापसी येथील मुकामी सनद दक्षीणा कुशोदक तीलयुक्त जमीन बिघे तीन मौजे कापसी पां वरून येथे अवल दुपिकी कुलबाब कुलकानू हली पटी व पेस्तर पटी जल तरू काष्ट पाषाण निधी निक्षेप सहीत खेरीज इनामदार व हकदार करून जमीन सदरहु तीन बिघे दिल्ही असे तरी तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने इनाम अनभऊन सुखरूप राहणे. यासी कोणी चालवयास विक्षेप करील त्यास धर्म

शास्त्रवचन प्रमाण. स्वदत्ता पर दत्ता वा ब्रह्मवृत्ती हरतेया।। षष्ठी वर्ष सहस्त्राणी विष्ठया जायते कृमी ।। हे वचन जाणोन इनाम चालवितील छ ११ माहे मोहरम मोर्तब सुद मोर्तब असे.

लेखांक : १८२

प्रतिनिधी दप्तर : ३० मार्च १८११

म।। आनाम कासीराव बिन परबतराव कोकरे देसाई देहे ४१ ता। मलकापूर यांसी भगवंतराव आबाजी प्रतिनिधी सु।। इहीदे अशर मयातैन व अलफ तुम्ही किले विशालगडचे मुकामी हुजूर येऊन विनंती केली की देह येकेचालीस ता। मजकूर येथील देशमुखीचे वतन आपले दरोबस्त त्यास पेशजी आपले वडिलानी नाहावीण बायको ठेविली होती त्याज समई काही जातवाळी पडोन आपले वडील बहुत दिवस परागंदा जाहले. मागे नाहाविणचे पोटी वंश जाहला त्याणे आमचे इतरल्या नाव सांगोन देशमुखीचे वतनाचा अनभव करू लागला. पुढे आम्ही काही दिवसा आम्ही परागंदा होतो ते सरकारात येऊन हजीर होऊन वतन आमचे आम्ही अनभवीत आहो परंतू नाहविणीचा वंश हली म्हादजी नावडा आहे तो वतनापो काही वतनाचा उपभोग करतो अशास वतन दरोबस्त आपले नावडा यास समंध नाही. या करिता स्वामींनी कृपाळू होऊन वतन दरोबस्त आमचे आम्हाकडे चालविले पाहिजे म्हणोन.

त्याजवरून मनास आणिता पेशजी तुमचे वडिलानी नाहावीण ठेवली होती. तिचे पोटी वंश जाहला. त्याणे तुम्ही परागंदा जाहलीयावर. वतनाचा अनुभव केल्यावरून बाबाजी नावडा वतनाचा खटला सांगतो. आणि काही वतनही अनुभवितो आहे. परंतू दरोबस्त वतन तुमचे त्यास वतनास सबंध नाही हे जाणोन तुम्हावर कृपाळू होऊन दरोबस्त देशमुखीचे वतन तुमचे तुम्हाकडे करार करून देऊन भोगवटी यास हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी दरोबस्त वतनाचा अनुभव करून तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने अनभऊन सुखरूप राहाणे छ. ५ रबिलावल निदेश समक्ष मोर्तब

लेखांक : १८३

प्रतिनिधी दप्तर : ता. २८ फेब्रुवारी १८१३

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्ये राजेश्री भगवंत राव पंडीत प्रतिनिधी ता।। मठ देवरू महामूर्ती चरंती व मठ पट्टी व सेव्य व महाजन व समस्त दैव लिंगाईत सिव्रभक्त माहाला नीहाये. सु।। सलास अशर मया तैन व अलफ राजश्री व्रिरुपाक्ष आया आचारपति मठ सिधगिरी श्री काडसिद्ध याणी हुजूर किले विशाळगडचे मुकामी येऊन व्रिनंती केलीजे. लिंगाईत सिवभक्त याजकडून पेशजी सिव्ररात्रीचे व श्रावणमासचे उछाहास नेमणूक चालत होती. ते अलीकडे चालत नाही. ते पुरातन चाली प्रा। द्यावया आज्ञा व्हावी म्हणोन. त्याजवरून तुम्हास हे आज्ञापत्र सादर जाहले असे. तरी पुरातन वैवाटी प्रो देत जाणे छ २६ सपर.

लेखांक : १८४

प्रतिनिधी दप्तर : ता. २८ जुलै १८१३

समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे — आपणाकडून मध घागर येक भरून व हिराच्या झाडण्या सुमार १०० शंभर येणेप्रमाणे हुजुर आणव्रिले तरी आज्ञेप्रमाणे सत्वर हुजूर पाठवून द्यावे जाणीजे आर्बा आशर मयातेन व आलफ. रवाना छ २९ माहे रजेब बहुत लिहिणे तरी सुज्ञे असा

लेखांक : १८४

प्रतिनिधी दप्तर : ता. ७ ऑगस्ट १८१४

श्रीमंत मातोश्री बालाबाई आका निंबाळकर बाहादुर साहेबाचे सेवेसी.

सेवक भगवंतराव आबाजी प्रतिनिधी व्रिनंती येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन करीत असावे. व्रिशेष. मौजे महागाव ता।। अजरे येथील नायकीचे वतन नूतन आपल्यास हुजुरून पाटिलकीचे दाखल्याप्रमाणे करार करून दिल्हे आहे. त्या प्रमाणे पत्र करून देऊन चालवले पाहिंजे म्हणोन समजाव्रिले त्या-

वरून मौजे मजकूरचे नाइकीचे वतन नूतन आपणाकडे करार करून दिल्हे कसे तरी सदरहू नाइकीचे वतन हक व इनाम कानुकायदे सुद्धा हुजूरचे सनदे प्रमाणे तुम्ही व तुमचे पुत्र पौत्रादि वंशपरंपरेने अनुभवीत जावे रा।. छ २० शाबान सु।। खमस अशर मया तेन व अलफ. बहूत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती



लेखांक : १८५

प्रतिनिधी दप्तर : ता. ३ डिसेंबर १८१४

समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी यासी आज्ञा केली ऐसीजे—मौजे मीळ ता।। मलकापुर येथील चौथाई आंबेपटी बाबत रुपये सव्वातेवीस राजेश्री काशीराव कोकरे देशमुख तर्फ मा।र याजकडे देवून पेशजी सनदा सादर जाहल्या आहेत व आपणाकडून चौथाईचा ऐवज हुजुर येत आहे त्यांत साल दरसाल वजा पडला असता हल्ली चौथाई आंबापट्टीचे रुपये विषयी मौजे मजकुरास रोखा पाठवीला आहे. म्हणोन हुजुर विदीत जाहाले त्याजवरून आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी मौजे मजकूरास चौथाईचे सव्वा तेवीस रुपये विषयी वरातदार गेले आहेत त्यासी मना चिट्ठी देऊन उठवून न्याहात्रो आणि रुपये नेले असल्यास माघारे कोकरे याजकडे देवावे फिरोन आज्ञापत्राचा उजुर न धरिता साल दर साल चौथाईचा ऐवज मौजे मा।चा मशारनील्हे कडे देत जावा जाणीजे सु।। खमस आशेर मया तेन व आलफ रवाना छ २० मोह जिल्हेज बहुत लिहिणे तरी सुज्ञे असा.

लेखांक : १८६

प्रतिनिधी दप्तर : १० जानेवारी १८१५

राजमान्य राजेश्री बालाजी सखाराम यासी—आज्ञा केली ऐसीजे-राजेश्री बाजीराव पंडीत प्रधान यांचा मु।। निपाणीस जाहाला आहे त्यास तुम्ही तेथील सरंजाम स्वार व लोका (फाटलेले) निशी सत्वरनिघोन करवीरास येणेविषयी राजेश्री भगवंतराव पंडित प्रतीनिधी यास ही आज्ञापत्र सादर जाहाले आहे. त्याप्रमाणे पुढे स्वार व लोक घेऊन हुजुर येणे आणि प्रतिनिधी यासीही येणे

विषयी सांगणे जाणीजे सु।। सन खमस आशरे मयातेन व आलफ रा।। छ ५ माहे मोहरम बहुत काय लिहिणे

लेखांक : १८७

प्रतिनिधी दप्तर : ता. १० जुलै १८१५

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री भगवंत राव पंडित प्रतीनिधी ता। कमावीसदार मौजे दाभोले ता। देवले सु।।सीत अशर मयातेन व आलफ वेदमुर्ती राजश्री चंद्रशेखर भट माहादेव भट व जीवभट बीन रामभट आठल्ये धर्माधीकारी व उपाध्ये ता। मजकुर यानी हुजुर किले विशाळगडचे मुक्कामी येऊन विनंती केली की, आमचा व सखारामभट बीन गंगाधरभट आठल्ये धर्माधीकारी व उपाध्ये ता। मजकुर यांचा व आमचे तीर्थरूप रामभट यानी मौजे मजकुरी दोनशे कहारीची ईनाम जमीन संपादिली आहे त्याचे विभागाविषयी कजिया लागोन मनसुबी पुणे मुक्कामी राजश्री बाजीराव पंडीत प्रधान याजकडील न्यायाधीश वेदशास्त्र संपन्न राजेश्री बाळशास्त्री दिक्षीत याकडे पडिली. त्यावरून उभयतानी करिणे व कतबे व वर्तणुकेस जामीन देवून पुरसीसाची उत्तरे लिहून दिल्ही व आपले साधनाचे कागदपत्र दाखविले त्यावरून पंचाईत मते मनास आणिता आमचे लिहिण्यातील हाशील की आपले चुलेत वडील रुद्रभट व बाळंभट हे दोघे सखे बंधु व सिंदभट व रामभट व ब्राह्मणभट हे त्रिवर्ग सखे बंधु येकूण पाचजण परस्परे सापत्न बंधु विभक्त होवून रुद्रंभट व बाळंभट व बामणभट हे त्रीवर्ग येकत्र राहिले व रामभट आमचे तीर्थरूप एकटेच वेगळे राहिले. त्यानंतर रामभट यानी विभक्तपणी मौजे दाभोले येथे दोनशे कहारीची ईनामत कैलासवासी संभाजी महाराज यापासून संपादन केली त्यापासून ईनामतीचे भोग्य आमचे आम्हाकडे निर्वेध चालत आले. सीदंभट यानी व बाबणभट यानी समीप असता त्यानी व त्याचे पुत्राही कधीही खटला केला नाही ऐसे असता हाल्ली पंधरा सोळा वर्षे जाहाली सीदंभट याचे नातू नागेशभट व बाबणभट याचे नातु सखारामभट यानी तंटा करून आमची कीर्द पाडिली आहे. त्यास आमचे तीर्थरूप रामभट यानी विभक्त पाच बंधु जाहाल्या नंतर एकट्यानीच दोनशे कहारीची ईनामत मिळविली. त्या ईनामतीत नागेश

भट व सखंभट यांचा संबंध नाही याप्रमाणे पुरवणी करून देवू पुरवणी न जाहाल्यास नागेशभट व सखभट यास सदरहु इनामतीच्या विभाग देवू म्हणोन लिहून देवून येविषयीचे साधनाचे कागदपत्र सुमार ६ साहा दाखविले. सखंभट याचे लिहिण्यातील हांसील की आपले आजे वडील रुद्रभट व बाळंभट हे दोघे सखेबंधू व सीदंभट व रामभट व बाबणभट हे त्रीवर्ग सखे बंधु येकूण पाच जण परस्परे सापत्न बंधु विभक्त होवून रुद्रंभट व बाळंभट दोघे येकत्र राहिले सीदंभट व रामभट व बाबणभट हे त्रीवर्ग येकत्र असता रामभट यानी मौजे दाभोले येथे दोनशे कहारीची जमीन संपादिली. या प्रमाणे पुरवणी करून देवू पुरवणी न जाहाल्यास महादेवभट यापासी दोनशे कहारीचे जमीनीचा विभाग मागणार नाही, म्हणोन लिहून देवून येविषयीचे साधनांस कागदपत्र सुमार दाखविले.

उभयताचे लिहिण्याची व कागदपत्राची चौकशी शास्त्री यानी करून सीदंभट यांचे नातू नागेशभट वगैरे बाबणभट याचे नातू सखाराम भट वगैरे यानी दोनदी कहारीचे ईनामजमिनी संबंध नाही याप्रमाणे पंचाईत मते ठरोन शास्त्री याजकडील निवाड्याची याद व भोगवटी यासी पत्रे व सुभा रत्नागिरी येथील पत्रे करून घेतली आहेत ते व दोनशे कहारीचे जमीनी पुर्वी रुद्रभट व बाळंभट व सीदंभट व रामभट बाबणभट येकत्र असता येकशे छत्तीस कहारीची जमीन संपादिली त्याची चतु:सीमा लागोन जाबता हा मनवता त्या जमीनीचा व रामभट यानी दोनशे कहारीची जमीन विभक्तपणात येकट्यानीच संपादीली त्या जमीनीची चतु:सीमा येक लागोन जाबता येकच जाहला आहे त्यास येक से छत्तीस कहारीचे जमीनीस चतु:सीमा निराळीच लावून पाच विभाग करून रामभट आमचे तीर्थरूप याचा विभाग आम्हाकडे चालवावा. व च्यार विभाग चौघाकडे चालवुन पाच विभागाची चतु:सीमा निराळी निराळी लावून घ्यावी म्हणोन राजश्री चिंतो वामन तालुके रत्नागिरी यास पत्र न्यायाधीश याजकडील घेतले आहे ते पाहोन स्वामीनी कृपाळू होवून भोगवटी यासी पत्रे करून दिल्ही पाहिजेत.

त्यावरून मनास आणिता महादेव भट पुण्यास जावून राजश्री प्रधानपंत याजकडील न्यायाधीशीकडे पंचाईत होवून सीदंभट याचे नातू नागेशभट वगैरे व बाबणभट याचे नातू सखाराम भट वगैरे यांस मौजे मजकूर येथील दोनशे कहारीचे ईनाम जमीनीस संबंध नाही. याप्रमाणे

ठरोन न्यायाधीशी कडील निवाड्याची याद व पत्रे व रत्नागिरीकडील पत्रे व पाचबंधु येकत्र असता येकसे छत्तीस कहारीची जमीन संपादीली त्यांचे व :रामभट यानी दोनशे कहारीची जमीन संपादिली त्याचे चतु:सिमेचा जाबता येकच जाहाला आहे त्यापैकी येकशे कहारीचे जमीनीचे विभाग पाच करून चतु:सीमा निराळी निराळी लावून त्याचे विभाग त्याजकडे चालवावे म्हणोन शास्त्रीचे पत्र सुभा रत्नागिरी येथील मामलेदार यास घेतले ते माहादेव भट यानी आणोन दाखवीले ते पाहोन चंद्रशेखरभट व महादेव भट व जिऊभट यावर कृपाळू होवून सदरहु दोनशे कहारीची जमीन दरोबस्त व एकशेहे छत्तीस कहारी पो पाच विभाग ईनाम चतु:सीमा पूर्वक चालवणे विषयी मौजे मजकुरास हे आज्ञापत्र सादर केले असे तरी सदरहु दोनशेहे कहारीची जमीन दरोबस्त व येकशेहे छत्तीस कहारीचे जमीनी पो पाचवा विभाग चंद्रशेखर भट व माहादेवभट व जिऊभट यास व याचे पुत्र पौत्रादी वंश परंपरेने चालवीत जाणे या पत्राची प्रत लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटीयासी परतोन देणे छ २ रजेब निदेश समक्ष

लेखांक : १८८

प्रतिनिधी दप्तर : ता. १४ आक्टोबर १८१५

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतीनिधी यास आज्ञा केली ऐसीजे—हुजुरची खासा स्वारी किल्ले सामानगड भुदरगडास व्हावयाची आहे याजकरिता आपले कडील सरंजामाची तयारी करणेची आज्ञा जाहाली असे तरी आज्ञेप्रो स्वार व पायदळाची तयारी करून राजेश्री आंताजी माहादेव यासी हुजूर पाठवून द्यावे जाणीजे. सु॥ सन सीत आशर मया तेन व आलफ रा॥ छ १० जिलकाद बहुत लिहिणे तरी सुज्ञे असो

लेखांक : १८९

प्रतिनिधी दप्तर : ता. २५ ऑक्टोबर १८१५

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी यांसी आज्ञा केली येसीजे.

स्वामीचे सेवेसी आपण विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ठ होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला. हुजूरचे सेवेशी पुजेकरिता गाय लहानसर येक पाठविली ती हुजुर प्रविष्ठ जाहाली. आपणास कळावे जाणिजे सु।। सीत आशर मया तेन व आलफ रवाना छ २२ माहे जिलकाद बहूत लिहिणे तरी सुज्ञे असा.

लेखांक : १९०

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १८१५

यादी मौजे तुलसण प्रां।। कराड व मौजे पणुंबरे त।। काले हे दोनी गाव विशालगडाकडे पेशजीपासून चालत होते मधे .... कैलासवासी भवानराव प्रतिनिधी याणी दिकत घेतली त्याजवरून कैलासवासी माधवराव पंडीत प्रधान याचे पत्र नेऊन गाव पूर्वीप्रमाणे चालते करून घेऊन सदरहू गावचा ऐवज आम्हाकडे देत आले, अलिकडे गोखले याचे घालमेलीपासून गाव वहिवाट सरकारात होत आहे. त्यास पेशजी पासून विशालगड तर्फेचे गाव विशालगडाकडे चालविले पाहिजेत. सु।। खमस अशर मयातेन व अलफ.

लेखांक : १९१

प्रतिनिधी दप्तर : ता. ३ जुलै १८१६

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वास निधी राजमान्य राजश्री भगवंतराव पंडीत प्रतीनिधी त।। कमावीसदार देहाये त।। सार्वेड सु।। सबा आशर मयातेन व आलफ चवाण कोकणराव देशमुख मामले हदाबाद तर्फ पांच सुभा दाभोली यापैकी दाजीराव बीन भगवंतराव चव्हाण कोकण राव देशमुख मामले व तर्फ म।। यानी हुजुर किल्ले विशाळगडचे मुक्कामी येवून विनंती केली की, ... अगोदर देशमुखीचे हक्क परभारे रयताकडून आम्ही घेत होतो. शामलाने मना करून आपण वसुल घेवून त्यापैकी काही आम्हास देत असे तेवढेच घेवून होतो. त्याप्रमाणे आंगरे यांचे कारकीर्दीत चालत आले अलीकडे प्रधानपंत यांची कारकीर्द जाहल्यावर आमचे भाऊबंदीचे खटल्यामुळे घेतले नाही नंतर कैलासवासी माधवराव नारायण प्रधान याचे कार-

कीर्दीत सन सीत सबेन मया व आलफेचे साली परभारे रयताकडून हक्क चालते करावे या विषयी कृष्णाजी विश्वनाथ मामलेदार तालुका आंजनवेल याचे सनद घेतली त्यापासून परभारे रयता कडुन हक्क चालत आहे ते सनद व दाखलेचे कागदपत्र स्वामीनी पाहोन त्या आन्वये वतन आम्हांकडे चालवीले पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता देशमुख पुण्यास जावून कैलासवासी माधवराव नारायण प्रधान यांचे कारकीर्दीत वतनाची मोकळीक करून घेवून कृष्णाजी विश्वनाथ मामलेदार किले आंजनवेल यांचे नावे सन सीत सबेनात सनद करून घेतली ते वगैरे दाखल्याचे कागदपत्र आणुन दाखविले आन्वये चवाण कोकणराव देशमुख याजवर कृपाळू होवून देहार्य मजकुरास हे आज्ञापत्र सादर केले असे तरी देशमुख यांचे हक्क सरकार जमाबंदीवर परभारे रयताकडुन दर खंडीस अर्धा मण गला व नक्त जबाबेस दर रुपयास आर्धा आणा प्रमाणे पेशजी तिकडुन मोकळीक होवून चालत आल्याप्रमाणे देत जाणे या सनेदची प्रत लिहूनं घेवून आस्सल सनद चवाण कोकणराव देशमुख याजपासी परतोन देणे छ १ रजेब निदेश समक्ष

लेखांक : १९२

प्रतिनिधी दप्तर : ता. १३ नोव्हेंबर १८१६

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतिनिधी ता।। जयराम बाबाजी व बालाजी लक्ष्मण व सिवराम धोंडदेव जोशी मौजे सोमेश्वर ता।। हरचिरी सु।। सबा अशर मया तेन व अलफ तुम्ही किले विशाळगडचे मुकामी हुजूर येऊन विनंती केली की मौजे मा।री ठिकाण येथे पेशजी खाडी किनारा खाडी गला जमीन पडिली होती. त्यास चिरेबंदी बांध बांधाने भरणी घाळून कुडपाट प्रतीची जमीन तयार केली. त्यास मेहनतीबद्दल पैका मुबलक लागला आणि जमीन थोडकी यास्तव सन सबा तिसेनात येकुणीस साला माफी व माफी भरल्यावर चौथाई धारा इनाम याप्रमाणे रत्नागिरीकडील कौल घेतला. त्यास ठिकाण खाडीचे निस्तावरील पाण्याचा नेट भारी याजमुळे दरसाल डागडुजीस पंचवीस रुपये खर्च लागतात. सन अर्बा अशरात पर्जन्य काली पुराचे व नोदरगतीचे पाण्याचे फुगे भराने पाण्याचे नेटाने माती धुपून जाऊन बांध मोडल्यामुळे शेते नाकीर्द पडले. यामुळे पेशजीचे

बंदिस्तीस पैका लागला. तो व दरसाल डागडुजीस पंचवीस रुपये खर्च लागला. तो व्यर्थ गेला. फेर बंदिस्तीस पैका मुबलग लागणार तो लाऊन बंदिस्त करावी तरी जमीन थोडकी. परंतु आपले शेत वतनी, बंदिस्त न केल्यास या जमिनीत पेशजीचे....शेत आहे त्या सुधा बुडणार याकरिता किरीस्ताव या कडून........ चिरेबंदी बांध बांधवून पेशजीचे कौलातील व आणखी डोंगर खणोन काही नवकीर्द जमीन तयार केली आहे. त्यास दोन खंडीचे हजार रुपये खर्च लागले. त्यावरून रत्नागिरीस जाऊन सदरहू जमिनीचे मोजणीस कारकून आणून जमिनीची मोजणी व जमिनीचा आकार जाहला.

येकूण कुडमट .... जमीन पावणे दोन बिघे दीड पांड यासी मेहनतीस दोनहजार सहाशे एकवीस रुपये खर्च लागेल. त्याचा अजमास पाहोन तिकडून .... सन खामस अशर ता .... सलासीन मया तैन ता। सोळा वर्षाचा व माफी भरल्यावर चौथाई इनाम करार करून देऊन कौल दिल्हा आहे तो स्वामीनी पाहोन त्या अन्वये माफीचा कौल चौथाई धारा इनाम द्यावयाचा करार करून देईन कौल देविला पाहिजे म्हणोन त्यावरून मनासी आणिता ठिकाणी खाडीचे नस्तावरील पाण्याचा नेट भारी यामुळे बांध फुटोन गेला फेरबंदिस्तीस पैका मुबलक लागला. आणी जमीन थोडकी म्हणोन रत्नागिरीकडून कारकून जाऊन जमिनीची मोजणी व खर्चाचा अजमास करून सोळा वर्षे माफी व माफी भरल्यावर चौथाई इनाम द्यावयाचा करार करून कौल दिल्हा तो तुम्ही आणोन दाखविला तो पोहोन तुम्हावर कृपाळु होऊन त्या अन्वये सदरहू जमिनीचा सन खमस अशर तागायेत सलासीन मया तैन तागायत साले सुमार १६ सोळा वर्षे माफीचा कौल देऊन तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी उमेदीने कष्ट मशागत करून शेताची कीर्द माबाजनुरी करणे पेस्तर माफी भरल्यावर-सरकारातून पाहणीस कारकून पाठऊन मोजणी करून दस्ताचा आकार होईल त्याप्रमाणे सरकारातून दस्ताची उगवणी करून दरसाल करून देऊन सुखरूप राहणे. छ. २२ जिल्हेज निदेश समक्ष मोर्तब आहे.

लेखांक : १९३

प्रतिनिधी दप्तर : ता. २२ नोव्हेंबर १८१६

आज्ञा पत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भग-

वंतराव पंडीत प्रतिनिधी ता।। विनायक नारायण व रामचंद्र धोंडदेव मुळ्ये खोत कुलकर्णी मौजे आवाडू बु।। ता।। संगमेश्वर सु।। सबा अशर मया तेन व अलफ. तुम्ही हुजूर मौजे विशालगडचे मुकामी येऊन विनंती केली की आमचा व सिवाजी गोविंद मुळ्ये खोत कुलकर्णी मौजे मा।र याचा मौजे मा।र येथील वडील धाकुटे-पणाचे मानाविसी कज्या लागोन सुभा रत्नागिरीस गेलो तेथे आम्ही करिणा लिहोन दिल्हा त्यातील मा।र की मौजे मा।रची वडीलकी आमची वडीलकीचे मानपान आमचे सिलंगणाची पालखी व जागराचे पोवते व दिपवालीचा दिवा व गावात मातुस्कर भट वगैरे रयता आहेत त्याचे घरचे कार्य प्रथा .... गंध सुपारी व साडी नेसवावयास व आरती वोवाळावयाची व नारळ वाटावयाचे वगैरे मान याप्रा। पुरातन पासोन आमचे आम्हाकडे चालत आले असता अलीकडे शिवाजी गोविंद खोत मौजे मा।र याणी गावची चवथी तक्षीम केल्यास पंच-वीस सवीस वर्षे जाहाली तक्षीम केल्यानंतर तीन चार वर्षानी मानाविसी खटला करोन अडथळा केला. त्यावरून देवलातील कुणबी याचे हातून होऊन मान अमानति खाली आहेत व ब्राम्हण रयताचे घरचे कार्य प्रयोजनाचे मान त्याजकडे आमानत आहेत. त्या माना प्रा। सिमग्याची श्रीची पालखी मात्र पुरातन आम्हाकडे चालत आल्याप्रमाणे चालत आहेत शिवाजी गोविंद यानी तक्षीम केल्याचे अगोदर काही दिवस त्याचा भाऊ बाळाजी गोविंद याचे आंगी थळाचे वारे होते. यामुळे देवस्कीची वहिवाट तो देवकं करीत असे तेव्हा आमचे वडील नारो रंगनाथ याचे पोटांत तीडीक यामुळे हैराण असत. यास्तव बाळाजी गोविंद यांस देवस जागराचे पोवते घालावयास व दिवाळीचा दिवा देवास ओवाळावयास सांगत असत. परंतू त्याचे पूर्वी देवास पोवते घालणे ते व दिपवाळीचा दिवा वोवाळावा तो नारो रंगनाथ वोवाळीत आले असत. व ग्रामस्तास पोवते वाटणे ते गावास कुणबी याणे वाटावे. अगोदर नारो रंगनाथ यांस द्यावे. मागाहून बाळाजी गोविंद यांस द्यावे व दिपवालीचा दिवा वोवाळणे तो अगोदर आमचे वडिलांस वोवाळून नंतर बाळाजी गोविंद यांस वोवाळावा. या प्रा। चालत होते व मातुस्कर भट याचे घरचे मान साल याचे नारळ वाटावया घेत बाळाजी गोविंद याचे हातून काही दिवस वाटविले. येखादे कार्यास आमची घरची बायको तेथे नसल्यावर साडी नेसवावयाची व आरती ओवाळावयाची ते त्याचे बायकोचे हातून चालविले असेल येखादे कार्यास

आमचे वडील तेथे नसल्यास गंध सुपारी त्यास दिली असलेस न कळे सदरहू मानपान लिहून दिले आहेत हे पुरातन कालापासून आमचे या प्रमाणे गावचे सन्मुखे खरे करून देऊ. म्हणोन लेहून देऊन राजनामे व मनसुबीचे वर्तणुकेस जामीन राजश्री निलो विश्वनाथ मुकाम ता॥ ....यांस दिल्हे व शिवाजी गोविंद खोत कुलकर्णी मौजे मा॥र याणी लिहून दिल्हे.

तरी श्री देवास मान द्यावयाचे ते तुम्ही विनायक नारायण यानी देवास देऊन प्रथम मान तुम्ही पुरातन पासून घेत आल्या प्रमाणे घेऊन मागाहून बालाजी गोविंद याचे चिरंजीव बाजी बलाल यास देऊन नंतर उभयतांचे घर भाऊबंद गावकरी यांस देत जावे व गावात रयताकडून कार्य प्रमाणे मानपान वडीलकी समंधे येतील ते पुरातन चालीप्रमाणे तुम्ही विनायक नारायण घेऊन उभयतां तुम्ही व शिवाजी गोविंद वहिवाट चालवून सुखरूप राहोन सिवाजी गोविंद यानी सर्व मानपान आपले वडीलकी समंधे म्हणोन वादा .... ते खोटे जाहले. सबब रुपये ५ पाच घेऊन तुम्ही वडीलकीचे मान खरे जाहलेत सबब हरकी रुपये १५ पंधरा ते पोती जमा:असत छ. २ मोहरम निदेश समक्ष मोर्तब असे.

लेखांक : १९४

प्रतिनिधी दप्तर : ता २४ फेब्रुवारी १८१७

अभयपत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडीत प्रतीनिधी ता॥ मोकदामानी मौजे माहागाव ता॥ आजेर सु॥ सबा अशर मया तेन व आलफ मुकुंद पाटील व शंकराजी आपाजी यानी हुजुर किल्ले विशाळगडचे मुकामी येवून विदीत केले की, मौजे मजकुरावर सामानगडकरी यानी स्वारी करून टोळी धरून नेल्या आणि गाव जाळून लुटून खराब केला टोळीचे मोकळीके बाबत खंडणी घेवुन रयत तजावजा जाहाली ऐसीयांस स्वामीनी कृपाळू होवुन तीन साला पडीचे माफीचा कौल दिली या रयतेस धीर भरवसा देऊन रयत गावी आणुन घरे दारे बांधोन कीर्द माहामुरा करून म्हणोन त्यावरून मनास आणिता सामानगडचे कसाल्यामुळे गावची खराबी जाहाली कौल दिल्याबिना निभावणी व्हावयाची नाही हे जाणोन तुम्हावर

कृपाळु होऊन आवांतर पट्टी खेरीज करून साल मजकुरा पासून तीन साला पट्टी माफ करून तुम्हांस हे आज्ञा पत्र सादर केले असे तरी तुम्ही बेवसवसा गावी येवुन कीर्द माहामुरा करून सुखरूप राहाणे मुलुक शर्त सरकार वसुलांची उगवणी करून देत जाणे. ज्याजती जलाल होणार नाही शक न धरणे अभय असे छ. १ रबिलारत्रर

लेखांक : १९५

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १८१७

यादी श्री........स नवरात्राबद्दल नवसीक एक साली सु॥ सबा अशर-मया तैन व अलफ शके १७३८

श्री श्री आउंद

श्री मूलपीठी

१ नऊ दिवस सप्तशती साधे आवर्तन दररोज एक प्रमाणे करीत जाणे

१ नऊ दिवस पंचामृत पूजा व रुद्राभिषेक आवर्तन येक व श्री सूक्त आवर्तन येक प्रमाणे करीत जाणे

१ नऊ दिवस पूर्णाचा नैवेद्य

१ विडे धरून दोन सुपाऱ्या व दहा पाने प्रमाणे.

१ दररोज पुजेस साहित्य असावे.

गुलाल दररोज तोळा १ बुका दररोज तोळा १ उदबत्त्या दररोज येक तेल चमेली दररोज तोळा १ लवंगा दररोज ५ वेल दोडे ५ प्रमाणे कापूर अर्धा तोळा प्रमाणे कुंकू दररोज अर्धा प्रमाणे. सेंदुर दरयेक मासा प्र॥

१ नवमीचे दिवशी जायफळ

१ नऊ दिवस पूजा होईपर्यंत तुपाचा दिवा असावा. नंदादीप आहेच.

१ नवमी दिवशी नारळ येक ·॥· दक्षणा नवमीचे दिवशी वरखाली लोकांस दररोज नऊ रोजा हरबरे सवा सेर प्रमाणे सवासनी नऊ दिवस आ॥ दोन

१ भोजन १ हळदी कुंकू

१ विडे ·॥· नऊ दिवसाची

२ नवमीचे दिवशी नारळाने ओटी दक्षणा भट ।· प्रमाणे येणे प्रमाणे

समाराधनेचे दिवशी ब्राह्मण सुवासिनीस दक्षणा दर आसामीस येक पैसा प्रमाणे देत जाणे

लाकडे पान पत्रावली वगैरे लागेल त्याची याद घेऊन देणे

दोहोकडे दोन ब्राह्मण अनुष्ठानास लागतील त्यास नऊ दिवस भोजन व विडे देत जाणे

नवमीचे दिवशी

१ समाराधना

१० ब्राह्मण

५ सवासनी

१ गोंधळ

१ समाराधनेस भोजन पुरण पोल्या व दोन भाज्या कडी सांबारे वरण भात तूप तिखट लोणची वगैरे व विडे देणे

सदरहू लिहिलेप्रमाणे यथासांग करून त्रिकाल प्रार्थना करीत जाऊन दसरा जाहलियावर खर्चाची याद आकारून श्रीचा प्रसाद अंगारा घेऊन गडास येणे म्हणजे यैवज द्यावयास येईल म्हणोन पत्र वो॥ चिंतामण भटजी पुरोहित वास्तव्य औंद यास

लेखांक : १९६

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १८१८

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधी ता। मुसलमान खुजाजमात गावगना ता। पावस सु॥ समान अशर मयातेन व अलफ काजी आमद वलद काजी हशम व काजी हुसेन वलद काजी महंमद व काजी ईस्माल वलद काजी आली ता। मा।र व मौजे गावखडी ता। लांजे यांचा व काजी पाल हजरत वलद काजी दाऊद व काजी हुसेन ऊर्फ काजीबा वलद काजी हसन व काजी अबदुला रजाक वलद काजी अबदुला काजी ता। मा।र पैकी मौजे गावखडी ता। लांजे याचा वडीलकीने मान

पाना विषयी कज्या होता त्याच्या मनसुब्या होऊन काजी आमद यांचे घराण्याकडे वडीलकीचा मान चालावा याप्रमाणे सरकारची आज्ञा पत्र व समजी पत्रे जाहाली परंतु काजी रजाकाचे ममतेतील कोणी आहेत त्या कडील कज्या सरकारात करून आपण चालवितो त्याजवरून काजी हबीब रत्नागिरीस जाऊन काजी रजाक याकडून गुन्हेगारी घेववून वडीलकीचा मान काजी आमद याचे घराण्याकडे चालत आल्याप्रमाणे चालवणे विषयी ताकीद आणिली त्या आन्वये भोगवटी यासी आज्ञापत्र सादर जाहाले पाहिजे म्हणोन काजी हबीब हुजूर येऊन विनंती केली त्याजवरून मनास आणिता काजी आमद यांचे घराण्याकडे वडीलकीचा मान चालावा येविशी पेशजी निवाड पत्रे जाहाली असता काजी रजाक आपले ममतेतील कोणी आहेत त्यास फ़िसात करून काम चालवितो व आपले घरास कोणी न बोलविता आपले घरचे काम चालवितो. हे जाणोन त्यापासून गुन्हेगारी घेऊन वडीलकीचा मान काजी आमद याचे घराण्याकडे पुरातन चालत आल्याप्रा चालवणे विषयी तुम्हास हे आज्ञापत्र सादर केले असे तरी वडीलकीचा मान पुरातन चालत आल्याप्रमाणे काजी आमद याचे घराण्याकडे देणे जाणे नीदेश समक्ष मोर्तबा असे

लेखांक : १९७

प्रतिनिधी दप्तर : इ. स. १८१४

कौल नामा अज स्वारी राजश्री चिंतो वामन सुभेदार तालुके रत्नागिरी ता। जयराम बाबाजी व बालाजी लक्ष्मण व शिवराम धोंडदेव जोशी मौजे सोमेश्वर ता। हरचेरी सु॥ खमस अशर मयातेन व आलफ दिल्हा कौलनामा ऐसाजे ....तुम्ही सुभा येऊन विनंती केली की, मौजे मजकुरी आमचे ठिकाण पाडा येथे पेशजी खाडी किनारी खाडी गर्क जमीन पडिली होती त्यास चिरेबंदी बांध बांधोन भरणी घालून कुड्याट प्रांत जमीन तयार केली आणि मेहनतीबद्दल सन सबा तिसेनात येकूणीस साला माफी व माफी भरल्यावर चौथाई धारा इनाम याप्रमाणे कौल घेतला त्यास ठिकाण खाडीचे नेस्तावरील पाण्याचा नेट भारी याजमुळे दरसाल डागडोजीस वीस पंचवीस रुपये लागतात. साल गुदस्त सन आर्बा अशरात प्रजन्य काली पुराचे पाण्याने फुगे भरोन पाण्याचे नेटाने माती धुपोन

जाऊन बांध मोडोन गेल्यामुळे शेत नाकीर्द पडिले पेशजीचे बंदिस्तीस पैका लागला तो व दरसाल डागडोजीचा ऐसा व्यर्थ गेला फेर बंदिस्तीस पैका मुबलगा लागणार तो लावून बंदिस्त करावी तर जमीन थोडकी परंतु आपले शेत वतनी बंदिस्त न केल्यास या जमिनीत पेशजीचे दस्ती शेत आहे त्यासुद्धा दरोबस्त बुडणार याजकरिता करीस्ताव याजकडून पक्का मजबुद दुहेरा चिरेबंदी बांध बांधवून पेशजीचे कौलातील व आणखी डोंगर खणोन काही नाकीर्द जमीन तयार केली आहे त्यास दोन अडीच हजार रुपये खर्च लागले. अैशास स्वामी कृपाळू होऊन मेहनती अन्वये माफी व चौथाई धारा इनाम दिल्हा पाहिजे म्हणोन त्याजवरून मनास आणिता ठिकाण खाडीचे नेस्तावरील बांधास पाण्याचा नेट भारी याजमुळे बांध फुटोन गेला त्याचे फेर बंदिस्तीस पैका मुबलग लागला आणि जमीन थोडकी हे जाणोन मेहेनती बद्दल माफी व चौथाई इनामाचा कौल ध्यावयाकरिता चौकशीस सुभाहून राजश्री बाळाजी माहादेव कारकून गावी पाठवून जमिनीची मोजणी व मेहनतीचे खर्चाचा अजमास करून आणविला एकूण कुड्याट जमीन पावणे दोन बिघे दीड पांड यासी मेहेनत दोन हजार साहाशे येकवीस रुपये खर्च लागला त्यास जमीन थोडकी आणि मेहनत भारी हे जाणोन मेहेनती बद्दल माफी ईस्तकबील साल मजकूर ता। सन सलासीन मयातेन साले सुमारे १६ व माफी भरली यावर चौथाई धारा इनाम ध्यावयाविषयी हुजूरची सनद छ. १६ रबीलाखर सन सीत समानीनची सुभा सादर जाहाली. तेथे आज्ञाने जंगल गर्क जमिनी पो कुड्याट प्रतजमीन तयार करितील त्यास दर बिघा तीन च्यारशे रुपये व दर्यागर्क जमीनी आहेत त्या पो खाजण नोबंदिस्त तयार करितील त्यास तकवीयात कौल देवून जमीन तयार करवणे त्याची माफी भरोन दस्त जमा येणे त्या पो चौथाई धारा इनाम द्यावयाचा करार करून मोजणी जाबता व बखेर हुजूर पाठवून देणे मनास आणून इनाम पत्रे करून दिल्ही जातील म्हणोन आहे त्या अन्वये तुम्ही मेहनत केलीत सबब चौथाई धारा इनाम द्यावयाचा करार करून दिल्हा असे सदरहू चौथाई धाऱ्याची इनाम पत्रे हुजुरून करार ध्यावयाबद्दल मोजणी जाबता दिली जाईल येणे प्रमाणे करार करून देवून हा कौल तुम्हास सादर केला आहे तरी उमेदीने कष्ट मशागत करून शेतकीर्द माहामुरा करणे पेस्तर माफी भरली यावर जमिनीची मोजणी करून आणवून आकार होईल त्या पैकी चौथाई धारा इनामाचा

वजा करून बाकी दस्ताची उगवणी करून देवून सुखरूप राहाणे कोणे बाबे शंक अंदेशा न धरणे जाचणी जलेल होणार नाही. कौल असे जाणीजे. छ २६ जमादिलाखर

लेखांक : १९८

प्रतिनिधी दप्तर : ता. २४ जून १८१८

बेहाडा ठराव सरकार स्वारी राजश्री पंत प्रतिनिधी सु।। तीसा अशर मया तैन व अलफ ठाणे महागाव ता।। अजरे येथील मामलत साल मजकुरा पासोन तीन साल राजश्री रामराव नरसिंह याजकडे सांगितली त्या संमंधे ठरावाची कलमे बी तपशील

जमाबंदी ठराव रुपये १०९७ ऐन जमा

४३३। बिघावणी
७३ सरदेशमुखी
३९ श्रीलक्ष्मीपटी
१६ घरटका
२८४।। इनामपटी
१२५।। मोहतर्फा
१०७।।। आडाणी
१८ वाणमहिषी

१०९७

६८१ सीवाय जमा
३५० जकात
९० कलाल खोती
६ पत्र लोणी
२०० प्याद्याच्या असाम्या दूर केल्या त्या बाबत यैवज जमा
३५ किरकोळ वेट

९२०।।।≡ जिराईत जमा हक तेरीज गला हर जिनसा पैकी
२१३।।। वजनी गूळ रवे ९० दर मणे २।= प्रमाणे

२९१२।।≡
२०११ पट्या २ येकूण पटी आकार यैन जमा १०९७ रुपये पै।। वजा पटी धरावयाची नाही. लक्ष्मी पटी व घर टका १६ वाणमहिषी १८ व अडाणीपैकी रुपये १८।। येकूण रुपये ९१५ बाकी १००५।। रुपये येकूण दुपट पटी रुपये आकार

४९२३।।=

२५० शेरी निसबत राजश्री रामराव
नरसिंह
७३५ खंड पैदास्त व कसर व पाट
दम वगैरे

५९०८॥≡
२५ ताग कापूस येरंड्या

५९३३॥≡
पैकी वजा
३४० हकदार अजरेकर ठाणे बाबत
वगैरे
२०५ ठाणे बाबत
७५ तीर्थवाडी
मौंजे मजकूर ६० सरदेशमुखी
५० १०

३४०
४१९ गाव निसबत
२५ मुशाहिरा कुलकर्णी
२६२ सादिलवार
१३२ श्री देव महाकाली व
लक्ष्मी येक साल आड
जत्राखर्च अजमासे
रुपये २६४ पैकी दर
साल निमे
१७२ लोकसनदे यांस सालाबाद ६६
घोंगडी दर असामीस रुपया
येक १ प्रमाणे ६६
सण दसरा
४ चार सण
४५० वेतन
४०० मामलेदार राजश्री राम-
राव नरसिंह
३०० खुद वेतन
४८ पोरगे आ॥ २
२८ आबदा गिऱ्या
२४ मशालजी

४००
५० येसाजी श्रीनिवास कार-
कून यांस
३६ प्यादे

१४१७
बाकी वसुली रुपये ४५१६॥≡
वजा जप्तीस आला सबब बेहड्यास
दरसाल कमी कलमे
१००५॥ पठ्या २ येकूण सदरी जमा
रुपये २०११ पे॥ निमे सोड
३६१ खंड कमावीस सदरी
जमा रुपये ७३५
बाकी वसुली करार ३१५०८≡ रुपये
यांसी खिस्ती रुपये
५०० अश्वीन अखेर नवरात्र रसद
५०० कार्तिक अखेर नवरात्र रसद

१०००
५५० पौष अखेर
५५० माघ अखेर
५२५ चैत्र अखेर
५२५८≡ ज्येष्ठ अखेर

३१५०८॥
येकूण दरसाल साडे येकतीससे रुपये
तीन आणे प्रमाणे तीन साल रसद
भरणा करीत जाणे कलम १

ठाणे मजकुरी सिबंदी संमंधे चाकरमाने लोक असामी ६६ यांचे हजरीची याद अलाहिंदा आहे त्याप्रमाणे लोक याची चाकरी घेऊन ठाण्याचा बंदोबस्त राखणे कलम १

मौजे मजकुरी वतनदार व ब्राह्मण वगैरे याच्या इनामती पेशजी पासून चालत आहेत. त्याची याद आलाहिंदा आहे. त्याप्रमाणे चौकशी होऊन चालविले जाईल. कलम १

फडफर्मास वलबे वगैरे जिन्नस सालाबादप्रमाणे हुजूर पाठवीत जाणे. कलम १

सरकारांत कारण लागल्यास 'प्यादे लोक पाठवीत जाणे शिरस्ते प्रमाणे पोटगी देविली जाईल. कलम १

दंग्यामुळे सिबंदी ज्याजती ठेवावयाचे कारण पडिल्यास जदीद पन्नास असामीपर्यंत लोक येक महिना ठेवणे यांचा रोजमुरा तुम्ही देणे. व पुढे जाजती ठेवणे पडिल्यास रोजमुरा सरकारातून अजमासने मजुरा देविला जाईल. लोक सरकार आज्ञेने ठेवीत जाणे. कलम १

इमाने इतबारे सेवा चाकरी करून ठाण्याची रखवाली करीत जाणे कलम १

सन सबा अशर मया तेनचे सालची रुजुवात करून कचे वहिवाटीचा हिशेब समजोन देणे कलम १

सामानगडास खंडणी पडली. त्याचे भरण्याची याद साडे आठ हजाराची तुम्हा पासी दिली आहे. त्यापैकी तेवीशेनवद रुपयाचा भरणा सरकारातून जाहला होता. त्याचा उलगडा व्याजबटा सुधा तुम्ही करून दिल्हा बाकी येसाजी श्रीनिवास याचे विद्यमाने सावकारी देणे त्यापैकी खंडणीचे यैवजी गावाकडून वसूल येसाजी श्रीनिवास याजकडे पोहोचला असेल तो वजा होऊन सावकारी हिशेब व्याज सुधा करून बाकीचे यैवजाचा उलगडा तुम्ही करून देणे व गावातील खंडणीचे खतापैकी बाकीचे यैवज राहिला असेल तो खताप्रमाणे तुम्ही वसूल करून देणे व साडे आठ हजाराच्या खताखेरीज सिधे खर्च वगैरे खंडणी संमंधे वाजवी पडला असेल तो येसाजी श्रीनिवास व व तुम्ही मिलोन गावाकडून साधून घेणे कलम १

मृगा अलीकडे खंड पैवस्त व साल मजकुरी वसुलाचा यैवज सरकारात आला असेल त्यापैकी ठाणे निसबत खर्च वजा होऊन मजुरा देविला जाईल. कलम १

राजश्री सखो केशव याचे विद्यमाने गुदस्ता सामानगड मुकामी हुजुरची स्वारी खर्चाची मखलाशी होऊन यैवज देणे पडिला. त्याचा दस्ता यैवज

गावकर याचा सखो केशव याजपाशी असेल त्याप्रमाणे गावाकडून उलगडा करून घेतला जाईल. कलम १

सरकार पागेची घोडी तेथे राहतील त्यास कुरणापैकी वैरण घेऊन निगा-रास्त राखणे. चंदी सरकारातून देविली जाईल. कलम १

येकूण कलमे बारा करार करून दिल्ली असत. येणेप्रमाणे वहिवाट करणे आप्त फिसरत जाहलिया विलायत शर्त मजुरा देविली जाईल. मामलतीची तीन सालात घालमेल होणार नाही. छ १९ शाबान निदेश समक्ष

लेखांक : १९९

प्रतिनिधी दप्तर : ता. ५ ऑगस्ट १८१८

आज्ञापत्र राजश्री पंत प्रतिनिधी ता मोकदमानी देहाये

१ मौजे कापशी पैकी वारुण	१ मौजे चावटे प्रां शिराळे	१ मौजे डोणोली प्रं॥ सिराळे
१ मौजे गोंडीली प्रां वारुण	१ मौजे सांडोली प्रां सिराळे	१ मौजे भेंडसगाव प्रां वारुण
१ मौजे उकलव प्रां वारुण	१ मौजे टुकोली तो मलकापूर	२
३	३	

एकूण आठ ८ गाव

सु॥ तिसा अशर मया तैन व अलफ मौजे मा॥री तीर्थस्वरूप मातुश्री वहिनीबाई या कडोन देव ब्राह्मणास व अनछत्राकडे इनाम धर्मादाय जमिनी वगैरे दिल्या व पुढे देतील ते दरोबस्त चालवीत जाणे अक्षेप न घेणे छ २ शावाल निदेश समक्ष

लेखांक : २००

प्रतिनिधी दप्तर : ता. २९ जुलै १८१९

आज्ञापत्र समस्त राजकार्य धुरंधू विश्वासनिधी राजमान्य राजश्री कृष्णाजी परशराम प्रतिनिधी ताहा मोकदमानी मोजे परले निनाई तर्फ मलकापुर सु॥

तीसा आशर मया तैन व आलफ. राजश्री चिमणाजी बलाळ व प्रलादजी बलाळ यानी राज्यामध्ये येक निष्ठेने वर्तणुक स्वामी सेवा केली व पुढेही करावयाची उमेद धरिताहेत आणि कुटुंब वत्सल याचा योग क्षेम चालला पाहिजे याकरिता यावरी कृपाळु होवून मौजे मजकुर पा। नुतन ईनाम कुल बाब कुल कानु खेरीज हकदार व ईनामदार करून पड जमीन बिघे तीस. भात रोप जमीन ६८० .... वरकस जमीन ६८० येकूण तीस बिघे जमीन देवून अलाहिदा देशाधीकारी यांचे नांवे पत्र सादर केले आहे. त्याप्रमाणे सदरहु जमीन देऊन चतु:-सीमा करून देवून याचे पुत्र पौत्रादी वंशपरंपरेने चालवीत जाणे. नवीन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची प्रती लिहुन घेवून अस्सल पत्र भोगवटे यांस जवळी परतोन देणे. जाणीजे छ २ रबिलारवर नीदेश समक्ष मोर्तबा असे.

लेखांक : २०१

प्रतिनिधी दप्तर : ता. १६ एप्रिल १८१९

कारिणा जबानी बाजी सावंत व केदार सावंत मौजे कोलेवाडी ता। देवले सु॥ अशरीन मया तेन व आलफ सेवेशी लिहून दिली जबानी असीजे श्री देव केदारलिंग मौजे मार यांची पालखी कुणबी घेवून केळवलीस जात होते. तेव्हा आम्ही त्यास पुसीले जे पालखी घेवून तुम्ही कोणी कडेस जाता त्यास त्यानी उत्तर केले की, रा॥ बालाजीपंत याजकडे घेवून जातो त्याजवर आम्ही बोलिलो की बाळाजीपंत हे कोण न्यावयाचे निमित्त्य काय त्यानंतर कुणबी यानी उत्तर केले तुम्ही वारंवार विचारिता त्यावरून आजही तुम्हासी सांगावे अथवा पुढेही सांगणे प्राप्त आहे. त्यास बाळाजी पंत खोत म्हणोन नेतो. हे समजून आम्ही कुणबी यास दुराई दिली की, त्याजकडे न्यावयाचा संबंध काय हे ऐकोन घेवून कुणबी बोलिले जे आजपासुन खोत खरा किंवा खोटा हा निवाडा केल्याशिवाय राहाल तरी तीच दुराई तुम्हास आहे या करिता शेवेशी विनंती केली त्याजवरून आज्ञा जाहाली की, करिणा लिहून देणे त्यास जाहाली जबानी लिहुन दिली असे हा करिणा लिहून दिला सही छ १ जमादिलारवर सदरहु मजकुरास संभाजी चंदुरकर साक्षीस ठेविला आहे तो सत्त्योत्तर सांगेल त्यास आम्ही मान्य आहो हे लिहून दिले.

लेखांक : २०२

प्रतिनिधी दप्तर : ता. २५ जानेवारी १८२०

समस्त राजकार्य धरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री माधवराव पंडीत प्रतिनिधी यांसी आज्ञा केली ऐसीजे. मौजे पिसवी ता॥ सातवे येथे श्री चा बाजार भरत असतो. त्या गावास आपणाकडून लोक येऊन गाव अगदी खराब केला व हली दावेमुळे खराब जाहला सबब हुजूरने जकायेतिचा हासील माफ केला असे. तरी आपणही ठाणे मलकापूरचे आमलदार आहेत त्यास ताकीद करून बाजाराचे जकायेतिविसी उपद्रव न लागे यैसे करावे व मौजे म॥रचे व गावकर यासी ठाणे मलकापुरचे बाजारास गेले असता जकायेतीविसी व हरयेकविसी उपद्रव न लागे यैसे करावे जाणिजे सु॥ इहीदे अशरीन मया तैन व अलफ रा। छ ८ माहे रबिलारवर बहूत लिहीणे तरी सूज्ञ असा.

लेखांक : २०३

प्रतिनिधी दप्तर : ता. १ डिसेंबर १८२०

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री माधवराव पंडीत प्रतिनिधी याणी अजम महमद इब्राहीम परकार........मुकादम यासी सु॥ इहीदे अशरीन मया तैन व अलफ. गावगना ता। देवले येथील हाबशी पटीचा व मौजे सिलपे भोवडे ता। देवले घेरा किले विशाळगड येथील अमली यैवज रत्नागिरीकडे द्यावयाचा त्याचा मक्ता पुरातन पासून चालत आहे. त्याप्रमाणे अजम बाहादर यांच्या अमलापासून तीन वर्षे मक्ता चालत आला. मक्त्याअन्वये वसूल खिरस्तीस रत्नागिरीस पोचत असता साल म॥री गावगनाकडून परभारे वसूल घेऊन यैवज जमा करण्याविसी माहालकरी ता। देवले यासी राजश्री बाजी बलाल सर कमाविसदार याणी ताकीद केल्यावरून हली गावगना तगादा लागला आहे व नक्त बाबेचे पाहणीस देवळे माहाली कारकून आले आहेत. त्याकडून हरदुगावचे पाहणीविसी निकड लागली आहे. अशास घेण्याचे गांव तेथील पाहाणी आजपर्यंत कधीही जाहाली नाही. इकडील अमली ऐवज येणे त्याचे मक्ते सदरहू मक्त्याप्रमाणे तालुके रत्नागिरी येथे मौजे करबुडे ता। केलपे

माजगांव येथील व ताा सावर्डे तालुके अंजनवेल येथील सावगावचा व वर घाटी वारूण माहाली सावगाव प्रचीतगड घेण्यात आहे तेथील यैवज पुरातन मक्त्या प्रमाणे वसूल येतो. जाजती होत नाही. याप्रमाणे पहिले दाखले आहेत. राजेश्री प्रधानपंत यांचे कारकीर्दीत तहनामा जाहला. त्याची तालीक राजश्री सदासीव भिकाजी या समागमे पाठविली आहे. हे पाहोन मक्त्याप्रमाणे वसूल घेण्याविसी सदर कमावीसदार यांस पत्र व नक्त बाबेचे पाहणीस कारकून आले आहेत. त्यांस मनाई घेऊन पाठऊन देणे. वरघाट मौजे अणसकुरा व तलघाट मौजे येरंडब ताा राजापूर येथील जकायतीचा अमल तलघाटी दरोबस्त व वरघाटी चौथाई याप्रमाणे पहिल्या पासून आहे. तो घाट रहदारी चालत आहे. असे असता मौजे काजिर्डा ताा राजापूर येथील घाट उघडून रहदारी करावयाविसी मालवणहून पत्रे येऊन घाट नीट करीत आहेत. म्हणोन समजण्यात आले. अशास काजिर्डा घाट उघडिला असता अणसकुऱ्या घाटाचे रहदारीस कमती पडोन इकडील अमलास नुकसान पडोन यैवजास हिसका येतो. यास्तव अणसकुरा घाटाचा मार्ग चालावा. काजिर्डाघाट चालण्याचा असल्यास तलघाटी दरोबस्त इकडील अमल व वर घाटी चौथाई याप्रमाणे अमल बसोन घाटं चालावया प्रमाणे होऊन पत्र घेऊन पाठविणे. वरकड इकडील कामकाजाचे मार राजश्री सदासीव भिकाजी बोलतील त्या प्रमाणे बंदोबस्त करून घेऊन लेहून पाठविणे तेरीख छ. २४ सपर जहादा काय लिहिणे हे किताबत

लेखांक : २०४

प्रतिनिधी दप्तर : ता. ६ जानेवारी १८२१

आज्ञापत्र राजेश्री पंत प्रतीनिधी ताहा मोकदमानी मौजे सितुर पो वारुण सु॥ ईहिदे आशरीन मया तेन व आलफ मौजे मजकूर पो वतन सरदेश कुल-कर्णाचे हक्काचे तुप वजन दाहाशेर आणविले असे जलद पा॥ देणे या कामास लोक नी॥ पागा पाठवीले त्यास मसाला रुपये चवल आदा करणे छ १ रबिलारवर

लेखांक : २०५

प्रतिनिधी दप्तर : ता. ७ मे १८२१

राजेश्री विठल सदाशिव मामलेदार पेटा खानापूर यासी आज्ञा केली

असीजे राजश्री माधवराव विशालगडकर यानी अजम ग्रँट साहेब बाहादुर यांस पत्र पाठविले की आम्हाकडील गाई व म्हसरे पेटा मजकुरी सालाबाद प्रमाणे चरणीस येतात. त्यास पाहणीविसी साल मजकुरी उपद्रव लागला आहे. म्हणून त्याजवरून हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी पेशजी पासून गाई व म्हसरे चारणीस येत असतां पाहणीविसी साल मजकुरी उपद्रव लागला असल्यास मना करविणे जाणीजे. छ. ४ साबान सु।। इहीदे अशरीन मया तैन व अलफ

लेखांक : २०६

प्रतिनिधी दप्तर : १० जून १८२१

